२९५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
सं. नं. 239






# ऊब आणि गारठा



शशिकांत पुनर्वसु



REFBK-0009747
REFBK-0009747



ऊब आणि गारठा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलक्रम.
अनुक्रम 23030 वि: 31-5-91/21
क्रमांक 231 नों: दि: 28/3/58

## याच लेखकाचीं इतर पुस्तकें

संध्याकाळच्या सांवल्या

शांति

पुष्करिणी

संधिप्रकाश

# ऊब आणि गारठा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23030 दि:
क्रमांक 237 नों दि:

कै. शशिकांत पुनर्वसु

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
शाखा

REFBK-0009747

मौज प्रकाशन [प्रायव्हेट] लिमिटेड

किंमत चार रुपये

मौज प्रकाशन : २६

प्रथमावृत्ति :
विजयादशमी, १८७९
[ ३ ऑक्टोबर, १९५७ ]

या आवृत्तीखेरीज इतर सर्व हक्क
श्रीमति कमला भडभडे यांचे स्वाधीन

प्रकाशक :
**वा. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23038 वि: 25-4-91.
क्रमांक 2297 नों: दि: 


| | |
|---|---|
| ★ प्रास्ताविक | सात |
| ★ हिमालय-प्रवासांतील स्मृति : १ : | १ |
| ★ हिमालय-प्रवासांतील स्मृति : २ : | २१ |
| ★ हिमालय-प्रवासांतील स्मृति : ३ : | ३६ |
| ★ कर्नाटकांत | ५१ |
| ★ अठरा वर्षांपूर्वी | ७० |
| ★ चंद्रभागेच्या वाळवंटांत | ८४ |
| ★ धन्य कारवार | ९५ |
| ★ मंगेशीच्या परिसरांत | १०९ |
| ★ सारनाथ आणि बनारस | १३५ |
| ★ ऊब आणि गारठा | १४७ |

प्रस्तुत संग्रहांतील प्रवासचित्रें सत्यकथा मासिकाऱ्या पुढील अंकांतून अनुक्रमें प्रसिद्ध झालीं होतीं : सप्टेंबर १९५०; ऑक्टोबर १९५०; डिसेंबर १९५०; फेब्रुवारी १९५१; मे १९५१; मे १९५२; जून १९५२; नोव्हेंबर १९५२; डिसेंबर १९५४; मे १९५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23030 वि: ......
क्रमांक 239 नों: दि: 29/3/86

# प्रास्ताविक

या पुस्तकाची प्रस्तावना मी लिहावी असें सुचविण्यांत आलें आणि मीं तें मान्य केलें तेव्हांच हें कार्य सोपें नाहीं याची मला जाणीव होती. प्रथितयश साहित्यिक अथवा मर्मज्ञ टीकाकार अशा कोणी तरी प्रस्तावना लिहावी असा संकेत आहे; वाचकांचीहि अपेक्षा बहुधा तशीच असते. साहित्य हा माझा प्रांत नव्हे. केवळ परिचयात्मक लिहावयाचें तर आज पुनर्वसूंच्या पुस्तकाला तशा प्रास्ताविकाची मुळींच आवश्यकता नाहीं. व्यक्तिचित्र लिहिण्याकरितां आत्मीयते-बरोबर एक तऱ्हेची अलिप्तताहि असावी लागते. भडभड्यांचें जीवन, त्यांचे स्वभावविशेष, आशा, आकांक्षा आणि निराशाहि मीं गेलीं कित्येक वर्षे त्यांच्या इतका समीप उभा राहून पाहिलीं आहेत कीं, त्रयस्थाची भूमिका मला प्रयत्न करूनसुद्धां घेतां येणार नाहीं. चित्रविषयाच्या अगदीं संनिध उभें राहून वास्तव चित्र काढणें सोपें नसतें. त्यांचा माझ्याशीं गेलीं कित्येक वर्षे जो अकृत्रिम स्नेहभाव होता, त्यामुळेंच मी या पुस्तकाला प्रास्ताविक लिहावयास धजलों. या विषयींची वाचकांची अपेक्षा पुरी झाली नाहीं, तर मला एवढेंच म्हणणें शक्य आहे कीं, क्षमस्व.

ۿ ۿ ۿ

मो. शं. भडभडे ऊर्फ शशिकांत पुनर्वसु यांचा व माझा परिचय प्रथम सन १९३४–३५ च्या सुमारास झाला. फर्ग्युसन कॉलेजमध्यें पदवीपरीक्षेच्या आसपास असणाऱ्या आम्हां आठदहा समवयस्क मित्रांपैकीं भडभडे एक होते. आमच्यापैकीं कित्येकांची त्यांच्याशीं ओळख व स्नेह ते न्यू इंग्लिश स्कूलमध्यें विद्यार्थी असल्यापासूनचा होता. पण आमची सर्वांची विशेष गट्टी जमली ती १९३५ ते १९३७ या दोन-अडीच वर्षांच्या अवधींत. विद्यार्थ्यांसाठीं भाड्यानें खोल्या असलेल्या भांडारकर रस्त्यावरील एका इमारतींत आम्ही तिघेचौघे मित्र राहत होतों; पदवीपरीक्षेनंतरचा अभ्यासक्रम पुरा करीत किंवा नोकरीव्यवसायाचा शोध घेत राहत होतों. तशाच परिस्थितींत असलेले भडभडे आणि इतर दोघे-तिघे मित्र यांचीं गांवांत घरें होतीं. दररोज संध्याकाळीं व कधींकधीं अहोरात्रसुद्धां त्यांचा डेरा आमच्या खोल्यांवर पडलेला असे, आणि मग तेथें तारुण्यसुलभ सर्व

प्रकारच्या गप्पांना ऊत येई. भडभडे आम्हांपैकीं बहुतेकांच्या एक वर्ष मागें होते. त्यांचा स्वभाव त्या वेळींहि कमालीचा शांत, भिडस्त व अबोल होता. पण संस्कृतचा जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर, मराठी ललित वाङ्मयाचा जाणता वाचक व नवोदित कथालेखक, आणि कॉलेजांतील कलामंडळाचा एक नामवंत सदस्य म्हणून आम्हां मित्रमंडळींत 'मोन्या'ला (भडभड्यांना) एक विशिष्ट आणि महत्त्वाचें स्थान होतें.

या दोन-अडीच वर्षांत त्यांचा व माझा विशेष स्नेह जमला. फर्ग्युसन कॉलेजची विस्तीर्ण टेकडी, वडारवाडीच्या बाजूनें खिंडींतून भांडारकर प्राच्य-विद्या-संशोधन मंदिरावरून ठाकरसी विद्यापीठाकडे जाणारी नागमोडी पायवाट, सिंहगडाचे निळे डोंगर, मालवणचा शुभ्र समुद्रकिनारा, सिंधुदुर्गाचे भव्य आणि खिंडारें पडलेले तट, अशा अनेक ठिकाणीं आम्हीं अनेकदां भ्रमंती केली असेल. टिळक तलावांत दंगा करीत यथेच्छ पोहलों; स्टेशनवरील करीमच्या खानावळींत अभक्ष्य भक्षण केलें आणि फुटपाथवर बसलेल्या भय्याकडे पाणीपुरीचा समाचार घेतला; भरधांव सायकल मारून त्या काळांत पुण्याच्या दुसऱ्या टोकास असलेल्या कॉनॉट चित्रपट-गृहांतच लागणारे ग्रिटा गार्बोचे चित्रपट अगदीं पडद्याजवळच्या चार आणेवाल्या बांकड्यांवरून पाहिले (खिशांत त्या वेळीं तेवढाच पैका सांपडावयाचा!); पावसानें ओल्या झालेल्या छपरावर पहाटे तीन-चार वाजेपर्यंत बसून सार्वजनिक गणेशोत्सवा-पुढचीं हिराबाईंचीं गाणीं ऐकलीं; किर्लोस्कर थिएटरच्या तिसऱ्या मजल्यावर 'पिटां'त बसून गंधर्वांचीं 'शेवटचीं स्वयंवरें' पाहिलीं आणि शरिरानें स्थूल व बोजड झालेल्या बालगंधर्वांनीं 'खडा मारायचा झाला तर' हें सुप्रसिद्ध स्वगत पूर्वींइतक्याच लाडिकपणें म्हणण्याचा अट्टाहास धरलेला पाहून 'मग आम्ही इथून दगडच मारूं' असें ओरडून आमची नापसंती व्यक्त करण्यासहि कमी केलें नाहीं. कधीं इराण्याच्या गजबजलेल्या चहाच्या दुकानांत सिंगल सिंगल चहा ढोशीत, तर कधीं अपरात्रीं अखंड धूम्रपानासह ओंकारेश्वरावरच्या चितांकडे पाहत, अनेक ठिकाणीं, अनेक वेळां आम्ही गप्पा केल्या असतील. आणि गप्पांचे विषय तरी कोणते म्हणून सांगावे?—साहित्य, समाजकारण, यौवनांतील अतीव आनंददायी घटना आणि दारुण निराशा, येथपासून तों कोणत्या खानावळींत कमी पैशांत पोटभर जेवतां येतें येथपर्यंत कोणताच विषय वर्ज्य नव्हता. क्वचित् प्राध्यापकांच्या गुणावगुणांची व लकबींची चीरफाड आणि समकालीन कॉलेजयुवतींच्या रूपगुणांची (केवळ दुरूनच करणें शक्य असलेली) छाननीहि होत असे; आणि समवयस्क

कॉलेजयुवकांतच अगदीं सहजगत्या व अहेतुकपणें होणारें अर्वाच्य-अभद्र बोलणें होतच नसे असेंहि नाहीं.

या दोन-अडीच वर्षांच्या शेवटीं आम्ही सर्व मंडळी या ना त्या नोकऱ्या व व्यवसाय मिळवून वा पत्करून आयुष्याची पुढची वाट चालू लागलों. अनेक कारणांमुळें भडभड्यांचा विश्वविद्यालयीन परीक्षेचा सांधा इंटरच्या परीक्षेंत चुकला तो परत कधींच जुळला नाहीं. गणित विषय घेऊन ते बी. ए झाले. त्यानंतरचीं त्यांचीं एकदोन वर्षें अनिश्चित व अस्वस्थ मनःस्थितींत गेलीं. पुढें त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी स्वीकारली आणि मग बी. टी. ही पदवी घेऊन शिक्षकाचा पेशा कायमचा पत्करला.

कॉलेजचे दिवस संपले, व्यवसाय वेगळे झाले, अनिकेत व कलंदर जीवन मागें पडून कित्येकांचे संसार उभे झाले आणि तदनुषंगिक जबाबदाऱ्या वाढल्या, तरी आमचा स्नेह पूर्वींप्रमाणेंच चालू राहिला. पुण्यांत असलों कीं आठवड्यांतून एकदोनदां तरी, पुष्कळदां एक दिवसाआडहि, आम्ही भेटत असूं; इतर मित्रांसह खाण्यापिण्याच्या, हुक्का ओढण्याच्या व विशेष म्हणजे गप्पागोष्टींच्या मैफली झडत असत; हशाचे व खिदळण्याचे मजले उभे होत असत व खळखळून कोसळून पडत असत. अलीकडचीं कांहीं वर्षें वयपरत्वें अथवा कार्यपरत्वें गांठीभेटी पूर्वींइतक्या वारंवार होत नव्हत्या; पण झाल्या कीं मग पूर्वींचाच रंग भरत असे. कॉलेजमधील जीवनाच्या शेवटीं शेवटीं जडलेला हा गाढ स्नेह भडभडे दिवंगत होईतों, वीस-एकवीस वर्षें, अखंड व अतूट राहिला होता.

भडभड्यांची शरीरयष्टि पहिल्यापासून दणकट व कांहींशी स्थूल होती. पूर्ववयांत खाण्यापिण्याची त्यांना बरीच हौस होती. त्यांच्या घरचें खिचडीचें जेवण म्हणजे आम्हां सर्व मित्रमंडळींना अवीट आनंदाची एक पर्वणी वाटत असे. त्यानंतर धूम्रपान व विशेषतः हुक्क्याचा बार भरणें हा कार्यक्रम हमखास असे. अखंड गप्पाष्टकांचा कार्यक्रम चालू असतांना भडभडे कानाला चमत्कृतिजनक वाटणारी एखादी शब्दावलि अथवा तऱ्हेवाईक भासणाऱ्या एखाद्या घटनेचा उल्लेख मध्येंच सोडून देत, आणि मग सर्व मित्र त्यांच्यावर तुटून पडून, गिल्ला करून विचारीत,

"हा तुझ्या नव्या गोष्टींतला शब्दप्रयोग (किंवा घटना) का रे? चोरा! आमच्यावर प्रथम पारखून बघतोस काय? ही तुझी युक्ति आम्ही बिल्कूल चालू देणार नाहीं."

आणि यानंतरच्या हास्यकल्लोळांत तो विषय मागें पडून मजलसीचा मोर्चा दुसऱ्या एखाद्या विषयाकडे वळे.

❀ ❀ ❀

फर्ग्युसन कॉलेजच्या कलाप्रेमी विद्यार्थ्यांनीं स्थापिलेल्या कला मंडळाचे भडभडे हे एक आधारस्तंभ होते याचा उल्लेख वर आलाच आहे. भडभड्यांचें हस्ताक्षर अतिशय सुरेख होतें. छायाचित्रें घेण्याची त्यांना आवड होती आणि चित्रकलेच्या माध्यमांत जलरंगांत व तैलरंगांत ते उत्तम निसर्गचित्रें काढीत असत. त्यांना रेखाचित्रांचाहि नाद होता आणि वुडकट हा चित्रप्रकारसुद्धां त्यांनीं कांहीं काळ हाताळला असल्याचें मला आठवतें. संगीतकलेबद्दल त्यांना प्रेम वाटे; ते स्वतः दिलरुबा उत्तम वाजवीत आणि सारंगीसुद्धां ते चांगल्यापैकीं वाजवायला शिकले होते. विविध कलांमधील ही प्रगति बहुतांशीं स्वतःच्या परिश्रमानें, हौशी कलाकार म्हणून त्यांनीं संपादन केली. त्याला पद्धतशीर शिक्षणाची जोड फारशी मिळालेली नव्हती. कलांची आवड होती, नाद होता, कलाविषयांत गतीहि होती, तरी त्यांमध्यें त्यांचें मन तितकेंसें रमलें नाहीं, असें म्हणावयास हरकत नाहीं. ललित साहित्या-शिवाय इतर कलाविशेषांना त्यांच्या जीवनांत निर्णायक महत्त्व आलें नाहीं. शेवटचीं आठ-दहा वर्षें त्यांचें लक्ष ललित लेखनाशिवाय इतर कलाविषयक छंदांकडे फारसें नव्हतेंच असें म्हटलें तरी चालेल.

❀ ❀ ❀

भडभडे यांचा अबोल, सौजन्यशील आणि (संथ म्हणण्याइतका) शांत स्वभाव त्यांच्या सहवासांत येणाऱ्या सर्वांच्या लक्षांत सहजच भरत असे. मित्रांच्या अथवा आप्तेष्टांच्या मेळाव्यांत, तसेंच लहान मुलांच्या सांनिध्यांत, अनेकदां त्यांची वृत्ति अतिशय उल्हसित झालेली दिसे. पण अनाक्रमी, अनाग्रही व सहनशील वृत्ति, संकोच व कमालीचा भिडस्तपणा हेच त्यांच्या स्वभावाचे स्थायीभाव होते. दुसऱ्याला शब्दानें किंवा कृतीनें दुखविणें त्यांच्या अतिशय जिवावर येई. त्यांच्या या भिडस्त स्वभावाचा आणि अंतर्मुख वृत्तीचा त्यांना स्वतःला वारंवार त्रास होई आणि त्यांच्या पत्नीला व आप्तमित्रांनाहि त्यामुळें अनेकदां त्रास होत असे. इतक्या वर्षांच्या दीर्घ परिचयांत मीं त्यांना एकदांहि दुसऱ्याला (तसें करण्यासारखे प्रसंग असतांना-देखील) रागावून, तोडून अथवा उलटून बोलल्याचें पाहिलें नाहीं. भडभडे अजातशत्रु होते व याचें रहस्य त्यांच्या या कमालीच्या शांत आणि सौजन्यपूर्ण स्वभावांतच असलें पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांचें अंतर्मनहि स्वस्थ

अतएव थंडप्राय होतें. वरवर पाहतां शरद् ऋतूंतील सागराप्रमाणें दिसणाऱ्या या संथ स्वभावाच्या पोटीं मानसिक प्रक्षोभाचे, आंतरिक खिन्नतेचे व विषण्णतेचे महान् वडवानल सांठविलेले होते, याची कल्पना फार थोड्या निकटवर्तीयांनाच येणें शक्य होतें.

भडभडे आपल्या मित्रपरिवारांत अथवा आपल्या आप्तजनांच्या मेळाव्यांत आपली स्वाभाविक खिन्नता व विषण्णता विसरून जात. केवळ परिचित व्यक्तीं-विषयींच नव्हे तर त्यांच्या सांनिध्यांत येणाऱ्या सर्वांबद्दल त्यांना एक प्रकारचें कौतुक व जिव्हाळा वाटत असे. लहान मुलें म्हणजे त्यांच्या जीवनांतील आनंदाचा एक अमोल ठेवा होता; त्यांच्याशीं गोष्टी करण्यांत, गप्पा मारण्यांत, खेळण्यांत ते रंगून जात असत. आम्हां मित्रांपैकीं कित्येकांच्या मुलांचें 'भडभडेकाका' हें एक प्रेमाचें स्थान बनून राहिलें होतें. दुर्दैवानें त्यांच्या आयुष्यांत त्यांना अपत्यसुखाचा लाभ झाला नाहीं. जीवनांतील या अपुरेपणाची, रितेपणाची छाया अलीकडे त्यांच्या मानसविश्वावर व लिखाणावरहि दिसून येत असे.

भडभडे (आणि त्यांचे समवयस्क मित्र) ज्या काळांत वाढले, ज्या काळांत त्यांनीं कॉलेजचें शिक्षण घेऊन प्रौढ जीवनांत प्रवेश केला, तो 'तिशीं'तला काळ (एकोणीसशें तीस ते सदतीसपर्यंत) म्हणजे आर्थिक मंदीचा, सार्वत्रिक बेकारीचा कालखंड होता. नव्या जगड्व्याळ महायुद्धाच्या सावल्या दिसूं लागल्या होत्या. तीस-बत्तीस सालांमधलें महान् राष्ट्रीय आंदोलन असफलतेंत ओसरलें होतें. देशांतील इतर विभागांप्रमाणें महाराष्ट्रांतील सामाजिक व राजकीय जीवनांत एक प्रकारचें नैराश्य, एक प्रकारची अगतिकता पसरली होती. इतरांबरोबर सुशिक्षित मध्यमवर्गहि या बिकट परिस्थितींत भरडून निघत होता. त्या काळांत कॉलेजांत आलेल्या मध्यमवर्गीय तरुणांपैकीं फारच थोड्यांना आपल्या भविष्यकाळाविषयीं निश्चितपणें आशा बाळगणें शक्य होतें. सामाजिक व राजकीय क्षेत्रांत—किंबहुना सर्व क्षेत्रांत—नवे वाद, नव्या आकांक्षा, नव्या प्रेरणा उदयास येऊं लागल्या होत्या हें खरें. पण या नव्या कल्पना आत्मसात् करून, निदान त्यांची जाणीव घेऊन, त्यांचा आपल्या भावी आयुष्यांत सुकाणूसारखा उपयोग करून घेणारी मंडळीहि थोडीच. कॉलेजमध्यें शिकत असलेल्या आणि शिकून बाहेर पडणाऱ्या बहुसंख्य युवकांना आपल्यापुढें अनिश्चिततेचें, असफलतेचें, अगतिकतेचें ताट वाढून ठेवलेलें दिसत असे. यामुळें यौवनसहज खेळकरपणा, उच्छृंखलपणा

यांवरहि भावी आयुष्याविषयींच्या उदासीनतेची दाट सावली पडून युवकजीवन एक प्रकारें झांकोळून गेलेलें होतें.

भडभड्यांना आपल्या प्रौढ जीवनाच्या प्रारंभीं या खडतर कालखंडांतून जावें लागलें. वैयक्तिक व कौटुंबिक विश्वांतील कठोर घटनांमुळें त्यांना कॉलेजमध्यें परीक्षेंतील उच्च श्रेणी टिकवितां आली नव्हती. पदवी परीक्षा पास झाल्यावर बेकारीला तोंड देणें भाग होतें. पुण्यांतील एका सुप्रसिद्ध विमाव्यवसाय-तज्ज्ञाकडे भडभडे आणि आमचे कांहीं मित्र तीन आणे तास या भरघोस वेतनावर कित्येक महिने काम करीत होते, यावरून त्या वेळच्या परिस्थितीची कांहींशी कल्पना येईल. कारकुनीचा, कचेरींतील कामाचा त्यांना प्रथमपासून उबग वाटत असे. पदवी परीक्षेंतील अल्प यशामुळें प्राध्यापक अथवा तशा प्रकारच्या अन्य व्यवसायांचा दरवाजा जवळजवळ बंद झाला होता; आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची ईर्षा धरून अथवा अन्य क्षेत्रांत धडाडीनें शिरून या कोंडींतून बाहेर पडणें ही गोष्ट त्यांच्या अनाक्रमी व सौम्य मनोरचनेशीं जुळणारी नव्हती. त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूलमध्यें अध्यापकाची नोकरी पत्करली तीहि कांहींशा अगतिकपणेंच. ते उत्तम, निपुण शिक्षक होते हा भाग वेगळा; पण तो व्यवसाय त्यांनीं मोठ्या आवडीनें स्वीकारला होता असें मात्र नाहीं.

नवोदित व अमुखर साहित्यिकाचें साहित्यजीवनहि त्या काळीं असेंच बिकट होतें. आपण लेख छापतों हा त्या लेखकावर केवढा अनुग्रह करतों, अशी अनेक संपादकांची ठाम समजूत होती. पुनर्वसूंनीं एका मासिकाकडे पाठविलेली एक कथा त्यानंतर दोन वर्षांनीं ते जुन्या बाजारांत रद्दी चाळत असतांना त्या मासिकाच्या जुन्या अंकांत त्यांना प्रथम पाहायला मिळाली! त्या वेळीं तो अंक प्रसिद्ध होऊन बारा महिने लोटले होते; पण स्मरणपत्रें गेलीं असूनहि संपादकांनीं या कथेचा स्वीकार अथवा प्रसिद्धि कळविण्याचें, मासिकाची वा कथेची छापील प्रत पाठविण्याचें—कसलेंच सौजन्य दाखविलें नव्हतें. याच सुमारास तरुण जीवनांतील कठोर निराशा त्यांना निमूटपणें गिळून टाकाव्या लागल्या. सामाजिक व वैयक्तिक अडचणींचे डोंगर भेदून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणें त्यांच्या सौम्य प्रकृतीला जमलें नाहीं. त्यांच्या भावी पत्नीचा—कमलाबाईंचा—व त्यांचा या वेळीं परिचय झाला नसता तर त्यांच्या वास्तविक व वैचारिक जीवनाचें तारूं कुठें व कसें भरकटत गेलें असतें कोणास ठाऊक. विवाहानंतर कमलाबाईंच्या सहवासांत त्यांच्या जीवनाला बरेंच स्थैर्य प्राप्त झालें. पण या कालखंडाचा ठसा त्यांच्या मनावर

कायमचा टिकून राहिला. भडभड्याच्या जीवनावर आणि पुनर्वसूंच्या लेखनावर खिन्नतेची, विषण्णतेची, अगतिकतेची व हतबुद्धतेची कधीं अस्पष्ट तर कधीं घनदाट छाया जी दिसून येते, त्याचीं कारणें या वरील घटनांत सामावलेलीं असावींत असें मला वाटतें.

यानंतरच्या दहा-पंधरा वर्षांत बाह्य जगांत व त्यांच्या परिसरांत घडलेल्या घटनांचाहि त्यांच्या संवेदनाक्षम मनावर परिणाम झाला. महायुद्धाच्या काळांतील भीषण प्रसंग, बंगालचा दुष्काळ, मनस्वी महागाई, समाजजीवनांतील वाढतें दैन्य व निष्ठुरता यांनीं त्यांचें मन भारावून जात असे. मृत्यूपूर्वी तीन-चार वर्षांमागें त्यांच्या मातोश्रीचें निधन झालें व त्याचा त्यांच्या मनाला जबर धक्का बसला. आपल्याला अपघाती व अवचित मरण येणार आहे अशा तऱ्हेची अकारण धास्ती त्यांना अलीकडे वाटत असे. त्यांची प्रकृति अखेरपावेतों उत्तम होती व त्यामुळें त्यांच्या या मनोव्यथेची कित्येकदां थट्टाहि होई आणि ते स्वतःहि त्या थट्टेंत भाग घेत. निकटवर्तीयांस किंवा स्वतः भडभड्यांना कोणतीहि कल्पना न येतां, गाढ निद्रेंत हृदयक्रिया बंद पडून त्यांना अवचित व एक प्रकारें अपघाती मृत्यु यावा, हा केवढा विलक्षण आणि निष्ठुर योगायोग!

पुनर्वसूंनीं साहित्यलेखनास कॉलेजमध्यें असतांना कथालेखनापासून सुरुवात केली. तेव्हांपासूनच्या दोन तपांच्या कालावधींत त्यांनीं अनेक साहित्यप्रकार— लघुकथा, कविता, बालवाङ्मय, नाट्यछटा, लघुनिबंध, प्रवासवर्णनें, एकांकिका— कमी-अधिक यशस्वीपणानें हाताळले. त्यांच्या साहित्याचें समालोचन करण्याचा माझा अधिकार नाहीं; तसा मी प्रयत्नहि करीत नाहीं. त्याविषयीं समीक्षात्मक लिखाण यापूर्वीच आलेलें आहे, आणि स्वतः पुनर्वसूंनींहि एका लेखाद्वारें आपली भूमिका निवेदिली आहे. त्यांची साहित्यिक घडण कोणत्या तऱ्हेची होती व ती कशी बनत गेली यासंबंधीं मला जें वाटतें तेवढेंच मीं येथें लिहिण्याचा प्रयत्न करणार आहें.

प्रारंभींच्या काळांत पुनर्वसूंवर प्रा. फडके यांच्या ललित लेखनाची, व विशेषतः त्यांच्या भाषाशैलीची, जबरदस्त पकड होती. प्रा. फडक्यांची 'जादुगार' ही कादंबरी आपण पंधरा-वीस वेळां वाचली, केवळ फडक्यांच्या सहज आणि मोहक भाषाशैलीसाठीं वाचून काढली, असें ते मजजवळ बोलल्याचें मला स्मरतें. अलंकारिक अथवा सुभाषितांची पेरणी असलेल्या शैलीबद्दल त्यांना फारसें आकर्षण

कधींच नव्हतें. सहृदय व्यक्तींचें चित्रण असलेल्या आणि अंतिम कलाटणीनें विस्मयकारक शेवट साधणाऱ्या ओ. हेन्रीच्या रेखीव कथांची त्यांना विलक्षण आवड होती. पहिलें महायुद्ध आणि त्यानंतरची मध्ययुरोपांतील अस्वस्थतेंची व अनिश्चिततेंची परिस्थिति यांच्या पार्श्वभूमीवर रेखाटलेल्या रेमार्कच्या कादंबऱ्याहि त्यांच्या विशेष मर्जीतल्या होत्या. या कादंबऱ्यांची सोपी, मोजकी व परिणामकारक भाषाशैली आणि भयाकुल पार्श्वभूमीवर वावरणाऱ्या सरलहृदयी निरागस कथाव्यक्ति पुनर्वसूंना फार प्रिय होत्या. या व इतर अनेक श्रेष्ठ देशी व परदेशी लेखकांच्या कथा-कादंबऱ्या व ललित वाङ्मय त्यांनीं वाचलें व अभ्यासलें. या परिशीलनाचा व त्यांच्या मित्रपरिवारांतील कांहीं व्यक्तींच्या[1] सहवासाचा असा परिणाम झाला असावा कीं, त्यांचें लक्ष भाषासौष्ठवाकडून, शैलीच्या सुंदरतेकडून वळून आशयाकडे, अनुभूतीकडे वेधलें गेलें. नंतरच्या काळांत त्यांना सखोल अनुभूतीचें महत्त्व अधिकाधिक पटूं लागलें; आणि पुढेंपुढें केवळ भाषाप्रभुत्वावर उभविलेल्या, कृत्रिम मनोविश्लेषणानें सजविलेल्या, काल्पनिक वर्णनाच्या फुलोऱ्यानें भरघोस नटविलेल्या, पण उथळ अनुभवाच्या ठिसूळ पायावर आधारलेल्या कथा-कादंबऱ्यांचा त्यांना अगदीं उबग वाटत असे.

पुनर्वसूंच्या कथांमध्यें व्यक्तिशः मला जो गुण विशेषेंकरून जाणवतो व पटतो तो म्हणजे त्यांच्या कथांतील प्रामाणिकपणा, कलेनें अनुभूतीशीं राखलेला कमालीचा प्रामाणिकपणा. त्यांचें कथाविश्व मध्यमवर्गांतील एका विभागापुरतें मर्यादित आहे; पण बहुतेक सर्व कथा स्वतःच्या अथवा परिसरांतील व्यक्तींच्या वैयक्तिक अनुभवांवर आणि त्यांनीं ऐकलेल्या वा पाहिलेल्या घटनांवर आधारित आहेत. केवळ कपोलकल्पित असें त्यांनीं कधींच लिहिलें नाहीं. ते वास्तवाच्या खंबीर जमिनीवर पाय घट्ट रोवून उभे राहिलेले होते. तुटपुंज्या अनुभवावर काल्पनिकाचा, कृत्रिमाचा शाब्दिक फापटपसारा त्यांनीं कधींच मांडला नाहीं. परंतु त्याचबरोबर ही गोष्टहि मान्य केली पाहिजे कीं, जीवनांतील सामान्य अनुभव सहृदय

१. त्यांच्या मित्रपरिवारामधील विशेष मर्जीतल्या एका व्यक्तीला ते आपल्या कथा हस्तलिखिताच्या स्वरूपांत पुष्कळदां दाखवीत आणि त्या व्यक्तीच्या तद्विषयक मताबद्दल त्यांना विशेष उत्सुकता वाटत असे. मला वाटतें, हा क्रम दहा-बारा वर्षें तरी चालू राहिला असावा.

कल्पनाशक्तीनें उजळून त्यांना असामान्यतेच्या उच्च पातळीवर नेऊन सोडणाऱ्या अभिजात कलाकाराच्या प्रतिभेची देणगी त्यांना मिळालेली नव्हती; आणि मला वाटतें, याची त्यांना जाणीवहि होती. सुलभ व सुंदर भाषाशैली मिळविण्यासाठीं जसे पुनर्वसूंनीं प्रारंभीं चिकाटीनें परिश्रम घेतले, त्याचप्रमाणें आशयाची सखोलता वाढविण्यासाठीं, आपलें लेखन बांधेसूद व रेखीव करण्यासाठीं, नंतरच्या काळांत त्यांनीं पद्धतशीरपणें प्रयत्न केले. प्रथम प्रथम त्यांना तऱ्हेवाईक घटनांची व चमत्कृतिजनक शब्दसमूहांची फार आवड होती; तसेंच त्यांच्या आरंभींच्या कांहीं कथांमध्यें एखाद्या एकुलत्या व एकात्म घटनेवर, परिसराविषयीं ऐसपैस वर्णन—कधींकधीं अप्रस्तुत, क्वचित् रसभंग करणारें वर्णन—करून कथानक उभें करण्याची प्रवृत्ति दिसून येत असे. नंतरच्या काळांत हे दोष टाळण्याचा ते कटाक्षानें प्रयत्न करीत असत आणि हा प्रयत्न बऱ्याच अंशीं यशस्वी झालेला दिसून येतो. कारण अलीकडच्या कांहीं कथांवरून, अनेक एकात्म अनुभूतींचा एका केंद्रवर्ति महान् अनुभूतींत परिणामकारक रीत्या लय साधण्याची किमया त्यांना अलीकडे साधली होती, असें म्हणावयास हरकत नाहीं.

ज्या काळांत भडभडे वाढले त्या 'तिशीं'तील परिस्थिति, सभोंवतींची सामाजिक व आर्थिक विषमता आणि दैन्य, सहृदय अवलोकनशक्ति (आणि कांहीं अंशीं त्यांच्या मित्रपरिवारांतील कांहीं व्यक्तींचा सहवास यांचा परिणाम), यामुळें ते पुरोगामी विचारप्रवाहांकडे झुकले, समाजवादी व कांहीं प्रमाणांत साम्यवादी विचारसरणीकडे ओढले गेले, याचे पडसाद त्यांच्या वाङ्मयांत कांहीं ठिकाणीं स्पष्ट उमटलेले दिसतात. पण ही विचारसरणी त्यांच्या बुद्धीला पूर्णपणें पटली असली, तरी त्यांच्या कलात्मकतेशीं तिचा बेमालूम सांधा कधींच जमला नाहीं असें मला वाटतें. म्हणूनच जिथें जिथें या विचारप्रणालीचे उल्लेख आले आहेत तिथें तिथें ते सहज व ओघानें आल्यासारखे न वाटतां ओढून आणल्या-सारखे, कलम केल्यासारखे वाटतात.

असें कां झालें असावें? विचारसृष्टि व कलासृष्टि यांचा हा दुसंधपणा कशामुळें उत्पन्न झाला? या प्रश्नाचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतांना पुनर्वसूंच्या वाङ्मयाची समीक्षा करणाऱ्या समीक्षकांनीं उपस्थित केलेले महत्त्वाचे अन्य प्रश्नहि विचारांत घेतां येतील असें मला वाटतें. पुनर्वसूंच्या कथाव्यक्ति नेहमीं समंजसपणें, सोशिकपणें कां वागतात? उफाळून बंड करून कां उठत नाहींत? त्यांच्या वाङ्मयांत भयंकर, कुटिल खलपुरुष अथवा प्रेयसीकरितां, इतरांकरितां, किंवा

सामाजिक वा अन्य ध्येयासाठीं भव्य दिव्य करावयास निघालेले स्त्रीपुरुष कां दिसत नाहींत ?

या सर्व प्रश्नांचीं उत्तरें भडभड्यांच्या विशिष्ट स्वभावांत व पुनर्वसूंच्या साहित्यिक घडणींत बहुतांशीं सांपडतात असें मला वाटतें. दलितांच्या उद्धाराची विचारसरणी काय किंवा कडाडून तळपून जाणारी व्यक्तिरेखा काय, हीं दोन्ही त्यांच्या अनाग्रही व अनाक्रमी व्यक्तित्वाला, सौम्य प्रकृतीला व कलात्मकतेला सहज पेलण्याजोगीं नव्हतीं. त्यांच्या लेखनाला या स्वाभाविक मर्यादा होत्या आणि त्याची त्यांना जाणीव असली पाहिजे. म्हणून त्यांनीं तसे प्रयत्न फारसे केले नसावेत; आणि ज्या केव्हां त्यांनीं ते केले तेव्हां ते तितकेसे यशस्वी झाले नाहींत. पुनर्वसु या मर्यादा कालांतरानें उल्लंघू शकले असते असें त्यांच्या अलीकडील कांहीं कथांवरून वाटण्याजोग्या त्या कथा आहेत. पण कधींच न येणाऱ्या भविष्यकाळाच्या उदरांत कोणतीं रत्नें लपलेलीं होतीं याचा व्यर्थ विचार करण्यानें मनस्तापापलीकडे दुसरें काय लाभणें शक्य आहे ?

**—अ. रा. कामत**

पुणें,
२४ जुलै १९५७

# हिमालय-प्रवासांतील स्मृति : १

पहांटे साडेचारच्या सुमारास लामबगड चट्टी आम्हीं सोडली तेव्हां भोंवतालीं अंधार होता. ताजेतवाने होतों, पावलं भराभर पडत होतीं. आजचा दिवस विशेष महत्त्वाचा होता. आज आम्ही बद्रिनारायणाला पोंचणार होतों. बद्रिनारायण हें आमच्या प्रवासाचं शेवटचं ठिकाण होतं. आतां त्याच्या पलीकडे जायचा आमचा विचार नव्हता. बद्रिपुरीहून 'पडाव' हलला कीं परतीचा प्रवास सुरु होणार होता.

हनुमानचट्टी आली तेव्हां फटफटीत उजाडलं होतं. वाटेंत पाऊस लागला होता, पण तो अगदीं सूक्ष्म होता. भोंवतालीं वनश्री होती. झुडुपं, वेली, झाडं, फुलझाडं...कांहीं झाडं तर उंच उंचपर्यंत सरळ वर गेलेलीं. मुख्य बुंध्याला आडव्या फांद्या फुटलेल्या आणि त्या फांद्यांच्या टोकांशीं, तारांइतक्या जाड आणि सुमारें बोटभर लांब अशा हिरव्यागार काड्यांचे झुपके फुटलेले. आकाशाच्या आड पाहिलं, कीं सबंध झाड एखाद्या अजस्र झुंबरासारखं दिसे. मागं जेव्हां मीं असलं झाड पाहिलं होतं तेव्हां पंड्याजीला म्हटलं होतं, "इस पेड का नाम तो बताओ!" तो म्हणाला, "मालूम नहीं इसे क्या कहते हैं!" मीं म्हटलं होतं, "ठीक आहे! आम्ही याला झुंबऱ्या देवदारु म्हणणार!" त्यानंतर आम्हा मंडळींत त्याचं हेंच नांव रूढ झालं होतं.

हनुमानचट्टी गेली आणि वनश्री संपली. नुसते पहाड, पहाड, राक्षसी पहाड! मध्येंच रस्ता धोका वाटण्याइतका भुसभुशीत लागे आणि जपून चालणं भाग पडे. पुढं माणसं, मागं माणसं; वरून येणारीं, वर जाणारीं. मध्येंच थांबून दूरपर्यंत दिसणाऱ्या रस्त्याकडे पाहावें, तेव्हां मुंग्यांच्या तुटक्या रांगा सरकत असल्यासारखं वाटे. अलकनंदेचा खळखळाट आतां वाढत होता. आजूबाजूला डोंगरांच्या खोबणीखोबणींतून बर्फ सांचलेलं होतं.

वाटेंत दोन सोंडांच्या मधील लवणांतून उजवीकडून आलेला पाण्याचा प्रवाह समोरून आडवा खालीं जाऊन अलकनंदेला मिळाला होता, तो सारा गोठलेला होता. नदीच्या प्रवाहाला जिथं तो मिळाला होता तिथं पाण्याचा मिलाफ दिसणं

शक्यच नव्हतं. कारण, तेवढ्या भागावरचा नदीचा प्रवाहदेखील गोठला होता. मात्र त्या गोठलेल्या भागाला भगदाड असून त्यांतून पात्राचा वाहता भाग विलक्षण जोरानं खळखळाट करीत वाहत जात होता. या ‘हिमसेतू’वर जाण्याचं धाडस करणं शक्यच नव्हतं. कारण त्या गोठलेल्या वरच्या भागाला भल्या मोठ्या भेगा पडलेल्या होत्या.

आमचा रस्ता त्या आडव्या आलेल्या बर्फावरून जात होता. तेथून कांहीं जण उजवीकडे वर चढले आणि तेथून कांटाचे मोटमोठे कडपे काढून खालीं रस्त्यावर असलेल्या आम्हांकडे भिरकावूं लागले. ते अंगावर आदळत आणि त्यांच्या बारीक कण्या सुट्या होऊन एकदम विखरून जात. मार मुळींच लागत नसे. हें चालू असतांना हास्य, आरडा-ओरडा भरपूर करून घेतला. असलं बर्फ इतक्या प्रमाणावर कधीं बघितलं नव्हतं. जवळ जवळ एक तासभर हा धिंगाणा घातला आणि पुढं चालूं लागलों. आमची कल्पना होती, कीं हिमालयांत गेल्यावर मैलन् मैल अंतर आम्हांला बर्फ तुडवीत जावं लागेल. पण तसं साऱ्या प्रवासांत कधींच करावं लागलं नाहीं. स्वित्सर्लंडमधले हिंवाळ्यांतले देखावे आपण सिनेमांत पाहतों आणि माणसं चालत जातांना हिमसेकाच्या थरांतून त्यांचीं पावलं उमटत जातांना दिसतात. पण असला प्रकार येथें फक्त हिंवाळ्यांत असतो. आम्हांला बर्फ तुडवावा लागला तो केवळ चारपांच ठिकाणीं आणि तोहि असा वाटेंत जेव्हां शेजारच्या घळींतून गोठलेला प्रवाह येऊन खालीं नदीकडे जाई तेव्हां. पण जमिनीवर बर्फ आंथरलेलं आढळलं नसलं तरी सभोंवारच्या डोंगरांच्या माथ्यांवर थरांची इतकी रेलचेल होती, कीं कोणत्याच प्रकारें न्यूनत्व असल्याची भावना मनांत आली नाहीं.

आतां पावलं भराभरा पडत नव्हतीं. साऱ्या अठरा जणांत संथ चाल एकट्या माझीच होती. पण चाल जलद असती तरी मी तसा चाललों नसतों. बद्रिनाथाला जात असूनहि आम्ही बद्रिनाथाला जात नव्हतों. कारण, आमचा मुख्य हेतु निराळा होता. आम्हांला हिमालयाची शोभा लुटायची होती, भव्यता पाहायची होती, आणि त्याच्या भीषणतेंतूनहि आनंद उपभोगायचा होता. आमच्यापैकीं भराभर जाणारे पुढं जात आणि ठरलेल्या चट्टीवर आधीं पोंचत. त्यांची मी टवाळी करीं. त्यांत सर्वांत वेगानं जाणारा होता त्याला मी एकदां म्हणालों, “आपल्याला तुमच्यासारखं चालणं जमायचं नाहीं नि जमायलाहि नको! तुम्ही लंगोटी पेटल्यासारखे चालतां!”

" म्हणजे कसं ?" चमकून त्यानं विचारलं.

" म्हणजे असं, कीं हळू चाललं, तर मागं मांडीला चटके बसतील या भीतीनं भराभरा चालायचं, तेंसुद्धां इतकं भराभरा, कीं लंगोटी मागं ताठ राहायला पाहिजे आणि तिच्या टोकाशीं असलेल्या ज्वाळाहि मागच्या दिशेनं फरफरत राहायला पाहिजेत !" मीं शांतपणानं म्हणालों.

सगळे जण हसले. नेहमीं त्याच्याबरोबर चालणारेसुद्धां ! तो मात्र गप्प बसला. तो रागावला कीं काय तें मला समजूं शकलं नाहीं. रागावला असला तरी त्याला तो दाखवतां येणं शक्य नव्हतं.

चट्टी म्हणजे प्रवाश्यांचं उतरण्याचं ठिकाण. आपल्याकडच्या दहा-पंधरा घरांच्या वाडीप्रमाणं बहुधा हें असतं. बहुतेक सगळ्या इमारती बैठ्या आणि सोप्याप्रमाणं फक्त तीन भिंतींच्या. भिंती दगडांच्याच आणि वरील छप्परहि दगडांचंच. छप्पराचे हे काळेभोर दगड तक्त्यासारखे, आपल्याकडील लिहिण्याच्या दगडी पाट्यांसारखे असतात. अधिक जाड आणि अधिक लांबरुंद. मागल्या भिंतीला लागून सारख्या अंतरावर चारपांच चुली घातलेल्या. एकूण वाडीलाहि चट्टीच म्हणतात आणि तींतल्या प्रत्येक मकाणालाहि चट्टीच म्हणतात. प्रत्येक मकाणांत चट्टीवाला असतो, त्याचं एका अंगाला दुकान असतं. ह्या दुकानांत सर्व प्रकारचा शिधा मिळतो, लाकूडफाटाहि मिळतो, स्वयंपाकासाठीं भांडीं पण मिळतात. यात्रेकरू स्वयंपाक करतात, स्वतः भांडीं घासतात (त्याला तीं घासलेलींच परत द्यावीं लागतात. पैसे देऊं केले तरी चट्टीवाला खरकटीं भांडीं घेत नाहीं.) आणि तीं परत करून पुढं चालूं लागतात. चट्टीवाल्याकडून शिधासामान घेतलं तर भाडं पडत नाहीं. पुष्कळ ठिकाणीं चट्टीवाला कढईत पुऱ्या तळीत असतो. त्या पुरीबरोबर 'आलूकी सबजी'हि मिळते. चट्टीवाल्याकडून कांहींच न घेतल्यास भाडं द्यावं लागतं. हें सामान्यतः एका मुक्कामाचं माणशीं चार आणे असतं. दोन चट्ट्यांमध्यें कमींत कमी अंतर दीड मैलाचं व जास्तींत जास्त पांच मैलांचं असतं. हरिद्वारला व हृषीकेशला पंड्ये भेटतात. ते यात्रेकरूंना चट्ट्यांचीं नांवं आणि प्रत्येकीचं अंतर, डाकखाना, तारघर त्यापैकीं कोणत्या ठिकाणीं आहेत तें दाखवणाऱ्या छापील याद्या जाहिरातीसारख्या वांटतात. त्या पाहून ( आणि आपल्या चालण्याचा अंदाज घेऊन) कोणत्या चट्टीवर मुक्काम करायचा तें आधीं ठरवतां येतं.

प्रत्येक चट्टीवर दिवसांतून दोनदां यात्रेकरूंच्या लाटा येतात. पहांटे चालायला सुरवात करून दुपारच्या जेवणाचा मुक्काम करण्यासाठीं येणारे सकाळीं नवापासून येऊं लागतात; आणि ते जेवण करून विश्रांति घेऊन मार्गस्थ झाले, कीं संध्याकाळचं जेवण आणि रात्रीचा मुक्काम करण्यासाठीं सूर्य उतरायच्या वेळेपासून दुसरी लाट येऊं लागते. प्रत्येक लाट येऊन गेली, कीं मग चट्टीवाला केर काढून चुली आणि जमीन सारवून स्वच्छ करून ठेवतो. आपल्यापाशीं असलेल्या जागेचा अंदाज घेऊन किती माणसं घ्यायचीं तें चट्टीवाल्यानं ठरवलेलं असतं. त्यांत थोडाफार बदल होऊं शकत असला तरी चट्टीवाला लोभीपणा न करतां सरळ "जगह खाली नहीं, किसी दूसरेके यहाँ जाओ" म्हणून चक्क सांगतो. यामुळं यात्रेकरूला एखाद्या चट्टींत कुठंच जागा नाहीं मिळाली तर पुढच्या चट्टीवर जावं लागतं. पण संध्याकाळ होऊन बराच उशीर झाला असला तर हेंहि शक्य नसतं. मग गयावया, मनधरणी करावी लागते; माणसं विभागून कुठं मिळेल तिथं आसरा शोधावा लागतो.

आमच्या वायुवेगी मंडळींच्या कृपेमुळं हा प्रसंग कधींच आमच्यावर आला नाहीं.

वाटेंत लागणाऱ्या सर्वच चट्ट्या लहान नाहींत. पांडुकेश्वर, जोशीमठ यासारख्या कांहीं चट्ट्या खेडेगांवासारख्या शंभर-दीडशें घरांच्या आहेत आणि चमोली हें ठिकाण तर तालुक्याचा गांव असून तिथं वकीलसुद्धां राहतात. तथापि अशा ठिकाणीं कायमची वस्ती करणारीं माणसं असलीं तरी ज्या घरांतून यात्रेकरू उतरतात तेथील व्यवस्था इतर चट्ट्यांप्रमाणंच असते. या चट्ट्यांपैकीं कांहीं चट्ट्या केवळ यात्रेच्या दिवसांत वसतात. कारण त्या ठिकाणीं वर्षांतून सात महिने हिमवृष्टि असते. त्या दिवसांत तेथें कुणी राहत नाहीं. किंबहुना, देवस्थानांतील मूर्तिसुद्धां या दिवसांत पूजाअर्चा करण्यासाठीं दुसरीकडे हलवल्या जातात. उदाहरणार्थ, केदारनाथाची रवानगी ऊखीमठांत होते, बद्रिनाथाची जोशीमठांत, आणि तुंगनाथाची मैकूमठांत. (हा मैकूमठ वाटेंत लागत नाहीं.)

<br>

शेवटची चढण चढलों आणि बद्रिनाथपुरी दिसूं लागली. आम्ही ज्या बाजूनं आलों होतों तेवढा अलकनंदेच्या तीराचा भाग सोडला तर बद्रिनाथपुरी-भोंवतालचा बाकी सर्व भाग हिमाच्छादित पर्वतांनीं वेढलेला आहे. हें सर्व दृश्य एका बाजूचा टवका उडालेल्या खोलगट बशीसारखं असून बद्रिनाथपुरी तिच्या

मध्यभागीं खोलगट जागेंत असल्यासारखी आहे. पुरींत पांचसहाशें तरी घरं असावींत. आजूबाजूला कुठं झुडुप नांवालासुद्धां दिसत नाहीं. मग वृक्षांची वार्ताच नको! पण या रुक्षपणालासुद्धां हिमाच्छादित पर्वतांनीं विलक्षण शोभा आणलेली आहे. अलकनंदेवरचा पूल ओलांडतांना अंगावर गार वाऱ्याचा झोत आल्यासारखा वाटला. गांवांत शिरतांना कचेरी लागली, तेथील कारकुनानं मंडळी कोण, कुठली, किती आणि 'मुखिया' कोण याची माहिती विचारून दप्तरांत टिपून घेतली. मग डाक-घर लागलं आणि प्रत्यक्ष गांव सुरू झाला. रस्त्यावर तेथेंच आमचा पंड्याजी भेटला. तो आमच्यापैकीं पुढं जाणाऱ्यांच्या बरोबर आला होता आणि आमची वाटच पाहत होता. त्यानं आमच्या ठरलेल्या जागीं आम्हांला नेऊन पोंचवलं. आमच्या आधीं येऊन पोंचलेली मंडळी गप्पा मारीत बसली होती.

इथलीं घरं मात्र चव्ह्यांतल्या घरांसारखीं नाहींत. चार भिंती आणि दारं असलेल्या खोल्या त्यांत आहेत. इथल्या कांहीं छपरांच्या दगडी तक्त्यांवर जाडशा भूर्जपत्राचं आच्छादनहि असतं. भूर्जपत्रं 'जलातीत' असतात. आमच्या खोलींत सतरंजी होती, दोन गालिचे तीवर आंथरले होते. थोड्या वेळानं 'शास्त्रीजी' येऊन चौकशी करून, बोलून, ('गरम पाणीनें आपली देह धुवावी' असल्या मराठींत!) गप्पा मारून गेले. त्यांच्या अंगांत लोकरीचा लांब कोट, डोक्यास टोपी आणि खालीं जांभळ्या रंगाचा चक्क मुकटा होता! इथल्या अनेक पंड्यांपैकीं हे एक पंड्ये.

साडेअकराचा सुमार होता. हवेंत चांगला गारवा होता. पण केदारनाथाच्या मुक्कामांत अनुभवलेल्या गारठ्याच्या मानानं हा कमीच वाटला.

आमचं मकाण नदीकांठच्या उतारावर होतं. त्यामुळं पुढच्या खोलीचा दर्शनी भाग जरी रस्त्याच्या पातळींत होता तरी तिच्या मागची खोली इकडच्या बाजूनं दुसऱ्या मजल्यावर होती. आम्हांला मागची खोली मिळाली होती. तिच्या मागच्या अंगाला सज्जा काढलेला होता. त्यांत बसून समोर दिसणारं दृश्य मी एकटक पाहत राहिलों. धो धो करीत चित्त्याच्या वेगानं वाहत जाणाऱ्या अलकनंदेचं पात्र, त्यापलीकडे भूभाग एकदम सरळ चढला होता, नंतर संथ चढीची, विरळ हिरवळ असलेली विस्तीर्ण माळासारखी जमीन, नंतर पलीकडे खूप उंच होत गेलेला पर्वत. त्याच्या खालच्या अंगाला खडक, माती, घळी, पण वर हिमाचं आच्छादन. हा नीळकंठ पर्वत हें नंतर कळलं. सज्जांत बसल्या बसल्या हें दृश्य पाहत घरीं पत्र लिहून टाकलं.

आज आम्हांला जेवण बनवायचं नव्हतं.

येथें येणाऱ्या यात्रेकरूंना पहिलं जेवण त्यांच्या पंड्यानं द्यायचं, असा येथें शिरस्ता आहे. त्यानुसार आम्हांला तो तें घालणार होता.

आमच्याबरोबर जो हरिद्वारपासून होता आणि ज्याला आम्हीं इतके दिवस पंड्याजी म्हणत होतों तो हरिकिसन पंड्या नसून इथल्या शास्त्रीजींचा तो गुमास्ता आहे हें आम्हांला इथं आल्यानंतर कळलं. आमचे शास्त्रीजी देवप्रयागचे. ते अक्षय्यतृतीयेला बद्रिनारायणाच्या देवळाचे 'पट खुलण्याच्या' दिवशीं हजर असतात. मग सुमारें पांच ते सात महिने त्यांचा इथं पंडयेगिरीचा व्यवसाय चालू असतो. दरवर्षी ते दक्षिण हिंदुस्थानपर्यंत भटकून हिमालयांत येऊं इच्छिणाऱ्यांची गांठ घेऊन त्यांना माहिती पुरवण्याचं काम करतात. हें काम त्यांना परत जाईपर्यंत पुरतं. इथल्या प्रत्येक पंड्याच्या पदरीं अनेक गुमास्ते असतात. हे गुमास्ते म्हणजे पोटपंडयेच. यात्रेकरूंना हरिद्वारापासून सोबत करून वाटेंत प्रत्येक मुक्कामावर जागा, शिधासामुग्री, पाणी आणणं, अन्न पकवणं, इत्यादि व्यवस्थेबरोबर केदारनाथ, तुंगनाथ हीं मोठीं आणि गुप्तकाशी, ऊखीमठ, इत्यादि लहान देवस्थानांचीं दर्शनं आणि तेथें करावयाचे धार्मिक संस्कार करवून बद्रिनाथपुरींत आणून त्यांना आपल्या स्वामीच्या स्वाधीन करणं हें यांचं काम असतं. आतां आम्ही शास्त्रीजींच्या ताब्यांत होतों. आमच्या मुक्कामाचं घर त्यांच्याच मालकीचं होतं.

जेवण यायला अवकाश होता. थोडा वेळ विश्रांति घेतली आणि गांवांत फेरी मारण्यासाठीं आम्ही निघालों.

क्षेत्राच्या ठिकाणाप्रमाणंच येथें सर्व कांहीं आहे. राजमार्गाच्या दोन्ही अंगांना धार्मिक पुस्तकांचीं, चित्रांचीं, कपड्यांचीं, हिमालयांतील शुद्ध शिलाजिताचीं, मिठाईचीं, (सांच्यावर पत्रे ठोकून उमटवलेल्या) देवस्थानांच्या प्रतिमांचीं, अशीं सर्व प्रकारचीं खुजीं दुकानं इथं आहेत. त्याचप्रमाणं घाण, उकिरडा, सांडपाणी, ओहोळ, राजमार्गाला त्या ओहोळासारख्याच आडव्या फुटलेल्या अरुंद गल्ल्या. नाहींत काय ते शरीराचीं व्यंगं उघडीं करणारे भिकारी. कदाचित् नारायणाच्या दर्शनानंच महापुण्य प्राप्त होत असतांना, साध्या दानानं मिळणारं क्षुद्र पुण्य कोण मिळवूं पाहणार? तेव्हां इथं आपला धंदा चालणार नाहीं अशा धोरणानं ते येत नाहींत, कीं इतर ठिकाणीं चांगला 'जम बसला' असतांना फक्त पांचच महिने धंदा देणाऱ्या या ठिकाणीं जाण्याची उठाठेव करा कशाला?—अशा विचारानं, कीं इतक्या दूरपर्यंत थंडी, वारा, बर्फ यांचा मारा सोशीत जावं लागेल या भीतीनं

कीं काय, कोण जाणे! (हें लिहितांना माझा हात चांचरतो आहे. काम करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक माणसाला जोंपर्यंत हक्कानं काम मिळत नाहीं तोंपर्यंत भिकाऱ्यांची संस्था नष्ट व्हायचीहि नाहीं आणि ती नष्ट करतांहि यायची नाहीं. तेव्हां भिकाऱ्यांवर आग पाखडण्यांत काय अर्थ?—असं मन सारखं बजावतं आहे.) धार्मिक कर्मकांड भरपूर आहे. इथं येणारे यात्रेकरू पवित्र ठिकाण म्हणून भाविकपणानं येत असतात, त्यांना सगळीकडे पावित्र्यच दिसत असतं. पण पंढरपूरला पंधरा वर्षं राहिलेल्या माझ्या, क्षेत्रांतील पावित्र्यासंबंधाच्या सर्व कल्पना उडून गेल्या आहेत. सभोंवार हिमालयाचं भव्य वैभव नसतं तर मला या देवस्थानांची किळसच आली असती. अर्धा तास भटकून आम्ही परत आलों.

दुपारीं दोन लाडू, एक मालपुआ, भात आणि कढी यांचं जेवण झालं. भात नारायणाच्या नैवेद्याचा होता. येथें जेवायला भूर्जपत्रावर वाढतात. भूर्जपत्र हें भूर्ज झाडाच्या सालींपासून तयार होत असून तें कागदाइतकं पातळ असतं. झाडाच्या रेषा त्यांत स्वच्छ दिसतात. पण पातळ असूनहि त्यांत कढीभात कालवला तरी तें फाटत नाहीं, कीं त्यांतून कढीभात खालीं झिरपत नाहीं. इथं दुकानांत कोणतीहि वस्तु घेतली कीं ती भूर्जपत्रांतून देतात. नमुना म्हणून एक भूर्जपत्र मीं जवळ ठेवून घेतलं.

आतां गारठा वाढला होता आणि जेवण नुकतंच झाल्यामुळं तो अधिकच वाटत होता. थोड्याच वेळांत मग गार वारे वाहूं लागले आणि थंडी असह्य होऊं लागली. नदीच्या बाजूकडील सज्जांत उघडणारं दार बंद करून आणि रजया पांघरून घेऊन आम्ही खोलींत स्वस्थ पडून राहिलों. आकाश काळवंडलेलं असावं. रस्त्याच्या बाजूकडील दरवाजाच्या चौकोनांतून माणसं रस्त्यावरून येतां-जातांना अंधुक दिसत होतीं. त्यांतल्या प्रत्येकाच्या अंगाभोंवतीं गरम शाल लपेटलेली, कान झांकून घेतलेले...झोंपेच्या गुंगींत असल्यामुळं तीं गूढगुंजनवादी कवितांतल्या कल्पनांप्रमाणं दिसतां दिसतांच नाहींशीं होत होतीं...

अंधार पडला तसे देवदर्शनाला निघालों. हवेंत गारठा होताच.

देवळांत गर्दी चिकार होती. घंटानाद चालू होता. पुरांतून एखादं अजस्र झाड वाहत जातांना दिसावं त्याप्रमाणं तो भोंवतालच्या गलग्यांत स्पष्टपणानं वर राहून प्रतीत होत होता. देवदर्शन करण्याचं मला फारसं औत्सुक्य नव्हतं. पण येथपर्यंत आलों आहोंत, तेव्हां नारायणाची मूर्ति पाहिल्यावांचून जाऊं नये असं वाटलं, म्हणून गेलों. कांहीं वेळ ताटकळत उभे राहिल्यावर आंत जागा झाली

आणि प्रवेश मिळाला. नारायणाच्या मूर्तीवर वस्त्रांची व दागिन्यांची इतकी खेंचाखेंच होती कीं मुखाशिवाय सर्व भाग झाकून गेला होता. मूर्ति काळ्या शिळेची. भोंवतीं पुजारी वगैरे मंडळी होतीच. समया होत्या, दिवे होते. तबकं, पेट्या, त्यांत रुपयांचे ढीग, त्यांतच नोटाहि टाकलेल्या. मीं देवाला मग नमस्कारहि केला.

वाटेंत गुप्तकाशीच्या विश्वेश्वराला, केदारनाथाला, तुंगनाथाला ज्याप्रमाणं मी आपल्या आईचा नमस्कार केला होता, तसाच हाहि केला होता. देवाचं अस्तित्व मी मानीत नाहीं, पण माझ्या आईची देवावर विलक्षण श्रद्धा आहे. थंडीच्या दिवसांत ती देव्हाऱ्यांतल्या मूर्तीवर लोकरीचं पांघरुणसुद्धां घालते. तिला खोटं सांगावं लागूं नये म्हणून मी हे नमस्कार करीत होतों. मी येथें यायचं ठरवलं, तेव्हां तिनं आम्हांबरोबर यायचा ध्यास घेतला होता. मी 'झंपान' करून येईन असं ती म्हणत होती. सगळी मंडळी तरुण आहेत, धर्मकृत्याच्या भावनेनं जाणारं कुणी नाहीं, आणि सगळे पुरुषच आहेत, तेव्हां 'झंपान' करून आलीस तरी तें जमायचं नाहीं, असं मीं परोपरीनं सांगितलं होतं तरी तिला तं पटत नव्हतं. अखेरीस निघतांना, प्रवासांतील माझ्या सुखरूपतेविषयीं चिंता आणि बरोबर न नेल्याची नाराजी या दोन भावनांचं ओझं तिच्या मनावर ठेवून कष्टी मनानं मी निघालों होतों. पापपुण्यावर आणि देवदर्शनावर अर्थातच तिची श्रद्धा आहे. तेव्हां हे सारे नमस्कार करतांना तिची भाविकता त्या क्षणापुरती मनांत आणण्याचा मीं आटोकाट प्रयत्न केला होता. मी 'तिचा म्हणून' केलेला नमस्कार तिला समाधान देणार होता याचंच मला समाधान होतं.

रात्रींच्या जेवणाची सोय आमची आम्हांला करायची होती. इतर ठिकाणच्या चट्टयांप्रमाणं इथं स्वयंपाक करण्याची सोय नाहीं. इथं झाडझाडोरा नाहीं, समुद्र-सपाटीपासून उंची साडेअकरा हजार फूट असल्यानं तुरळक हिरवळीवांचून इथं कांहींच रुजत नाहीं, त्यामुळं सारा लाकूडफांटादेखील इतर सामानाप्रमाणंच खालून आणावा लागतो. जेवढा येतो तेवढा सगळा देवळाचे पुजारी आणि गांवांतले हलवाई घेतात. पुजारी त्यावर भाताचीं तपेलीं शिजवतात आणि त्याचे वांटे काढून वेगवेगळ्या मडक्यांतून ठेवून देतात. हा भात म्हणजे बद्रिनारायणाचा नैवेद्य. भक्तानं पांच रुपये नैवेद्यासाठीं दिले, कीं त्याला ठरलेलं भांडं मिळतं. अधिक देणाऱ्याला अधिक मोठं मिळतं. पंड्येदेखील पहिल्या जेवणाच्या वेळीं ह्यांतलाच भात आणून यात्रेकरूंना वाढतात. पुष्कळ जण यांतला कांहीं भाग

वाळवून गांवीं नारायणाचा प्रसाद म्हणून आतेष्टांना देतात. भात मिळण्याचा एवढा एकच मार्ग. आमच्यापैकीं भात मिळवण्याइतके पैसे देवापुढं कुणींच ठेवले नाहींत. हलवायाच्या दुकानांतील जिलबी, पुरी, बटाट्याची भाजी, मालपुआ, असलं अन्नरसन्नर खाऊनच आम्हीं भूक भागवली. हे पदार्थ दुकानाच्या बाहेरच्या अंगार्शींच तयार होत होते आणि त्यांचा गलिच्छपणा प्रत्यक्षच दिसत होता. खातांना हे बाधतील कीं काय याचा घासाघासागणिक मन धसका घेत होतं. पण हवं तें, हवं त्या वेळीं आणि हवं त्या ठिकाणीं मिळवायचं म्हटलं तर परप्रांतींचाच काय पण जीविताचाहि प्रवास शक्य नाहीं हा विचार करून मनाला गप्प करीत होतों. प्रवासांतल्या इतर मजा मिळवायच्या असतील तर पैशांबरोबर गैरसोईचीहि किंमत मोजावी लागते...

शास्त्रीजींनीं सकाळींच कोण कोण काय काय धर्मकृत्यं करणार आहेत त्याची चौकशी केली होती. येथें करावयाचा मुख्य विधि म्हणजे ब्रह्मकपालावरील श्राद्ध. ब्रह्मकपाल हा एक नदीच्या कांठचा मोठा सपाट खडक आहे. इथल्या श्राद्धाला ज्या सवलती व सोयी आहेत त्या पृथ्वीच्या पाठीवर कुठं सांपडायच्या नाहींत. इथल्या श्राद्धानं पितरांना इतकी भक्कम सद्गति मिळते, कीं पुन्हां कधीं श्राद्ध करावं लागत नाहीं. करावं लागत नाहीं म्हणजे करणं निषिद्ध आहे. केलं तर पितर नरकांत खेंचले जातात! श्राद्ध करणाऱ्यावर क्षौराची अट नाहीं, उपवासाची अट नाहीं, पुरुषांप्रमाणं स्त्रियाहि श्राद्ध करूं शकतात. फार काय, माणूस जिवंतपणींदेखील स्वतःच श्राद्ध करूं शकतो! शास्त्रीजी सांगत होते आणि ऐकतांना आमचा श्वास उतरला होता! सर्वांनीं आम्हांला कांहींहि करायचं नाहीं असं एकमुखानं त्यांना सांगितलं होतं. तथापि आमच्यांत दोघे भाविक होते, ते परस्पर श्राद्ध उरकणार होते. शास्त्रीजींनीं त्यांतून फायदा काढावा हें त्यांना मान्य नव्हतं.

आमच्या पुढच्या खोलींत शास्त्रीजींचे कांहीं 'देहाती' यजमान उतरले होते. देहाती लोकांचा सोशीकपणा, हल्लींची हलाखीची परिस्थिति ध्यानांत येऊन मला त्यांच्याविषयीं नेहमीं अनुकंपा वाटते. तिचा कांहीं उपयोग नसतो हें कळत असूनहि मी तिला दूर करूं शकत नाहीं. पण त्या दिवशीं रात्रीं विचित्रच प्रकार घडला. आम्ही पांघरुणं घेऊन झोपेची आराधना करूं लागलों होतों. बहुतेक जण झोपीं गेले होते. मला झोप येत नव्हती. अशा वेळीं पुढच्या खोलींतला एक जण सारखा खोकूं लागला. बहुधा तो दमेकरी असावा. त्याच्या खोकण्याला अर्थातच कांहीं उपाय नव्हता. पण त्याबरोबरच त्यानं 'जय बद्रि विशालजी की

जय' या महामंत्राचा घोष सतत चालू ठेवला. हा मंत्र म्हणतांना तो निरनिराळे स्वर काढी आणि वारंवार तारसप्तकांतहि चढे. त्याच्या खोकल्याला खंड पडे, पण या पुण्यसंचयाच्या प्रयत्नाला खंड पडण्याचं लक्षण दिसेना. मला झोप त्यानं अशक्य करून टाकली. त्याच्या भाविकतेविषयीं आदर ठेवून मीं अर्धा-पाऊण तास सहन केलं. त्याच्या बरोबरीच्यापैकींच कुणी तरी त्याला गप्प कां करीत नाहींत याचं आश्चर्य करीत राहिलों. पण मग अशक्य होऊन मीं त्याला मोठ्यानं सांगितलं, "भैया, जरा शांतिके साथ हमें सोने दो ना बाबा!" आमच्यापैकीं दोघांनीं मला साथ दिली. तो रागावला आणि मंत्राबद्दल ही वृत्ति बाळगल्या-बद्दल त्यानं आमचा धिक्कार केला. पण त्यानं आवाज मात्र उतरवला आणि खंडितपणानं मंत्र चालू ठेवला. मग कांहीं वेळानं झोप लागली ती गाढ होती.

दुसऱ्या दिवशीं पहांटे मला लवकर जाग आली. मी बाहेर रस्त्यावर आलों तेव्हां गारठा फारसा नव्हता. पंचवीस एक पावलं चालून गेलों तों गांव संपलं आणि मोकळा भाग लागला. उजव्या हाताला जवळच जो डोंगर होता त्यावर माझी दृष्टि सहज गेली तों त्याच्या माथ्याशीं हिमाचे जे थर होते त्यांवर सुंदर नारिंगी शेंदरी रंग चढला होता. आइसक्रीमचा अजस्र ढीग असल्यासारखा तो पर्वत दिसत होता. बस्स, तेवढ्याच डोंगरावर हा रंग होता. पाठीमागं, पुढं, सर्वत्र डोंगर होते, त्यांच्या पलीकडे रांगाच रांगा होत्या, त्यांवरचं हिम मात्र निळसर पांढरं होतं. पूर्वेकडे अरुणाची प्रभा फांकली होती. आकाश निरभ्र होतं. मुग्ध होऊन बराच वेळ त्या डोंगराकडे आणि त्याच्यावरील त्या शेंदरी बर्फाकडे मी पाहत राहिलों आणि माझ्या स्मृतींत तें दृश्य साठवून ठेवलं...

सकाळीं शास्त्रीजी आले आणि आमच्या 'मुखियां'ना बाजूला बोलावून त्यांनीं पैशाची गोष्ट काढली. चर्चेचा सारांश आम्हांला नंतर समजला. शास्त्रीजींची आमच्याकडून तीनशें रुपयांची अपेक्षा होती. हरिकिसन गुमास्ता हरिद्वार-पासून आमच्याबरोबर 'सेवेंत' होता. त्याला द्यायचे एकशेंवीस रुपये, आणि आम्ही अठरा जण होतों, आमचं एक जेवण, राहण्याची, सतरंजी, गालिचे पांघरुणं यांची व्यवस्था याबद्दल प्रत्येकीं दहा रुपये प्रमाणं एकशें ऐंशी रुपये, असा तपशीलहि त्यांनीं सांगितला. त्यांचा हा हिशेब सरळ होता, पण तो आम्हांला पटणं शक्य नव्हतं. हरिद्वारला हरिकिसन आणि इतर गुमास्ते शास्त्रीजींची ओळखपत्रिका दाखवून भेटले होते. तेव्हां बरोबर आम्हांला कुणी नको असं आम्ही सांगितलं होतं. पण शास्त्रीजींनीं सांगून ठेवलं आहे, ते रागावतील, असं

धरणं धरल्यासारखं त्या मंडळींनीं केलं होतं तेव्हां त्याला आम्ही येऊं दिला होता. त्याच्या पायीं खाणंपिणं, मोटारवाहतूक इत्यादींत आम्ही जवळजवळ पस्तीस रुपये खर्च केले होते आणि त्या मानानं त्याचा उपयोग आम्हीं त्याहून आणखी पैसे देण्याइतका खासच झाला नव्हता. वाटेंत आम्ही एकहि धर्मकृत्य केलं नव्हतं. शास्त्रीजींना 'मुखियां'नीं हें सारं सांगितलं, तेव्हां ते म्हणाले, "सरकारी कागद झाला आहे, त्याप्रमाणं हरिकिसनला मला एकशेंवीस हे द्यावे लागणारच. त्यावर, मी तुमची कांहीं सेवा केली आहे असं तुम्हांला वाटत असेल, आणि यात्रींची अशीच सेवा करायला मला उमेद यावी अशी तुमची इच्छा असेल, तर तुमच्या मनाला येईल तें द्या. पैसे जवळ नसतील तर आजच द्या असा माझा आग्रह नाहीं. आज देतां येतील तेवढे द्या, उरलेले पाठवून द्या, किंवा दरवर्षी मी तिकडे आलों कीं पुण्याला येऊन जात असतों, तेव्हां मी घेऊन जाईन."

मुखियांनीं सांगितलं, "तीनशें देणें शक्य नाहीं. आजहि नाहीं किंवा पुण्याला गेल्यावरहि नाहीं. तथापि किती द्यायचे ते मंडळींना विचारून ठरवून देतों."

शास्त्रीजी गेल्यावर आमच्यांत चर्चा सुरू झाली. हरिकिसन जवळ होता, त्याला विचारलं, "क्यों पंडाजी, अगर हम लोग इतना रुपया नहीं देंगे तो क्या करेंगे?"

"उनका दिमाग बिगड़ जायगा! आप लोगोंको यात्रा का 'सुफल' नहीं मिलेगा!"

'सुफल' म्हणजे वाळलेला भात, हरभऱ्याची डाळ आणि साखरफुटाणे यांची कोरडी भेळ. हा बद्रिनारायणाचा प्रसाद. या प्रसादाबरोबरच शास्त्रीजींच्या आशीर्वादाचाहि सुफळांत समावेश होतो. भाविकपणानं आलेला कोणताच 'यात्री' सुफळ घेतल्यावांचून परतत नाहीं. आणि शास्त्रीजी मागितलेले पैसे दिल्याखेरीज किंवा देण्याचं कबूल केल्याखेरीज (भाविक यात्री क्षेत्राच्या ठिकाणीं दिलेला शब्द मोडणं शक्य नाहीं हें त्यांना ठाऊक असतं आणि अनुभवहि असतो.) सुफळ देत नाहींत.

आम्ही भाविकहि नव्हतों आणि यात्रेकरूहि नव्हतों. (एकशेंवीस रुपयांची भानगड आधींच कळती तर हरिकिसनला आम्ही येऊंच देतों ना!) आम्हांला प्रसादाची जरूरी नव्हती (बाजारी साखरफुटाणे घरच्या माणसांच्या समाधानासाठीं आम्ही घेतले होते.) आणि शास्त्रीजींच्या आशीर्वादाची त्याहून नव्हती. आम्हीं हिशोब केला. जेवणाचे प्रत्येकीं दीडप्रमाणं सत्तावीस रुपये, चट्टीवर मुक्काम केला

तर माणशीं चार आणेप्रमाणं साडेचार रुपये होतात, इथं गालिचे, रजया आणि इतर सोय होती म्हणून ते चढवून तेवीस रुपये केले, आणि पन्नासचा आंकडा ठरवला. क्षेत्रांतल्या पंड्याच्या अपेक्षाभंगाबद्दल आम्हांला कांहीं वाटण्यासारखं नव्हतं.

मग कपडे घेऊन आम्ही स्नानाला गेलों. बद्रिनाथाच्या मंदिराच्या पुढंच पायऱ्या उतरून नदीच्या बाजूला गेलं, कीं खेंचून उभीं केलीं तर सुमारें तीनशें माणसं उभीं राहतील एवढं कुंड लागतं. यांत गरम पाण्याच्या झऱ्यांतलं पाणी घेण्याची व्यवस्था केलेली आहे. कुंडांत आणि कुंडाभोंवतीं प्रत्येक क्षेत्राच्या ठिकाणीं आढळणारा गलिच्छपणा, ओल, चिकचिक, घाणपाणी—सारं कांहीं होतं. भाग्याची गोष्ट ही, कीं ठराविक काळानंतर त्या कुंडाचं पाणी खालून वाहून जाण्याची व्यवस्था केलेली आहे. तरी पण कांठच्या घाणेरड्या ओलांतलीं पावलं घेऊन तें भरतां भरतांच माणसं उतरत असल्यानं त्यांत स्वच्छपणा नांवालासुद्धां सांपडायचा नाहीं. आम्ही गेलों त्या वेळीं तें भरत होतं, आणि घोटाभर पाण्यांतसुद्धां माणसं उतरून अंगावर पाणी घेत होतीं, तें त्यांतच पडत होतं. या कुंडांत स्नान करायची इच्छा आम्हांला होईना.

आम्ही आणखी पुढं होऊन नदीकांठीं आलों. इथं एक कढत पाण्याचा मोठा झरा सवा पुरुष उंचीच्या खडकांतून धो धो पडत होता. त्याच्या धारेखालीं पाणी भरून घेऊं इच्छिणाऱ्या लोकांना बादली, घागर इत्यादि भांडीं ठेवण्यासाठीं शिळा होती आणि तिच्यापलीकडे दोन्ही अंगांना हौदवजा दोन लहान कुंडं होतीं. त्यांच्या कांठावर बसून आम्ही अंगावर पाणी घेऊन स्नान केलं. या हौदांतहि माणसं उतरत होतीं, पण एका वेळीं तीनचारच. आणि वरून सतत ताजं पाणी येत होतं त्यामुळं या हौदांतील पाणीहि त्या मानानं स्वच्छ राहत होतं. आणि शिवाय अखेरीला झऱ्याखालच्या ताज्या पाण्यानं अंग स्वच्छ करण्याची सोयहि होती. प्रत्यक्ष झऱ्याखालीं मात्र बसणं शक्य नव्हतं, कारण पाणी इतकं कढत होतं, कीं त्यांतून वाफा निघत होत्या. आणि केवळ सहाच पावलं पलीकडे अलकनंदेचा प्रवाह खळखळाट करीत जवळच्याच एका प्रचंड खडकावर धडक मारून उसळत होता, त्याचं पाणी इतकं गारठाण होतं, कीं तें अंगावर घेण्याची वार्ता सोडाच पण त्यांत नुसते पाय सोडले तरी पंचवीस मोजेपर्यंत पायांत वेग येऊं लागत. इतक्या थंड पाण्याजवळ भूमीच्या गर्भांतून आलेला हा उष्ण पाण्याचा झरा बघून विलक्षण आश्चर्य वाटतं. मात्र या कढत पाण्यानं फार वेळ स्नान करवत नाहीं. केलं तर डोकं गरगरूं लागतं.

देवळांतल्याप्रमाणंच या ठिकाणींसुद्धां सर्व प्रांतांतले भारतीय दिसतात. सिंधी, गुजराती, पंजाबी, बंगाली, मद्रासी, कर्नाटकी, महाराष्ट्री, इत्यादि सर्वांना हा धर्म आणि ही भाविक भक्ति एकत्र आणते. या संमर्दाकडे पाहतांना वाटतं, हीच धर्मनिष्ठा आणि भाविक भक्ति भारताच्या राष्ट्रीय चारित्र्याला उच्च पातळीवर ठेवूं कां शकत नाहीं? मनाला अस्वस्थता वाटते. मग विचार येतो, हिचं तें कार्यच नव्हे. व्यक्तिगत ऐहिक सुखाची विवंचना राहूं नये म्हणून 'व्यवहारा'च्या नांवाखालीं वाटेल त्या मार्गानं कां होईना पण द्रव्यसंचय करणं हें जसं या समाजरचनेंत योग्य ठरतं, त्याचप्रमाणं व्यक्तिगत पारलौकिक सुखाची विवंचना राहूं नये म्हणून या यात्रा करून पुण्याचा संचय करणं हेंहि योग्यच ठरतं, असंच यांतल्या बहुतेकांना वाटत असलं पाहिजे. आणि यामुळं सामूहिक सुखासाठीं प्रयत्न करण्याचे विचार यांच्यापैकीं ज्यांच्या मनांत येतात त्यांच्या सामूहिक सुखाच्या कल्पनेचा पल्लासुद्धां अन्नछत्रं घालून किंवा धर्मशाळा उभारून या यात्रेकरूंच्याच ऐहिक सुखसोयींची व्यवस्था करणं किंवा देवळांचा जीर्णोद्धार करून याच यात्रेकरूंना पारलौकिक सुख मिळवून देण्याची सोय करून ठेवणं यापलीकडे जाऊं शकत नाहीं...

हे विचार चालू असतांनाच माझ्या मनानं एकदम भविष्यकाळांत झेप टाकली. भारतांत शेतकरी आणि कामकऱ्यांचं राज्य आल्यावर या ठिकाणीं सर्व आधुनिक सुखसोयींनीं सज्ज असे भव्य प्रासाद उठतील. या अलकनंदेच्या पाण्यावर 'जनित्रं' चालवून सर्वत्र वीजहि खेळवली जाईल. या प्रासादांतून आपला वार्षिक विश्रांतीचा काळ श्रमिक लोक या ठिकाणीं येऊन घालवतील आणि त्या श्रमिकांचीं सुदृढ, सुंदर बालकं भविष्यकाळाविषयीं निश्चितपणा असल्यामुळं याच अलकनंदेच्या कांठीं खेळतील, बागडतील, उबदार कपडे घालून गिर्यारोहण करतील...

माझं स्वप्न भंग पावलं तें विचित्र प्रकारानं. एक 'गंगापुत्र' कुंडांत स्नान करणाऱ्या एका यात्रेकरूला मंत्र सांगत होता. त्याच वेळीं पलीकडच्या कुंडांत स्नान करणाऱ्या एका बाईनं नेमक्या वेळीं उभं राहून उदक सोडलं होतं. दक्षिणेसाठीं तिच्याशीं तो हुज्जत घालीत होता. अद्वातद्वा बोलत होता. बाई एक पैसा द्यायला तयार झाली होती, पण गंगापुत्र संपूर्ण दक्षिणा म्हणजे एक आणा मागत होता...

स्नान उरकलं आणि या ठिकाणापासून सुमारें चारपांचशें कदमांवर नदीकांठींच असलेल्या विस्त्यात ब्रह्मकपालावर नदीच्या कांठाकांठानं गेलों. मोठा प्रचंड कातळ आहे हा. या शिळेवर पंधरा, सोळापर्यंत जेवढे जमतील तेवढ्या श्राद्धेच्छु

मंडळींना जमवून भटजी त्यांची पंगत करून त्यांना बसवतो, प्रत्येकाला जितक्या पितरांची तृप्ति करायची असेल तितके रिठ्यांच्या बियांएवढे सातूचे पिंड (पितरांची संख्या फार मोठी असेल तर सतरा—कीं पंधरा कुणास ठाऊक, आंकडा विसरून गेलों आहें—पिंड पुरतात) आणि श्राद्धाचं इतर सामान देऊन सामायिक मंत्रोच्चारानं सर्वांचे पितर सद्गति मिळवतात. तीहि फक्त सव्वा रुपयांत! (काका कालेलकर म्हणतात, या भटजीला संस्कृताचा गंधहि नसतो.) आम्ही गेलों त्या वेळीं श्राद्धांची असली एक 'भट्टी' होऊन गेलेली होती. तिचे विखुरलेले अवशेष तेवढे आम्हांला पाहायला मिळाले.

स्नानाला जाण्याच्या वेळीं या भागांतल्या सामान्य लोकांच्या प्रामाणिकपणाची कसोटी पाहण्याचा प्रयत्न मीं केला होता. बद्रिनाथाच्या मंदिराबाहेर जेथें शेंकडों लोकांची वर्दळ असते, तेथें आपल्या वहाणा ठेवून मी गेलों होतों. स्नान करून ब्रह्मकपालकडे जाऊन सुमारें दोन तासांनीं मी परत आलों तरी त्या जेथल्या तेथेंच होत्या. त्या पाहून मला अतिशय आनंद झाला. अपेक्षाभंग झाला नाहीं म्हणून आणि वहाणा गेल्या असत्या तर हिमालयांत चालण्याची मोठीच 'आफत' आली असती ती टळली म्हणून. गढवाली लोकांची प्रामाणिकपणाबद्दल फार प्रसिद्धि आहे. प्रवास करतांना सामान कमी करावंसं वाटलं तर वाटेंतल्या कुटल्याहि चट्टीवाल्याच्या स्वाधीन नुसतं गांठ मारून करावं आणि चार-आठ दिवसांनीं परत जातांना घेऊन जावं. (तो भाडं घेतो, पण तें मामुली असतं.) किंबहुना, रस्त्यांतदेखील तुम्ही एका कडेला सामान ठेवून त्यावर पाल, कांबळं, असं कांहीं आच्छादन घालून निघून गेलांत तर परत आल्यावर त्याच्या सुरकुत्यांसुद्धां जसंच्या तसं तें तुम्हांला आढळेल, असं अनुभव घेतलेले लोक सांगतात. वाटेंत मला कडकीची बाधा झाली तेव्हां एका मोठ्या चट्टीवरील डॉक्टराचा सल्ला मीं घेतला. त्यानं मला सांगितलं, दुधांत जितक्यास तितकं पाणी घालून तें 'छानून' (म्हणजे मद्रासी लोक कॉफी छानतात तसं) प्या म्हणजे सर्व कांहीं ठीक होईल. पुढच्याच चट्टीवरल्या दुकानांत मीं दूध घेतलं आणि तें 'छानून' प्यायलों. इतकं पाणी घालूनहि त्याची चव आपल्याकडल्या उत्तम दुधासारखी लागली. (हा उपायहि रामबाण आहे. गुण तात्काळ येतो.) आमच्या कूलींचा तांडेल 'श्रीनंद' सांगे, आम्हां गढवाली लोकांचा कुणी संशय घेतला तरी आम्हांला राग येतो. डांबिसपणा झाला तर इथं येणाऱ्या बाहेरच्या लोकांपैकींच कुणी तरी केलेला असतो. सामान्य जनांच्या या प्रामाणिकपणाचा प्रत्यय वारंवार येत

असल्यामुळं पुराणांतील सत्ययुगांत आपण वावरत आहोंत असं आम्हांला वाटत होतं. कूली आमच्याबरोबर कधींच नसत. त्यांच्या पाठीवर बोजा असे. ते संथपणानं आमच्या मागून येत. पण सारं सामान निश्चित मनानं त्यांच्या हवालीं आम्ही करीत होतों.

⁂ ⁂ ⁂

दुपारीं शास्त्रीजी आले. त्यांच्याबरोबर हरिकिसन होता. त्याच्या हातांत तबक आणि त्यांत 'सुफल' होतं. आमचे 'मुखिया' शास्त्रीजींना घेऊन बाहेरच्या खोलींत गेले आणि त्यांच्या हातांत त्यांनीं लिफाफा ठेवला. पन्नास रुपये शास्त्रीजींनीं मोजले, मग क्षणभर स्तब्ध राहून त्यांनीं विचारलं, "आपण संतुष्ट आहांत ना?"

मुखियांनीं शांतपणानं उत्तर दिलं, "पूर्णपणानं!"

इथं वाद घालण्यांत अर्थ नाहीं, किंवा 'सुफला'नं अडवणूक करतां यायची नाहीं, हें शास्त्रीजींनीं ओळखलं असावं. अधिक कांहीं न बोलतां ते निघून गेले. हरिकिसन थोडा वेळ रेंगाळला. आम्ही सुफलाला हातसुद्धां लावला नाहीं. त्यानं सारं ओळखलं आणि तबक घेऊन तो निघून गेला. शास्त्रीजींनीं मागितले तेवढे पैसे आम्ही दिले असते तर तो पुढं परतीच्या प्रवासांत आमच्याबरोबर राहता. पण आतां त्याला शास्त्रीजी पाठवतीलसं वाटत नव्हतं. गेले पंधरा दिवस तो आमच्याबरोबर होता. सोळा-सतरा वर्षांचं वय होतं त्याचं. गोरा गोरा, थोडासा गबाळ्या, पण चलाख होता. आमच्यांतले बरेचसे जण विद्यार्थिदशेंतले, त्याच्या बरोबरीचे होते. सुरवातीचे थोडे दिवस मुलांनीं त्याची मस्करी केली, पण पुढं लवकरच तो मिसळून गेला होता. चालण्यांत इतका चपळ, कीं आमच्यांतल्या सर्वांत शीघ्रवेगी व्यक्तीशीं एकदां पैज लावून त्यानं त्याला धावायला लावून घामाघूम केलं होतं, पण स्वतःच्या पुढं जाऊं दिलं नव्हतं. शास्त्रीजींच्या पैसेकाढू वृत्तीवर आम्ही रुष्ट होतों, हरिकिसन आम्हांला आमच्यांतला वाटत होता. निघतांना त्याचा निरोप घेतां आला नाहीं, याबद्दल आमचं मन कष्टी झालं.

आम्ही सामानाची बांधाबांध सुरू केली. कूली आले. श्रीनंदच्या स्वाधीन आम्ही सामान केलं. बगलथैल्या पाठीवर टाकल्या आणि रस्त्यावर आलों.

रस्त्यावर आलों आणि पाऊस सुरू झाला. पण आतां आम्हांला पावसाची पर्वा नव्हती. आमचीं तोंडं आतां घराकडे वळलीं होतीं. घरीं पोंचायला, आपल्या माणसांत, आपल्या पुण्यांत वावरायला, मराठी शब्द ऐकायला आम्ही उत्सुक झालों

होतों. पुणं सोडल्याला आतां सव्वीस दिवस झाले होते. रुद्रप्रयागहून चालायला लागल्यापासून आमची दीडशें मैल पायपीट झाली होती. आतां उरलेले पन्नास मैल हां हां म्हणतां संपतील. मग चमोली, तेथून मोटार...मोटारीनं हरिद्वार... हरिद्वारला आगगाडींत बसलं, कीं मग फक्त ४८ तास काढले, म्हणजे पुणं! वरून थोडा थोडा पाऊस पडत होता. आमच्या मनानं पुणं गांठलंहि होतं.

घरं संपलीं, गांव संपलं आणि मीं पहांटे पाहिलेल्या त्या डोंगराकडे दृष्टि टाकली. त्याच्यावर आतां पांढरं शुभ्र हिम दिसत होतं. पण तसले डोंगर सर्वत्रच असल्यामुळं आतां त्याची कांहीं अपूर्वाई वाटेनाशी झाली होती. मला चांगलं आठवतं आहे, रुद्रप्रयागहून चालायला लागल्याच्याच दिवशीं सात मैलांनंतर अगस्तिमुनि चट्टी लागली, ती आम्ही मागं टाकली आणि थोड्याच वेळांत हिमाच्छादित पर्वताचं आम्हांला प्रथम दर्शन झालं. दूर दूर होता तो. आम्ही केवढे आनंदाचे उद्गार काढले त्या वेळीं! एकमेकांना दाखवून, पुनःपुन्हां टक लावून पाहून, आकाशांत चमकणारा तो ढग तर नव्हे ना अशी शंका काढून ती दूर करून घेऊन अनिमिष नेत्रांनीं त्याच्याकडे पाहण्यांत आम्ही किती तरी वेळ घालवला होता! त्यानंतर मग सतत हिमाच्छादित शिखरांचं, त्यांच्या रंगांचं, दिवसाच्या आणि रात्रीच्या, सर्व वेळीं, सर्व प्रकारच्या हवामानांत दिसणारं अक्षरशः सहस्रावधि प्रकारचं वैभव आम्हांला लुटायला सांपडलं होतं.

गेल्या फेब्रुवारीच्या 'सत्यकथे'त श्री. रा. भि. जोशी यांनीं केलेलं हरिद्वार आणि हृषीकेश यांच्या प्रवासाचं वर्णन मी वाचलं तेव्हां मी त्या भागांतून गेलों असतांना पाहिलेलीं सारीं दृश्यं डोळ्यांपुढं उभीं राहिलीं. लेखनशैली मोहक असल्यानं तहानलेल्या माणसासारखं तें वर्णन मी पीत गेलों होतों. परंतु वाचतां वाचतां—

"आमची बस चालली होती. आम्ही सभोंवतालची वनश्री पाहण्यांत गुंतलों होतों. इतक्यांत बाजूला कोपऱ्यांत लांब अंतरावर एक हिमाच्छादित पर्वतशिखर दिसलें. ह्या ठिकाणाहून हिमाच्छादित शिखरच दिसतें कीं नाहीं कुणास ठाऊक. पण तें त्यावांचून दुसरें कांहीं असणें शक्य दिसेना. तेव्हां निदान आमच्यापुरतें तरी आम्ही तें एकादें हिमाच्छादित शिखरच असावें असें ठरवलें आणि आम्हांला जन्माचें सार्थक झाल्याचा आनंद झाला."

—या मजकुरापाशीं मी आलों तेव्हां मला एकदम हसूं आलं आणि पाण्यांत कालवलेलं सातूचं पीठ दूध म्हणून पिणाऱ्या अश्वत्थाम्याची आठवण होऊन श्री. रा. भि. जोशी यांची दयाहि आली. कारण, हृषीकेशहून हिमाच्छादित शिखर कधींच

दिसत नाहीं. त्यासाठीं खूप उंचीवर जावं लागतं. त्या भागांत अगस्तिमुनि चट्टी मागं टाकल्याखेरीज हिमदर्शन होत नाहीं. (श्री. जोशीजींनीं मग हृषीकेशजवळच्या डोंगराच्या शिखराशीं असलेली नरेंद्रनगर नांवाची तेहरीच्या संस्थानिकाची वसाहत बघितली कीं काय, कोण जाणे! ती दुरून पांढरी शुभ्र दिसते.) परंतु तें कांहींहि असलं तरी या वर्णनापाशीं अनेक भावनांची क्षणिक खळबळ होऊन मन स्थिरावल्यावर मला एकाएकीं विलक्षण समाधान होऊन डोळ्यांत अश्रु उभे राहिले. मीं बघितलेल्या दृश्यांची किंमत केवढी मोठी आहे त्याचा ह्या वर्णनाइतका दुसऱ्या कशानंच पूर्ण प्रत्यय येणं शक्य नव्हतं.

या हिमाच्छादित शिखरावरून आठवण झाली. लहानपणापासून मला एका गोष्टीचं मोटं कोडं वाटत आलं आहे. 'कुमारसंभवा'त हिमालयाचं वर्णन करतांना कालिदासानं 'अनंतरत्नप्रभवस्य तस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातम्' असं लिहिलं आहे. यावरून असा अर्थ काढायचा काय, कीं हिमालय जर 'अनंतरत्नप्रभव' नसता तर हिमामुळं त्याच्या 'सौभाग्या'चा लोप झाला असता? 'सौभाग्य' या शब्दाचा अर्थ तर मी चुकत नाहीं ना?—या शंकेनं मी आत्तां शब्दकोश काढून त्यांत अर्थ पाहिला. सौंदर्य, मोहकता असा स्पष्ट अर्थ त्यांत दिलेला आहे, एवढंच नव्हे तर उदाहरण म्हणून हेंच कालिदासाचं वचन दिलं आहे. कालिदास असं कसं म्हणाला? आणि 'एकोहि दोषो गुणसंनिपाते निमज्जति' असं पुढच्या ओळींत लिहून हिमाला 'दोषास्पद' ठरवतांना त्या कविकुलगुरूला कांहींच कसं वाटलं नाहीं? हिमालयावर एकदेखील रत्न नसतं तरी एकट्या हिमानंच त्याच्या ठायीं सौंदर्य आणि मोहकता यांचं अपरंपार वैभव जमा झालं असतं असं त्यानं म्हणायला हवं होतं. ज्या अर्थीं कालिदास असं म्हणतो त्या अर्थीं त्यानं हिमालयाचं नखसुद्धां पाहिलं नसलं पाहिजे. आणि जो हिमालय त्यानं पाहिला नाहीं त्याविषयीं असे प्रलाप काढून त्या नगाधिराजाचा त्यानं अक्षम्य अपराध केला नाहीं काय? अप्रिय असला तरी याखेरीज दुसरा कोणताच निष्कर्ष निघूं शकत नाहीं. ज्यांनीं हिमालय पाहिला आहे ते माझ्या या म्हणण्याला दुजोरा देतील यांत शंका वाटत नाहीं.

आम्हीं अलकनंदेवरचा पूल ओलांडला आणि आतां थोडासा चढ लागला. मागं राहिलेली बद्रिनाथपुरी अधिकाधिक एकत्रित होऊन दिसूं लागली. मी पुन्हां

पुन्हां वळून तिच्याकडे पाहत होतों. रस्त्याची चढण संपली त्या विंदूपाशीं मी थबकलों. लहान मुलानं आपल्या खेळण्यांचा डबा बैठकीवर रिकामा केल्यावर त्यांचा ढीग जसा दिसेल तशी ती चिमुकली पुरी दिसूं लागली. सान्निध्यांत असतांना वहिणीशीं सतत भांडण केल्यावर वियोगाच्या वेळीं एकदम आपुलकी वाटावी तशी क्षणभर माझी स्थिति झाली. आतां आयुष्यांत हें दृश्य पुन्हां कधीं दिसणार नाहीं हा विचार आला आणि मन विलक्षण व्याकुळ झालं. जगाचा निरोप घेतांना माणूस शुद्धीवर असला तर त्याच्या मनांत कांहीं अंशीं अशीच भावना निर्माण होत असेल काय? मी दोन पावलं चालून गेलों आणि परत आलों. मग मन आवरलं व जलद पावलं टाकायला सुरवात केली. आतां रस्त्यावर सारखाच आणि खूप उतार होता. त्यानं वेग वाढायला मदत झाली. (किंबहुना, हातांत काठी होती तरी तो आवरायला प्रयास होत होते!) पाऊस आतां थांबला होता... म्हणजे या भागांत पडत नव्हता. मग हनुमानचट्टी आली. निर्वृक्ष प्रदेश संपला. काल सकाळीं बघितलेले झुंबऱ्या देवदारूंचे वृक्ष पुन्हां लागले. त्यांच्या खालून जातांना रेंगाळलों. पण पावलं पुढंच पडत होतीं.

निघालों तेव्हां साडेतीन वाजले होते. खालीं लामबगडला पोंचलों तेव्हां सूर्य मावळून तिन्हीसांजा झाल्या होत्या. आमच्या वायुवेगी मंडळींनीं पुढं येऊन आदल्या दिवशींच्या ठिकाणींच जागा मिळवली होती आणि शिधाभांडीं घेऊन खिचडी पकवायला प्रारंभ केला होता. मी सज्जांत आलों आणि समोर पाहत बसलों. मनावरची विषण्णता अद्याप दूर झाली नव्हती. पाऊस अगदीं सूक्ष्म पडत होता. आणि हवेंत गारवा होता.

समोरच रस्त्याच्या पलीकडच्या अंगाला बाबा कालीकमलीवाल्याची इमारत अर्धवट बांधून उभी होती. तेथें आतां कुणी काम करीत नव्हतं. फक्त एक गढवाली बाई आणि तिची सहासात वर्षांची लडकी दोन दोन आणि एक एक असे बांधकामाचे दगड कुठून तरी डोक्यावरून आणून त्या इमारतीजवळच न वांकतां डोक्यावरून लोटून देत होत्या. त्यांची सुदृढ प्रकृति आणि सर्वच गढवाली लोकां-प्रमाणं अंगाला झटके देत चालण्याची विशिष्ट लकब त्यांच्या ठिकाणींहि होती. सगळींकडे कसं हिरवंगार होतं. समोर पलीकडे घळींतून अलकनंदा वाहत होती. तिच्या अचाट आवाजावरूनच काय तें तिचं अस्तित्व जाणवत होतं. तिच्या पलीकडे प्रवाहाला लागूनच उभाच्या उभा, कातीव, काळाकभिन्न डोंगर वर, सरळ वर, राक्षसीपणानं भिंतीसारखा वर चढत गेला होता, तो एकाद्या

जगड्व्याळ खडकासारखा दिसत होता. ऐलतीरावरील एका कातळावर आमच्या-पैकीं एक जण मान खालीं करून पात्राकडे पाहत पाय पोटाशीं घेऊन, कसलं कुणास ठाऊक, चिंतन करीत बसला होता, तो त्या अजस्र पहाडाआड एका मोहरीएवढा दिसत होता. आणि....आणि या निळसर, थंडगार, हिरव्या वातावरणांत उजवीकडे दूर दूर हिमाच्छादित पर्वतशिखरांची रांग इथून इवलीशी दिसत होती. तिच्या टोकाटोकावर लालसर पिवळसर गुलाबी रंग रेंगाळत होता. त्यांत मध्येंच जिथं तो नव्हता तिथं पांढऱ्या रंगाच्या खांचा पडलेल्या होत्या. आणि त्या रांगांच्या त्या रंगित भागाच्या खालचा भाग कसल्या तरी धूसर, दाट निळ्या तवंगांत विरून गेला होता, त्याच्याकडे बघतांना डोळ्याची पापणी मिटत नव्हती.

ह्या हिमाला कालिदासानं 'सौभाग्यविलोपि' म्हटलं होतं. अरेरे!...

आंत खिचडी तयार होत होती. दोन मेणबत्त्यांच्या उजेडांत मंडळींच्या गप्पा चालल्या होत्या. आणि काय आश्चर्य! अचानक हरिकिसन प्रगट झाला! त्यानं आपली हकिकत सांगितली. आमच्या पन्नासांपैकीं शास्त्रीजींनीं त्याच्या हातावर फक्त अठरा रुपये टिकवले होते! त्यानं आम्हांला कराराचा कागद दाखवला. त्यांत ऐंशी ठरले होते! आम्ही विचारलं, "इतके कमी कसे घेतलेस तूं?"

तो म्हणाला, "आप लोगोंने जो पचास ही दिये तो शास्त्रीजी अस्सी कहाँसे लावें?"

त्याच्या नांवावर एकशेंवीस रुपये मागून चाळीस रुपये घशांत घालण्याचा शास्त्रीजींचा बेत त्याला सांगून आम्हीं म्हटलं, "आमचा करार झाला नव्हता. शास्त्रीजींनीं जें माहितीपत्रक आम्हांला दिलं होतं त्यांत 'दानदक्षिणाके लिये यात्रीपर किसी प्रकारका प्रतिबंध नहीं है' असा मजकूर आहे. आम्हांला रास्त वाटलं तें आम्हीं दिलं. पण तुझा करार झाला होता. आम्ही भाविक नाहीं म्हणून शास्त्रीजींची मात्रा चालली नाहीं. पण इतर कितीकांना त्यांनीं तुझ्या आणि तुझ्या बरोबरीच्या गुमास्त्यांच्या नांवांवर लुबाडलं असेल! त्यांतून तुझे द्यायला काय हरकत होती? तूं तक्रार कर."

तो हसत म्हणाला, "तक्रार कसली करूं कपाळाची! त्याचा भाऊ कोतवालींत अफसर आहे!"

"मग तूं आतां करणार काय?"

"तुम्ही न्याल तिथपर्यंत तुमच्याबरोबर येईन. प्रथम देवप्रयाग. जमलं तर हरिद्वार-पर्यंतहि. पण वाटेंतच संधि मिळाली तर यात्रेकरूंना घेऊन नारायणालाहि जाईन."

त्याचं नुकसान झाल्याचं आम्हांला खरोखरीच वाईट वाटलं. परतीचा खर्च तरी परस्पर निघावा ही त्याची इच्छा उघड होती. आम्ही अठरा जण होतों. त्यांत एकाचा खर्च सहज खपून जाईल हा विचार करून आम्हीं त्याला म्हटलं, "चल!" (पण तो शेवटपर्यंत आमच्याबरोबर आला नाहीं. वाटेंत गरुडगंगा चट्टीवरच शास्त्रीजींच्या दुसऱ्या एका गुमास्त्यानं कांहीं 'यात्री' खालून आणले होते आणि तो स्वतः आजारी झाला होता. दोन दिवस त्यानं कसेबसे रेटले होते, पण आतां गरुड-गंगेलाच बरं होईपर्यंत थांबावं लागतं कीं काय या चिंतेंत तो होता. हरिकिसन भेटतांच अडचण दूर झाली आणि त्यानं यात्री हरिकिसनच्या स्वाधीन केले.)

आतां आम्ही थकलों होतों. 'मुखियां'नीं सांगितलं, "उद्यां दुपारचा 'पडाव' विष्णुप्रयागला. पुढं जाणाऱ्यांनीं तिथं थांबायचं. मागची मंडळी आल्यावर वाटलंच तर सगळे चण जोशीमठापर्यंत जाऊं. पण कांहीं झालं तरी संध्याकाळीं कुम्हारचट्टी. पहांटे साडेतीनला उठवीन. झोपा आतां."

पांचसात घरांच्या त्या लामवगड चट्टीमध्यें आतां पूर्ण शांतता होती. बाहेर झिमझिम होती कीं काय, कोणास ठाऊक! पण किती तरी वर्षं न थकतां वाहत असलेल्या पुण्यजला अलकनंदेचा खळखळाट मात्र सतत चालू होता. त्यानंच गुंगी येऊन मनांत घराची आठवण करीत झोपीं गेलों...

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम 23030 दि:
क्रमांक 2397 नों दि:

# हिमालय-प्रवासांतील स्मृति : २ :

सियासेनला आम्ही पोंचलों तेव्हां सूर्य मावळून गेला होता. मग पावसाची सर सुरू झाली आणि बावरलेल्या पांखरासारखे यात्रेकरू झपाझपा येऊं लागले. पाऊस येणार अशीं लक्षणं दिसूं लागल्यावर मंद गतीचे आम्हीसुद्धां बिनीच्या तुकडीच्या मागोमागच आलों होतो. त्या तुकडींतले लोक सांगूं लागले, "साऱ्या चांगल्या जागा भरल्या. एक लहान खोली मिळते आहे ती घ्यायची का?"

मुखिया म्हणाले, "विचार कसला करतां? घेऊन टाका!"

सुमारें सात फूट रुंदी आणि तेरा-चौदा फूट लांबीच्या त्या खोलींत अठरा माणसं मावायचीं म्हणजे दिव्यच होतं. त्यांतून दोन कोपऱ्यांत चुली घातलेल्या होत्या. पण करणार काय! निवडीला सवड असली तर आवड संभाळणार! तसेच रेटून निजलों. जेवण बनवण्याचा प्रश्नच नव्हता. बहुतेकांना भूक नव्हती. दुपारीं गरुडगंगा चट्टीवरच्या मुक्कामांत जास्त चपात्या करून घेतल्या होत्या त्यावर भागण्यासारखं होतं. आणखी, 'पुरी भाजी' तर कुठं गेली नव्हती! पण ती घ्यावी लागली नाहीं.

शय्या अरुंद होत्या तरी त्यांवर पडतांना सर्वांनीं समाधानाचे सुस्कारे सोडले, उद्यां पहांटे सुमारें दोन तासांची मजल मारली, कीं चमोलीच. तेथें आमचा पायीं प्रवास संपत होता. रुद्रप्रयागाला जगाशीं तुटलेला संबंध पुन्हां जुळत होता. या अवधींत कुणाची प्रकृति बिघडती तर अडचणींचा हिमालय पुढं उभा राहता. वाहन मिळणं अशक्यच, हव्या त्या ठिकाणीं औषधं नाहींत, बरोबर घेतलेल्या जुजबी औषधांवरच काम भागवणं भाग पडलं असतं. पण तसं झालं नव्हतं. मामुली विकाराखेरीज तसा विशेष त्रास कुणालाच झाला नव्हता. आमच्या सुस्काऱ्यांमागं हें तिहेरी समाधान होतं.

निजतांना दुसऱ्या दिवशींच्या कार्यक्रमाचा आराखडा ठरला. नेहमींप्रमाणें पहांटे सर्वांनीं एकदम निघायचं. पुढं पोंचणाऱ्यांपैकीं दोघांनीं मोटारतळावर जाऊन तिकिटांच्या तयारीला लागायचं, मिळालीं तर नंदप्रयागचीं तिकिटं घेऊनहि ठेवायचीं आणि बाकीच्यांनीं जागा घेऊन जेवणाच्या तयारीला लागायचं.

सकाळीं आम्ही चमोलीला पोंचून बिऱ्हाडाची जागा शोधून काढली तोंच मोटरतळावरून दोघे जण आनंदाची बातमी घेऊन आले. पहिल्या, अकराच्या मोटारची सगळी जागा आदल्याच दिवशीं संपली होती, तरी दुसऱ्या, दोनच्या मोटारींत आम्हां सर्वांना जागा मिळत होती. 'टिकटबाबू'नं पैसेदेखील घेऊन ठेवले होते. मोटारतळावर त्यानं एक वाजेपर्यंत बोलावलं होतं.

"तिकिटं कुठं आहेत ?" मुखियांनीं विचारलं.

"तीं मोटारींत बसल्यावर देण्याची इथं प्रथा आहे. पैसे घेतल्याची मात्र त्यानं पावती दिली आहे. ती ही घ्या."

आम्हांला त्या दिवशीं दोन खोल्या मिळाल्या होत्या. जिथं स्वयंपाक चालला होता, तेथून धूर सपाटून निघत होता. कुणी तरी विचारलं, "काय बुवा! बेत काय आहे ?"

"कांहीं विचारूं नका! आजचीं लाकडं ओलसर आहेत." तेथूनच डोळे चोळीत बुवा म्हणाले.

"आणि 'बेत' कसला आहे ?"

"तेंहि विचारूं नका! आज तुम्हांला थक्क करणार आहें !"

जरा वेळानं थाळ्या-वाट्या घेऊन आम्हीं जेवायला बसलों आणि बुवांनीं आम्हांला खरंच थक्क केलं. त्यांनीं साखरभात केला होता. पायीं प्रवास संपल्याचा आनंद साजरा करण्यासाठीं. पण पहिला घास तोंडांत घातला तों आणखी शतपटींनीं थक्क झालों! भात कच्चा होता! बुवांचा विरस करणं सर्वांच्याच जिवावर आलं. कुणी तरी त्यांतल्या त्यांत परिस्थिति सौम्य करून म्हटलं, "बुवा, भात थोडा शिजायला हवा होता." बुवांना ती कल्पना होतीच. ते म्हणाले, "आजच्या अडचणी कांहीं विचारूं नका. लाकडं ओलीं. साखर कुठं मिळेना. पण तुमचं तोंड गोड करायचा आज निर्धार केला होता. हलवायाकडून जिलबीचा पाक मिळवला. सगळं व्यवस्थित जमवलं, तर जाळानं दगा दिला. भातच 'किडवळला'. असो. आतां घ्या झालं संभाळून !"

मोटार मिळण्यांत गफलत होऊं नये म्हणून आम्ही सर्व सामानासह पावणेबारा वाजतांच तळावर जाऊन एका झाडाखालीं तळ दिला. तेथें प्रवासी पुष्कळ जमले होते, पण मोटार मात्र नव्हती. लखनौ विद्यापीठांतला एक विद्यार्थी आईला बद्रिनारायणाचं दर्शन करवून परत चालला होता त्याच्याशीं, तसंच चमोलीच्या एक वकिलाशीं गप्पा मारीत मग वेळाबरोबर खेळत राहिलों.

सुमारें एक वाजतां खालून मोटार आली. ती रिकामी झाली आणि तिच्यावर प्रवाश्यांनीं झुंबड लावली. आम्ही खात्री बाळगून होतों, कीं टिकटबाबू यांना उतरवून आम्हांला जागा करून देणार. पण चौकशी करतां त्यानं सांगितलं, "ही मोटार अकराची. ही नंदप्रयागला जाऊन येईल आणि चार वाजतां सुटेल ती दोनची म्हणून सुटेल. त्यांत तुम्हांला जागा नाहीं दिली तर बोला." शेवटीं अकराची मोटार आम्हांला न घेतांच दोन वाजतां सुटली.

चमोलीहून नंदप्रयाग सात मैल आहे. पण अलकनंदेला मिळणाऱ्या नंदगंगेवर तेथें मोटार जाण्याएवढा मोठा पूल नसल्यानं मोटार पलीकडे जाऊं शकत नाहीं. तेथून कर्णप्रयाग तेरा मैल आहे. त्या भागाकरतां मोटार बदलावी लागते. आणि इकडचीचा पलीकडचीशीं कांहीं कांहीं संबंध नसल्यामुळं या प्रत्येक ठिकणीं धांवपळ, खेंचाखेंच चुकत नाहीं.

आमची मोटार सुटल्यानंतर कूली निघाले तर त्यांना पोंचायला बराच उशीर होणार या विचारानं तीन वाजतां आम्ही त्यांच्या स्वाधीन हलक्याशा सामानाचे निम्मे डाग दिले आणि टिकटबाबूला विचारून जागा मिळण्याची पुन्हां पुन्हां खात्री करून घेऊन त्यांना पुढं पाठवून दिलं.

पण त्या दिवशीं तीन साडेतीनच्या सुमाराला नंदप्रयागहून येणारी मोटार सहा वाजले तरी आली नाहीं. वेड्यासारखे आम्ही सांवलीबरोबर सरकत झाडाखालीं पडून होतों. हिमाच्छादित शिखरं आतां दिसत नव्हतीं, तरी अलकनंदेचं रुंदावत चाललेलं खोरं कांहीं कमी रम्य नव्हतं. पण आतां तें आम्हांला मोहवीत नव्हतं. इतर लोक निराशेनं केव्हांच परत गेले होते, कांहींनीं आधींच नंदप्रयागची वाट धरली होती. टिकटबाबू म्हणाला, "पेटरोल न मिळाल्यामुळं मोटर आली नसेल. पण आतां आली तरी ती यापुढं जाऊं शकणार नाहीं. उद्यां तुम्हांला पहिल्या मोटारींत जागा देतों."

आम्हीं म्हटलं, "तूं म्हणशील तें खरं!"

तो म्हणाला, "यापेक्षां तुम्ही असं कां करीत नाहीं? तुमच्यापैकीं पांच जण इथं राहूं द्या. त्यांना मोटारींत जागा देतों. उरलेले तेरा जण पहाटे नंदप्रयागला जाऊं देत. सात मैल तर आहेत. ते पोंचेपर्यंत मोटारचे लोकहि पोंचतील. सकाळीं सातला मोटार निघेल." यालाहि आम्ही कबूल झालों.

सारं आधींच कळतं तर दुपारींच चालायला लागून संध्याकाळीं पोंचलोंहि असतों. आणि आतां तर कूली पुढं गेलेले असल्यानं उरलेल्या अर्ध्या सामाना-

साठीं कांहीं जणांना मोटारनं जाणं भागच होतं. दुसरं असं कीं केदारनाथहून उतरतांना आमचे मुखिया पाय घसरून वाटेंत पडले तेव्हां त्यांचा पाय दुखावला होता, त्या दुखत्या पायावरच त्यांनीं एकशेंसाठ मैल तावडले होते. तो आतां भलताच त्रास देऊं लागला होता. एकेक पाऊल टाकायलासुद्धां त्यांना कष्ट पडत होते. या कारणानं त्यांना तरी मोटार हवीच होती.

तिन्ही सांजेच्या वेळीं आम्ही चमोली गांवांत परतलों ते आंबलेल्या शरीरानं आणि कष्टी मनानं.

माझी गजगति असल्यानं माझी निवड मोटारनं जाणाऱ्यांत झाली होती. पहांटे उठायची घाई नव्हतीच. साहजिकच रात्रीं अंथरुणावर अंग टाकल्यावर आमची वाटचाल सुरू झाली तेव्हांपासूनचीं दृश्यं माझ्या मनश्चक्षूंसमोर तरंगूं लागलीं....

रुद्रप्रयाग....

रुद्रप्रयागला आमचा मुक्काम बाबा कालीकमलीवाल्याच्या धर्मशाळेंत होता. आमच्या खोलीला तीन भिंती होत्या. मागच्या चवथ्या मोकळ्या जागेला खालपासून वरपर्यंत उभे गज ठोकलेले होते. या प्रचंड खिडकीच्या खालीं उभा तुटलेला कडा होता आणि त्याच्या पायथ्याशीं अलकनंदा खळखळ वाहत होती. पात्रापलीकडे दरीच्या समोरच्या अंगाचा पहाड वरवर चढत गेला असून तो आणि त्याच्या मागचा डोंगर यांच्यामधून आकाशाचा एक इवलासा उलटा त्रिकोणच काय तो बसल्या जागेवरून दिसत होता....

रुद्रप्रयागला अलकनंदेचा मंदाकिनीशीं संगम झालेला आहे. मंदाकिनीचं पाणी त्या मानानं संथ, स्वच्छ आणि मोरचुदी रंगाचं आहे, तर अलकनंदेचं पाणी राखी, पांढुरकं, गढूळ आणि विलक्षण वेगानं वाहणारं असं आहे. संगमाच्या जागीं अलकनंदेची धडक एवढी दांडगी आहे, कीं प्रचंड आकाराच्या लाटा तेथें उसळतात आणि पात्रांत मोठमोठाले खडक विखुरलेले असल्यानं आवाज कान बधिर करण्याइतका जोराचा होत असतो. अलकनंदेच्या पात्रांत लुप्त होण्यापूर्वी संगमाच्या ठिकाणापासून थोड्या अंतरापर्यंत मंदाकिनी आपलं अस्तित्व दाखवीत राहते; पण तें इतकं क्षीण असतं, कीं मोठ्या दोरखंडांत एकादाच रेशमाचा धागा असावा तसं तें दिसतं.

गांवाची वस्ती उंचावर आहे आणि तेथून खालीं संगमापर्यंत अरुंद पण भक्कम घाट बांधून काढलेला असून तेथपावेतों जातां येतं. पण त्या जागीं ओढ अफाट

असल्यानं पोहणं तर दूरच, पण पाण्यांत उतरून स्नान करणंहि अशक्य असतं. घाटाच्या दोन्ही अंगांना लोखंडी सांखळ्या असून त्या धरून कावडवाले खालीं उतरतात आणि हव्या त्या नदीचं स्वतंत्र किंवा मिश्र पाणी वर काढून स्नानेच्छूंच्या डोक्यांवर ओततात. पिण्यासाठीं मात्र मंदाकिनीचं पाणी वापरतात.

गलोलीच्या वेचर्कीप्रमाणं दोन अरुंद दऱ्या इथं एकत्र आल्या आहेत. त्यांचे पहाड वरपर्यंत चढलेले पाहतांना काळीज फाटतं, पण त्यांच्या 'धारेवर' अलग-पणानं उभीं असलेलीं देवदारूंचीं झाडं आकाशाआड एकाद्या मिरवणुकींतून मिरवत चाललेल्या माणसांप्रमाणं दिसतात. त्यांच्याकडे पाहतांना दृष्टि दूर व्हायला राजी होत नाहीं.

अंधार पडेपर्यंत शेवटच्या पायरीवर बसून मी हें दृश्य पाहत राहिलों होतों. हिमाचं दर्शन न होतांहि असल्या दृश्यांनीं हिमालयाची माझ्या मनावरची मोहिनी अधिकाधिक दृढ होत होती.

रुद्रप्रयागहून आम्ही चालत निघालों तेव्हां पहांटेचे चार वाजले होते. ताजेतवाने होतों आणि चालण्याचा पहिलाच दिवस होता. चाललों, चाललों ते पंधरा मैलांवरील चंद्रापुरी चट्टी गांठली. तीनचार तासांनीं कूलींचा तांडेल श्रीनंद आणि त्याचे साथी सामान घेऊन आले ते घामाघूम होऊनच. धापा टाकीत श्रीनंद म्हणाला, "आम्हांला काय जिवं मारायचा विचार आहे कीं काय तरी तुमचा? वाटेंत प्रत्येक चट्टीवर चौकशी करावी तर लोक सांगत, पुढं गेले. शेवटीं इथं भेटलांत." आम्ही थक्क झालों. त्यांना खायलाप्यायला घालून शांत केलं. आणि मग ठरवलं, कोणतीहि मजल मारण्याआधीं श्रीनंदची संमति मिळाल्यावांचून ती पक्की करायची नाहीं.

श्रीनंद म्हणजे मूर्तिमंत सौजन्य. तो आम्हांला श्रीनगरला भेटला. तो आणि त्याचे साथी हे गढवाल प्रांतातले किसान. कूली वर्षांतून एकदांच सामान वाहण्याचं काम करतात आणि परत आपल्या गांवीं जातात. घासाघीस करावी लागत नाहीं. भाव ठरलेले आहेत. मणाला एकशेंवीस रुपये. देवप्रयागपासून परत देवप्रयागपर्यंत. वाटेंत पुढं कुठंहि सुरवात केली तरी पैसे तेवढेच. संस्थान सरकारच्या ठिकठिकाणीं कचेऱ्या आहेत. तेथें कराराचा कागद करतां येतो. म्हणजे करावाच लागतो. कारण, या कागदाशिवाय सामान नेणाऱ्या कूलींना सामान चोरून घेऊन चालला आहे या आरोपाखालीं वाटेंत पोलिस अटक करूं शकतो. कराराच्या तीन प्रती होतात. एक कचेरींत, एक प्रवाश्यांपाशीं, आणि एक कूलींच्या तंडेला-पाशीं. याच्या आधारानं प्रवाश्यांना निश्चितपणानं सामान त्यांच्या स्वाधीन करून

मुक्कामावर आधीं पोचतां येतं. (या निश्चितपणांत अर्थातच कूलींच्या प्रामाणिकपणाचा फार मोठा वांटा असतो.) आमचं सामान पांच मण होतं. त्याची हमाली सहाशें रुपये होत होती. आमच्या सर्व प्रवासांतली खर्चाची सर्वांत मोठी बाब हीच. पण एकाहि क्षणीं आम्हांला ती अवास्तव वाटली नाहीं. आणि पहिल्या दिवशीं जरी आमच्या चालीनं श्रीनंद हबकला होता, तरी तेवढ्याच अंतराचे मुक्काम पुढं त्याच्या संमतीनं आम्हीं मारले होते; आणि शेवटीं शेवटीं तर इतर 'यात्रीं'ना जें अंतर तोडायला महिना-सवा महिना लागला असता तें आम्हीं पंधराच दिवसांत तोडून त्याला लवकर मोकळं केल्याबद्दल त्यानं आमचे आभारहि मानले होते.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं आम्हीं नालाचट्टीवर मुक्काम केला होता.

ही चट्टी अनेक कारणांनीं माझ्या चांगली लक्षांत राहिली आहे. इथं आम्हांला मिळालेली जागा दुसऱ्या मजल्यावर होती. तिच्या सज्जांत बसून समोर पाहत राहिलं, कीं हिमालयाचं कसलं विलक्षण रम्य रूप समोर उभं राही! खालीं समोर मंदाकिनीचं खोरं होतं, तिच्या उतारावर पायऱ्यांपायऱ्यांसारखीं भातखाचरं होतीं. (गढवाल प्रांतांतला 'पहाडी चावल' अतिशय प्रसिद्ध असून डेहराडूनच्या तांदुळापेक्षांहि तो श्रेष्ठ समजतात. आकारानं तो लहान असतो.) मंदाकिनीचं पात्र दिसूं शकत नव्हतं, इतकं तें खालीं होतं. समोरच्या डोंगरावरहि तशींच भातखाचरं होतीं. मध्येंच कुठं वृक्ष होते, कुठं 'देहाती' लोकांच्या झोपड्यांचे झुपके होते, कुठं बुटक्या गाई चरत होत्या. सगळीकडे कसं हिरवंचार होतं. आणि समोरच्या या पहाडाच्या शिखरावरील या खांचाखोंचांनून पांढरं शुभ्र हिम सांचलेलं होतं. तीन दिवसांनीं केदारनाथाहून परततांना याच ठिकाणीं आम्हीं उतरलों होतों. त्या वेळीं सूर्यास्त होऊन गेला होता. आम्ही आंत आलों आणि पावसाला सुरवात झाली होती. आकाश काळवंडून गेलं होतं, समोरच्या खोऱ्यावरहि गहिरा हिरवा रंग चढला होता. आणि सहस्रावधि जलधारांतून समोरच्या नगराजाच्या शिखरावरील आणि खांचाखोंचांतील हिमसेकाचे जे थर दिसत होते, ते कशानं कुणास ठाऊक, पण असे कांहीं विलक्षण उजळून निघाले होते, कीं त्यांच्याकडे पाहून रसरसलेल्या शुद्ध चांदीची आठवण व्हावी. अशी शोभा स्वप्नांतसुद्धां पाहायला मिळण्यासारखी नव्हती. मी स्तिमित होऊन अनिमिष नेत्रांनीं हें सारं वैभव लुटत होतों.

पण त्या दिवशीं दुपारीं सारं वैभव फक्त बाहेरच होतं. आंत माशा इतक्या भरमसाट होत्या, कीं हालचाल न करतां माणूस पडून राहिलं कीं लागलीच

त्याच्या शरिरावरची जागा व्यापण्यासाठीं त्यांच्यामध्यें स्पर्धा सुरू होई. एकाद्या कपड्यानं अंग संपूर्ण झाकल्याशिवाय माणसाला दुपारीं विश्रांति अशक्यच होती. मध्येंच एकदां मी डोक्यावरचा 'अंगोछा' किलकिला करून आजूबाजूला पाहिलं, तों मला अक्षरशः अस्वलं लोळत असल्याचा भास झाला!

याच नालाचट्टींत केदारनाथाहून परत आलेल्या कांहीं संयुक्त प्रांतीय कॉलेज विद्यार्थ्यांनीं आमच्या पोटांत भीतीनं गोळा उठवला होता. आम्ही केदारनाथाला जात आहोंत हें समजल्याबरोबर त्यांनीं सूचना दिल्या. ते म्हणाले होते, "'रामबाड' चट्टीपासून 'खडी चढाई' सुरू होते. तुमची फेसाटी निघेल! वर हवा विरळ आहे. डोकं दुखूं लागेल. ओकारीची भावना होईल. फक्त एवढंच ध्यानांत घ्या, कीं या गोष्टी नैमित्तिक नसून नित्य आणि नैसर्गिक आहेत..." त्यांच्या या वर्णनानं आम्ही धसका घेतला होता आणि मन घट्ट करीत होतों. तरी पण गौरीकुंडाहून निघाल्यानंतर रामबाडा यायच्या आधींच्याच चढानं आमच्यांतला वयानं सर्वांत लहान चौदा वर्षांचा मुलगा आणि वजनानं सर्वांत अधिक असलेला एकशेंऐशीं पौंडाचा तरुण हे दोघे जण खचले होते. आम्हांला झंपानं तरी करून द्या, नाहीं तर आम्ही परत जाऊन खालीं गौरीकुंडालाच थांबतों, अशी त्यांनीं वार्ता सुरू केली होती, किंबहुना तसे ते थोडे परतून आम्हां मागाच्या लोकांना भेटले होते. त्या वेळीं त्यांना परत वर जायला प्रवृत्त करायला मुखियांना आपलं सर्व प्रकारचं सामर्थ्य खर्ची घालावं लागलं होतं. तथापि ज्या वेळीं तो चढ आम्हीं सर्वांनीं पार केला होता त्या वेळीं आम्हांला कृतकृत्यतेचा आनंद झाला होता, तरी तो आपल्या सिंहगडाहून अधिक विकट नसल्याचं ध्यानांत आलं होतं. त्याची लांबी पांच मैल होती एवढीच काय ती विशेष गोष्ट होती. पण आम्हां मराठ्यांना भय वाटण्यासारखं खरोखरच त्यांत कांहीं नव्हतं. (किंबहुना, केदारनाथाच्या चढाच्या वेळीं खचलेले ते दोघे जण त्याहून खड्या असलेल्या तुंगनाथाच्या चढाईच्या वेळीं कोणतीहि जिकीर न करतां वर गेले.) केदारनाथाला पोंचल्यावर-देखील नाहीं कुणाचं डोकं दुखलं, कीं नाहीं कुणाला हवा विरळ वाटली आणि नाहीं कुणाला ओकारीची भावना झाली! मी त्या वेळीं म्हणालोंसुद्धां, कीं सपाट प्रदेशांत वावरणारे ते संयुक्त प्रांतीय लोक. त्यांच्या संडासालादेखील पायऱ्या नसतील! नालाचट्टीला ते भेटले नसते तर आपला हा मनस्ताप टळला असता!

नालाचट्टीची आठवण आणखीहि एका कारणामुळं माझ्या मनांत कायमची रुजली आहे.

येथें ललितागौरीचं मंदिर आहे. मंदिर मामुली आणि मूर्तीहि ओबडधोबडच. याच्या आधीं गुप्त काशीच्या देवळांत बघितलेल्या मूर्ति किंवा नंतर बघितलेल्या केदारनाथ, ऊखीमठ, तुंगनाथ, गोपश्वर, जोशीमठ, पांडुकेश्वर, बद्रिनारायण, इत्यादि देवस्थानांतल्या मूर्तींचं मला एवढं म्हटल्या एवढंसुद्धां आकर्षण वाटलं नाहीं, कीं उत्कृष्ट कलाकृतीच्या दर्शनामुळं येणाऱ्या उदात्तपणानं मन भरून आलं नाहीं. पण या ललितागौरीच्या देवळाच्या प्रवेशद्वाराशीं दोन्ही अंगाला जेथें 'जूतें' ठेवायचे, तेथें देवळाच्या भिंतीला टेकवून उघड्यावर हिरवळींत शिवपार्वतींच्या दोन जोड्या दिसल्या, त्यांचं शिल्पकाम पाहून मी आश्चर्यानं स्तब्ध झालों. प्रत्येक जोडी एकसंधी शिळेंतून कोरलेली होती आणि प्रत्येकीची लांबी हातभर आणि उंची फार तर दीड हात असेल. पण एवढ्या लहान व्यापांतहि त्या मूर्तींच्या मुद्रा, त्यांचीं आसनं, रेखीवपणा इतका अद्भुत होता, कीं माझा पाय तेथून हलेचना. लाखों भाविकांनीं ललितागौरीचं दर्शन घेतलं असेल, पण या शिवपार्वतींकडे सर्वच जणांची उपेक्षा झाली होती. माझ्या वेड्या झालेल्या मनानं तें शिल्प विकत मागण्याचा एक क्षणभर विचारहि केला. पण जगाशीं संबंध तुटलेला, वाहनं नाहींत, पुजारी मूर्तींकडे दुर्लक्ष करतील पण कुणाला नेऊं देणार नाहींत, इत्यादि विचारांनीं मीं तो दूर सारला. त्यांचे निदान फोटो तरी संग्रहीं असावे, म्हणून शेजारच्या एका माणसाला विचारून त्या मूर्ति उचलून उन्हांत शेजारीं शेजारीं ठेवूं लागलों तो एका जोडीचा कमरेपासून वरचा भाग हातांतच आला! आम्हीं मग फोटो घेतले, पण रसिकतेची आकंठ तृप्ति होऊनहि मनाची विलक्षण उद्विग्नता कांहीं केल्या दूर होईना. (पुराणवस्तुसंशोधन खात्यानं ह्या उत्कृष्ट मूर्ति इथं अशा कां राहूं दिल्या, हें मला मोठं कोडं वाटतं. संशोधन करण्याला योग्य होण्याइतपत त्या छिन्नभिन्न होण्याची तें वाट पाहत असल्यास न कळे!)

नालाचट्टीहून तिसऱ्या दिवशीं आम्ही केदारनाथाला पोंचलों. शेवटचा चढ चढून गेलों आणि पठार दिसूं लागलं. दूर पांचपन्नास घरं आणि त्यांतून डोकं वर काढणारं केदारनाथाचं इवलंसं मंदिर. सभोंवार झाड नाहीं, झुडुप नाहीं, पण मंदिराच्या मागच्याच बाजूला शुभ्र, अतिशय शुभ्र असा उंच डोंगर उभा होता. जणूं एकादा जगड्व्याळ स्फटिक समोर असून त्याच्या गर्भांतून कुठून तरी विलक्षण धवल प्रकाशाचे झोत लखलखत बाहेर पडत आहेत आणि ते बाहेर पडतां पडतां तो स्फटिक पिचून गेला आहे असा भास होत होता. आमचीं पावलं भराभरा पडूं लागलीं आणि आम्ही गांवांत जाऊन पोंचलों. आतां त्या डोंगराचा खालचा भाग

म्हणजे शुद्ध रात्र दिसूं लागली. तिच्यामुळं आणि त्याच डोंगराचे पैलू दिसूं लागल्यामुळं त्याची शोभा शतपटींनीं वाढल्यासारखी वाटली. डोळे दिपून जाईपर्यंत मी त्याकडे टक लावून पाहून घेतलं. केदारनाथाची उंची साडेबारा हजार फूट असून त्या मागच्या या 'केदारनाथके पहाडकी ऊंचाई' एकवीस हजार फूट आहे असं समजलं.

केवळ उपचार म्हणून मी देवदर्शनाला गेलों.

केदारनाथ हें शंकराचं स्थान. धर्मराज स्वर्गात जातांना त्यांचा अंगठा या ठिकाणीं गळून पडला. धर्मराजानं इथं शंकराची स्थापना केली असं सांगतात. इथला शंकर म्हणजे ना मूर्ति ना शाळुंकेंतील पिंडी. इथं केवळ एक काळीकभिन्न ओबडधोबड शिळा आहे. गाभाऱ्यांत आणि सभामंडपांत सर्वत्र ओल असून पायांत कांहीं नसल्यामुळं असह्य वेग येत होते. गारठा मनस्वी होता. तिथल्या पंड्यानं आमची क्रमाक्रमानं शंकराशीं भेट करवली. प्रथम दोन्ही हात, नंतर आम्हांला पुढं अधिक वांकवून आमचे खांदे त्यानं शिळेवर टेकवले. तोल सगळा त्या शिळेवर पडल्यानं महाप्रयासानं तिच्यापासून दूर झालों तों तुपाच्या चिकट्यानं हात बरबरटलेले! भिंतीला ते पुसले तर तिच्यावरचा आणखीनच चिकटा लागला! माझ्या अंगावर शहारेच आले! त्या शिळेसंबंधांत हरिकिसननं माहिती दिली, "यह भगवान् शंकरजीका चूतड (नितंब) है। धर्मराजने शंकरजीको प्रसन्न करने के लिये इसपर घी चढाया था। इसीसे यहाँपर आनेवाले सभी यात्री शंकरजीपर घी चढाते हैं।" आजूबाजूला प्रत्येक यात्रेकरूच्या हातांतील तबकांत इतर साहित्याबरोबरच तुपाचा एक लपका दिसत होता त्याचा हा असा उलगडा झाला.

केदारनाथाची ही अशी भेट मीं 'आईची म्हणून' घेतली होती. तथापि माझं मन भरकटलं होतं....'सगळीकडे कसं शांत आणि गंभीर वातावरण होतं. गाभाऱ्यांत उदबत्त्यांचा घमघमाट सुटला होता. विस्तीर्ण अशा शाळुंकेंत काळ्या कुळकुळीत घोटीव पाषाणाची शंकराची पिंडी नंदादीपाच्या उजेडांत चमकत होती आणि वर टांगलेल्या अजस्र कलशांतून मंदाकिनीच्या पाण्याची केदारनाथावर संततधार धरली होती. तिचा पिंडीवरच्या बिल्वदळावर पडल्यामुळं होणारा सूक्ष्म आवाज आणि शुचिर्भूत ब्राह्मणांनीं शेजारीं बसून म्हटलेल्या 'रुद्राच्या' मंत्रांचा धीरगंभीर ध्वनि यांच्या संमिश्र नादानं माझ्यासारख्या नास्तिकाचंसुद्धां मन क्षणभर हेलावून गेलं...' ——असं कांहीं तरी खोटं वर्णन करून आईच्या मनाला समाधान द्यायचा प्रयत्न केला तर काय बिघडणार आहे? असे विचार माझ्या मनांत घोळूं लागले...

केदारनाथाला आमचा 'पडाव' होणार नव्हता. तीन, चार तास थांबून, पहांटे जेथून निघालों होतों, त्या गौरीकुंडालाच संध्याकाळच्या सुमारास पोंचून तेथें रात्र काढायची असं आमचं ठरलं होतं. इथं आम्ही आलों तेव्हां चांगलं ऊन पडलं होतं. पण मग दुपारीं आकाश भरून आलं, गारठा परमावधीचा वाढला आणि सर्वांग थडथडूं लागलं. निघायच्या वेळीं तर पाऊस पडायला सुरवात झाली. पण त्यामुळं अधिक थांबायची सोय नव्हती. तसेच निघालों. मागं वळून तो स्फटिकाचा पर्वत पुन्हां पाहत सकाळच्या त्या ठिकाणापर्यंत आलों आणि मग भरमसाट उतार सुरू झाला—व उतारावर हातांतल्या काठीची खरी किंमत कळून आली. कानापर्यंत उंच असलेली ती काठी मी हरिद्वारला घेतली होती. फक्त एक रुपयाला. तिला निमुळती चौधारी लोखंडी शेंबीहि बसवून घेतली होती, त्यामुळं जमिनींत ती रोवली कीं हलत नसे, कीं जागच्या जागीं फिरत नसे. गौरीकुंडापर्यंतचं साडेसात मैलांचं अंतर आम्हीं अवघ्या दोन तासांत तोडलं तें केवळ त्या काठीमुळं. ती नसती तर चार तासहि पुरले नसते. पुरुष असो वा स्त्री असो, तरुण असो वा वृद्ध असो, हिमालयांत केवळ दोन पायांवर प्रवास करणारा प्रवासी सहसा काय, कधींच सांपडायचा नाहीं.

गौरीकुंडाला पोंचलों तेव्हां फारसे वाजलेले नव्हते. पावसाची झिमझिम चालू होती. आकाश पोलादी रंगाचा लेप दिल्यागत झालं होतं. सभोंवतालीं उंच उंच वृक्ष ध्यानस्थ उभे होते, त्यांवर गहिरा रंग आला होता. हवा कुंद होती. मंदाकिनीच्या कांठच्या सुप्रसिद्ध उष्ण कुंडांतून वाफांचे लोटच्या लोट निघत होते. त्यांना पाऊस खालीं रेटण्याचा प्रयत्न करीत होता तरी ते वरवर जातच होते. ते एकाद्या अजस्र होमकुंडांतून बाहेर पडत असल्यासारखं वाटत होतं. सारं कांहीं विसरून एक क्षणभर आपण प्राचीन काळच्या महर्षींच्या कुठल्या तरी तपोवनांत आल्याचा मला भास झाला आणि आतां जवळपास कुठं तरी 'सायं मृगाध्यासित-वेदिपार्श्वं' असा एकादा आश्रमहि दृष्टीस पडणार अशी माझ्या मनानं कल्पना केली...

चमोलीच्या त्या मकाणांत रात्रींच्या वेळीं पडल्या पडल्या या सगळ्या स्मृति वेंचत राहणं आणि त्यांतल्या कांहींवर रेंगाळत राहणं किती सुखाचं होतं! आमच्या-पैकीं एकानं प्रवासांतल्या साऱ्या जिकिरीला कंटाळून उद्गार काढले होते, "आपण आतां जन्मांत पुन्हां या भागाकडे नकाशांतसुद्धां पाहणार नाहीं!" मला तसं

कधींच वाटलं नव्हतं. उलट जेव्हां केव्हां सवड मिळेल तेव्हां गंगोत्री, जम्नोत्री, नेपाळांतला पशुपति, मानससरोवर, कैलासपर्वत, त्याचप्रमाणं पूर्वेकडे असलेली कांचनगंगा, इत्यादि ठिकाणींचं हिमालयाचं वैभव पाहण्याची उत्कंठा माझ्या मनांत वारंवार उत्पन्न झाली होती.

नुकत्याच केलेल्या या प्रवासांतील त्या स्मृति चाळतां चाळतां माझं मन आणखीहि एक चाळा करीत राहिलं होतं. प्रवासाला निघण्यापूर्वी हिमालयाच्या प्रवासवर्णनाचीं कांहीं पुस्तकं मीं वाचलीं होतीं. त्यांच्या वाचनानं माझ्या मनश्चक्षूं-पुढं निरनिराळीं दृश्यं निर्माण केलीं होतीं. आणि प्रत्यक्ष प्रवास करतांना बघितलेल्या दृश्यांशीं तीं त्या रात्रीं मी पडताळून पाहत होतों. प्रत्येक वेळीं मनश्चक्षूंचा पराभव झालेला मला आढळत होता. (मनश्चक्षूंपुढल्या विश्वाच्या बबातींत मी आजपर्यंत अतिशय जागरूक राहिलों आहें. कालिदासाचं शाकुंतल आणि बाणाची कादंबरी यांच्या वाचनानं माझ्यापुढं जीं मोठीं रम्य विश्वं निर्माण झालीं आहेत, तीं उध्वस्त होऊन पुढील वाचनाच्या वेळीं डोळ्यांपुढं भलतीच शकुंतला, प्रियंवदा, अनसूया किंवा नको असलेली महाश्वेता उभी राहूं नये म्हणून त्यांवर आधारलेले चित्रपट-देखील पाहण्याचं मीं कटाक्षानं टाळलं आहे. किंबहुना, घरीं आलेले पाहुणे ते पाहायला जात असतांना त्यांच्याबरोबर न जाऊन त्यांची नाराजीहि पत्करली आहे.) यामुळं मनश्चक्षूंच्या या पराभवाचा मला केवढा आनंद झाला असेल त्याची कल्पना करतां येईल. आज तर मनश्चक्षूंपुढच्या त्या हिमालयीन दृश्यांपैकीं एकदेखील माझ्या ध्यानांत नाहीं. आधीं वाचलेलीं तीं पुस्तकं परत आज वाचलीं तरी त्यांचं स्मरण होणं अशक्य आहे. कारण आज केवळ प्रत्यक्षांतलीं आणि मीं ज्या वेळीं बघितलीं त्या वेळचीं दृश्यं काय तीं उभीं राहतात.

उदाहरणार्थ, आज तुंगनाथ हीं अक्षरं दिसलीं, कीं मला दिसूं लागतं तें हें:

त्या दिवशीं पहांटेस नालाचट्टीहून आम्ही आडवे वळलों आणि सगळा डोंगर उतरून अगदीं पायथ्याशीं मंदाकिनी ओलांडली. मग पुन्हां समोरचा डोंगर चढत चढत अनिरुद्ध आणि उषा यांचं विवाहस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या ऊखीमठांतून (उषामठाचा अपभ्रंश) पुढं पुष्कळ अंतर जाऊन आणखी एक तशीच दरी तशाच प्रकारानं ओलांडली. त्या दिवशीं थकून जाऊन आम्हीं दुपारीं 'देहेडा' चट्टीवर मुक्काम केला आणि थोडी विश्रांति घेऊन तीनप्रहरीं चालूं लागलों.

तो दिवस अविस्मरणीय होता. चालतांना वाटेंत सारखी 'खडी चढाई' होती. रस्ता मध्येंच उंच उंच झाडांच्या किर्र राईतून जाई तेव्हां भयाण वाटे, तर केव्हां

पहाड़ाच्या तटावरून वळत गेलेला दूरपर्यंत दिसे तेव्हां त्याचा चढ पाहून काळीज फाटून जाई. त्या दिवशींच्या चालीनं अंगांतून घाम आणि डोळ्यांतून पाणी निघालं. पण वाटेनं वारंवार जीं दृश्यं दिसलीं त्यांनीं त्यांतला प्रत्येक बिंदु न् बिंदु वसूल झाला. गिरीतटावरून जातांना डाव्या हाताला एकामागोमाग एक पाकळ्या उलगडत गेल्यासारख्या डोंगराच्या रांगा दिसत, त्यांच्यावर हिरवीचार झाडी असे, प्रत्येक रांग स्पष्ट दिसत असल्यामुळं त्यांच्यामधल्या दऱ्यांच्या विस्ताराची आणि खोलीची स्वच्छ कल्पना येई, आणि या सर्व रांगांच्या पलीकडे क्षितिजाशीं जी शेवटची रांग होती, तिचीं असंख्यात हिमाच्छादित शिखरं हारीनं मांडून ठेवल्यासारखीं दिसत. त्यांच्यावरच्या निरनिराळ्या छटा श्रेष्ठ चित्रकारालाहि मांत्रावून सोडतील अशा असत. हिमालयाची ही संपदा पाहून ती सारी आपली आहे हा विचार मनांत येई आणि छाती अभिमानानं भरून येई. अखेरीस संध्याकाळीं जीव मेटाकुटीस येऊन आम्ही बनियाकुंड नांवाची चट्टी गांठली तेव्हां तर भोंवतालच्या सृष्टीचं भव्य आणि मनोहर रूप पाहून खर्चलेले सारे घर्मबिंदु आणि अश्रुबिंदु केव्हांच वसूल होऊन खात्यावर मोठी शिल्लक पडल्यासारखं वाटलं.

बनियाकुंड...

बनियाकुंड हें ठिकाण डोंगराच्या चढणीवरच्या वाटेंतल्या एका लहानशा पठारावर आहे. तेथें जिकडेतिकडे अतिशय दाट हिरवळ होती त्यामुळं हिरव्यागार गालिच्यावरून चालल्यासारखं वाटत होतं. (त्यावर आम्हीं पुष्कळ वेळ लहान मुलासारखं बागडून घेतलं.) या पठाराच्या एका अंगाला डंवरलेल्या सडेसोट उंच देवदारूंचं वन होतं, त्याच्या पानापानांतून आणि बुंध्याबुंध्यांतून आकाशाचे खवले मोठे मोहक दिसत होते. पठाराच्या दुसऱ्या अंगाला झाडीनं आच्छादलेला, आतां काळाकभिन्न दिसणारा डोंगर दुर्गप्राकारासारखा खडा उभा होता. त्याच्या अलीकडे ढगांचे लोटांवर लोट येत होते, ते त्याला क्षणांत संपूर्ण झांकीत, तर क्षणांत मंदस्फुट करीत, तर क्षणांत 'दिगंबर' करीत होते. या धामधुमींत ते ढग येत होते कोठून आणि जात तरी होते कुठं, याचा कांहींच थांग लागत नव्हता. पठाराच्या आणखी एका अंगाला कांहींच नव्हतं. तेथें एकदम गचकन् उतार सुरू होऊन दरी उघडली होती. ती उभ्या असलेल्या जागेवरून दिसत नसूनहि केवळ हिरवळ अचानक संपल्यामुळं तिची विशालता अनुमानानं जाणतां येत होती. क्षितिजावरचीं तीं हिमाच्छादित शिखरं 'वेदकालीन ऋषींची महापरिषद बसली असावी' (हें काका कालेलकरांचं ऋण) तशीं दिसत होतीं. आणि या बाजूच्या

अनुक्रम ...२३०३० .... दि: ...

क्रमांक ........२३९.... नों: दि: ...

आकाशाला जो दाट, घोटीव, जांभळसर निळा विलक्षण रंग आला होता, त्याचं वर्णन "नंदनवनांतून वाहणाऱ्या आकाशगंगेच्या पाण्यांत थोडींशीं माणकं, पुष्कळसे हिरे आणि असंख्य नीलमणि यांचं 'पाणी' काढून कालवलं व त्याचा लेप दिला तर जो रंग येईल तो आकाशाला आला होता" या शब्दांत केलं, तरी तें दोन आणेदेखील जमलेलं नाहीं या वैफल्याच्या भावनेनं मनाला खंत वाटत होती, तरी त्याचंहि समाधान वाटत होतं.

त्या रात्रीं गारठ्याचा फार त्रास झाला. उंची फार होती त्यामुळं पाणी आटलं तरी भात कच्चाच राहिला. पिठलंहि धड शिजलं नाहीं. पण या साऱ्या गैरसोई त्या वेळीं तुच्छ वाटल्या.

आतां हें लिहीत असतांनादेखील वर्णनाचा व्याप बंद ठेवून मी बनियाकुंडाचं तें दृश्य जसंच्या तसं मनश्चक्षूंपुढं उभं करून स्तब्धपणानं डोळे मिटून पाहत राहिलों आहें...

दुसऱ्या दिवशीं आम्ही तुंगनाथाला गेलों. तेथेंहि ढगांचे लोटावर लोट होते; किंबहुना, त्या लोटांत अनेक वेळां आम्ही सांपडून दोन हातांपलीकडचं दिसेनासं होत होतं. तुंगनाथ साडेतेरा हजार फूट उंचीच्या शिखरावर असल्यामुळं चहूंबाजूला वनश्री, हिमश्री आणि गिरीश्री दिसत होती. वस्ती फक्त पांचसात घरांचीच असल्यामुळं, त्याचप्रमाणं केदारनाथ आणि बद्रिनारायण यांच्याइतकं तुंगनाथाला महत्त्व नसल्यामुळं व चढण फार असल्यामुळं पुष्कळसे यात्रेकरू इकडे येण्याचं टाळत असल्यामुळं, गलिच्छपणा कमी असला तरी बनियाकुंडाची सर त्याला आलीसं मला वाटलं नव्हतं. वाटला होता फक्त हिमालयाच्या इतक्या उंच स्थानावर पोंचल्याच्या कृतकृत्यतेचा आनंद...

या साऱ्या स्मृतींशीं रेंगाळतां रेंगाळतां मला केव्हां झोंप लागली तें माझ्या लक्षांतहि आलं नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जागा झालों तेव्हां फटफटीत उजाडलं होतं. तेरा जण सामान मागं ठेवून पहांटेसच नंदप्रयागची वाट चालू लागले होते. आमच्यापैकीं एक जण मोटारतळावर जाऊन आला. त्यानं वाईट बातमी आणली. आज नंदप्रयागला मोटार जाणारच नव्हती! आणि पेटरोल मिळेपर्यंत ती कधीं जाईल तेंहि सांगतां येण्यासारखं नव्हतं. एक तारखेला दोन दिवस होते, तेलाचा सांठा संपून गेला होता, म्हणून हा अनिश्चितपणा आला होता.

गांवांत चौकशी केली तर माणसाला नेणारीं सगळीं घोडीं नारायणाकडे गेलीं होतीं. मालवाहू घोडं फक्त मिळालं. त्यावर सामान लादून निघायला साडेसात वाजलं. मुखिया चांगलेच लंगडत होते. (एकुणसाठ मैल त्यांनीं मोडक्या पायावर रेटले होते हीच अचाट गोष्ट होती!) रस्ता सपाट होता तरी फक्त सात मैलांवरचं नंदप्रयाग गांठायला आम्हांला बारा उलटून गेले होते.

पण त्या बाराच्या उन्हांतसुद्धां डोंगराच्या पायथ्याच्या उतरणीवरील त्या छोट्या गांवाचा टुमदारपणा डोळ्यांत भरण्यासारखा वाटत होता. अलकनंदेच्या एका अंगाला वस्त्रगाळ शुभ्र वाळूचं छोटंसं वाळवंट, पैलतीराला स्वच्छ सपाट शेतं, त्यांत मधून मधून विखुरलेले चारपांच, चारपांच डेरेदार झाडांचे पुंज, मग पलिकडे वृक्षांनीं आच्छादलेला डोंगर, आणि वर निरभ्र आकाश. नंदप्रयाग पाहून आम्ही पांचहि जणांनीं समाधानाचे उद्गार काढले. मीं म्हटलं, "मोटार न मिळाल्यानं इथं दोन दिवस राहावं लागलं तरी दुःख वाटायला नको. कपडे स्वच्छ धुऊं, स्नान करूं, भरपूर विश्रांति घेऊं, संध्याकाळीं नदीकांठीं संगमापाशीं जमून सारे जण गप्पा मारूं..."

परंतु गांवांत येऊन चमोलीहून पहांटे निघालेल्या मंडळींना भेटलों तों हाय रे दैवा! त्यांनीं सांगितलं, "सकाळीं आम्ही इथं येऊन पोंचलों तेव्हां इथून पुढची मोटार सुटतच होती. तींत महाप्रयासानं कर्णप्रयागचीं दोन तिकिटं मिळालीं, म्हणून दोघांना आम्हीं पुढं पाठवून दिलं. साडेसात वाजतां तुम्ही आलांत, कीं तुमच्यासह नंतरच्या मोटारनं निघायचं ठरवून तुमची वाट पाहत राहिलों. पण ते दोघे गेले तीच मोटार शेवटची ठरली आणि मग तुमची गत काय झाली असली पाहिजे तेंहि ध्यानांत आलं..."

"चांगलं झालं! कर्म आमचं!" मीं मनांत म्हटलं.

"तरी पण ते दोघे पुढच्या मोटारींचीं उद्यांचीं तिकिटं मिळावींत म्हणून खटपट करणार आहेत, तेव्हां आज आपल्याला कर्णप्रयागला पोंचणं भागच आहे. आणि त्याच दृष्टीनं काय वाटेल तें झालं तरी आज संध्याकाळपर्यंत तुमच्यासह कर्णप्रयागला येतों असं त्यांना आम्हीं सांगून ठेवलं आहे. ते आपली वाट पाहतील!"

रंगभूमीवर कुठल्या तरी नाटकांत आपण काम करतों आहोंत असा मला भास झाला!

"चला! कांहीं खाणंपिणं उरकून घ्या! पुढं तेरा मैल जायचं आहे! लागलीच निघायला पाहिजे." ती मंडळी वाघ मागं लागल्यासारखं करूं लागली.

अखेरीस त्या दिवशीं आम्ही मागची मंडळी कर्णप्रयागला लळतलोंबत पोंचलों तेव्हां रात्रीचे साडेआठ झाले होते. त्या ठार अंधाऱ्या रात्रीं निरभ्र आकाशांतील तारका आणि त्याखालीं काळ्याकभिन्न प्रचंड डोंगरावर वरपासून खालपर्यंत तुरळकपणानं वसलेल्या कर्णप्रयागच्या घरांतील दिव्यांचे पुंज दुरून जरी रमणीय दिसले, कर्णगंगेचा अविरत खळखळाट जरी श्रवणमधुर वाटला, तरी त्याचं अधिक वर्णन करायला मन घेत नाहीं. कारण, विश्रांति न घेतां ऐन दुपारीं उन्हांतून कष्टी मनानं मारावी लागलेली मजल, पांगळ्या माणसाचे दुखऱ्या पायामुळं झालेले हाल, पुढं आतां मोटारी वेळेवर आणि व्यवस्थित मिळणार आहेत कीं नाहींत या भीतीनं मनाला बसलेली धास्ती, शरिराला आलेला थकवा आणि पोटांत भडकलेली भूक यांचीच आठवण प्रामुख्यानं मनांत गर्दी करते आणि दुसरं कांहींच आठवेनासं होतं...

# हिमालय-प्रवासांतील स्मृति : ३ :

नंदप्रयागहून सकाळीं मोटारनं कर्णप्रयागला आलेल्या त्या दोघांना, आज आम्हांला मोटार मिळणं अशक्य आहे, हें तिथं पोंचल्यावर कळलं होतं. तथापि आमच्यासाठीं जागा घेऊन सबंध दिवसभर ते आमची वाट पाहतच होते. प्रत्यक्ष कर्णप्रयागला दिवसांतला मिळेल तेवढा वेळ त्यांनीं मोटारतळावर काढून सर्वांच्या पुढच्या प्रवासासाठीं खटपट चालवली होती. इथून पुढं चाळीस मैलांवरील श्रीनगरपर्यंत थेट मोटारी जातात. तेलसांठा संपल्यानं गेले नऊ दिवस ह्या टापूंतली मोटारवाहतूक बंद होती. जे प्रवासी थांबू शकले होते ते थांबले होते; बाकीच्यांनीं वाट धरली होती. चमोलीहून वर नारायणाकडे जातांना मुखियांनीं एक कार्ड टाकून अमक्या दिवशीं जागा पाहिजे असल्याचं कळवलं होतं, तें कार्ड पोंचल्याच्या दिवशीं आमचा नंबर लागला होता. तो बराच वर होता, तरी आतां अधिक थांबणं आम्हांला कठिण होत होतं. घरची ओढ हें तर होतंच, पण एकेक दिवस जास्त म्हणजे सुमारें चाळीस रुपयांनीं खर्च वाढत होता. टिकटबाबू विद्यार्थी वगैरे भाषा ऐकत नव्हता. पंक्तिप्रपंच करण्याची त्याची तयारी नव्हती. समाधानाची गोष्ट एवढीच, कीं आम्ही पोंचलों त्याच दिवशीं चौदा मोटारी येऊन प्रवासी घेऊन गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशींहि अशाच येण्याचा संभव होता. तथापि आमच्या हातीं वाट पाहण्याखेरीज कांहीं नव्हतं. या साऱ्या गोष्टी आम्ही कर्णप्रयागला पोंचलों तेव्हां थोड्याच वेळांत आम्हाला समजल्या.

रात्रींच्या अंधारांत जपून पावलं टाकीत झुलत्या पुलावरून कर्णगंगा ओलांडली. बिऱ्हाडाची जागा खूप उंचावर डोंगरावर होती. कोलमडत आणि दगडगोटे, खांचखळगे व डोंगराचा चढ यांना मनापासून शिव्या देत खाणावळींत गेलों आणि तेथें अंग टाकून दिलीं. सर्वांच्या पोटांत भूक इतकी भडकली होती, कीं वाढपी आणतील तें सारं फस्त होत होतं. खाणावळवाल्यापाशीं पुरेशीं भांडीं नव्हतीं म्हणून सारे एकदम बसू शकले नाहींत. पण आधीं बसलेल्यांनीं सारा स्वैंपाकच संपवून टाकला! मागच्या आम्हां पांच-सहा जणांसाठीं मग पुन्हां अन्न शिजवावं लागलं. आकंठ जेवून आणि पोट फुटेपर्यंत पाणी पिऊन (आणि तुपाच्या जादा

आकारणीबद्दलचा तंटा कसाबसा मिटवून) बिन्हाडांत पथाऱ्यांवर अंगं टाकलीं तेव्हां बारा वाजून गेले होते.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आळशीपणाची कमाल करून (रुद्रप्रयाग सोडल्यापासून ही संधि प्रथमच मिळत होती.) रेंगाळत, रेंगाळत नदीकांठीं कपडे स्वच्छ धुतले, स्नानं केलीं. बघण्यासारखं जेवढं होतं तेवढं सारं आतांपर्यंतच्या प्रवासांत बघून झालं होतं. आतां जागचं हलून कांहीं बघायला जाण्याची इच्छाहि नव्हती आणि त्राणहि उरलं नव्हतं. बसल्या जागेवरून जें दिसेल तें पाहत होतों आणि समाधान मानीत होतों. इथं देवस्थानं आहेत कीं काय त्याची चौकशीहि केली नाहीं. फार काय, अलकनंदा आणि कर्णगंगा यांचा संगमहि बघितला तोहि बसल्या जागेवरूनच. मीं रुद्रप्रयाग मनसोक्त बघितलं होतं, त्यापुढं हा संगम म्हणजे क्षुद्रप्रयाग होता! (किंबहुना, वाटेंत अनेक ठिकाणीं मंदाकिनी आणि अलकनंदा या मोठ्या नद्यांना जेथें लहान नद्या येऊन मिळून संगम बने, तेथें मुद्दाम थांबून माहितगाराप्रमाणं गंभीरपणानं, "या संगमाला 'क्षुद्रयाग' म्हणतात बरं का!" असं निरनिराळ्या जणांना सांगून कांहींना हसवण्याचा तर कांहींच्या तोंडून आश्चर्यानं "असं का!" हे उद्गार काढण्याचा खेळ मी दोन-चार वेळां केला होता.)

दुपारीं पंड्यासारखं यथेच्छ जेवण करून विश्रांति घेत होतों. पिंडरगंगेच्या (हें कर्णगंगेचं दुसरं नांव आहे) सतत घोषानं गुंगी आली होती. तेवढ्यांत रस्त्यावर आग लागल्यासारखा कसला तरी ओरडा झाला. बिचकून बाहेर आलों तो आमचेच कूली आम्हांला मोठ्यानं हाक मारत होते, "मोटार छुटनेको है बापूजी! टिकटबाबू बुलाते हैं। जलदी चलो। थोडा देर बाकी है।" तेवढ्यांत टिकटघरांत थांबलेल्या आमच्या माणसांचा निरोपहि आला—"शेवटच्या मालवाहू मोटारींत जागा मिळते आहे. सात-आठ जण चला. बाकीचे उद्यां." मुखियांनीं निवड केली. झटपट सामान आवरून कूलींच्या स्वाधीन केलं. बाकीचे पुन्हां झोपीं गेले. आम्ही पहाड उतरूं लागलों. मोटारींत सामान चढवलं. आम्हीहि चढलों तों साडेतीन झाले. मुखिया आमच्याबरोबर येणार होते, ते मागं राहिले होते. लंगडत लंगडत चालावं लागल्यामुळं त्यांचीं पावलं भराभर पडत नव्हतीं. त्यांना मागं राहणाऱ्यांना सूचना द्यायच्या होत्या, श्रीनंद आणि त्याचे साथी यांना देण्यासाठीं उरलेले चारशें रुपये आणि इतर खर्चासाठींहि कांहीं पैसे द्यायचे होते. त्यांना घाई करण्यासाठीं कूलींना परत पिटाळलं. सरकारी नियमाप्रमाणं साडेतीन वाजतां मोटार सुटायला हवींच होती. कारण, नंतर फाटक बंद व्हायचं होतं. आतां मुखिया मागं राहणार

कीं काय ही भीति वाटत होती. तरी घाई करणाऱ्या चक्रधराला "एकही आदमी रहा है। वह देखो। आया है, अभी आ रहा है।" करीत सांवरून घेत होतों, तोंच त्यानं फाटक बंद होण्याच्या भीतीनं मोटार चालू केलीसुद्धां! आंतल्या आम्हांपैकीं एकाहि जवळ पैहि नव्हती. असे कफल्लक आम्ही पुढं श्रीनगरला जाऊन करणार काय! आम्ही एकच गिल्ला सुरू केला. चक्रधरानं "मोटार छूटही चाहिए। साढ़ह तीन बज गये हैं।" म्हणून फाटक ओलांडलं आणि पलीकडे ती उभी केली. "अब आने दो उनको" म्हणत मग तो खालीं उतरला.

मग मुखिया चढून मोटार सुरू झाली तेव्हां श्रीनंद आणि त्याचे सहकारी बंद झालेल्या फाटकाला टेकून उभे होते आणि "बाबूजी, याद रखना" म्हणत पुनः पुन्हा प्रणाम करीत होते. त्यांना आम्हीहि प्रणामानं उत्तर देत होतों, पण पोटांत कालवून आलं होतं. या प्रेमळ व्यक्ति आतां कधीं आयुष्यांत पुन्हां भेटणार नव्हत्या. सोळा दिवसांच्या उडत्या सहवासांतच त्यांनीं आम्हांवर विलक्षण मोहिनी टाकली होती. आणि स्वार्थी, अप्रामाणिक, क्रूर, रक्तपिपासु, पाशवी वृत्तीच्या माणसांनीं गजबजलेल्या या जगांत सालस, प्रामाणिक, कष्टाळू, सोशीक, प्रेमळ व्यक्तीहि असल्याचं प्रत्ययाला आणून देऊन मनाला अंजन लावलं होतं. "बाबूजी, याद रखना! याद रखना!"...कशाला? त्यांना आम्ही कधींच विसरणं शक्य नव्हतं...

रुद्रप्रयागला या मंडळींशीं आम्हीं थोडीशी 'चलाखी' केली होती. वजनापूर्वी सामान भरण्याच्या वेळीं आमच्या पाठीवर कायम राहणाऱ्या थैल्या आम्हीं सर्वांनीं ठांसून भरल्या होत्या आणि कूलींचं सामान कमी करण्याचा प्रयत्न केला होता. मुक्कामाहून निघतांना मात्र जरूर तेवढंच सामान या थैल्यांतून आम्ही बाळगणार होतों. यामुळं आमचे पैसे किती वांचले असतील कुणास ठाऊक, पण माझ्या मनाला त्याची सारखी टोचणी (तिचा मी कुणापाशीं कधींच उच्चार केला नाहीं.) लागली होती. मात्र पुढं, केदारनाथाच्या दिवशीं सारं सामान गौरीकुंडालाच ठेवून आम्हीं एकदोघांनाच बरोबर घेऊन बाकीच्यांना विश्रांति दिली होती, त्याचप्रमाणं तुंगनाथाच्या दिवशीं तेथें मुक्काम होणार नसल्यानं या सर्वांना 'चोपता' चट्टीपाशीं फुटलेल्या जवळच्या रस्त्यानं संध्याकाळपर्यंत 'मंडल' चट्टीपाशीं या, म्हणजे सारी खडी चढाई चुकेल आणि बरंचसं अंतरहि कमी होईल, असं सांगितलं होतं, आणि अखेरीस आतां कीर्तिनगरापर्यंत सामान पोंचवण्याचं करारांत ठरलेलं असूनसुद्धां कर्णप्रयागालाच सारा सहाशें रुपयांचा हिशेब चुकता करणार असल्यानं त्यांचे त्रेचाळीस मैलांचे श्रम वांचवीत होतों, ह्या

साऱ्यामुळं ती टोंचणी शेवटीं शेवटीं नाममात्र राहिली होती, तरी पण तिचा इथं उल्लेख केल्यावांचून ती पूर्णपणें नाहींशी होईलसं मला वाटत नाहीं.

या रस्त्यांनीं मालवाहू मोटारी रिकाम्या जात असल्या तर त्यांतून उतारू नेण्याची परवानगी असते. पण सातच. आम्हांला हिसके खूप बसत होते, हाडं खिळखिळीं होत होतीं, पण त्याचं विशेष दुःख नव्हतं. कारण, जागा ऐसपैस होती. पाय वाटेल तितके पसरतां येत होते, हवं तर लोळतां येत होतं, उभंहि राहता येत होतं. वरच्या भागावर लोखंडी कमानी होत्या आणि त्यांवर पाल ताणून बसवलं होतं, त्यामुळं आम्हांला सारं सृष्टिसौंदर्य मागल्या बाजूनं दिसत होतं. वाटेंत अनेक रम्य ठिकाणं येऊन गेलीं, पण त्या सर्वांत 'गऊचर' नांवाचं एका विस्तीर्ण पठारावरचं ठिकाण इतकं विलक्षण मोहक होतं, कीं त्यामधून असं घाईघाईनं मोटारींतून गेल्यानं त्याचा आणि हिमालयाचा आपण उपमर्द केल्याची भावना मनांत तरळून गेली. संध्याकाळीं मग श्रीनगरला पोंचलों तेव्हां सूर्यास्त झाला होता.

बहुतेक प्रवासी येतांना हरिद्वारहून देवप्रयागमार्गें येतात आणि परत जातांना श्रीनगरला आडवे वळून मोटारनं कोटद्वाराला जातात. तेथून नजीबाबादला रेल्वे-फांटा आहे. नजीबाबाद हें ठिकाण अंबाला-लखनौ या मुख्य रेल-रस्त्यावर आहे. आम्ही खर्च वांचवण्यासाठीं दोन मण सामान येतांना आधींच देवप्रयागाला शास्त्रीजींच्या वाड्यांत ठेवून दिलं होतं. त्यासाठीं आम्हांला हरिद्वारमार्गें परत जाणं भाग होतं.

सोळा दिवसांपूर्वी वर जातांना याच श्रीनगरमध्यें आम्हीं मुक्काम केला होता. हें श्रीनगर गढवाल प्रांतांतलं. काश्मिरांतलं नव्हे. गांव लहानशा शहरासारखा आहे. बाजारहि आहे. पण मुख्य रस्त्यावरूनसुद्धां गर्दी नसते. त्यामुळं नेहमीं शांत आणि निवांत वाटतं.

याच श्रीनगरांत बाबा काली कमलीवाल्याच्या धर्मशाळेंतील मुक्कामांत मी बंगालींत कडाक्याचं भांडण ऐकलं होतं. तें बंगाली आहे हें भांडणाऱ्यांच्या पोशाखा-वरून आणि त्यांतल्या 'आमार, तोमार, छिलो' असल्या शब्दांवरूनच मला अनुमानानं ओळखतां आलं होतं. यात्रेला आलीं असलीं तरी माणसं तीं माणसं; तेव्हां भांडणं झाल्याशिवाय कशीं राहतील? तथापि (हवं तें म्हणा, पण) या मंजुळ भाषेंत भांडण करतां येत असेल ही कल्पनाच मला कधीं आली नव्हती. बंगालींतलं हें भांडण ऐकल्यावर मात्र कानडींतसुद्धां प्रीतिकूजन करतां येत असलं पाहिजे असा

विचार मनांत आला! (कानडी बंधूंनीं क्षमा करावी.) आणि मग माझ्या नेहमींच्या संवयीप्रमाणं हे दोन्ही, विलक्षण म्हणा, आचरट म्हणा, विचार कथा लिहितांना कुठं तरी उपयोगांत आणण्याचं मीं ठरवलं...

याच श्रीनगरमधल्या धर्मशाळेंत हिमालयांतल्या प्रवाश्यांची पिण्याच्या पाण्याची सोय प्रथमच आम्हांला पाहायला मिळाली होती. वाचून आश्चर्य वाटेल, पण हिमालयांतील साऱ्या प्रवासांत एक दोन वेळ अशक्यच झालं तेव्हांचे प्रसंग वगळून बाकी कुठं म्हटल्या कुठंहि, धर्मानं अत्यंत पावन मानलेल्या या नद्यांचा एकहि थेंब आम्ही पोटांत जाऊं दिला नव्हता. सर्वच जण कटाक्षानं हा नियम पाळतात. या पाण्यांत अभ्रक सपाटून असतं. त्यामुळं तें पिणाऱ्याला अतिसाराचा मनस्वी त्रास होतो. पुस्तकं वाचून हें आम्हांला ठाऊक होतंच, पण इथले रहिवासीहि बजावतात आणि ठिकठिकाणीं सूचनाफलकहि असतात. हिमालयांत असंख्य झरे आहेत. यांना 'झरना' किंवा 'चश्मा' म्हणतात. जरूरीपुरल्या (तीनचारशें हातसुद्धां) लांबीचा, एक इंची लोखंडी फुंकणीवजा नळ घेऊन त्याचं एक तोंड या झऱ्यामध्यें दुसऱ्या तोंडाशीं झोताला पुरेसा जोर राहील इतपत उंचीवर सोडलेलं असतं आणि तो नळ भूपृष्ठानुसार वाकवीत वळवीत आणून चट्टीपाशीं टपालपेटी-एवढ्या उंच सिमेंटाच्या खांबांतून बाहेर आणलेला असतो. तोटी नसल्यानं नळ अखंड वाहत असतो. धारेखालीं एखादी मोठी चौकोनी शिळा असते. तेथें भांडीं घासावींत, पाणी भरून घ्यावं, स्नान करावं, हवं तर कपडेहि धुवावेत. हीं पिण्याच्या पाण्याचीं ठिकाणं प्रत्येक वस्तीच्या ठिकाणीं असतातच आणि तीं व्यवस्थित ठेवण्याचं काम 'सार्वजनिक निर्माण विभाग' (P.W.D.चं इकडचं नांव) करीत असतो.

हेंच श्रीनगर विंचवांबद्दल प्रसिद्ध आहे. आमच्या दोन्ही मुक्कामांत रात्री काढूनसुद्धां आमच्यापैकीं कुणालाच हा त्रास झाला नाहीं, त्यामुळं श्रीनगरच्या माझ्या रम्य स्मृति गढूळ झालेल्या नाहींत. विंचवावरून आठवण झाली. हिमालयांत सर्वत्र एक विलक्षण झुडूप आढळतं, त्याला 'बिच्चू का पौधा' म्हणतात. त्याच्या पानाचा स्पर्श अंगाला झाला कीं, त्या ठिकाणीं विंचू चावल्यासारख्या वेदना बराच वेळ होत राहतात. या झुडुपाला काटे कुठंच नसतात, पण बुंध्याला आणि पानांना सूक्ष्म लव असते तिच्या अग्राशीं कांहीं विषार असतो कीं काय कुणास ठाऊक! या 'बिच्चू के पौधेकी' काळजी पहांटेच्या वेळीं 'तट्टीला' जातांना घ्यावी लागते, नाहीं तर अनवस्था येते. हरिकिसननं यावरचा उतारा असलेला पौधाहि

आम्हांला दाखवला होता, त्याची प्रतीतीहि एकानं पाहिली होती, पण त्याचं नांव हरिकिसनला ठाऊक नव्हतं आणि तो सर्वत्र आढळतहि नाहीं.

या श्रीनगरच्या नदीकांठ अतिशय रम्य आहे. सभोंवतालीं सर्व बाजूंनीं हिरवेगार डोंगर असल्यानं या भागाला विस्तीर्ण 'चपका'सारखा आकार आला आहे. नदीकांठीं कांहीं ठिकाणीं पांढरेशुभ्र गोटे आहेत. ते प्रारंभीं लहान मुलांप्रमाणं गोळा करण्याचा मोह माणसाला आवरत नाहीं आणि पुष्कळसे जमा झाले म्हणजे मोठ्या माणसाप्रमाणं प्रवासांत असल्याचा विवेक करून ते परत नदीला अर्पण केल्यावांचूनहि राहवत नाहीं. कांहीं ठिकाणीं मऊ, वस्त्रगाळ, पांढरीशुभ्र वाळू आहे, तिच्यांतून चालतांना सायास पडले तरी मजा वाटत असते. नदींत एक दोन डोह आहेत आणि त्यांच्या कांठाच्याच अंगाला उंच दरड असल्यानं उड्या मारण्याचीहि नैसर्गिक सोय चांगली आहे. पाणी दुधिया रंगाचं, गार असून ओढ भरपूर असली तरी पात्रांत खडक नसल्यामुळं धोका नाहीं.

श्रीनगरहून कीर्तिनगर तीन मैल आहे. हें अंतर नदीच्या कांठानं पायीं तोडावं लागतं. तेथें नदी ओलांडली, कीं मोटारअड्डा लागतो. तेथून देवप्रयाग-मार्गें थेट हृषीकेशपर्यंत मोटारी जातात. या मोटारींत जागा साधारणपणें वाटेल तितकी मिळते. तथापि दुसऱ्या दिवशीं सकाळींच दोघे जण कीर्तिनगरला जाऊन पुढच्या दिवसासाठीं जागा सांगून परत आले तेव्हां काय ते निश्चिंत झालों. हा शहाणपणा झाला हें नंतर कळलं. कारण, मोटारी कर्णप्रयागहून सारखे उतारू आणूं लागल्या तसे कोटद्वाराकडे जाणारे लोक श्रीनगरला तुंबूं लागले, तेव्हां त्यांतल्यांपैकीं पुष्कळ जण कीर्तिनगरला वळले. पण या साऱ्या गोष्टी होऊं लागल्या त्याच्या आधींच आमचा नंबर लागला होता.

मग दुपारीं आमची उरलेली मंडळी कर्णप्रयागहून आली आणि त्यांच्यासह सारे जण रात्रीच्या मुक्कामासाठीं संध्याकाळीं कीर्तिनगरला आलों. हा गांव आहे अगदींच साध्या पांचपंचवीस घरांचा, पण त्यांनीं कुणाची कीर्ति वाढत होती आणि त्याला नगर तरी कां म्हणत होते तें एक कोडंच होतं.

कर्णप्रयागच्या खालीं अलकनंदेच्या कांठीं कुठं तरी ओंडक्यांचा कारखाना आहे. नदीच्या पात्रांतून रेल्वे-रुळांच्या 'बैठकीच्या' आकाराचे हे लांबट चौकोनी कापीव ओंडके वाहत जातात. हे हृषीकेशच्या अलीकडे कुठं तरी काढून घेण्याची व्यवस्था होत असली पाहिजे. कारण, लक्ष्मणझुल्यापाशीं यांचा मागमूसहि राहत नाहीं. प्रवाहांत अनेक अडथळे असतात, त्यांत हे अडकतात. त्यांना धारेंत लोटून

वाहते करण्यासाठीं ठिकठिकाणीं माणसं नेमलेलीं असतात. कीर्तिनगराच्या अलीकडे एका प्रचंड दरडीपाशीं नदीकांठ आंत असल्यामुळं तेथं पात्र रुंदावल्यासारखं होऊन मुख्य धारेला एकादं सरोवर चिकटल्यासारखं झालं होतं. धारेची आणि या सरोवराची सीमा किंचित् उथळ असल्यामुळं त्या सरोवराला घासून जाणाऱ्या प्रवाहाच्या वेगानं हें सरोवरांतलं पाणी गरगरां फिरत राहिलं होतं आणि आधीं-पासूनच त्यांत सांपडलेले शेंदीडशें ओंडकेहि गरगरां फिरत होते. एवढंच नव्हे, तर धारेंतले ओंडके या चक्रांत येऊं शकत नव्हते आणि यांतलेहि धारेंत घुसूं शकत नव्हते. मकाणाच्या अलीकडे सातआठशें कदमांवर असलेलं हें अजब दृश्य जातांना पाहिलं आणि सामान टाकून परत येऊन मग त्या उंच दरडीवर कांठावर बसून गप्पा मारीत, अनेक आठवणी काढीत पाहत राहिलों. खूप खालीं त्या सरोवराच्या कांठाशीं खडकांतून दहाबारा माणसं दोरखंडाच्या साहाय्यानं ते ओंडके धारेंत ओढायचा प्रयत्न करीत होते, पण त्यांना यश येत नव्हतं. शेवटीं त्यांनीं नाद सोडून दिला. 'यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ। समेत्य च व्यपेयातां तद्वद् भूतसमागमः॥' या श्लोकांत वर्णन न केलेला, चक्राकार फिरणाऱ्या आणि त्यांना त्यांतून बाहेर काढणाऱ्यांच्या प्रयत्नांना दाद न देणाऱ्या मानवांचा सहवास त्या उपमेचं प्रात्यक्षिक या ठिकाणीं पाहतांना प्रत्ययाला आला...अंधार पडूं लागला तसं हें दृश्य बराच वेळ स्तब्धपणानं टक लावून पाहून स्मृतिसंपुटांत व्यवस्थित ठेवून दिलं आणि मकाणांत परत गेलों.

कीर्तिनगराहून दुसऱ्या दिवशीं उजाडण्याच्या सुमारास निघूनहि देवप्रयागला थांबावं लागून सहा तास व्यर्थ गेले. या सर्व भागांतून रस्ता एक मोटार जाण्या-पुरताच रुंद असल्यानं दोन्ही बाजूंनीं सुटलेल्या सर्व मोटारी ठराविक टप्प्यावर एकमेकांना भेटल्यावांचून आपापल्या दिशेनं पुढं जाऊं शकत नाहींत. देवप्रयाग ते हृषीकेश हा रस्ता महाभयंकर आहे. रस्त्याला कठडा कुठंच नाहीं. अर्थातच कड्याखालीं पडणाऱ्या मोटारीला या कठड्यामुळं अडथळा होऊं शकणार नसला तरी बघणाऱ्याच्या दृष्टीला त्याचा आधार वाटतो. चक्रधरांची दृष्टि संवयीनं बधिर झालेली असेल, पण आंतल्या लोकांच्या पोटांत मात्र भीतीचा गोळा क्षणोक्षणीं उभा राही. कल्पना करा, रस्त्याच्या एका अंगाला एकदम खालीं गेलेली खोल खोल भयानक दरी, तिच्या पायथ्याशीं सुताच्या धाग्यासारखी दिसणारी भागीरथी, मध्येंच एकादे वेळेला मोटार डोंगराच्या सोंडेच्या वळणापाशीं येई तेव्हां एकदम

रस्ता संपलेला आणि पलीकडे नुसतंच निळं निळं आकाश दिसे, अशा वेळीं मनांत जें काय होई तें होई! रोज वीसएक गाड्या दोन्ही बाजूंनीं सुखरूप जात आहेत एवढ्या एकाच विचारानं मनांतली भीति दाबायचा जो तो प्रयत्न करी. पण चक्रधर मात्र गाड्या सोसाट्यांत आणि विश्वासानं हांकीत होते. आमच्या बरोबरचे एक जण म्हणाले, "मीं विमानांतून प्रवास केलेला आहे, पण त्या वेळींसुद्धां हें असलं कधींच वाटलं नाहीं!" संध्याकाळीं हृषीकेश आलं तेव्हां कुठं जिवांत जीव आला.

आतां हृषीकेशला पुढची हरिद्वारची मोटार पकडून ती पूर्ण भरून सुटेपर्यंत काय तो अर्धापाऊण तास आम्हीं काढला. पण बावीस दिवसांपूर्वी वर जातांना इथं आम्हीं मुक्काम केला होता. त्या वेळीं इथल्या धर्मशाळा सगळ्या भरलेल्या होत्या. जागा कुठंच नव्हती. मग मुखियांनीं केलेल्या खटपटीला यश येऊन इथल्या 'नेपाळी संस्कृत पाठशाळे'त, आम्हांपैकीं बहुतेक जण विद्यार्थी होते म्हणूनच, जागा मिळाली. वास्तविक हें यात्री उतरण्याचं ठिकाण नाहीं.

ही पाठशाळा गांवाबाहेर 'मुनिकी रेती' या ठिकाणापाशीं आहे. येथून संध्याकाळीं लक्ष्मणझूला पाहायला आम्ही गेलों होतों. आतां हा झुलता पूल लोखंडी तारा पिळून बनलेल्या मनगटाएवढ्या जाड दोरखंडाचा असून त्यावरचा रस्ता काँक्रीटचा आहे. पण पूर्वी जेव्हां केव्हां तो साध्या दोराचा असेल त्या वेळीं त्यावरून जाणं अतिशयच भयप्रद काम असलं पाहिजे. आतांसुद्धां मध्यभागीं उभं राहून खालीं पात्राकडे पाहिलं कीं डोळे फिरतात, आणि दोरखंडाचा झोळ इथं सर्वांत खालीं आल्यामुळं गुढग्याइतक्याच उंचीवर असतो, त्यामुळं वाऱ्याची सूक्ष्मशी झुळूक आली तरी झोक जाणार या भीतीनं अंगाचा सारखा थरकांप होतो. नदीकांठीं एका अंगाला दाट हिरव्यागर्द झाडीनं आच्छादलेले पहाड खूप उंच असून त्यांची रचना घोडनालेच्या आकारासारखी आहे. या ठिकाणच्या वातावरणाचा शांतपणा, निवांतपणा आणि भव्यपणा तपश्चर्येला आदर्श असाच आहे. फार काय, इथं आल्यानंतर अंगांतल्या शहरी कपड्यांचीसुद्धां शरम वाटू लागते. आम्ही इथं आलों, तेव्हां सूर्यास्त झाला होता, त्यामुळं सर्वांचीं मनं इथल्या गूढ निरामय शांतीनं विशेषच भारावून गेलीं. मी अंगावर नाममात्र एकच कपडा राहूं दिला आणि नदीकांठच्या वस्त्रगाळ शुभ्र वाळूंत अंग टाकून देऊन त्या वातावरणाशीं तद्रूप होण्याचा प्रयत्न केला. सर्वांनींहि तेंच केलं. मग अंधार होऊं लागला तशीं भगभर स्नानं उरकून घेतलीं. त्रिन्हाडीं परतलों ते केवळ इथं राहतां येणं शक्य

नव्हतं म्हणूनच. हृषीकेश हें विष्णूचं नांव आहे. हृषीक म्हणजे इंद्रिय, त्यांचा ईश म्हणजे जितेंद्रिय. पण इथं हृषीकेश हा शब्द लिहिलेला सहसा आढळायचा नाहीं. सगळे जण ऋषिकेश लिहितात आणि म्हणतातहि तेंच. हें रूपांतर अज्ञानामुळं झालं आहे, कीं जिभेनं आपल्या सोईसाठीं करून घेतलं आहे, कीं तपस्वी जनांना योग्य अशा लक्ष्मणझूल्याजवळच्या वातावरणानं अभावितपणानं झालं आहे तें सांगणं कठीण आहे.

आम्ही इथं आलों होतों तेव्हां मोटारींचीं पुढच्या दोन दिवसांचीं सारीं तिकिटं खपलीं होतीं. ते दिवस वायां जाऊं नयेत म्हणून मग इथून सत्तावीस मैलांवरचं डेहराडून आणि तेथून पुढं तेवीस मैलांवरची मसूरी हीं ठिकाणं आम्हीं पदरांत पाडून घेतलीं होतीं. मसूरीची हवा चांगली, गारवा उत्तम. इथं हिंवाळ्यांत बर्फहि पडतं. वस्तीहि बरीच आहे. बाजार मोठा, आणि महाग कां होईना वाटेल त्या वस्तू इथं मिळूं शकतात. मसूरीला आम्ही दुपारचे चारपांच तास काढले. प्रत्येक क्षणीं मी दिवसाच्या त्या वेळच्या महाबळेश्वरशीं मसूरीची तुलना करीत होतों. तथापि मला महाबळेश्वरचा निसर्गाचा भव्यपणा आणि रौद्र स्वरूप इथं आढळलं नाहीं. इथलं एक ठिकाण मला अतिशय आवडलं. या ठिकाणीं रस्त्याच्या एका अंगाला थोड्या अंतरापुरता कठडा होता आणि तेथें खालीं घळ सुरू होऊन तेथून पुढं समोर खोल खोल दूरपर्यंत दरी रुंदावत गेली होती. या दरींत आणि तिच्या दोन्ही अंगांच्या डोंगरावर तीन प्रहरच्या स्वच्छ उन्हांत उजळलेली झाडी इतकी दाट होती कीं तिच्याकडे पाहून मीं म्हटलं, "आत्तां एकादी होडी आणि दोन वल्हीं मिळालीं तर या दरींतून सहज ती वल्हवत पार पायथ्यापर्यंत जायला मस्त मजा येईल!" पण हा एवढा भाग सोडला तर बाकीची मसूरी मला रुक्ष वाटली. इथं संध्याकाळ काढली असती तर हें मत बदललं असतं कीं काय कुणास ठाऊक!

या साऱ्या बावीस दिवसांपूर्वींच्या गोष्टी. आज हृषीकेशला पुढची मोटार मिळतांच हरिद्वार गांठलं. आतां मोटारींच्या कचाट्यांतून सुटल्यानं सर्वांना हायसं वाटलं. मला आठवतं आहे, चमोलीच्या अलीकडे चालत असतांना एके दिवशीं वाटचालीनं फसफसणारी एक ढेरपोटवाली बया हातांतली काठी आपटीत मोठ्यानं "हे भगवान् मुझे मोटार मिले! हे भगवान्! मुझे मोटार मिले!" असा धांवा करीत जातांना मला आढळली होती तेव्हां मला हसूं आलं होतं; पण तें अनाठायीं होतं हें आतां या वेळपर्यंत पुरेपूर पटलं होतं.

या खेपेला आम्ही हरिद्वारला रेल्वे स्टेशनांतल्या उतारूंच्या खोलींत उतरलों. पण आधीं इथं आलों होतों तेव्हां जागा मिळायला फार प्रयास पडले होते. साऱ्या धर्मशाळा खेंचून भरल्या होत्या. 'कुशा' घाटाजवळच्या 'तेहरी गृहा'मध्यें तिसऱ्या मजल्यावर औरसचौरस सुमारें सोळा फुटांची खोली आम्हांला घ्यावी लागली होती. तिला एका दिवसासाठीं पांच रुपये जागाभाडं, एक रुपया मुनीमपट्टी, आठ आणे सतरंजीभाडं, आणि दर माणशीं अर्धा आणा भंगीपट्टी असे पैसे मुनीमानं आमच्याकडून उकळले होते. इतका डांबिसपणा पंढरपूरलाहि मीं कधीं बघितला नव्हता! पण एवढा कडू अनुभव सोडला तर जातांयेतांनाच्या दोन्ही मुक्कामांत हरिद्वारनं आम्हांला तृप्त केलं होतं. पहिल्या खेपेला, दुपारीं गंगास्नान आणि ब्रह्मकुंड, हरिकी पौडी, इत्यादि देवस्थानं उरकून संध्याकाळीं पुन्हा नदीकांठीं गेलों होतों. घाटावरली गर्दी, माळ्यांचीं दुकानं, दिव्यांची आरास, मिठाई व इतर वस्तु विकणारे, कीर्तन, भजन, कथाकार यांनीं केलेला कोलाहल, त्यांतच मिसळणारा आरतीचा घोष आणि घंटानाद, हे सर्व आवाज कर्णकटु न वाटतां उलट कानाला मालिश केल्यागत वाटलं होतं. हा केवळ तेथील वातावरणाचा परिणाम होता.

आणि गंगाप्रवाहांतलं दीपदान! आकारानं ओंजळीच्या दुप्पट, तिप्पट, चौपट मोठे असलेले पानांचे द्रोण, त्यांत नाना रंगांचीं, नाना आकारांचीं फुलं भरलेलीं, त्यांत एक इवलीशी मातीची पणती आणि तिच्यांत तुपांत भिजवलेली चिमुकली फुलवात. हे दिवे आणि द्रोणांतलीं फुलं अर्पण करणाऱ्या गंगाभक्तांच्या चर्यांवर द्रोण दूरवर चमचमत गेला तर दिसणारा आनंद आणि फुलवात जवळच भडकून विझली किंवा लाटेमुळं द्रोण उलटा झाला तर गंगामाईनं आपली सेवा रुजू करून घेतली नाहीं या विचारानं येणारी निराशा आणि दुःख...कित्येक वर्षांपूर्वीं 'संध्यादीप' नांवाची एक पंधरावीस ओळींची कथा मीं लिहिली होती. त्या वेळीं हरिद्वार हें मला अपरिचित होतं आणि इथं असं दीपदान रोज संध्याकाळीं चालतं हें मला ठाऊकहि नव्हतं. पण ती लिहितांना जें असलंच दृश्य माझ्या डोळ्यांपुढं होतं तें, मी आतां पाहत होतों त्या दृश्यापुढं किती तुच्छ, किती क्षुद्र होतं!...

आधींच्या खेपेला कनखलला जाणं जमलं नव्हतं, तें या खेपेला इथं आल्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं केलं. त्या दिवशीं आमचा रस्ता चुकला आणि भलतीकडेच गेलों. मग चौकशी करून आडवे वळलों. अंतर फार वाढलं होतं, तरी पण त्याचं कांहीं वाटलं नाहीं. कारण आतां ज्या भागांतून आम्ही जात होतों,

त्यांत मोठ्या वृक्षांच्या राया, रसरशीत फळांनीं लगडलेल्या हिरव्यागार झाडांच्या जागा इतक्या विपुल होत्या, कीं प्रत्यक्ष नंदनवनांतून चालल्याचा खरोखरच भास होत होता. लीची नांवाचीं फळं इतकीं भरमसाट विकत घेतलीं, कीं कांहीं जणांनीं शेवटीं एक एक फळ माकडाकडे फेंकून तें तें सोलून कसं खातं हें पाहण्याचा खेळ सुरू केला. गंगेचा कालवा बघितला तो इतका मोठा, कीं ती एकादी नदी असल्याचाच भ्रम व्हावा. यामुळं प्रत्यक्ष कनखल क्षेत्रांत गंगेचं पात्र अगदींच क्षीण होतं, उघड्या पडलेल्या पात्रामुळं तिची अवस्था अतिशय शोचनीय वाटत होती, लहानपणापासून सतीचा देहत्याग आणि दक्षयज्ञ यांची कथा ऐकून मनांत जीं भव्य दृश्यं तयार झालीं होतीं, तीं, इथलं एकाद्या बाहुलीलादेखील उडी मारतांना भीति वाटेल इतकं आकुंचित असलेलं दक्षयज्ञाचं कुंड पाहून उध्वस्त होऊन गेलीं होतीं, तरी त्याचं मनाला कांहीं वाटलं नाहीं. मी लहान असतांना थोरली आई स्नानाच्या वेळीं घंगाळांतून पहिला तांब्या अंगावर घेतांना 'गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते। स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ॥' हा श्लोक म्हणे, तो मी रोज ऐकत असें. तो लक्षांत होता म्हणून इथं आईचं म्हणून स्नान करून तिच्या पुनर्जन्माची चिंता दूर करून टाकली...

थोरली आई 'मातः शैलसुता...' इत्यादि शब्दांनीं सुरू होणारा आणखीहि एक श्लोक म्हणत असे. त्यांतल्या अखेरच्या दोन ओळी मला कधीं धड ऐकूं आल्या नाहींत, आणि ज्या वेळीं त्या तिच्याकडून ऐकून घेऊन अर्थ लावण्याच्या वयाचा मी झालों होतों, तेव्हां ती कैलासवासी झाली होती. त्यांच्याविषयीं मी किती तरी दिवस अज्ञानांतच होतों. पण मध्यंतरीं श्री. रा. भि. जोशी यांच्या याच भागाच्या वर्णनांत नेमक्या तेवढ्याच ओळीं केवळ योगायोगानं संपूर्ण सांपडल्या. तेव्हां त्या 'घृतकुल्या मधुकल्यां'नीं समृद्ध प्रांतांतून वावरत असतांना मनांत उठलेल्या विचारांना अचानक वाचा फुटल्यासारखं झालं. 'तुझ्या पापनाशी पुण्यजलांत, हे भागिरथी, मला एकादा मासा किंवा कासव व्हायला मिळालं तरी किती चांगलं? किंवा हे गंगे, तुझ्या तीरावरील एकाद्या झाडाच्या ढोलींतला पक्षी व्हायला मला मिळालं तरी मी स्वतःला भाग्यशाली मानीन...' काव्याच्या वाचनालासुद्धां वेळ असते. निरनिराळ्या वेळीं केलेलं वाचन निरनिराळं माधुर्य निर्माण करतं. या ओळी मला पूर्वीं वाचायला मिळाल्या असत्या तर मीं त्यांचा नुसता अर्थच लक्षांत घेतला असता. आतां मी त्या अर्थाच्या मागं जातों आणि बराच वेळ गंगेच्या कांठीं रेंगाळत राहतों...

हरिद्वारला रात्रीं आगगाडींत कसे घुसलों असूं तें आमचं आम्हीच जाणूं. स्टेशनावर ही थाप होती. सामानाचे आणि माणसांचे दोन गट केले आणि दोन टोकांना उभे राहिलों. गाडी थांबल्यावर तिच्यावर अक्षरशः धडक मारली! ही गाडी दिल्लीला थेट जाणार होती ही केवळ्या भाग्याची गोष्ट होती!

आम्हीं असं कां म्हणावं याला कारण आहे. दिल्लीहून इकडे येतांना आमची काय अवस्था झाली होती ती आम्ही विसरलों नव्हतों, विसरणं शक्य नव्हतं. दिल्लीहून हरिद्वारहून डेहराडूनला जाणारी गाडी संध्याकाळीं सात वाजतां निघते, ती गांठण्यासाठीं आम्ही स्टेशनावर अडीच तास आधीं आलों; पण ती त्याआधींच फलाटाला लागली असल्यानं ठिच्चून भरलेली होती. आतां, म्हटलं, संपलंच काम! आम्ही इतकीं माणसं आणि आमचं इतकं सामान एकत्र राहणं सोडाच, पण नुसतं आंत शिरणंहि शक्य नव्हतं. शहाणपणानं आम्ही गाडीचा नाद सोडून दिला आणि मग तींत एकट्यादुकट्या पुष्कळ व्यक्ति घुसूं पाहत होत्या त्यांची तारांबळ, बोलपटांतलीं दृश्यं पाहावींत तशीं निर्लेप मनानं मजेत पाहत राहिलों. तीं भांडणं, मारामारी, फेंकाफेंकी, धक्काबुक्की, कचाकची, शेवटीं अमेरिकन बोलपटालाहि लाजवील इतक्या थराला गेलीं. आमच्यापैकीं एकानं उद्गार काढले, "एखादा माणूस संसाराला वैतागून हिमालयांत जायला निघाला, तर हा आगगाडीचा प्रवास पाहून त्याला संसारदेखील त्यापेक्षां बरा वाटेल आणि तो माघारीं फिरेल!" शेवटीं आम्हीं मुर्दाडपणानं हसत ती गाडी समोरून जातांना बघितली, तेव्हां एकादं मोहोळ सरकत गेल्यासारखं आम्हांला वाटलं. या सर्वांचा परिणाम मात्र असा झाला, कीं वाटेल त्या गोष्टीसाठीं मनाची तयारी झाली.

रात्रीच्या ज्या गाडीनं मग आम्हीं जायचं ठरवलं ती अमृतसरची गाडी होती. ती सहराणपुरला बदलायला हवी होती. ती फलाटाला लागतांक्षणींच आमच्या नेमक्या संख्येएवढा वेगळा सलग कप्पा पकडून जागा तर मिळवली. पण ती टिकवायची कशी? डब्यांत छापलेला आंकडा कुणीच मान्य करीत नाहीं. लाटांवर लाटा येत होत्या. विद्यार्थी आहेत, जागा राखीव आहे, वगैरे थापा देऊन थोडा वेळ तग धरला. एक माहितगार आला, तो ऐकेना, आणि त्याच्याबरोबर अनेक आंत आले. हात सोडले, डोळे मिटले आणि म्हटलं, येऊं द्या! इतर डब्यांतून भरमसाट गर्दी असतांना आम्ही तरी कोणत्या तोंडानं लोकांना हांकून लावणार!

पण हा विचार आधीं सुचला नाहीं आणि जेव्हां सुचला तेव्हां जे आमच्या थापा खऱ्या मानून निघून गेले होते त्यांचीच मनाला चुटपूट लागून राहिली.

पुढं मीरतला एकानं आपलीं मुलं आंत फेंकलीं, बायको लोटली, तेवढ्यांत गाडी सुटली आणि तो व त्याचं सामान मागंच राहिलं. सांखळी खेंचूनहि गाडी थांबली नाहीं. नंतर एका स्टेशनावर लष्करी 'जवान' आले, त्यांनीं आमच्या आरडाओरडीला न जुमानतां दारांतच खालपासून अगदीं वरपर्यंत पेट्यांची उतरंड रचली आणि त्या बाहेर पडूं नयेत म्हणून ते त्यांना सांवरून दांडे धरून बाहेर उभे राहिले! शेवटीं सहाराणपूरला सामानासह उतरलों तेव्हां एकाची वळकटीच गायब झाली होती! आतां मनं इतकीं बधिर झालीं होतीं, कीं त्याला फटका कितीचा बसला त्याचा हिशेबहि त्या वेळीं किंवा पुढं कधींच त्यानं किंवा आम्हीं केला नाहीं.

आतां सहाराणपूरला दुसऱ्या गाडींत चढण्याचं दिव्य करायचं होतं. आधींची गाडी दिल्लीहून सुटणारी तरी होती, पण ही दुसरीकडून येणारी होती. शेवटीं ती आली, ती 'उससे भी जादा' भरलेली. मुखियांनीं त्या धामधुमींतहि शांतपणानं आपलं सगळ्या प्रकारचं शब्दांचं सामर्थ्य (फक्त शब्दांचंच) खर्च करून रेल्वे-अधिकाऱ्याकडून (आमच्या जबाबदारीवर) ब्रेकमध्यें सामान टाकण्याची परवानगी मिळविली आणि मग वाटेल त्यानं वाटेल तिथं घुसावं, पुढचं हरिद्वारला पाहूं, असं ठरवून कुणी उभे, कुणी वांकून, कुणी दाराबाहेर लोंबकळत, तर कुणी अंगाची घडी घालून असे एकदांचं हरिद्वारला पोंचलों होतों. दोन वर्षांपूर्वीच या भागाच्या जरा पलीकडे कसले उत्पात झाले होते, ते मनांत आणले, त्या वेळच्या इथल्या परिस्थितीची थोड्याफार अंशानं कां होईना कल्पना आपल्याला आली, असा विवेक केला आणि सुखरूप पोंचलों याचाच आनंद मानला...

ही हकिकत सारी जातांनाची. आतां आम्ही त्या मानानं किती सुखांत होतों. गट दोन झाले असले तरी प्रत्येक एकत्र होता. त्याचं सामानहि जवळ होतं!

सकाळीं दिल्ली आली. मग पंजाब मेलमध्यें बसलों आणि दिल्ली मागं गेली...

आम्ही प्रवासाला निघालों तेव्हांपासून रोज टिपणं ठेवायचीं असा मीं निश्चय केला होता. सवड मिळेल तसतसं मी लिहीत गेलों होतों. आग्रा, दिल्ली, हरिद्वार, हृषीकेश, देवप्रयाग...पण पुढं रुद्रप्रयागपासून चालायला लागल्यावर मुक्कामाच्या ठिकाणीं रात्रीं अंधार असे आणि मेणबत्तीच्या क्षीण उजेडांत लिहिणं कठिण होई. त्याचप्रमाणं जेव्हां केव्हां सवड मिळे तेव्हां विश्रांतीची इतकी जरुरी वाटे, कीं मान मोडून लिहीत राहणं जिवावर येई. मी मग तें सोडून दिलं. लिहीत होतों केवळ पत्रं आणि तींहि कर्तव्य म्हणून, कबूल केलं होतं म्हणून, आणि घरीं काळजी वाटेल

ही भीति होती म्हणून. तिहींनीं भाग जाणाऱ्या तारखांनाच फक्त तीं लिहिण्याचं मीं कबूल केलं होतं हीच त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होती.

गाडी पुढं चालली होती. दुपारीं 'राजा की मंडी' आली आणि गेली......

परतायच्या वेळीं घरीं जायला सगळे इतके उत्सुक असतील, कीं दिल्ली आणि आग्रा यांचं केवढंहि आकर्षण असलं तरी तेथें उतरायला राजी होणार नाहींत, हें लक्षांत घेऊन, जातांनाच वाटेंत आम्हीं तेथें मुक्काम केले होते. विख्यात, विख्यात म्हणून म्हणतात त्या इमारती या मुक्कामांत आम्ही इतक्या थोड्या अवधींत मोठ्या संख्येनं बघून घेतल्या होत्या, कीं डोक्यांत गर्दी होऊन दृष्टीपुढून उमटून गेलेलीं त्यांचीं चित्रं आतां पुसटच नव्हेत तर एकमेकांत मिसळून जाऊं लागलीं आहेत. माझ्या टिपणवहींत त्यांच्या नांवांचीच फक्त नोंद मला आढळते आणि म्हणून त्यांचं वर्णन करायचं म्हटलं तर मला 'प्रवाशांच्या' छापील 'मार्गमित्रां'ची मदत घ्यावी लागणार. पण मग तसं करण्यांत स्वारस्य काय?

तथापि ही अवस्था सर्वच स्थळांची नाहीं. उदाहरणार्थ, ताजमहाल मला स्पष्ट दिसतो आहे. त्याला पराभूत करण्याच्या हेतूनं दयाळबागेंत राधास्वामी नामक साधुबोवांच्या एका मंदिराचं काम गेलीं चाळीस वर्षं चालू आहे, त्यासाठीं शंभर कारागीर महिना दोनशें रुपये पगारावर संगमरवरावर कोरीव काम करीत आहेत आणि तयार झाला आहे फक्त एक मजला. पण तोसुद्धां आकर्षकहि नाहीं आणि भव्यहि नाहीं. सजावटींची नुसती मारवाडी पद्धतीनं खेंचाखेंच झाली आहे. ताजमहालचा पराभव न होतां या मंदिराचंच हसं होणार कीं काय हीच शंका सारखी मनांत येते......फत्तेपूर शिक्रीमध्यें सलीम चिस्तीच्या कबरीमध्यें केलेल्या 'पच्ची-कारीं'त लक्लकन् चमकलेलं शेंदरी गुलाबी रंगाच्या शिंपल्याचं प्राजक्ताएवढं चिमुकलं फूल मला दिसतं...अफाट उंच असलेल्या बुलंद दरवाज्याच्या खालीं गांवांत कुणा डॉक्टरानं स्वतःचंच स्मारक उभं केलं आहे त्याचा मनोरा, हिमालयांतल्या उत्तुंग देवदारूशेजारीं एकादं कोरांटीचं झुडूप उभं असावं तसा मला दिसतो...दिल्लींतासुद्धां आम्हीं बघितलं चिकार, पण कुतुबमिनार आणि अशोकस्तंभ, गांधीजींना-जेथें श्रेष्ठ मरण आलं तें स्थान आणि त्यांच्या कीर्तीला साजेसाच राजघाटावरील अगदीं साधा चौथरा...अशा मोजक्या ठिकाणांचीच स्मृति काय ती स्पष्ट आहे. बाकी मग, बघितले नाहींत असं वाटूं नये म्हणूनच केवळ बघितलेले ते मकबरे, त्या कबरी, ते उद्दाले, ते जंग, ते महाल...सारं कांहीं विस्मृतींत झिरपत चाललं आहे...

आगगाडी जोसांत चालली होती. भसाड्या आवाजाची शिटी (कीं भोंगा?) असलेलं नवीन इंजिन तिला भलत्याच वेगानं ओढीत होतं आणि ठरलेल्या वेळेच्या आधींच आणून ठेवीत होतं. ग्वाल्हेर आलं नि गेलं, झांशी गेली, अपरात्रीं केव्हां तरी धुंदींत इटारसी गेलेली बघितली आणि मग सकाळीं उजाडतां उजाडतां भुसावळ आलं तेव्हां इतक्या दिवसांनंतर आजूबाजूला प्रथमच्च मराठी शब्द कानांवर आले.

आतां घर घर तें यायचं काय राहिलं होतं? या खोलींतून पलीकडच्या खोलींत जायचं तेवढं काय तें उरल्यासारखं होतं. महाराष्ट्राची माती, महाराष्ट्राचे वृक्ष, महाराष्ट्राचे डोंगर, महाराष्ट्रांतल्या नद्या, महाराष्ट्राचं आकाश, हवा...महाराष्ट्र, महाराष्ट्र...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

# कर्नाटकांत

'गुणग्रामाविसंवादि नामापि हि महात्मनाम्' असं एक सुभाषित मी लहानपणीं शिकलों होतों. श्रेष्ठांचं नांव कर्णमधुर असतं हा त्याचा आशय हिमालयांत प्रवास करतांना हरिद्वार, ग्वालियावगड, तुंगनाथ, चमोली, नंदप्रयाग, इत्यादि ठिकाणीं मला पुरेपूर पटला होता. (किंबहुना, हिमालयांतल्या स्थळांच्या नांवांचं कर्णमाधुर्य इतकं अवीट आहे, कीं नुसते ते शब्द ऐकले तरी माणसाची तृप्ति व्हावी.) जी गोष्ट गुणांची तीच दोषांचीहि म्हणायला काय हरकत आहे? तेव्हां वास्तविक सुभाषितकारानं 'एकाद्याचं नांव त्याच्या ठायीं असलेल्या गुणदोषांना अनुरूप असतं,' असं एकादं सर्वस्पर्शी सुभाषित करायला हरकत नव्हती. उदाहरणांची वाण त्याला कधींच पडली नसती.

तथापि माझं मत कुणी विचारील तर मी म्हणेन, सुभाषितं हीं उसाच्या कर्व्यांसारखीं असतात. त्याचा 'रस' चोखावा आणि नंतर तीं फेकून द्यावीं. अधिक खोलांत कुणी शिरूं नये. तरीदेखील 'भद्रावती' या नांवाच्या बाबतींत वरचं सुभाषित खोटं म्हणण्याचा मला धीर होत नाहीं. कारण, भद्रावती हा शब्द ऐकला, कीं एकादा बांध फोडून तप्त रसाचा स्रोत प्रारंभीं जोरानं वाहून मग संथपणानं सरकत गेल्याचा मला भास होतो. भद्रावती प्रत्यक्ष पाहण्याआधींच हें दृश्य माझ्या मनांत तयार झालं आहे. ती पाहिल्यावर तें पक्कं झालं एवढंच.

भद्रावती हें आगगाडीचं स्टेशन आहे. पुण्याहून बंगलोरला जाणारी गाडी सुमारें चोवीस तासांनंतर बिरूरला बदलावी लागते. बिरूरहून वायव्येकडे शिमोगा-मार्गें तालगुप्पापर्यंत फांटा गेला आहे, त्यावर ३८ मैलांच्या अंतरावर भद्रावती आहे. बोलूनचालून फांटा, तेव्हां पुण्याहून व बंगलोरहून येणाऱ्या उतारूंना घेतल्यावांचून ही गाडी निघत नाहीं, त्यामुळं तिच्या वेळा फक्त वेळापत्रकांतच राहतात. आम्ही भद्रावतीला पोंचलों तेव्हां गाडीला एक तास उशीर झाला होता. म्हणजे त्या मानानं लवकरच पोंचलों आम्ही. वेळ संध्याकाळची झाली होती.

कारखान्याच्या अतिथिशाळेंत आम्ही उतरलों होतों. रात्रीं कर्नाटकी पद्धतीचं जेवण मिळालं. तें आवडेल कीं नाहीं ही भीति होती, पण ती अनाठायीं ठरली.

आमच्यापैकीं गुजराती पद्धतीचं जेवण घेणाऱ्यांची, या वेळीं आणि बाकीच्या प्रवासांतहि, खाण्याची गैरसोयच झाली.

या जेवणाच्या पदार्थांच्या बाबतींत माझं एक स्वप्न आहे. एका प्रांतातले प्रवासी दुसऱ्या प्रांतांत जातात तेव्हां पुष्कळ वेळां अपरिचित पदार्थ आवडले नाहींत तर हाल होतात. स्वतःच्या पद्धतीचं जेवण तरी करावं लागतं (आणि हें करण्यांत बरीचशी शक्ति खर्च झाल्यामुळं भटकण्याची मौज लुटायला उत्साह, निदान बरोबरच्या बायकांना तरी, उरत नाहीं.) किंवा अपुऱ्या जेवणावर तरी भागवावं लागतं. दोन्हीकडून गैरसोयच. भाषेची अडचण दूर करण्यासाठीं ज्याप्रमाणं आपण राष्ट्रभाषा स्वीकारली, त्याप्रमाणं कांहीं खाद्यपदार्थहि राष्ट्रीय अन्न म्हणून आपण सर्वसामान्य आवडीवरून ठरवायला हवेत! हे पदार्थ यंत्रांनीं निर्माण होऊन भारतांत माणूस कुठंहि गेला तरी त्याला मिळायला पाहिजेत. (हे पदार्थ केवळ प्रवाशांनाच नव्हे तर इतरांनाहि घेतां येतील आणि त्यांनीं स्त्रियांचा रोजचा स्वयंपाकांत खर्च होणारा किती तरी वेळ वांचेल हें जातां जातां म्हटल्यावांचून राहवत नाहीं.) पण या गोष्टी आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण होईल तेव्हांच्याच. आज तरी तें स्वप्नच म्हणायला हवं!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कारखाना बघण्याचा कार्यक्रम ठरलेला होता. गेलों तेव्हां आवारांत सगळीकडे कसं शांत होतं. आंत व्यवस्थापकांच्याकडे गेलों आणि परिचयपत्र पुढं केलीं. इथं आम्हांला पहिला धक्का बसला. आज कारखाना बंद होता! सगळे जण हें ऐकून हतबुद्ध झाले. आधीं पत्र पाठवून चौकशी केली होती, रविवार टाळून सोमवार घेतला होता. कारखान्यानंहि सोमवारीं या, कारखाना दाखवूं, असं कळवलं होतं. मग हें असं कसं झालं? व्यवस्थापकांनीं दिलगिरी प्रदर्शित करून स्पष्टीकरण केलं, "आधीं या गोष्टी लक्षांत आल्या नाहींत, पण कामगारांनीं आज सुट्टी घेतली. त्याच्या बदली ते काल कामावर आले होते. काल कारखाना चालू होता." ही भानगड आहे तरी काय, याचा आम्ही अचंबा करीत होतों तेवढ्यांत व्यवस्थापक म्हणाले, "आज एक मे आहे ना?"

कानांवर घण बसावा तसा मी स्तंभित झालों. आज एक मे! आंतरराष्ट्रीय कामगारदिन! आणि माझ्या हें कसं लक्षांत नाहीं आलं? श्रमजीवि वर्गाविषयीं स्वतःला आपुलकी वाटते असं समजणारा मी असा कसा विसरून गेलों? ज्या देशांत श्रमिकांनीं आपली सत्ता स्थापून प्रगतीचे उच्चांक गांठले आहेत त्या देशाकडे भक्तीनं पाहणारा मी आणि हा दिवस माझ्या कसा लक्षांत येऊं नये?—हे

सगळे प्रश्न मनांत गर्दी करूं लागले आणि विलक्षण खंत वाटली मला.

आज संध्याकाळीं भद्रावती सोडायचं ठरलेलं होतं. पुढचे सगळे कार्यक्रम विसकटले असते म्हणून आम्हांला मुक्काम वाढवतां येण्यासारखा नव्हता. व्यवस्थापक म्हणाले, "कारखाना बंद असला तरी हरकत नाहीं. तुम्हांला सारे विभाग पाहायला मिळतील." त्यांनीं आमच्याबरोबर एक दरवान दिला आणि तो हिंदींत आम्हांला निश्चेष्ट पडलेल्या माणसासारख्या त्या कारखान्याच्या निरनिराळ्या विभागांत नेऊन माहिती देऊं लागला.

मीं किर्लोस्करांचा कारखाना बघितला आहे. पण त्यापेक्षां हा कारखाना किती तरी मोठा आहे! तिथल्यापेक्षां इथं तयार होणाऱ्या—चाकं, प्रचंड रूळ, रस्त्यावरील दिव्यांचे खांब, इत्यादि—वस्तु पुष्कळच मोठ्या आणि मोठ्या प्रमाणावर आहेत. हें तर झालंच, पण इथलीं इतर जीं प्रमुख वैशिष्ट्यं आहेत, त्यामुळं दोघांची तुलना करणंच अशक्य आहे, हें आम्हांला लवकरच कळून आलं. तीं वैशिष्ट्यं म्हणजे खनिज लोखंडापासून शुद्ध लोखंडाच्या 'लगडी' तयार करण्याची इथं भट्टी आहे. (आणि या लगडी ज्यांना पुरवल्या जातात त्यांपैकीं, मला वाटतं, एक कारखाना किर्लोस्करांचा आहे.) त्याचप्रमाणं इथं लोखंडापासून पोलाद तयार करण्याच्याहि भट्ट्या असून त्याची 'घडाई'हि इथल्या रोलिंग मिलमध्यें होते.

माणूस निश्चेष्ट असला तरी त्याच्या हृदयाचं स्पंदन चालूच असतं, त्याचप्रमाणं कारखाना बंद असला तरी भट्ट्या कधीं बंद राहत नाहींत. (कारण, त्या बंद ठेवल्या तर पुन्हा चालू करायला वेळ फार लागतो आणि नुकसानहि फार होतं.) कारखान्याचं हें हृदय चालू होतं आणि आम्ही गेलों तेव्हां खनिज लोखंडाची भट्टी उघडायची वेळ जवळ आली होती. त्या दिवशीं आम्हांला खनिज लोह वितळून त्यांतलं हीण वर राहून तळाशीं झिरपलेलं शुद्ध लोखंड भट्टीच्या पायथ्याशीं असलेलं विवर उघडतांच खळाळत, तडतडत येत आधींचपासूनच तयार करून ठेवलेल्या निरनिराळ्या पाटांतून वाहत जात जात अखेरीस खांचांतून भरून निवल्यावर त्यांच्या लगडी कशा बनतात तें संपूर्णतया पाहायला मिळालं.

हें सगळं पाहून पोलाद विभागांत गेलों, तों जणुं आमची वाटच पाहत असल्याप्रमाणं हीहि भट्टी खोलायची वेळ जवळ आली होती. या भट्टीच्या 'पोटा'ला एका अंगाला झरोके होते. त्यांतला एकादा उघडला, कीं डोळ्यांना सहन न होण्याइतकी प्रखर धगधगती आग दिसे आणि उष्णतेची 'लपट' अंगावर झपका मारी. मग एक कामगार सुमारें तीन वाव लांबीची पहार झरोक्यांतून आंत

घालून वितळलेलं पोलाद ढवळून काढी. थोडाच वेळ, पण तेवढ्यांत पहारीचा आंत गेलेला भाग रसरशीत लालपांढरा आणि मेणासारखा मऊ होऊन गेलेला असे. (हें भीषण काम करणाऱ्या कामगाराला संरक्षण फक्त दुसऱ्या एका कामगारानं शेजारीं उभं राहून त्याच्या पुढ्यांत धरलेलं ओलं पोतं आणि डोळे 'बंदिस्त' न राहणाऱ्या रंगीत कांचेच्या चष्म्याचं होतं ही आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट होती.) मग लागलीच एका लांब दांड्याच्या पळींतून त्या ढवळलेल्या पोलादाचा मासला बाहेर काढला जाई अणि त्याची तपासणी होई.

भट्टीच्या दुसऱ्या अंगाला विस्तीर्ण छपरी जागेंत ओतकामाचा विभाग होता. तेथें पुष्कळ सांचे तयार करून एका रांगेंत ठेवलेले होते. त्यांत पोलाद ओतण्याचं काम आतां सुरू व्हायचं होतं. भट्टीला वळसा घालून एक लोखंडी जिना उतरून आम्ही त्या बाजूला गेलों, आणि या ठिकाणीं जन्मांत कधीं विसरणार नाहीं अशीं दृश्यं दिसूं लागलीं.

थोड्याच वेळांत घरघर आवाज सुरू होऊन छपराजवळचीं यंत्रं फिरायला सुरुवात झाली. त्यांनीं एक टांगती 'रावणी बादली' सरकवीत पोलादभट्टीच्या इकडच्या तोंडाजवळ आणली. मग कामगारांनीं तें तोंड उघडतांच प्रथम लखलखणारी नारिंगी प्रभा सभोंवतालच्या मंद वातावरणांत सगळीकडे फांकली. तोंडाशीं पन्हळ होती, तींतून मग पोलादाचा रस त्या रावणी बादलींत झराझरा पडूं लागला. ती बादली भरली तशी सरकली आणि एका सांच्याच्या वर येऊन थांबली. इशारे दिले गेले आणि खालीं सांच्याजवळ उभ्या असलेल्या कामगारानं कडेचा दांडा सरकवतांच जिलबीपात्रांतल्याप्रमाणं बादलीच्या तळच्या छिद्रांतून सांच्यांत पोलादाचा रस नियमित वेगानं ढाळला जाऊं लागला. तिकडे पन्हळीच्या कडेवरून अखेरीचा अनावश्यक तप्त रस खालीं जमिनीवर अद्याप संथपणें स्रवत होता, तेथें असंख्य ठिणग्या उडत होत्या, त्यांवरून दृष्टि दूर होत नव्हती.

पोलादाचा तप्त रस...एकाद्या राजर्षीनं उग्र तपश्चर्या केल्यानंतर ब्रह्मर्षि व्हावं त्याप्रमाणं तप्त सुवर्णासारखा लखलखणारा पोलादाचा तप्त रस...पोलादाविषयीं आधींपासूनच माझ्या मनांत असलेली भक्ति त्या दिवशीं तीं दृश्यं पाहिल्यापासून शतपटींनीं वाढली.

तो अखेरीचा रस शेवटीं ठिबकूं लागला आणि ठिणग्यांची आतषबाजी ओसरली तशी माझी दृष्टि वर उंच पन्हळींशेजारीं उभ्या असलेल्या कामगारांकडे गेली आणि मीं माझ्याजवळच असलेल्या एका कामगाराला म्हटलं, "कितना खतरनाक काम है इन लोगोंका!"

अनुक्रम ....22030.... दि: ....
क्रमांक .......... नों: दि: ..........


तो म्हणाला, "बिलकुल! लेकिन इसके लिये इनको जो दाम मिलता है, सो केवल रोजाना दस आनेसे दो रुपया तक!" त्याच्या स्वरांत उद्वेग होता, त्याला त्वेषाची सूक्ष्मशी छटाहि होती, पण लाचारीचा अंशहि नव्हता.

मी एकदम स्तब्ध झालों...

ही परिस्थिति बदलावी म्हणून विरोध करीत करीत हे कामगार एक होत होते, जागे होत होते, झगडत होते. आणि आम्ही निराळ्याच जगांतलीं वर्णनं वाचून मनश्चक्षूंपुढं भव्य चित्रं रंगवीत होतों, आशाळभूतपणानं भविष्यकाळाचींच काय तीं स्वप्नं पाहत होतों...मला ओशाळल्यागत झालं होतं आणि त्यांतच मग 'पुढं चला' ही हांक आली तेव्हां त्या कामगाराला नमस्कार करून पुढं गेलों.

दोन भट्टयांनंतर जें कांहीं पाहण्यासारखं होतं, तें आज चालू नव्हतं. रोलिंग मिल पाहण्याची मला फार इच्छा होती, पण ती अपुरीच राहिली. शेवटीं बरोबर आलेल्या दरवानाच्या हातावर बक्षिसी ठेवली तेव्हां त्यानं "भाळ संतोप, स्वामी!" हे शब्द उच्चारले ते ऐकून बाहेर पडलों, तेव्हां दोन्ही भट्टयांचीं विलक्षण दृश्यं पाहायला मिळालीं हें काय थोडं झालं, अशा शब्दांनीं मनाचं समाधान करीत होतों.

भद्रावतीला सिमेंटचा आणि कागदाचाहि कारखाना आहे. सिमेंटच्या कारखान्यांत नवीन 'यंत्रसंच' आणलेला असून तो बसवण्याचं काम चालू असल्याचं कळलं. तेव्हां दुपारच्या वेळांत कागद-कारखाना पाहून येण्याचं आम्हीं ठरवलं.

कारखाना दाखवण्यासाटीं नेमलेला कारखान्याचा 'मार्गमित्र' दुपारच्या सुट्टीनंतर अद्याप आलेला नव्हता, त्यामुळं आवारांत आम्हां सर्वांना सुमारें अर्धा तास थांबून राहावं लागलं. शेवटीं एकदांचा तो आला आणि आम्हांला आंत घेऊन गेला.

आपल्याकडची मुंढव्याची गिरणी ज्यानं बघितली आहे, त्याला इथं विशेष नावीन्य आढळायचं नाहीं. मात्र एक राक्षसी यंत्र आपल्या नरड्यांतून सबंधच्या सबंध बांबू सरसर ओढून बकाबका गिळून घेतं आणि कानठळ्या बसवील एवढा आवाज करीत त्यांचा फन्ना उडवीत असतं, एवढंच एक यंत्र इथं निराळं आहे.

या ठिकाणीं आवाज एवढा प्रचंड आणि कर्कश होत होता, कीं माणसं मोठ्यानं ओरडलीं तरी मुंग्या कुजबुजल्यागत वाटे. पुढं गेल्यावर मार्गमित्र माहिती सांगूं लागला...सर्वस्वीं बांबूच्या लगद्यापासून कागद करीत नाहींत. केलाच तर तो अतिशय ठिसूळ होतो. त्यांत परदेशांतून येणारा लगदा मिसळावा लागतो...या कारखान्याची उत्पादनशक्ति पुष्कळ आहे, पण त्याचा बराच थोडा अंश उत्पादन

होतं...कारणं?...कारणं अनेक आहेत...कच्च्या मालाचा तुटवडा...वाहतुकीच्या अडचणी...खप...मागणी...स्पर्धा...आणि सर्वांत महत्त्वाचं कारण म्हणजे औद्योगिक कलह...

आमचा मार्गमित्र अगदीं रडतोंड्या होता. हें सारं तो सांगत होता तें अशा भावानं, कीं जणुं या परिस्थितीला सर्वस्वीं तो स्वतःच जबाबदार असून सारा दोष त्याच्यावरच येऊन पडला होता. माझ्या जिभेवर शब्द आले, "पण वेड्या, हें हसत सांग कीं! असा रडतोस कां? कारखान्यावर जोंपर्यंत खाजगी मालकी आहे तोंपर्यंत हें असं चालायचंच आणि असंच चालायचं! त्याला तूं तरी काय करणार आणि मी तरी काय करणार? औद्योगिक कलहांच्या वेळीं तुझी सहानुभूति कोणत्या पक्षाला असते तें आम्हांला कळलं तरी पुरे!..."

पण या गोष्टी अशा प्रसंगीं कशा बोलायच्या? आम्ही त्याचे पाहुणे असल्यासारखे होतों. निदान त्या वेळीं त्याच्याशीं बोलाव्यातशा वाटेनात.

आम्ही हळूहळू पुढं सरकत होतों. सभोंवतीं सिमेंटच्या रुंद पन्हळींचे चक्रव्यूह होते, त्यांतून रसायनमिश्रित पाण्यांत कालवलेल्या आणि उकळून मऊ झालेल्या पातळ लगद्याचा ओघ वाहत होता. आजूबाजूला आमच्यावांचून कुणीच नव्हत. दुर्मुखलेला मार्गमित्र सांगूं लागला, "मजूर अगदीं निरक्षर आहेत. त्यांच्यासाठीं मी रात्रीची शाळा चालवतों. पाट्या, पेन्सिली, पुस्तकं आम्हीच पुरवतों. कारखान्याकडून पैसे मिळतात, पण ते अगदींच अपुरे असतात. तुम्हीं कांहीं मदत करावी अशी इच्छा आहे."

आम्हीं म्हटलं, "पाहूं."

त्यानं तोंड आणखी वाईट केलं आणि आवाज अधिक क्षीण करीत म्हटलं, "तुम्ही कांहीं देणार असलांत तर कृपा करून इथंच द्या. कारण तिंकडे उघड्यावर मीं तुमच्याकडून पैसे घेतले तर लांच घेतल्याचा संशय निर्माण व्हायचा."

फारसा विचार न करतां आम्हीं त्याच्या हातावर दोन रुपये ठेवले आणि मनांत म्हटलं, "आतां तरी तुझ्या चेहऱ्यावर हास्याची रेषा उमटणार आहे का?" पण ही अपेक्षा सफळ झाली नाहीं. मला तर नंतर निराळीच शंका यायला लागली. सरळ पैसे खाण्याचा बेरडपणा अंगीं नसल्यामुळं या माणसानं लांचेचा आरोप उलट्या क्रमानं आधींच खोडून काढून आम्हांला निःशंक करून साळसूदपणानं पैसे खाण्याचीच तर ही युक्ति केली नसेल ना? अजूनहि मधूनमधून ही शंका डोकावत असतेच.

कारखान्याच्या अतिथिशाळेंतून मग संध्याकाळीं पुढची गाडी पकडण्यासाठीं बाहेर पडलों तों विस्तीर्ण मैदान लागलं. तेथें साफसफाई चालू होती. टेबल, खुर्ची व त्यांच्या वरच्या अंगाला विजेचा दिवा लावण्याचं काम चाललं होतं. लाल बावटा फडकत होता. कोंवळ्या उन्हांत पटांगणाच्या मागच्या अंगाला उभा असलेला प्रचंड कारखाना, त्याचीं उंच धुराडीं, बाहेरूनहि दिसणारीं राक्षसी अवजारं, समोर लाल फुलांनीं ठिच्च बहरलेले गुल्मोहोराचे वृक्ष. मे दिनाच्या सभेची ही तयारी होती. त्या तयारींतच एका अंगाला छोटेखानी इमारतीपाशीं पोलिस, संगिनी लावलेल्या बंदुका, चकचकणाऱ्या चामडी पट्ट्यांनीं शरिरं आवळून टाप टाप चालणारे अधिकारी...

गिरसप्पा येथें शिमोगा, सागर किंवा तालगुप्पा या ठिकाणीं उतरून जातां येतं. बिरूर ते तालगुप्पा या शंभर मैलांच्या फांट्यावर भद्रावतीच्या पलीकडे हीं तिन्ही गांवं आहेत. आम्ही सागराहून जाणार होतों.

गिरसप्पाच्या धबधब्याचं नांव जोग हें आहे. हीं दोन्ही नांवं बरोबर ऐकल्यामुळं साहजिकच माझी अशी कल्पना झाली होती, कीं गिरसप्पा जोग नांवाचा कर्नाटकांत एकादा मोठा माणूस होऊन गेला असला पाहिजे आणि त्याच्या स्मरणार्थ हें नांव पडलं असलं पाहिजे. पण प्रत्यक्षांत तसं नव्हतं असं दिसलं. गिरसप्पा आणि जोग हीं धबधब्याच्या जवळच्या गांवांचीं नांवं आहेत. त्यांतल्या त्यांत जोग हें गांव अधिक जवळचं असल्यानं जोगचा धबधबा हेंच अधिक रूढ आहे.

धबधब्यापासून जवळच वीज-उत्पादनकेंद्र आहे. त्याला पाण्याचा वर्षभर अखंडित पुरवठा व्हावा म्हणून, धबधब्याच्या बरंच वरच्या अंगाला, टेकड्यांची नैसर्गिक सोय साधून, शरावतीच्या पात्रावर धरण बांधून पाणी अडवलं आहे. त्यांतून कालव्याच्या साहाय्यानं पाणी केंद्राच्या थोडं अलीकडेपर्यंत आणून मग एकदम असलेल्या उतारावरून मोठ्या नळांच्या साहाय्यानं पायथ्याच्या केंद्रांत नेलं आहे. या धरणाचं नांव 'हिरेभासगर' धरण. याची माहिती तेथील जलतज्ज्ञांनीं चांगली करून दिली. या ठिकाणचं खास वैशिष्ट्य असं, कीं पाऊस जास्त पडून पाण्याची उंची प्रमाणाबाहेर वाढली, तर अनावश्यक पाणी झपाट्यानं वाहून जावं म्हणून धरणापाशीं तलावांत वृत्तचितीच्या (cylinder) आकाराचीं घरं बांधून, त्यांच्या तळांतून मोऱ्या काढून धरणाच्या दुसऱ्या अंगाला उघडल्या आहेत. पाणी विशिष्ट पातळीच्या वर गेलं, कीं त्या घरांच्या वरच्या भागावर बांधलेल्या वाढत्या

आकाराच्या घुमटांत निर्वात प्रदेश तयार होतो व मोऱ्यांवाटे वेगानं पाणी खेंचलं जातं आणि साध्या मोऱ्यांच्या योगानं होईल त्यापेक्षां किती तरी लवकर पाण्याची पातळी उतरते. हें सगळं 'स्वयंचलित' असल्याकारणानं धोक्याची परिस्थिति केव्हांच निर्माण होत नाहीं. विशेष हें, कीं कल्पना रुजून ती मूर्त होईपर्यंतचं सारं कांहीं काम हिंदी स्थापत्यकारांनीं केलेलं आहे. हें समजल्यावर तर अभिमानानं भारावलेल्या मनानं आम्ही जोगकडे निघालों.

ह्या सगळ्याच भागावर निसर्गानं वरदहस्त ठेवलेला आहे. आमच्या सभोंवतालीं दाट झाडी होती. सगळीकडे हिरवंचार होतं. मध्येंच मोकळा भाग लागे, तो खोलटांतला असे आणि त्यांत बांबूंचीं बेटं, केळीं, पोफळी, चवेणीचीं वनं, शेतं, राया, आणि पलीकडे पुन्हा झाडीनं आच्छादिलेले हिरवेगार डोंगर दिसत, पण ते भयाण वाटण्याइतके उभे किंवा उंच नसत. विस्तीर्ण डोंगरमाथ्यांवरून चाललों आहोंतसं वाटे आणि या भागांत दरी लागणार तरी कुठं अशी शंका येई. त्यामुळं मोटार थांबली ती अचानकच कांहीं तरी बिघाड होऊन थांबलीशी वाटली. मग आजूबाजूला कांहीं बंगले दिसले, तेव्हां वाटलं, रानांतली वीज-अधिकाऱ्यांची एकादी वस्ती असावी. पण मग मोटारींतून उतरलों तों बाजूला एकदम घळ दिसली आणि पहिला साक्षात्कार झाला तो 'राजा'चा.

सूर्य माध्यान्हीला चढत असतांना रम्य स्थळांचं रम्यत्व सांवल्यांप्रमाणंच बिंदुमात्र होण्याच्या पंथाला लागलेलं असतं. तरी पण त्या वेळीं राजाचा भव्यपणा पाहून आम्ही स्तब्ध झालों. आमच्याबरोबर मुलं होतीं, त्यांपैकीं ज्यांनीं काका कालेलकरांचं या भागाचं वर्णन वाचलेलं होतं, त्यांनीं त्याच्या अनुरोधानं त्या त्या प्रपाताशीं टाऊक असलेल्या नांवांची सांगड घालायचा प्रयत्न सुरू केला. काकांचीं नांवं तरी किती काव्यपूर्ण आणि जिभेची व मनाची पकड घेणारीं आहेत! पार्वती, रुद्र आणि वीरभद्र या नांवांपुढं मला कुणी तरी, केव्हां तरी सांगितलेलीं विलायती नांवं लक्षांत राहिलीं नाहींत आणि राहण्यासारखींहि नव्हतीं.

तेथील अधिकाऱ्याशीं आमचा याविषयीं थोडासा वादहि झाला. त्याचं म्हणणं असं, कीं जुनीं नांवं परकी असलीं तरी त्यांच्यामागं इतिहास आहे, तो जतन व्हावा यासाठीं तीं बदलतां कामा नये. पण यांत तथ्य नव्हतं. कारण, त्या नांवांपाठीमागं भारताचं कल्याण करणाऱ्या कुणाहि इंग्रज पुरुषश्रेष्ठांचीं नांवं निगडित नाहींत. केवळ धबधब्यांच्या स्वरूपावरून कुणी तरी प्रवाशांनीं किंवा त्या वेळच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं तीं दिलेलीं. त्यापेक्षां काकांनीं त्यांच्या स्वरूपावरूनच

ठेवलेलीं हिंदी नांवं हिंदी माणसाला अधिक समर्पक वाटणारच. फार काय, तीं समर्पक नसतीं तरी देशसेवा करणाऱ्या काकांनीं तीं ठेवलीं आहेत येवढ्याच केवळ कारणासाटींसुद्धां तीं रूढ व्हायला हवींत. पण त्या अधिकाऱ्याला हे विचार पटले नाहींत. अखेरीस लोकच काय तो याचा निर्णय करतील या मुद्द्यावर तो वाद मिटला.

ज्या दरीच्या वळणावरून हे चारी धबधबे पडतात तिचा आकार बायकांच्या केंसांतील आंकड्यांसारखा असून त्याची एक बाजू मुंबई प्रदेशांत असून दुसरी म्हैसूर संस्थानांत आहे. आम्ही म्हैसूर संस्थानांत होतों. आम्हांला जो बंगला मिळाला होता त्याच्या सज्ज्यांत खुर्ची टाकून बसलं, कीं समोर राजा दिसे. चौघांत हाच श्रेष्ठ असून त्याचं विलायती नांवहि 'राजा'च आहे. (भविष्यकाळांत लोक याला 'राष्ट्रपति' म्हणणार आहेत काय?) दरीच्या वळणावरून हे चौघेहि निरनिराळ्या पातळ्यांवरून सुटतात त्यामुळं सर्व दृश्याला विलक्षण रम्यता आली आहे. राजा सर्वांत खोल म्हणजे नऊशें साठ फूट खालीं कोसळतो. कोसळतो असं म्हटलं खरं, पण 'कपाळा'वरून सुटल्यापासून सुमारें अर्ध्या वाटेंतच ओघ हजारों धारांमध्यें फाटतो आणि तेथूनच त्याचं धुकं बनायला लागतं. घळींतून वर येणाऱ्या वाऱ्याच्या झोतासरशीं हें धुकं लोटांलोटांनीं वर जाऊन मागचा पहाड आणि पुढचा कोसळता प्रवाह यांच्यामधील पोकळ जागेंत (र. वा. दिघे आपल्या 'सराई'त जिला 'धोधाणी' म्हणतात ती हीच काय?) घुसतं. मध्याच्या जरा वर आणखी एक विलक्षण दृश्य दिसतं. ओघापासून इथं कडेचे पाण्याचे लचके सारखे सुटून निघतात आणि ते खालीं येतां येतां कसे विरत जातात तें पाठीमागल्या काळ्या पहाडाआड स्पष्ट दिसतं. वातीपासून सुटलेली ज्योत वर सरकत लुप्त व्हावी तसे दिसतात ते. मध्येंच एकदम कुठून तरी शेंसवारीं चिमुकले पक्षी उडत उडत झोताच्या आड येतात, तेव्हां गुलाबाच्या पाकळ्या उधळल्यागत वाटतं आणि एका विशिष्ट क्षणीं त्यांचे सर्वांचे पंख सूर्यकिरणांच्या शलाकेंत लक्कन् चमकतात तेव्हां काय वाटतं तें सांगणं कठीण आहे. हे पक्षी कुठं जातात तेंहि कळत नाहीं आणि पुन्हां कांहीं वेळानं अचानक असेच पक्षी येतात तेहि हेच असतात कीं दुसरे तेंहि कळत नाहीं.

बरेच जण इथं सकाळीं येऊन संध्याकाळच्या सुमारास परत जातात. आम्ही रात्रींहि इथं मुक्काम करणार होतों. त्यामुळं जोगची संध्याकाळचीहि शोभा पाहायला मिळाली. पण त्याहूनहि एक निराळंच दृश्य आम्हीं पाहिलं. तीन प्रहरच्या

सुमारास आम्ही दरीची सारी उभी उतरण पायवाटेनं उतरून तळच्या डोणींत गेलों. इथं सारे धबधबे वरून पडतांना दिसत होते. राजाच्या पायथ्याशीं धूसर भाग होता, त्याच्या पलीकडे जी पोकळी होती तिथं लहान मुलांच्या गोष्टींतल्या गुहांमधल्यासारखा भीषण अंधार आणि कमालीचा गारठा असावा असं दिसत होतं. प्रत्यक्ष झोतांच्या खालीं जाणं शक्यच नव्हतं, पण जिथपर्यंत शक्य होतं तिथपर्यंत आम्ही गेलों. वीरभद्र जरा पलीकडे आहे. पण राजा, पार्वती आणि रुद्र जवळ जवळ पडतात. पाण्याचे कोट्यावधी कण हवेंत भरलेले होते आणि तळाशीं जाईपर्यंतच अंगांतले सारे कपडे दमटले. आमच्यांतले कांहीं जण, जरा पुढं पार्वतीच्या पायथ्याशीं एक प्रचंड खडक आहे, त्यावर भयंकर निसरडं आहे, आणि पाण्याचे तुषार जोरानं पडत होते, तरी जाऊन आले. त्या वेळीं सूर्य बराच कललेला होता आणि त्यांच्या पाठीकडून किरण येत होते. त्या वेळीं त्यांना इंद्रधनुष्य दिसलं तें संपूर्ण वर्तुळाकार! त्यांनीं जेव्हां हें सांगितलं तेव्हां मी बराच अलीकडे आलों होतों आणि परत जाऊन यावं तर सूर्य दरींतले आपले किरण झपाट्यानं आवरून घेत होता. एक विलक्षण दृश्य पाहण्याचं राहून गेल्याची चुटपुट मग मनाला लागून राहिली...

त्या दिवशीं संध्याकाळीं वर आल्यानंतर सज्जांतून पाहिलं तों दरींतून प्रवाहाच्या सहस्र धारा पिंजून पिंजून ढगांचे लोटच्या लोट वर चढत आकाशांतल्या ढगांत मिसळत होते. वाढत्या अंधारानं हें दृश्य अगदीं अंधुक होईपर्यंत तर पाहिलंच पण पहांटेहि लवकर उठून सज्जांत येऊन बसलों. आतां राजा अजिबात दिसेनासा झाला होता आणि आकाशांत सगळीकडे जे ढगांचे थर सांचले होते तो त्याचाच पराक्रम होता कीं काय तें सांगणं कठीण होतं. पौर्णिमा आदल्याच दिवशीं होऊन गेली होती आणि पूर्वेला शुक्राचा तारा इतका मोठा आणि तेजस्वी दिसत होता कीं आयुष्यांत एवढा कधीं न बघितल्यामुळं मी थक्क होऊन गेलों. शुक्राची ती पौर्णिमा होती कीं काय न कळे. पण ढगाला भेदून मध्येंच प्रकाश फांके तेव्हां रुद्र, पार्वती आणि वीरभद्र यांच्याकडे दृष्टि जातांच चांदीचा ओघ शतधारांनीं वाहत असल्याचा भास होई...माणसान निसर्गावर परिश्रम घेतले तर तो त्यांची परतफेड अनेक पटींनीं करतोच, पण केवळ अनाहूतपणानं मानवाला आनंदित करण्याचं हें त्याचं कार्य मला अतिशयच विलोभनीय वाटतं...निसर्ग ...मानवांचा मित्र निसर्ग...

सकाळीं आम्ही विजोनिर्मिति केंद्र पाहायला गेलों. हें ठिकाण जोगपासून जवळच

असलं, तरी शरावतीची घळ वळसा घेऊन पलीकडे जाते त्या ठिकाणीं असल्या-मुळं धबधब्यांच्या आसपास दृष्टि कुठंहि फिरवली तरी लहानशी तारसुद्धां दिसत नाहीं. आणि त्यामुळं ज्या महाभागांना निसर्गसौंदर्याच्या ठिकाणीं मानवी उप-योगाचीं साधनं निर्माण झालीं म्हणजे त्यांत बिघाड झाल्यासारखा वाटतो, त्यांची तक्रार उद्भवलेली नाहीं. अर्थातच 'शरावतीचं कांहीं पाणी हिरेभासगर तलावां-तून काल्व्यावाटे बाजूला वळलं असल्यानं धबधब्यांचे ओघ कमी होऊन त्यांचं सौंदर्य उणावलं आहे,' असं म्हणून या लोकांना कपाळावर आंठी चढवतां येईलहि, पण तिच्याकडे दुर्लक्ष करणं भाग आहे. (मला तर त्या दृष्टीनंसुद्धां सौंदर्य उणावलं आहे कीं काय तें कळायला मार्ग नव्हता. कारण, पूर्वी हे ओघ केवढे होते तें कधीं मीं बघितलेलं नाहीं.) तें कांहीं असलं तरी, शक्तिनिर्मितीचं केंद्र असं पलीकडे उभं केलं आहे तें वर सांगितलेल्या महाभागांच्या समाधानासाठीं असेल कीं काय याची शंकाच आहे. कारण ज्या ठिकाणीं काल्व्याला मोठे नळ जोडून तीव्र उतारावर घेतले आहेत त्या ठिकाणची पायथ्यापासूनची 'उभी उंची' हजार फूट आहे; आणि धबधब्याजवळ इतकी मिळूं शकली नसती. शक्तिमंदिरांतील 'जनित्रा'च्या चक्राच्या पाळ्यांत पाणी शिरतं तें सेकंदाला चारशें फूट वेगानं आणि चाकाला गति देऊन तें बाहेर पडतं तेव्हां केवळ चार फूट त्याचा वेग असतो. सध्यां या ठिकाणीं उत्पादन वाढवण्याचं काम चालू असून आम्ही गेलों तेव्हां नवे नळ टाकण्याचं आणि नवीं 'जनित्रं' बसवण्याचं काम चालू होतं. त्यांपैकीं एक जनित्र तर उघडं बघायला मिळालं. त्याच्या चक्राला पाळीं बसवून झालीं होतीं (एकेक पाळं हाताच्या पंजाएवढं आहे.) व त्या चक्रांतलंच तारकाम लोक करीत होते. मानवी सुखांत भर घालणारीं अजस्र यंत्रं बघितलीं, कीं मला एखाद्या करारी लोकनेत्याच्या सांनिध्यांत असल्यासारखं वाटतं. कारण हीं अजस्र यंत्रं बघितलीं कीं माझ्या भारतीय मनाला श्रेष्ठ गजराजांची आठवण होते. जात्या हीं दुष्ट नाहींत; माणसं यांच्याशीं चांगलीं वागलीं तर हीं सुखं निर्माण करतील; पण दुष्टपणानं किंवा मूर्खपणानं वागल्यास नुकसान केल्याखेरीज राहणार नाहींत.

हें ठिकाण पाहून परत जोगच्या मुक्कामाला येतांना वाटेंत सभोंवार मोकळी जागा दिसे, पण शेतकापणी झाल्यावर जमिनींत खुंट राहावेत तसे झाडाच्या बुंध्या-एवढे खुंट दिसत. त्यांचं स्पष्टीकरण मीं बरोबर आलेल्या अधिकाऱ्याला विचारलं, तेव्हां तो म्हणाला, "हें केंद्र नवीन, हे रस्ते नवीन आणि ही वस्तीहि नवीन म्हणजे गेल्या दहा वर्षांतली आहे. इथं पूर्वी किर्र अरण्य होतं. तें मोकळं करण्या-

सार्टी तोडलेल्या झाडांचे हे अवशेष आहेत."

तीनप्रहरीं आमचा मुक्काम जोगहून हलणार होता. आतां आम्ही पुनःपुन्हा धबधब्यांकडे पाहून घेत होतों. आयुष्यांत आणखी या ठिकाणीं यायला अशक्य नाहीं असं वाटत होतं, तरी पाहून घेत होतों. अखेरीस मोटारीनं जेव्हां वळण घेतलं आणि सारं झाडींत लुप्त झालं, तेव्हां आमचीं मनं जगांतील अद्वितीय स्थान पाहिल्याच्या समाधानानं भरून आलीं होतीं. अद्वितीय म्हणण्याचं कारण असं कीं इतक्या उंचीवरून पडणारा धबधबा जगांत दुसरा नाहीं...

जोग धबधबा पाहून आम्ही सागराला परत आलों आणि स्टेशनावरच मुक्काम केला. उद्यां आम्हाला म्हैसूरला जायला निघायचं होतं. इथून म्हैसूरला जायचं म्हणजे मोठं विलक्षणच दिव्य आहे. कारण, परत आलेल्या ज्या मार्गानं बिरूरला जायचं तो फांटा असल्यामुळं जागा चांगली मिळूं शकते, तरी पण बिरूर ते अर्सिकेरे हें सुमारें दीड तासाचं अंतर पुणें-बंगलोरच्या गाडींतून जायचं असल्यानं, गाडी बदलतांना बिरूरला त्या गाडीमध्यें जागा मिळणं फारच मुष्किलीचं असतं. पुन्हा अर्सिकेरेला गाडी बदलून म्हैसूरकडे गेलेल्या फांट्यावरच्या गाडींत बसावं लागतं आणि इथंहि जागा बरी मिळते. पण मधल्या अंतराचं काय? हड्डी नरम होण्याची तयारी ठेवावी लागते.

आमच्या सागराच्या गाडीला म्हैसूरचा डबा होता. पण तो पुणें-बंगलोर गाडीला जोडला गेला तर उपयोग होता. तो नेहमीं जोडतातच असं नाहीं हें कळल्यामुळं आम्ही चिंतेंतच होतों. पण त्या दिवशीं आमचं भाग्य जोरावर होतं. त्यामुळं हा डबा बिरूरला जोडला गेला आणि अर्सिकेरेला तोडला जाऊन म्हैसूरच्या गाडीला पुन्हा जोडला गेला. आम्हांला किती हायसं वाटलं असेल, तें, सुमारें तीस जण बरोबर असतांना असं मधल्या स्टेशनावर पुणें-बंगलोरच्या (किंवा आजकाल कोणत्याहि) गाडींत सामानासह चढण्याचा ज्यानं प्रयत्न केला असेल त्यालाच कळेल.

त्या दिवशीं सत्रीं म्हैसूर स्टेशनावर नऊ वाजल्यानंतर उतरून कांहीं वेळानं आमच्या बिऱ्हाडाच्या दिशेनं रस्त्यावरून चालूं लागलों तेव्हां आमचा कमालीचा विरस झाला. कर्नाटकाचं संस्कृतिकेंद्र मानलं जाणारं म्हैसूर हें विजेचं माहेर आहे असं आम्हीं ऐकलं होतं. तथापि आजकाल तेथें उजेडाची रेलचेल कमी आहे हें आम्ही गेल्या कांहीं दिवसांच्या वृत्तपत्रांतून वाचत होतों. गाडींत कांहीं माणसं बोललीं तींहि असंच सांगत होतीं. पण म्हैसूरची रया इतकी नाहींशी झाली असेल अशी

कल्पनाहि आली नव्हती. रस्त्यावरच्या अंधारांत जे खांब उभे होते, ते पिशाच्चां-सारखे दिसत होते आणि मधूनच एकादा दिवा लागलेला आढळे त्याचा उजेड इतका क्षीण असे, कीं आंत उदबत्ती लावून ठेवल्याचा भास होई. पाऊस झिमझिम पडत होता. रस्त्यावरच्या चिमुकल्या पाणथळींची अवस्था, गरीब कुळांत जन्मलेल्या प्रज्ञावंतासारखी झाली होती आणि मन अधिकच विषण्ण होत होतं. आम्ही गाडींत असतांना सपाटून पाऊस लागला होता. सारखे मनाशीं म्हणत होतों, म्हैसूरची ही दुर्दशा पावसाच्या अवकृपेनं झाली आहे, आपल्या दोन-तीन दिवसांच्या मुक्कामाच्या अखेरीस, कुणी सांगावं, खरं निशाकाळचं म्हैसूर पाहायला मिळेलहि. पण तें कसं शक्य होतं? ग्रीष्मांतला एक पाऊस पावसाळ्याचं काम कसं पार पाडणार? तथापि अशा रीतीनं म्हैसूरच्या रात्री बरबाद होऊन आमच्या कार्यक्रमाला पक्षघात झालाच होता, तरी पण दिवसांचा तरी जास्तींत जास्त उपयोग करून घ्यायचा असं आम्हीं ठरवलं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जगन्मोहनप्रासादांतील चित्रशाळा पाहण्यासाठीं आम्ही निघालों. वातावरण इतकं मस्त होतं, कीं आदल्या दिवशींची विषण्णता पार नाहींशी झाली. सगळीकडे कसं स्वच्छ स्वच्छ होतं. विस्तीर्ण रस्ते, त्यांना दक्षिण भारतांतल्या स्त्रियांच्या साड्यांच्या कांठांप्रमाणं असलेले घसघशीत रुंद पदपथ, त्यांच्यावर विशाल आणि उंच वृक्ष, त्यांच्या गर्द छाया आणि सगळीकडे उजळा फिरवणारं निरभ्र आकाश....(म्हैसूर नगरींतल्या राजमार्गांवरील झाडांचं वैभव अगदीं हेवा वाटण्यासारखं असून केवळ या राजमार्गांमुळंच म्हैसूर हें कुणालाहि आवडण्यासारखं आहे. त्यांतल्या सयाजीराव रस्त्याच्या दोन्ही कांठांनीं तर गुलमोहोराचीं झाडं अगदीं हारीनं लावलेलीं आहेत. आम्ही गेलों होतों त्या दिवसांत त्यांना फुलांचा रसरशीत बहर येऊन पानं जवळजवळ दिसेनाशीं झालीं होतीं. जरा उंचावर उभं राहून या रस्त्याकडे बघितलं, कीं मॉस्को किंवा पेकिंगमधली मे-दिनाची मिरवणूक चालली असल्याचा भास होई. सयाजीराव रस्ता यापेक्षां 'कामगार रस्ता' हें नांव या रस्त्याला शोभून दिसलं नसतं काय?)

सकाळीं चित्रशाळेंत आम्हीं चांगलीं चित्रं बघितलीं त्याचप्रमाणं कापडी पडदे आणि त्यावरचीं भिकार चित्रंहि (—यांचा समावेश केवळ तीं राजघराण्यांतील व्यक्तींचीं असल्यामुळं झाला असला पाहिजे—) बघितलीं. महाराष्ट्रांत ज्यांच्या प्रतिकृति घरोघर दिसत होत्या आणि अजूनहि दिसतात तीं राजा रविवर्म्याचीं मत्स्यगंधा, कृष्णशिष्टाई, जटायुवध, इत्यादि मूळ तैलचित्रं बघितलीं आणि टिपू

सुलतानाच्या काळांतल्या युद्धप्रसंगांचीं इंग्रज चित्रकारांनीं काढलेलीं चित्रं पाहतांना भूतकाळांत वावरून विषण्ण झालों. या साऱ्या चित्रांतलीं कांहीं आपणहून आठवतात, कांहीं आठवण करून दिलीं तरच स्मरतील, आणि कांहीं तर तरीदेखील आठवायचीं नाहींत. आपणहून आठवणाऱ्या चित्रांत हळदणकरांचं 'रुद्ध प्रकाश' नांवाचं चित्र आहे. त्यांत एका महाराष्ट्रीय कुलवधूनं हातांत दीप घेतला असून ज्योत विझूं नये म्हणून तिच्याआड हात धरलेला आहे. त्या वेळीं तिच्या बोटांमधून फांकलेली रसरसलेल्या निरोगी रक्ताची लाल प्रभा, सर्वत्र छायाप्रकाशांचा खेळ...या चित्रापुढं प्रत्येक जण थांबत होता आणि क्वचित् एकादा नाहीं थांबला तर त्याला बरोबरीचं कुणी तरी ओढून आणीत होतं. परप्रांतांत होत असलेला हा महाराष्ट्रीयाचा गौरव मनाला आनंददायी होता...या चित्रशाळेंत कलाकुसरीच्याहि असंख्य वस्तु आहेत. वरच्या मजल्यावर रंगमहाल असून त्यांत नानाप्रकारचीं नवीं, जुनीं, देशी, परदेशी, आघात करून, फुंकून, छेडून किंवा गज घासून वाजवायचीं वाद्यं आहेत. त्यांत (टेबलावरील दिव्याच्या ढापणाएवढी) एक विलक्षण घंटा आहे; पण ती वाजवण्यासाठीं आघात करावा लागत नाहीं, तर एक गुळगुळीत लांकूड तिच्या कडेवरून घासत फिरवावं लागतं. कांहीं वेळानं मग आवाज निघूं लागतो तो इतका उंच असतो, कीं सरस्वती राणे एकदम तार निषादापर्यंत चढून स्थिर झाल्यागत वाटावं. मग लाकूड दूर केलं तरी आवाज येत राहतो, तो खराच निघत असलेला आवाज आहे, कीं कानांत झालेला तीव्र परिणामच रेंगाळतो आहे याचा संशय पडतो...

दुपारीं आम्हीं मोटारी केल्या आणि क्रमाक्रमानं चंदनतेल गाळण्याचा कारखाना, रेशीम विणण्याची गिरणी, चामुंडी टेकडी आणि त्याच टेकडीच्या उतारावर असलेला अजस्र नंदी पाहून घेतला. चंदनतेलाच्या कारखान्यांत लहानमोठ्या आकाराचीं चंदनी खोडं पाहून डोळे आणि नाक तृप्त झालं, लहानपणीं पाट केलेलीं चंदनावरचीं अनेक सुभाषितं मनांत गोळा झालीं आणि त्यामुळं कारखान्यांतून बाहेर पडतांना मन भारावून आलं होतं आणि शरीर सुगंधित झालं होतं. रेशमाच्या कापडकारखान्यांत नाना रंगांचे सुंदर धागे एकत्र येत होते, पण तेथील कामगार बायांच्या अंगावरचे कपडे मात्र जसे असायचे तसेच होते; आणि लागूनच असलेल्या दुकानांत म्हैसूरची आठवण म्हणून कापड घ्यावं या उद्देशानं गेलों तों त्यांची किंमत श्वास उतरवील इतकी अफाट होती. मार्क्सचा 'अतिरिक्त मूल्याचा' सिद्धांत बिंबायला हा कारखाना उत्तम उदाहरण होता. चामुंडी देवीचं

दर्शन मीं घेतलं पण तिच्यापेक्षां (फक्त सहासात महिन्यांतच तिची मूर्ति आतां विस्मृतींत झिरपून गेली आहे.) मला भारतांतल्या किसानांचा अन्नदाता असलेल्या बैलाचं प्रतीक जो नंदी तोच अधिक आवडला. दुःखाची गोष्ट एवढीच, कीं आज इतके पुष्ट नंदी क्वचितच आढळतात. ज्या काळांत हें शिल्प घडवलं गेलं तेव्हां इतके सुदृढ आणि सौष्ठवयुक्त बैल असतील काय? असलेच पाहिजेत. त्याशिवाय असली मूर्ति तयार व्हायची नाहीं...

आदल्या दिवशीं गाडींत एका गृहस्थाची ओळख झाली होती. तो मद्रासी दिसत होता, कारण त्यानं धोतर त्या पद्धतीनं गुंडाळलं होतं. जिकडे तिकडे हे तामिळी लोक दिसत होते. तो कुणाशीं तरी बोलला तेव्हां मीं विचारलं, "आपण आत्तां बोललांत ती तामीळ काय?"

"नाहीं! कानडी!" त्यानं उत्तर दिलं.

"मग आपला पोशाख मद्रासी कसा?"

"कुणी सांगितलं आपल्याला हा पोशाख मद्रासी आहे म्हणून? छे छे! हा कर्नाटकीच पोशाख!"

आत्तांपर्यंत मी कर्नाटकी पोशाख पाहिला होता तो धारवाड-हुबळीकडच्या कन्नडिगांचा. त्यामुळं ही माहिती मला नवीन होती आणि त्यामुळं मग म्हैसूरमध्यें सर्रास असं गुंडाळलेलं धोतर दिसूं लागलं तेव्हां मी त्यांना अकर्नाटकीय मानीनासा झालों.

इथं माझी अशीच आणखीहि एक कल्पना चुकीची ठरली. मला वाटलं होतं, दक्षिणेकडचे लोक हिंदी भाषेचा द्वेष करतात, निदान तिकडचे लोक हिंदीला राष्ट्रभाषेचा मान द्यायला नाखूष असल्याचं मीं वाचलं होतं, त्यामुळं हिंदी बोलतां येण्याचा इकडे कांहीं उपयोग व्हायचा नाहीं. पण इकडे वावरतांना बघितलं, तों तसा अनुभव कुठंच आला नाहीं. चालचलाऊ हिंदींत बोलून इकडचे सामान्य लोक आमच्याशीं सहज व्यवहार करूं शकत होते. ही स्थिति केवळ म्हैसूर प्रांतांतच आहे किंवा काय, आणि असल्यास याचं कारण या प्रांताला झालेला मुसलमानी सत्तेचा संपर्क हें आहे किंवा काय, न कळे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही प्राणिसंग्रहालयांत गेलों. नाना प्रकारच्या पशुपक्ष्यांनीं हें समृद्ध असून त्यांत दुधासारख्या शुभ्र रंगाचा मोर, त्याच निष्कलंक रंगाचा आपला पिसारा ताठ उभारून वावरत होता तो मला अतिशय आवडला. इथं मीं हंसहि बघितला; पण बऱ्याच अंतरावरून. हंस हा पक्षी कमळांनीं

भरलेल्या विस्तीर्ण सरोवरांतच बघायला हवा. (कालच्या पावसामुळं झालेल्या) गढूळ पाण्याच्या डबक्यांतला हा हंस जवळ जाऊन पाहायला माझं मन घेईना. इथं एक अजस्त्र, आडदांड, निर्बुद्ध आणि विद्रूप पाणघोडाहि मीं बघितला आणि त्यानं जबडा वासला तेव्हां विश्वरूपदर्शनहि झालं! ह्या हिडीस प्राण्याची आठवण कांहीं केल्या पुसत नाहीं. मुळांतच तो तसा, त्याला तो तरी काय करणार, असा विवेक मी करतों. पण विवेकाचं आणि मनाचं नेहमींच पटतं असं नाहीं.

म्हैसूरला येणाऱ्या सर्व प्रवाश्यांना सर्वांत मोटं आकर्षण कशाचं असेल तर तें वृंदावन बागेचं. कृष्णराजसागर धरणाला लागूनच तलावाच्या दुसऱ्या अंगाला ही बाग असून तींत लहानमोठे वृक्ष, नाना रंगांचीं फुलझाडं, वेलींचे कुंज तर आहेतच, पण निरनिराळ्या आकाराच्या पुष्कळशा पुष्करिणी असून त्यांतून अनेक कोन करून उडणाऱ्या, लहान, मोठ्या, जाड, पातळ, उंच, खुज्या धारांचीं कारंजीं असून दर शनिवारीं व रविवारीं रात्रीं या पुष्करिणींतले विविध रंगांचे विद्युद्दीप लावून जी सजावटीची शोभा निर्माण होते ती पाहतांना प्रत्यक्ष मायानगरींतलंच हें उद्यान असल्याचा भास होतो. मानवानं निर्मिलेल्या दृश्यांत इतकं रम्य दृश्य पृथ्वीच्या पाठीवर दुसरं नाहीं असं म्हणतात. हें पाहायला मिळावं म्हणून आम्ही शनिवार व रविवार इथं येईल या कटाक्षानं मुक्काम आंखला होता. पण ऐन वेळीं हीं ऐकीव वर्णनं केवळ ऐकीवच राहिलीं. कारण प्रत्यक्षांत कित्येक पुष्करिणी कोरड्या ठाण पडल्या होत्या, तर कित्येकांत बोटाच्या पेराइतकंहि पाणी नव्हतं; आणि जें होतं त्यांत गदळ, शेवाळ साचलं होतं, त्यांतून असलेले दिवे आतां उघडे पडलेले होते व ते फोड, पुरळ्या आल्यागत अभद्र दिसत होते, आणि निरनिराळ्या कोनांत उडणाऱ्या कारंज्यांचे छिद्रमणि आतां मलूल पडले होते.

ही सारी मेघराजाची अवकृपा होती. तिच्यामुळं कृष्णराजसागराचं पाणी कमी झालं होतं, खूप कमी झालं होतं, आजपर्यंत कधीं गेलं नव्हतं इतकं खालीं गेलं होतं. आणि वृंदावनांतलीं कारंजीं बंद पडलीं होतीं, त्याचप्रमाणं या पाण्यावर चाललेलं शिवसमुद्रमचं 'शक्तिकेंद्र' अगदीं थोडी वीज निर्माण करूं लागल्यानं केवळ शोभेसाठीं असलेली ही दिव्यांची आरासहि बंद ठेवण्यांत आली होती. 'रतीलाहि आपल्या सौंदर्यानं ही लाजवील' या शब्दांनीं जिचं वर्णन करतात अशा शुभांगीचं दर्शन घ्यायला मोठ्या उत्कंठेनं जावं आणि प्रत्यक्षांत तिच्या अस्थींचा सांपळाच फक्त पाहायला मिळून त्यावरून तिचं सौंदर्यवैभव डोळ्यांपुढं आणण्याचा प्रयत्न करण्याचा प्रसंग यावा, तशी आमची स्थिति झाली. मेघराजाचा छांदिष्टपणा

भारताच्या कपाळींच इतका का खडतर शाप आहे ?

अतिशय हिरमुसले होऊन आम्ही तिथल्या एका छोट्या दुकानांत वृंदावनाची पुस्तिका विकत घेतली आणि तिथं बसून त्यांतलीं चित्रंच खुळ्यासारखे पाहत राहिलों. पाण्यांत कालवलेलं सातूचं पीठ तर सोडूनच द्या, पण नुसत्या दुधाच्या पेल्याच्या चित्रावरच अश्वत्थाम्याला गप्प करण्याचा प्रयत्न करावा, तसं आम्ही करीत होतों...या साऱ्या संध्याकाळच्या गोष्टी. रात्रीं तेथें थांबण्यांत अर्थच नव्हता. रात्रीं मग बाजारांत गेलों आणि तेथें काळ्या लांकडाचा सुबकसा (माझा आवडता प्राणी) हत्ती पांच रुपयाला मिळाला तो म्हैसूरची आठवण म्हणून विकत आणला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही राजवाडा बघितला. राजवाड्याचा सगळा भाग पाहूं देत नाहींत; पण जेवढा देतात तोहि प्रेक्षणीय आहे. अतिशय सुबक नक्षीकाम केलेला चंदनी महाल, शस्त्रागार, शिकारखाना, भव्य, विस्तीर्ण आणि मूल्यवान सजावट केलेला दरबारमहाल, सोन्याची अंबारी, इत्यादि त्याचीं अंगोपांगं पाहून राजवैभवाच्या अफाटपणाची प्रतीति आली आणि आजच्या काळांतल्या जगांत हें वैभव पाहिल्यानंतर जे विचार मनांत यायचे तेच आले...

रात्रीं आम्ही बंगलोरला जाण्यासाठीं निघणार होतों. म्हैसूरला खेप होऊनहि दहा मैलांच्या अंतरावरचं श्रीरंगपट्टम् पाहायचं राहिलंच होतं. मग मनाशीं विचार केला, वृंदावन बाग पाहण्यासाठीं पुन्हा कधीं तरी आपल्याला यावं हें लागणारच. श्रीरंग-पट्टम्हि तेव्हांच पाहूं. किंबहुना, पुन्हा येण्याची प्रेरणा तीव्र होण्यासाठीं आणखीहि हें कारण होईल.

दिवसाचा वेळ वायां जाऊं नये म्हणून आम्हीं म्हैसूरहून रात्रीं सुटून सकाळीं बंगलोरला जाणारी गाडी घेतली. पण झालं भलतंच. गाडींत जागा महाप्रयासानं मिळाली; पण गर्दी इतकी भरमसाट, कीं सारी रात्रभर जागेवर खिळे ठोकून बसल्यासारखं राहावं लागलं. याचा परिणाम असा झाला, कीं दुसरा सगळा दिवस झोपेंत गेल्यानं वायां गेला. अगदीं संध्याकाळीं लालबागेंत पोंचलों तेव्हां दाट अंधार पडला होता आणि तेथील दारापासचे तपस्व्यांसारखे दिसणारे मोठमोठे वृक्ष काळोखांत आकाशाआडच काय ते पाहतां आले. आंत जाऊन थोडा वेळ बसलों, गप्पा मारल्या आणि परतलों. दुसऱ्या दिवशीं एक कापडगिरणी आणि चिनी मातीच्या वस्तूंचा कारखाना बघितला. हा कारखाना पाहायला जातांना एका साध्या, बैठ्या बंगल्याच्या फाटकाशीं चंद्रशेखर रामन यांची इंग्रजी पाटी दिसली. तेव्हां धांवतां

थांवतां तो बंगला नीट पाहून घेतला आणि एकादं तीर्थक्षेत्र बघितल्याचा आनंद झाला. माझ्या एका स्नेह्याला कॉलेजांत असतांना थोर पुरुषांच्या स्वाक्षऱ्या मिळवण्याचा छंद होता. त्यानं या विज्ञानमहर्षींची स्वाक्षरी मिळविली होती, तिच्यावर त्याला हा मजकूर मिळाला होता : "विज्ञानशास्त्र हें निसर्गाचीं गूढं उकलण्याचा सतत प्रयत्न करीत असतं, पण त्यांतून त्याला निसर्गाचीं अद्याप किती तरी गूढं उकलायचीं आहेत हेंच सारखं प्रत्ययाला येत असतं..."

झालं! संपला बंगलोरचा मुक्काम. बंगलोर जेवढं बघितलं होतं त्याच्यामुळं अद्याप किती तरी बंगलोर पाहायचं राह्यलं आहे हेंच आमच्या प्रत्ययाला आलं होतं! तत्त्वज्ञानाच्या प्रदेशांत वावरणाऱ्या त्या विज्ञानमहर्षींच्या संदेशाच्या आठवणीबरोबर मनांत आलेला हा विचार त्या मानानं अगदींच क्षुद्र होता, पण तो वारंवार येत होता एवढं मात्र खरं.

दुसऱ्या दिवशीं आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. वेळ घालवण्यासाठीं बंगलोरचंच एक वृत्तपत्र घेतलं. वाचूं लागलों तों काय आश्चर्य! म्हैसूरमध्यें असतांना पावसाच्या छांदिष्टपणाचं मनाला न पटणारं कोडं या अंकांत उलगडून दाखवलं होतं.

आदल्या दिवशीं बंगलोरला असलेल्या माझ्या एका मित्राला भेटायला मी गेलों असतांना बोलतां बोलतां, आतांशा औद्योगिक कारखान्यांना मिळणारी वीज बारा आणे कमी केली असल्यानं सारेच उद्योग कोलमडून पडले असल्याचं तो म्हणाला होता, आणि त्याचीं जीं कारणं त्यानं दिलीं होतीं त्यांना या वर्तमानपत्रांतल्या लेखानं पाठिंबाच मिळाला होता. सारांशरूपानं तीं कारणं अशीं होतीं :

कृष्णसागर कोरडा ठाण पडला होता. (इतका, कीं प्रारंभीं धरणांत पाणी सांचल्यापासून गेलीं पंचवीस वर्षं कावेरीकांठचीं जीं देवळं पाण्याखालीं गेलीं होतीं, तीं आतां उघडीं पडून त्यांच्या दर्शनासाठीं भाविक सारखे जाऊं लागले होते.) पण या परिस्थितीची जबाबदारी मेघराजाच्या लहरीवर फारच थोडी पडत होती. 'सागरां'तील पाण्याची पातळी जास्तींत जास्त एकशेंवीस फुटांच्या आसपास असते ती यंदा एकशें दहांच्या आसपास होती एवढीच मेघराजाची अवकृपा होती.

रागी हें नांव तुम्हीं ऐकलं आहे? रागी हें काळसर तांबड्या रंगाचं धान्य असून प्रमुख अन्न म्हणून याचा उपयोग इकडचा खालचा वर्ग करीत असतो. हें धान्य शिजवून त्याचे गोळे बनवतात व हे चिंचेच्या साराबरोबर खातात. या धान्याचं खरीपाचं पीक आषाढ-आश्विनांतल्या नेहमींच्या पावसावर निर्भरतंच, पण दलदलीच्या

जमिनींत पेरणी केल्यास रब्बीचं हिंवाळी पीकहि दोन महिन्यांत मिळूं शकतं. रब्बीच्या पिकाचे प्रयोग इतर ठिकाणीं झाले होते; पण ते दलदलीच्या जमिनींत. इथं कालव्याचं पाणी देऊन पीक काढण्याचा प्रयत्न झाला. थोडी जमीनच प्रयोगाखातर लागवडींत आणली असती, तरी बरं झालं असतं. परंतु तसं न करतां पिकासाठीं पाणी इतकं सोडलं कीं, कृष्णराजसागराची जी पातळी तळापासून सत्तर फुटांच्या खालीं कधींच गेली नव्हती, ती थोडीथोडकी नव्हे, तर पंधरा फुटांपर्यंत उतरली! परिणाम असा झाला, कीं शिवसमुद्रमला पाणीपुरवठा अपुरा होऊन बीजनिर्मिति कमी झाली, एवढंच नव्हे, तर साठ फुटांच्या उंचीवरून काढलेला ' विश्वेश्वरय्या कालवा ' बंद पडून त्यावर जगणाऱ्या उसाच्या मळ्यांत हाहाकार उडाला! उसाचं पीक तर खलासच झालं, पण पुन्हा पाऊस येऊन ' सागरां 'त पुरेसं पाणी सांचेपर्यंत विजेचं उत्पादन आणखी कमी होऊन कदाचित् तें पूर्ण बंद पडण्याचाहि संभव निर्माण झाला होता...(नंतर तें बंद पडलंच.)

पण हें असं झालं तरी कसं? तज्ज्ञांनीं आधीं कल्पना कशी दिली नाहीं? वृत्तपत्रांतल्या लेखकानं सांगितलं होतं--कल्पना दिली होती, वारंवार दिली होती, पण रागीचं पाणी बंद केल्यानं ज्यांचे हितसंबंध दुखावले जाणार होते, त्यांचं सरकारांत वजन होतं आणि त्यांनीं तज्ज्ञांचा सल्ला धाब्यावर बसवून पाणी सोडण्याचे हुकूम देववले होते...मेघराजाचा छांदिष्टपणा हा भारताच्या भाळींचा एकपट शाप असेल, तर बेजबाबदार आणि स्वार्थासाठीं समाजहिताचा घात करणाऱ्या माणसांच्या हातीं सत्ता हा शतपट शाप...होता म्हणूं कीं आहे म्हणूं?

वृत्तपत्रांतल्या लेखकानं अगदीं कातावून लिहिलं होतं. त्याचं वर्णन वाचल्यावर वृंदावन बागेंत आमच्या डोळ्यांना तृप्ति न मिळाल्याचं दुःख किती तुच्छ ठरत होतं! मग मनांत आलं, आपण यंदा आलों हें एका परीनं बरंच झालं. महाराष्ट्रापासून म्हैसूर फारसं दूर नाहीं. पुन्हा या बाजूला यायला मिळेल, वृंदावनांतली आरासहि बघायला मिळेल. पण हें...हें यंदा झालेलं 'प्रात्यक्षिक' पुन्हा कधींच पाहायला मिळायचं नाहीं...

गाडी संथपणानं रखडत रखडत चालली होती. सबंध दिवस गेला. रात्रहि गेली. उजाडतां उजाडतां बेळगांव गेलं. बसून बसून शरीरं आंबलीं होतीं. इतका वेळ बसून तर माझे पाय सुजले होते. शेवटीं साडेदहा वाजतां मी उतरलों, तेव्हां तळपायाला पाव बांधले असावेत असा भास पावलं टाकतांना होत होता...

# अठरा वर्षांपूर्वी

त्या गोष्टीला आतां येत्या उन्हाळ्यांत अठरा वर्षे होतील. ती कल्पना आम्हा तिघांपैकीं कुणाच्या मनांत आणि कशी रुजली तें आठवत नाहीं, पण त्या दिवसांत 'किर्लोस्कर' मासिकांत 'चाकावरून जगाची चक्कर' नांवाची एक मनोवेधक लेखमाला येत होती आणि तिनं आम्ही भारून गेलों होतों, एवढं मात्र पक्कं आठवतं आहे. कदाचित् त्यामुळंहि असेल, इतक्या लांबचा आणि दीर्घ अवधीचा नाहीं तरी जवळचा एकादा प्रवास निदान विलक्षण रीतीनं करावा असं आम्हांला वाटलं असेल. आम्हीं बेत आंखले. अधिक जण असलों तर उतरायला जागा मिळेल, आम्हांला जेवणाचीहि सोय व्हायला हवी होती, म्हणून आम्ही संख्या तिघांवरच मर्यादित केली.

पुण्याहून महाबळेश्वरला पायीं जाणार हें कळल्याबरोबर घरोघर हलकल्लोळ झाला! राग, भीति, धाक, अश्रू, इत्यादि सर्व अस्त्रांचा प्रयोग झाला! रानं आणि वाघ, चोर आणि दरोडे...आधींच धाकधुकींत होतों, या हल्ल्यानं (एकाच घरांतले) दोघे अगदीं हबकून गेलों. तिसरा बाळू, त्याच्या घरची मंडळी काय म्हणतात तें कळायचं राहिलं होतं. पण तो आला, तो हें सांगत कीं, "बरोबर पैसे मिळणार नाहींत, खायचं हवं तर करून देऊं. जायचं असलं तर जा." या शब्दांनीं परवानगी मिळाली. आम्हांला आनंद झाला, पण आश्चर्य वाटलं नाहीं. कारण त्याची प्रकृति चांगली, तो व्यायामहि खूप करीत असे; पण घरांत माणसं पुष्कळ आणि व्यायामानं भूक फार लागे, म्हणून त्याला तो सोडून द्यावा लागला होता, हें आम्हांला ठाऊक होतं. अर्थातच त्याला आम्ही वगळणं शक्यच नव्हतं.

पायीं प्रवास करणारे म्हणून प्रसिद्ध असणारे काळे त्या वेळीं पुण्यांत होते. त्यांच्याकडे एक दिवस सूचना व सल्ला विचारण्यासाठीं आम्ही गेलों. ते म्हणाले, "कसल्या सूचना नि कसला सल्ला? सूचना, सल्ला कांहीं नाहीं! घरांतून माणसाचं पाऊल बाहेर पडणं हें सर्वांत मुष्कील असतं. तें तुम्हीं निर्धारानं टाकलंत, कीं पुढचं सारं कांहीं जमत जातं!..."

हा विचित्र सल्ला ऐकून आम्ही स्तंभितच झालों. पण त्यामुळं आम्ही हट्टाला

पेटल्यासारखे मात्र झालं आणि घरांतल्या विरोधाला, दररोज जाऊं त्या ठिकाणाहून खुशालीचं पत्र न चुकतां पाठवूं, या तडजोडीनं दूर केलं आणि मग एका शनिवारीं दुपारीं तीनच्या सुमारास प्रत्येकाच्या हातांत एक दंडा, कपडे अंगांत होते तेवढेच, पाठीवर फक्त शाल—सतरंजींत गुंडाळलेली, चाकू, मेणबत्त्या यांसारख्या सटरफटर वस्तू या सरंजामानिशीं पुणें-सातारा रस्त्यानं आम्ही निघालों. वाटेंत चोरांचा त्रास होऊं नये म्हणून तिघांत मिळून फक्त दोन रुपये आम्हीं जवळ ठेवले. उन्हेरी टोपी कुणापाशीं नव्हतीच; पण असती तरी सुखवस्तु माणसं आहेत असं एखाद्याला वाटेल या भयानं आम्हीं ती घेतली नसतीच.

त्या दिवशीं चौदा मैल चालून आम्ही शिवापूरच्या बागेंत मुक्काम केला. जिला शिवापूरची बाग म्हणतात ती बाग नसून एक अतिशय विस्तीर्ण आंबराई आहे. हा बैलगाड्यांचा मोठा तळ असून इथं मोटारीहि थांबतात. रात्रीचे नऊ तरी वाजून गेले असावेत. सगळीकडे ठार अंधार होता. बरोबरची शिदोरी खाल्ली आणि पाणी प्यायला जवळच्या विहिरीपाशीं गेलों. मेणबत्तीच्या दिव्याच्या क्षीण प्रकाशांत पाणी शाईसारखं काळं दिसत होतं. विहिरीच्या आंतल्या अंगाला एका-खालीं एक दगड पुढं काढून केलेल्या पायऱ्या उतरून शेवटच्या पायरीवर गेलों तेव्हां पोटांत गोळा उठला! त्यांतून थोड्याच वेळापूर्वी विहिरींत शिरण्यावरून आमच्या गोष्टी निघाल्या होत्या, त्यांत एक माणूस असाच पाणी प्यायला उतरला, त्याला पोहतां येत नव्हतं म्हणून तो शेवटच्या पायरीवर जरा मागंच सरकून उकिडवा बसला होता, पण पाणी पिऊन तो चटकन् उठला तेव्हां त्याचा 'पृष्ठभाग' मागच्या भिंतीला आपटून तो पाण्यांत फेंकला गेला, ही गोष्ट निघाली होती; त्यामुळं पोहायला येत असूनहि काय जें झालं तें झालं! अंधाऱ्या रात्रीं खेड्यांतल्या विहिरींत उतरण्यासारखी भयाण गोष्ट नाहीं. मग थोड्या वेळानं भोंवतालीं बैलांच्या गळ्यांतील घुंगरांचा आवाज ऐकत आंब्यांच्या झाडांखालीं काळ्याशार मातींत ढेकळांवरहि झोंप गाढ आली.

पहांटे जागे झालों तेव्हां बैलगाड्या जोडून आपापल्या मार्गाला लागायला तयार झाल्या होत्या आणि कांहीं चालू लागल्या होत्या. आम्ही बावीस मैलांवरचं नसरा-पूर गांठलं आणि मुख्य रस्ता सोडून उजवीकडे गांवांत गेलों. पण तेथून जवळच असलेलं बनेश्वर बघितलं, त्यांतल्या झाडांच्या खालपर्यंत आलेल्या लवचिक फांद्यांवर झोके घेतले, देवदर्शन घेतलं, आवारांतलीं स्वच्छ पाण्याचीं चौरस आकाराचीं कुंडं आणि त्यांतले पुष्ट मासे बघितले आणि गांवांत मुक्काम करून

दुपारींच चालायला लागलों. आमचं सारंच कांहीं विचित्र चाललं होतं. आधीं-पासून कांहीं ठरलेलं नसल्यानं वाटेल तेथें थांबत होतों आणि वाटेल तेव्हां चालायला लागत होतों. ऊन उतरायच्या सुमाराला शिरवळला पोंचलों तेव्हां पाय विलक्षण दुखूं लागले होते. इतके कीं गांवाबाहेर एक देऊळ लागलं तिथंच मीं अंग टाकलं आणि बाळूला म्हटलं, "इथं तुझा वर्गबंधु का कोण जो म्हणत होतास त्याची चौकशी करून ये. घर सांपडलं तर बरं, नाहीं तर त्याहून बरं! इथंच मुक्काम ठोकूं. या क्षणीं एक पाऊलहि उचलायला आपण राजी नाहीं."

बाळू सुमारें अर्ध्या तासानं घर शोधून आणि त्याचा मित्रहि तिथंच असल्याची बातमी घेऊन आला. पण तोंपर्यंत तहानेनं कोरड पडलेली असूनहि माझ्या आणि मार्तंडाच्या तोंडचं पाणी पळालं होतं! कारण, मध्यंतरींच्या काळांत एक माणूस आला होता आणि आमची माहिती ऐकल्यावर त्यानं आश्चर्यानं उद्गार काढले होते, "तुम्हांला काय खूळबीळ लागलं कीं काय? मोटारी रोज जाताहेत, पण त्या जाऊं द्या. सायकली तर नाहीं कुठं गेल्या? पण पायीं इतक्या लांब? छे छे! तुमचं हें असं जाणं आपल्याला बिलकुल पास नाहीं बुवा!" या भाषेचीं आमच्या कानांवर पुटं चढलीं होतीं, पण तो माहितगारासारखं सांगूं लागला, "जावळीचं रान म्हणजे काय चेष्टा समजलांत तुम्ही? वाघ आहेत मोठमोठे त्यांत! वाटेंत पुन्हा चोर, लुटारू...आणि चढ! हे एकाहून एक बिकट!" हें म्हणतां म्हणतां चढ दाखवण्यासाठीं प्रथम तिरपा केलेला हात त्यानं उभा केला आणि शेवटीं तर इकडच्या बाजूला तिरपा केला! तेव्हां मी अगदीं घामाघूम होऊन गेलों. बाळू आल्यावर त्यालाहि हीच भाषा त्यानं ऐकवली. त्या वेळीं या गोष्टी बऱ्याच अंशानं खऱ्या वाटल्या. त्या माणसाला हें विचारायचं त्या वेळीं सुचलं नाहीं कीं, "तुझ्या या असल्या उलट्या चढावरनं ज्या मोटारी जातात त्यांना वरच्या दरडीवरून दोर सोडून शेंदून वर घेतात, कीं त्या पालीप्रमाणं सरपटत वर जातात? आणि त्या तशा जात असतील तर रस्त्याला त्यांचीं छपरं लागलेलीं असतात कीं चाकं?"

शिरवळला नीरा नदी आहे. केवळ शरीरं घाण झालीं होतीं म्हणूनच, थकवा आला होता तरी, आम्ही नदींत तरंगत पोहून स्नान करून आलों. पण पोहतांना आणि नंतर अनपेक्षितपणें कळून आलं, कीं विलक्षण आराम वाटत होता, तो पोहतांना पाण्यानं अंग चांगलं रगडलं गेल्यामुळं. पाणी हें नैसर्गिक रीत्या मालिश करीत असतं···पोटांत आतां भूक भडकली होती. तो दिवस अक्षय्य तृतीयेचा

होता. बाळूच्या मित्राच्या घरीं वासंतिक हळदीकुंकूं होतं. बेत झकास होता, तेव्हां अगदीं मनापासून हादडून जेवलों. अठरा वर्षांपूर्वींची ती गोष्ट आठवली, कीं आज मनांत येतं, अक्षय्य तृतीया सोडाच, पण दिवाळीच्या दिवसांतदेखील असे सपाटून दमलेले आणि भुकेनं झपाटलेले तिघे जण घरीं जेवायला आले, तर आज एकाद्या गृहस्थाच्या पोटांत धस्स होईल, आणि मोठ्या कष्टानं कां होईना, गार्हस्थ्याच्या सर्व कल्पना गुंडाळून ठेवून तो म्हणेल, "तुम्हांला हवं तर उतरायला जागा देतों, पण जेवायची व्यवस्था मात्र तुमची तुम्हांला पाहायला पाहिजे." प्रत्यक्ष अनुभवलेले ते प्रसंग मनापुढं आज उभे राहतात तेव्हां वेरूळअजिंठ्यांतलीं चित्रं पाहत असल्याचा भास होतो...

बाळूचा मित्र नदीकांठीं एका पडसाळींत झोंपायला व अभ्यासाला असे. तेथेंच त्याचे मित्रहि जमा होत. भोंवतालीं बिऱ्हाडंहि नव्हतीं. त्या दिवशीं रात्रीं आम्ही तेथेंच झोंपायला होतों. बाळूच्या मित्राला गाण्याचा आणि तबला वाजविण्याचा शोक होता. तेव्हां तो कार्यक्रम हसण्याखिदळण्यासह झाला. नंतर गप्पा सुरू झाल्या. सारी मंडळी सोळा ते वीसच्या दरम्यानची, परीक्षा संपलेल्या आणि नवीन वर्षाला अद्याप आरंभ न झालेला, तेव्हां गप्पा कसल्या असतील आणि कुठच्या थरापर्यंत गेल्या असतील त्याची कल्पनाच करावी. नुकत्याच होऊन गेलेल्या शिमग्यांतलं तें कवित्व, पंढरपूरला तसल्याच दिवसांत कानांवर येऊन मला परिचित झालेल्या कवित्वाच्या मानानं अगदींच मामुली होतं. आम्ही हसत त्या गप्पा ऐकत होतों, मधून मधून भागहि घेत होतों.

रात्रीं झोंप मात्र निर्विकल्प, शांत आणि गाढ आली.

मोजक्या व्यक्तींमधील अगदीं खाजगी बोलण्यांतल्या अर्वाच्य भाषेकडे मी नेहमीं कांहींशा उपेक्षेनं आणि कांहींशा सहानुभूतीनं पाहत आलों आहें. कुणाची, विशेषतः स्त्रियांची, त्यांतून व्यक्तिगत निंदा होत नसेल तर त्या अर्वाच्य शब्दांकडे दुर्लक्षच करायला हवं. माणसाची सगळीकडेच कुचंबणा होत असते, मनाला पावलांपावलीं दाबून टाकावं लागत असतं, त्याची ती प्रतिक्रिया असते. त्या शब्दांचा उच्चार होऊन गेला, कीं मन बऱ्याच अंशानं मोकळं होत असतं. चांगला शिकलेला माणूसदेखील सैनिकी जीवनांत कांहीं काळ गेला, कीं कोणती भाषा वापरूं लागतो तें कांहीं सांगायला नको. हें चांगलं आहे असं अर्थातच मी मानीत नाहीं. पण मग प्रत्येक माणसाला ज्या वेळीं स्वतःच्या आवडीचं आणि सामायिक संपत्तींत भर टाकल्याचं समाधान देणारं कार्य करण्याची संधि मिळूं

लागेल, त्याचप्रमाणं लैंगिक व्यापारांभोंवतीं व्यर्थ उभे केलेले जुगुप्सेचे तट दूर होतील, स्त्री आणि पुरुष खुल्या भावनांनीं एकमेकांशीं वर्तन करून खरं निरामय जीवन जगूं लागतील, तेव्हांच्या 'समाजस्वास्थ्यां'त अगदीं खाजगी भाषणांतूनच काय, पण स्वप्नांतसुद्धां ही अर्वाच्य भाषा, तिच्या मागचे विचार, आणि मनश्चक्षूं-पुढचीं अभद्र चित्रंहि नाहींशीं होतील.

दुसऱ्या दिवशीं पहांटेच चंबूगबाळं आवरून आम्हीं पुढचा रस्ता धरला. खंडाळ्याचा घाट आला तेव्हां उन्हं चांगलींच वर आलीं होतीं. सुरुवातीचा थोडा चढ आणि नंतरचा बराच सपाट रस्ता तुडवून प्रत्यक्ष डोंगर चढायला सुरुवात झाली तेव्हां दहा वाजून गेले होते. वाटेंत झाडं नाहींत, सांवली नाहीं आणि वेळहि अशी विचित्र कीं डोंगराची सांवली इकडेहि नाहीं आणि तिकडेहि नाहीं. अखेरीस दोहोंच्या सुमारास घाट संपल्यावर रस्त्याच्या कांठीं वडाचे मोठे वृक्ष लागतात, त्यांच्या गर्द सांवलींत शिदोरी सोडली तेव्हां शरीरं करपून गेल्यासारखीं आणि मनं मरगळल्यासारखीं झालीं होतीं. मग पुन्हा चालायला लागून, सुरूळला वाटेंत एका शेतकऱ्यानं आपल्या गुऱ्हाळांत लोटा लोटा रस आणि घसघशीत उसाचं कांडं प्रत्येकाला (कांहीं पैसे न घेतां) दिलं त्यांचा समाचार घेऊन चालत चालत वाई गांठली तेव्हां दिवेलागणी झालेली होती. मार्तंडा आणि बाळू कुणाचं तरी घर शोधायला गेले तेव्हां मी नदीकांठच्या एका देवळाच्या चौथऱ्यावर अंग टाकून दिलं आणि पश्चिमेकडून झुळझुळ येणारा थंड वारा अंगावर घेत आणि माथ्यावरच्या पिंपळाच्या पानांची सळसळ कानाला विलक्षण सुखवीत होती ती ऐकत गुंगून पडून राहिलों. त्या रात्रीं यजमानणीनं आम्हां तिघांना पायांना चोळायला खोबरेल आणि शेकायला कढत पाणी दिलं. त्या घरचीं मंडळी आमच्या अचाटपणानं थक्क झाली होती. वाईला एक दिवस मुक्काम करायचा आमचा निश्चय झाला.

तीन दिवसांच्या चालींतल्या घामानं आणि धुळीनं कपडे कमालीचे मळले होते आणि मानेवर खरपुड्या जमल्या होत्या. सगळं सामान पाठीवर, तेव्हां जादा कपडे घेण्याची वार्ताच नव्हती. विचार केला, कृष्णेकांठीं आलों आहोंत तर स्वच्छ होऊं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नदीवर जातां जातां एक साबण विकत घेतला (जवळच्या दोन रुपयांतला हा पहिला खर्च). कपडे परिटापेक्षांहि स्वच्छ धुवून काढले, तेथेंच उन्हांत खडकांवर वाळत घातले आणि अभिमानानं त्यांच्याकडे पाहत जवळच्या डोहांत स्वस्थ पडून राहिलों. वाईला उन्हाळ्यांत कृष्णेचं पात्र

क्षीण असलं तरी खडकांतून गळ्याइतकं पाणी असलेले लहान लहान डोह बरेच असतात.

तेवढ्यांत कुठून कुणास ठाऊक, एक माणूस आला आणि त्यानं आम्हांला म्हटलं, "ही इथं साबणाची वडी आहे!"

"हो हो! ही इथं साबणाची वडी आहे!"

"नुकतीच वापरलेली दिसते आहे!"

"हो! नुकतीच वापरलेली आहे!"

तो आमचे सगळे कपडे गोळा करूं लागला आणि म्हणाला, "मग आतां तुम्ही तिघेहि चला!"

विंचू चावल्यागत आम्ही एकदम पाण्यांतून बाहेर आलों आणि कपड्यांच्या दिशेनं धांवलों.

"तुमचे हे सगळे कपडे जप्त झाले आहेत. या भागांत नदीकांठीं साबणानं कपडे धुवायला बंदी आहे. दंड भरून आतां तुम्हांला कपडे सोडवून आणावे लागतील. चला!"

आमच्या डोळ्यांसमोरून एका क्षणांत अनेक दृश्यं तरळून गेलीं...नगर-पालिकेच्या कचेरीपर्यंत नुसत्या लंगोटावरच आमची मिरवणूक निघाली आहे, रस्त्यानं लोक गंमत पाहताहेत, तिघांत मिळून एक रुपया आणि चौदा आणे आहेत...त्याहून दंड खात्रीनं अधिकच असणार...पुढं अंधार...

लीनतेनं मऊ होऊन आम्हीं सारी परिस्थिति त्या गृहस्थाला समजावून सांगितली. त्याचा तीवर विश्वास बसला आणि त्यानं कपडे सोडले. तो मनांत आणता तर, सारी तुमची कैफियत कचेरींत सांगा, असं आम्हांला म्हणून आमची अडवणूक त्याला करतां येती. पण तो भला होता. इतका, कीं अखेरीस "तुमचा घात करणारी ही साबणाची वडी दडवून तरी ठेवा किंवा फेकून तरी द्या!" असंहि त्यानं आम्हांला बजावलं. कायद्याच्या तेजाबांत त्याची माणुसकी जळून गेलेली नव्हती.

त्या दिवशीं संध्याकाळीं पांचगणीचा घाट आम्ही चढूं लागलों. संस्कृत कवींनीं जिची मनसोक्त स्तुति केली आहे ती 'निदाघदिना'ची सायंकाळ त्या दिवशींहि रम्य होतीच, पण कृष्णा खोऱ्याच्या एका अंगानं वर चढत असतांना ती अधिकच रम्य वाटली. विश्रांति घेऊन ताजेतवानेहि झालों होतों. माथ्यावर आलों तेव्हां रुक्ष पांढरी माती संपून, महाराष्ट्रांतल्या बलोपासकांना पुष्ट करणारी,

नंदादीपाची स्निग्धता असलेली तांबडी माती आली आणि थोड्याशा वाऱ्यानंसुद्धां आपल्या इवल्याशा पानांतून अंगाईगीत निर्माण करणारे उंच उंच वृक्ष लागले. हवेंतला थंडावा तर काय, मस्तच होता.

आत्तांपर्यंत घरांतल्या एखाद्या व्यक्तीची ओळखहि आम्ही उतरण्यास पुरेसा आधार मानली होती. पांचगणीला तेवढंहि नव्हतं. ठाऊक होतं फक्त पंडितांच्या शाळेचं नांव. आधींच्या मुक्कामांतून कुठं ना कुठं तरी नातलग किंवा मित्र मिळाले होते ते वाळूचे. वाईला जिथें उतरलों होतों तें आईच्या मैत्रिणीच्या मुलीचं सासर होतं मार्तंडाच्या. तेव्हां या खेपेला सोय करण्याचं काम मीं अंगावर घेतलं आणि शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटलों. त्यांनीं तत्काळ होकार दिला.

त्या दिवशीं पांचगणीच्या विस्तीर्ण आवारांतील पाहुण्यांच्या राहुटींत किर्लोस्कर खाटांवर पहुडल्यानंतर आम्ही जी रात्र घालवली ती विसरणं शक्य नाहीं.

रात्रींच्या अंधारांत घड्याळाचा आवाज भयानक वाटतो. जणुं एखाद्या न्यायाधीशाच्या गांभीर्यानं आणि भकास लयीनं तो बजावीत असतो, "संपला, संपला, क्षण क्षण संपला!" रात्रीं रातकिड्यांचा किर्र आवाज उदासवाणा वाटतो, तर कुठं तरी चाललेल्या भजनांतील टाळ, मृदंग, अभंगांचा दुरून हवेवर तरंगत येणारा संमिश्र आवाज मनाला आर्द्र करतो. मालवणला मी एकदां गेलों होतों, तेथें घराच्या मागच्या अंगाला तरुणीच्या ओटीपोटासारखी नितळ 'चिउल्याची वेळ' होती आणि तिला लागूनच असलेल्या समुद्राच्या लाटांच्या आवाजानंहि माझं मन गुंगून गेलं होतं. पण एक तर तो खंडितपणें येत होता आणि कानांची तृप्ति होत होती तरी हवेंत मनस्वी उकाडा असल्यानं शरीर अतिशय नाराज होतं. परंतु पांचगणीच्या उंच झाडांच्या पानांमधून वाहणाऱ्या वाऱ्यानं त्या दिवशीं रात्रीं थंड हवेंत आलेली गुंगी सर्वतोपरी सुखावह होती. इतकी कीं झोंप न येतां रात्रभर ही नुसती गुंगीच चालू राहिली तर काय बहार होईल, असं सारखं मनांत येत होतं. आयुष्यांत रात्रीं ऐकलेल्या ध्वनींपैकीं तुला सर्वांत कोणता प्रिय आहे, असा प्रश्न कुणीं मला विचारला, तर विचार करावा न लागतां मला चटकन् उत्तर देतां येईल.

पहाटे केव्हां तरी जागा झालों तेव्हां तंबूत एके ठिकाणीं एक पुठ्ठा टांगलेला दिसला. कंदिलाची वात वर करून बघितलं तों पाहुण्यांच्या राहण्यासंबंधींचे शाळेचे ते नियम होते. मुलांकडे येणाऱ्या पालक पाहुण्यांना तीन दिवसांहून अधिक राहतां येणार नाहीं, प्रत्येक दिवसाला दोन रुपये आकार पडेल—इत्यादि मजकूर वाचून विलक्षण अस्वस्थ वाटूं लागलं. आमच्याकडे पैसे तर मागणार

नाहींत? आणि मागितले तर काय सांगायचं? बाळू-मार्तंडाशीं केलेल्या चर्चेंत चालक पैसे मागणार नाहींत हें निष्पन्न झालं, आणि मन निश्चिंत होत होतं तितक्यांत दुसराच प्रश्न मनाला ग्रासूं लागला, "म्हणजे आपण या शाळेचं रोजीं सहा रुपयांचं नुकसान करीत नाहीं काय?" या शंकेवर त्या दोघांपाशीं उत्तर नव्हतं. आज पैशाला किंमत नाहीं आणि मामुली नुकसानीची बातमी वाचली तरी तींत हजारालाखांचे आंकडे आढळतात. त्या वेळीं पैशाची किंमत फार वाटे; आणि प्रवास करतांना संकोचीपणा ठेवला कीं आटोपलाच कारभार, हें सूत्र मनांत जिरलेलं नव्हतं. आम्ही तिघेहि ओशाळल्यागत झालों. मग सकाळीं उजाडतांच शाळा झटपट पाहून घेतली आणि चालकांचे आभार मानून पुढं चालूं लागलों.

निघालों तेव्हां शनिवार होता, आज बुधवार होता. नसरापूरला बाजूला वळून वनेश्वरकडे गेलों तें अंतर सोडून दिलं, तरी नुसतं रस्त्यावरून चालणं आज पंचाहत्तर मैल पूर्ण होणार होतं. सकाळभर चाललों आणि दुपारीं एकाच्या सुमारास महाबळेश्वराचा शेवटचा चढ सुरू होण्याच्या ठिकाणचा वेण्णा तलाव दृष्टीस पडला. निघाल्यासारखे एकदांचे सुखरूप पोंचलों हा कृतकृत्यतेचा आनंद अपूर्व होता. पण त्याबरोबर इथं उतरायचं कुठं ह्या प्रश्नाची धाकधुक सतावीत होती. इथं ओळख, मित्र सोडाच, पण कुणाचं नांवदेखील ऐकून माहीत नव्हतं. शेवटीं 'नहर'मध्यें जिथं मी विश्रांति घेत पायांना कुरवाळीत पडलों होतों तेथें बाळू आणि मार्तंडा मान हलवीतच परत आले आणि धाकधुकीचं रूपांतर निराशेंत झालं. इथं उतरून घ्यायलादेखील कुणी तयार नव्हतं, तर जेवायची सोय कोण करणार?

ते पुन्हा मोहिमेवर निघाले. बऱ्याच खटपटीनंतर कापडाच्या एका लहान दुकानदारानं रात्रीं दुकान बंद झाल्यावर आंत झोपायला परवानगी दिली. त्यानं स्वयंपाकाला भांडींहि देण्याचं कबूल केलं. त्याच्या ओळखीचा एक पुरभय्या जवळच्याच खपरेलांत एकटा राहत होता, त्याची तेथें तीन दगडांची चूलहि होती, तिच्यावर तुम्ही स्वयंपाक करा असंहि त्यानं सांगितलं. (तो भय्या दिवस-भर भेळ विकी आणि रात्रीं उशीरां परत येई.) त्या दिवशीं रात्रीं दुकानदार आमची स्वयंपाकाची तारांबळ पाहून म्हणाला, "आमची जात शिंप्याची. आमच्यांत शिवाशीव असते. तुम्ही ब्राह्मण, आम्हांला चालत नाहीं. नाहीं तर तुम्हांला जेवायलाहि घातलं असतं."

आम्हीं म्हटलं, "तुम्ही हें म्हणालांत हेंच पुष्कळ झालं."

यानंतर मी अनेक वेळां महाबळेश्वरला येऊन गेलों आहें. तेथील अनेक ‘टोकं’ दिवसाच्या निरनिराळ्या वेळीं पाहून त्यांची सर्व वेळची शोभा लुटली आहे. तेथून तीन प्रहरच्या सुमारास क्षितिजाशीं चमचमणारा समुद्र बघितला आहे आणि संध्याकाळनंतरच्या अंधारांत दीपगृहहि बघितलं आहे. फार काय, गांवाजवळच सुमारें अर्ध्या मैलावर पठारवजा असलेल्या सर्वांत उंच ठिकाणीं सूर्यास्तानंतर जाऊन सगळीकडे निर्मनुष्य झाल्यावर अंगावर सुताचा तुकडादेखील न ठेवतां शांत वातावरणांत वावरून भोंवतालच्या चंद्रप्रकाशांत विरून गेल्यासारखं वाटण्याचा विलक्षण अनुभवहि घेतलेला आहे. पण अठरा वर्षांपूर्वीच्या त्या खेपेला जवळ पैसे नव्हते म्हणून मुक्काम झटपट आवरावा लागला, तेव्हां मग कमींत कमी वेळांत अधाशासारखे जास्तींत जास्त रम्य स्थळं ओरपीत आम्ही चाललों होतों. रम्य स्थळांचा रम्यपणा बऱ्याच अंशानं बघण्याच्या वेळेवर अवलंबून असतो हें लक्षांत घ्यायला त्या वेळीं सवडच नव्हती. पहिल्या दिवशीं एक टोक बघितलं तें दूरचं होतं. सारी दरी अंधारांत लुप्त झाली होती, आणि तीहि शोभा अपुरीच पाहून वाघ मागं लागल्यासारखे आम्ही परतलों. दुसऱ्या दिवशीं ‘हत्तीचं गंडस्थल’ बघितलं तेव्हां दहा वाजून गेले होते, सावल्या आटत चालल्या होत्या आणि त्याच दमांत ‘मुंबई टोंका’वर आलों तेव्हां सूर्य माथ्यावर आला होता. दोन्ही ठिकाणच्या दऱ्यांतून नव्हती फारशी शोभा कीं आकाशांत नव्हता रंगांचा खेळ! होता काय तो अंतराळांत झेपावणाऱ्या घारींचा (हिंदींतील आपलं नांव ‘चील’ हें सार्थ करणारा) कर्कश आवाज!

महाबळेश्वर गांवांत (यालाच नहर म्हणतात) आमचा मुक्काम फक्त चोवीस तास होता. तीन प्रहरच्या सुमारास तेथून निघून संध्याकाळीं आम्ही क्षेत्र महाबळेश्वरला पोंचलों. नहरांत श्रीमंत आणि त्यांच्यावर जगणारे लोक यांचीच बहुतेक वस्ती असल्यानं तेथें पैशाला देवतास्वरूप प्राप्त व्हावं यांत नवल नव्हतं. पण इथंहि तोच अनुभव आला. गांव सारा पांचपंचवीस घरांचा, श्रीमंती बंगला एकहि नाहीं, तरी पण आम्हांला कुणीच थारा देईना. इतका मोठा प्रवास चालत केल्यामुळं आपली सोय लोक करतात आणि त्यांनीं ती करायला हवी ही आधींच्या अनुभवानं रुजलेली अहंकाराची भावना नहरमध्यें बरीच कमी झाली होती, ती आतां इथं साफ उतरली. शेवटीं देवळाच्या गाभाऱ्यांत निवारा घेण्यासाठीं आम्ही निघालों तेव्हां एका म्हातारीनं विचारलं, “तुम्हांला कुठं अजून जागा मिळाली नाहीं, बाळांनो?”

आम्हीं माना हलवल्या, तेव्हां ती म्हणाली, "या, या. माझ्या घराच्या या पुढच्या खोलींत पसरा पथारी." थोड्याच वेळापूर्वी तिनं नकार दिला होता. आतां तिचं मन बदललं होतं.

या भागांत नेहमींची वस्ती फारच थोडी असल्यामुळं इथं अतिशय शांत आहे. इथल्या एका गुरख्यानं (हें ऐकलेलं सांगतों आहें) एकदां रात्रीं खोपटा-बाहेर अंगणांत पावलं वाजलेलीं ऐकलीं म्हणून काठी घेऊन तो बाहेर आला आणि झोंपेंतच दोनचार तडाखे मारून त्या गुराला घालवून दिलं. सकाळीं उठून पाहतो तों अंगणांत वाघाचीं पावलं! जवळच ब्रह्मारण्य असल्यानं श्वापदांचा नेहमीं वावर असतो. कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री आणि गायत्री या पंचनद्यांचं हें क्षेत्र उगमस्थान समजतात. त्या ठिकाणीं एक देऊळ उभं केलं आहे. या देवळाची मागची भिंत डोंगराच्या दरडीला लागून आहे आणि तिला पायथ्याशीं पांच विवरं असून त्यापुढं चिरेबंदी पन्हळीवजा चरांतून पांच इवलेसे प्रवाह एका गोमुखांतून एकत्रितपणें एका कुंडांत पडण्याची व्यवस्था केली आहे. सर्वच तीर्थक्षेत्रांप्रमाणें इथं चिकचिक, ओल असतेच आणि कुंडांतलं पाणी तर काय, जरा अधिक वेळ बघितलं तरी डोळे घाणीनं बरबटून जातील अशी भीति वाटते. भाविकांचं सोडून द्या, पण पांच नद्या एका ठिकाणाहून उगम पावतात असं म्हणतात तेव्हां पांच प्रवाह गेले असल्याचं लोकोत्तर दृश्य तरी पाहायला सांपडेल या उत्कंठेनं नास्तिक माणसंहि येत असतील, पण त्यांची पुरी निराशा होते. कारण या कुंडा-पलीकडे जवळपास एकाहि नदीचं नांवनिशाणहि आढळत नाहीं. कुणीं स्पष्टीकरण विचारलं तर सांगतात, पांचहि नद्या इथं उगम पावून इथंच लुप्त झाल्या आहेत. पुढं त्या आपापल्या खोऱ्यांत प्रगट होतात!

नाहीं म्हणायला, पंचगंगेच्या देवळापासूनच सुमारें शंभर पावलांच्या अंतरावर असलेलं महाबळेश्वराचं देऊळ मात्र शांत आणि स्वच्छ होतं.

दुसऱ्या दिवशीं ब्रह्मारण्यांतून सावित्रीच्या खोऱ्याशीं आम्ही गेलों. करवतीनं कडा कापून काढल्यासारखा या खोऱ्याच्या एका अंगाचा कडा पाहतांना दृष्टीबरोबरच आपणहि खालीं पडत असल्याचा भास होऊन पोटांत गपकन् पोकळी निर्माण होते आणि सह्याद्रीचं खरं रौद्र स्वरूप पाहायला मिळाल्याचं उग्र समाधान लाभतं. इथलीं ठिकाणं जितकीं भीषण, तितकींच प्रेक्षणीय आहेत. पण तीं पाहतांना 'अमक्याची बैठक', 'तमक्याची खिडकी' हीं त्यांचीं नांवं ध्यानांत येऊन आपुलकीवर सारखे प्रहार होत असल्यासारखं वाटे. भारताचं कोणतंहि कल्याण

न करणाऱ्या परकीयांचीं, या स्थळांशीं निगडित केलीं गेलेलीं नांवं उल्लेखण्यास मन घेत नाहीं.

सावित्री खोऱ्यांतून परतल्यानंतर त्या दिवशीं आम्हीं जो गाढवपणा केला त्याला तोड सांपडायची नाहीं.

प्रवासाचं हें आमचं शेवटचं ठिकाण होतं. आतां परतीचा प्रवास सुरू व्हायचा, तेव्हां आलेल्याच रस्त्यानं परत गेलों तर त्यांत स्वारस्य काय राह्यलं, असा विचार झाला. त्यानुसार आम्हीं जो रस्ता पसंत केला तो कल्पनेनं डोळ्यांपुढं आणला तर सुसूत्र होता. महाबळेश्वराच्या देवळावरून जरा पुढं जायचं, मग तेथून डोंगराच्या सोंडेवरून खालीं कृष्णा खोऱ्यांत उतरायचं. एकदां कृष्णा गांठली, कीं मग तिच्या कांठाकांठानं जात वाईला पोचायचं ! आहे काय त्यांत ?

हें सारं एरवीं ठीक होतं. पण त्या दिवशीं सकाळीं आमची ब्रह्मारण्यांतून चांगली दहा मैलांची तरी चाल झाली असेल. दुपारीं स्वयंपाक करण्याचेहि श्रम झाले होते. परंतु याविषयीं कांहीं विचार न करतां आम्हीं निर्णय घेतला आणि जेवण झाल्यावर दुपारीं एक वाजतां चालूं लागलों तेव्हां हातदेखील पुरते वाळलेले नव्हते, मग विश्रांतीची गोष्ट कशाला ? 'डोंगराची सोंड' या शब्दाची समर्पकता त्या दिवशीं आमच्या पुरेपूर प्रत्ययाला आली. उतार भयंकर, रस्ता अतिशय नागमोडी. आणि रस्ता तरी कसला, कातकऱ्यांची साधी पाऊलवाट ती. तिच्यावर ग्रीष्मकाळांतील सुकलेल्या पानांचा खच झालेला. पायांत कोल्हापुरी वहाणा, पण त्यांचे अंगठे व एकेक बंद तुटलेले. पाऊल टाकावं, तों उतारामुळं चवडा वहाणेबाहेर पडे. शेवटीं तुटण्याच्या आणि पाचोळ्यावरून घसरण्याच्या भयानं त्या आम्हीं काढून घेतल्या. डोक्यावर उन्हेरी टोप्या नाहींत, नुसते हातरुमाल बांधलेले. पाठीवर बोजे, त्यामुळं वेग आवरणं आणि तोल सावरणं महाकठीण होत होतं...

शेवटीं कृष्णाबाईच्या कांठानं चालूं लागलों तेव्हां उन्हाच्या झळा झपकन् फटकारूं लागल्या. घशाला कोरड पडूं लागली. पाऊलवाट सोडून डगर उतरून पात्राशीं पाणी पिण्यासाठीं जावं तों नेमकं त्या ठिकाणीं तें कोरडं आढळावं...त्या दिवशीं अक्षरशः करपून गेलों. (पुढं आठवडाभर अंगावरून भुसकट सुटून येत होतं.) थकलों होतों, पण दिवेलागणी व्हायच्या आंत वाई गांठायला हवीच होती. वाटेंत शेतकरी जमिनी नांगरतांना आढळत, त्यांना विचारावं, "वाई किती दूर आहे ?" तर ते उत्तर देत, "आहे दोन कोस !" शेवटीं विचारणं सोडून दिलं.

अखेरीस धांवपळीनं मी आणि मार्तंडा खलास झालों. बाळू आपला खर चघळावं तसा चालतच होता. त्याला मग आम्ही येत असल्याचं कळवण्यासाठीं पुढं पाठवून दिलं आणि आम्ही दोघे आमच्या चालीनं चालूं लागलों. त्या दिवशीं आमच्या यजमानणीला, "आतां सारं कांहीं संपलं" हें सांगण्याची (जेवण चालू असतांनाच) पाळी आली आणि आम्ही ती आणली म्हणून शरमिंदेहि झालों...

वाईहून परत जायचं तर आलेल्याच रस्त्यानं जायला हवं होतं. पण तसं करायला मन राजी होईना. श्रमाचं राहूंच द्या, पण आपण चालत असतांना शेजारून हवा नांगरीत गेल्याप्रमाणं लोट उडवून मोटारी जोरांत निघून जातात तेव्हां चालणं किती कंटाळवाणं वाटतं त्याची आठवण ताजी होती. आम्हीं विचारविनिमय केला आणि मोटारीनं संध्याकाळीं भोरला गेलों. भोरला केवळ ऐकीव नांवावरून सोय जमवली. गृहस्थ वृद्ध होता, सुखवस्तु होता. त्याचा पेशवाईकालीन वाडा होता आणि त्यानं आमचं आदरातिथ्यहि पेशवाईकाळच्या यजमानाला साजेसंच केलं. आमच्या प्रवासाचा इत्थंभूत वृत्तांत सांगून आम्हीं पण त्यांचं मनोरंजन केलं.

भोरला जाण्यांत आमचा हेतु हा होता कीं, भाटघरचं धरण बघावं, पुढं तसंच चालत चालत पुणें-सातारा रस्त्याला येऊन मिळावं आणि तेथें मोटारींत जागा मिळवून घरीं परतावं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून भाटघरचं धरण पाहून पुणें-सातारा रस्ता येईपर्यंत सारं ठीक जुळलं; पण सातारा, वाई, महाबळेश्वर, कऱ्हाड, इत्यादि ठिकाणांहून मोटारी येत त्या साऱ्या ठिच्च भरलेल्या! संध्याकाळपर्यंत वेड्यासारखे भोर फांट्याच्या तिवाठ्यापाशीं थांबलेलों होतों. मोटारी येणं बंद झालं तसे चालूं लागलों. एकदां तुडवलेला रस्ता पुन्हा तुडवायला हवा होता, पण गत्यंतर नव्हतं. शिवापूरहून सकाळीं मोटार सुटते हें समजलं होतं, तेव्हां तेथपर्यंत जाणं आलंच. काय वाटेल तें झालं तरी तेथपर्यंत जायचंच असं ठरवून आम्ही निघालो.

या भागांतून आधीं जातांना एके ठिकाणीं रस्त्याच्या कडेला छातीएवढ्या उंच चबुतऱ्यावर असलेलं म्हसोबाचं कीं कुणाचंसं छोटंसं देऊळ दाखवून बाळूनं सांगितलं होतं, "इथं रात्रीं कोल्हे जमतात अशी प्रसिद्धि आहे." तो असंहि म्हणाला, "कोल्हे माणसांशींदेखील धूर्तपणानं वागतात. ते कळपानं येतात. त्यांतला एक गट पुढून चालून येतो. त्याला तोंड देण्यांत माणूस गुंतला असतांना पाठीमागून दुसरा गट हल्ला करतो." हें कोल्ह्यांचं युद्धतंत्र खरं

असल्याचं बाळूनं सांगितलं, तेव्हां आम्हीं त्याची टवाळी केली आणि आतां-देखील त्यावर संपूर्ण विश्वास उत्पन्न झाला नव्हता तरी आमचीं पावलं मात्र विलक्षण वेगानं पडत होतीं! कमालीचे थकलों होतों, पण भीति पुढं रेटत होती. झोंप भयंकर आली होती, पण वाटेंत थांबण्याचा धीर होत नव्हता. म्हसोबा बराच मागं पडला तरी धाकधुक संपेना. पुढं मग शिवापूरला लवकर पोंचायचं या ईर्ष्येनं पावलं झाडीत राहिलों. चालतां चालतां पेंगत होतों आणि पेंगतां पेंगतां झोकांड्या जात होत्या. इतक्या कीं अखेरीला उजवीं पावलं डाव्या बाजूला आणि डावीं उजव्या बाजूला पडत होतीं. शिवापूर आलं तेव्हां पाठीवरचे बोजे शेतांतच झोकून दिले आणि ढेकळांवरच अंगं टाकून दिलीं. इतकी तत्काळ आणि इतकी गाढ झोंप आयुष्यांत कधीं मीं अनुभवली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठलों तों उन्हं वर आलीं होतीं. बैलगाड्या पहांटेसच निघून गेल्या होत्या. मोटारींची वर्दळ अद्याप सुरू व्हायची होती. इथली पुण्याची मोटार सुटायलाहि अवकाश होता.

एक माणूस गाय घेऊन आमच्याजवळ आला आणि म्हणाला,

"गाईचं दूध पाहिजे?" आम्हीं भाव विचारला. त्यानं तो सांगितला आणि म्हटलं, "दूध काढून घ्यावं लागेल." ही अट ऐकून आम्ही थक्क झालों.

आमच्याजवळचे पैसे आतां शेवटच्या मोटारभाड्यापुरतेच होते.

बाळूनं विचारलं, "तुम्हांला नाहीं काढतां येत?"

त्यानं मान हलवली.

बाळू म्हणाला, "मला येतं. मी सगळं दूध काढून देईन. आम्ही तिघे आहोंत. प्रत्येकाला पावशेर मिळालं पाहिजे. जमत असलं तर पाहा."

तो नकार देऊन निघून गेला. पण जरा वेळानं चरवी घेऊन आला आणि म्हणाला, "काढा दूध." बाळूनं चरवीभर दूध काढलं.

गाईचं धारोष्ण दूध पिऊन मोटारींत बसतां बसतां मनांत शंका आली, अशा विचित्र तऱ्हेनं दूध विकणारा हा गाईचा मालक अजबच असला पाहिजे. त्यानं ही गाय चोरून तर आणली नसेल? आणि असेल तर...तर...चोरीचे भागीदार!

पण मग...चोरी केली असली तर तिचा दोष त्याच्याकडे; बाळूनं दूध काढलं, त्याच्या मोबदल्यांत पाऊण शेर दूध घेतलं; दुधाच्या मागच्या इतिहासाशीं आपला संबंध नाहीं...असं कांहीं तरी उत्तर आम्हीं मनाला त्या वेळीं दिलं असलं पाहिजे...

या साऱ्या अठरा वर्षांपूर्वीच्या गोष्टी. माणसानं प्रवास केल्यानंतर किती अवधि गेल्यावर त्याचं वर्णन लिहावं याविषयीं सिद्धांत बांधणं शक्यहि नाहीं आणि इष्टहि नाहीं. बऱ्याच अवधीनंतर वर्णनं लिहिण्यांत हा फायदा असतो, कीं क्षुल्लक गोष्टी विसरून गेलेल्या असतात आणि त्या व्यर्थ अधिक जागा व्यापीत नाहींत. पण क्षुल्लक गोष्टी कोणत्या आणि महत्त्वाच्या कोणत्या हें व्यक्तीव्यक्तीवर अवलंबून असणार. कदाचित् त्यामुळेंच एकाच स्थळाच्या प्रवासवर्णनानं निरनिराळं माधुर्य निर्माण होत असलं पाहिजे. कदाचित् कशाला? तसंच. तथापि तें कांहीं असलं तरी प्रत्यक्ष या प्रवासांतील प्रसंगांबरोबरच त्या वेळच्या इतरहि कित्येक घटना व परिस्थिति मला विसरतां येत नाहींत. उदाहरणार्थ, तीसबत्तीसचीं आंदोलनं नुकतींच होऊन गेलीं होतीं. आणि त्या काळांत जवळच्या वातावरणामुळं मी त्यांकडे कांहींसं अलिप्तपणानं तर कांहींसं तुच्छतेनं पाहिलं होतं. शिक्षण घेत होतों, पण त्यामागं विशिष्ट हेतु नसल्यानं आणि भविष्यकाळाची चाहूल लागल्यानं मनाला विलक्षण हेलकावेहि बसत होते. मार्तंडा निखाऱ्यावर पडलेल्या पापडासारखा तडफडत होता, त्याची मनोव्यथा कळत होती, पण तीवरचा उपाय आमच्या हातीं नव्हता. बाळूची अवस्थाहि कांहीं अंशीं तशीच होती. प्रत्यक्ष प्रवासाशीं या गोष्टींचा तसा कोणताहि संबंध नसला तरी मला जेव्हां त्याची आठवण होते तेव्हां या साऱ्या स्मृति ढवळून निघतात आणि मनांत येतं, रात्रीं आंत उकडायला लागलं म्हणजे बाहेर येऊन माणसानं थोडा वेळ उघड्यावर येऊन पडावं त्याप्रमाणं ती मनाची तलखी कांहीं अंशानं कमी करण्यासाठींच तर आपण हा प्रवास नाहीं ना अंगावर घेतला?...

# चंद्रभागेच्या वाळवंटांत

रात्रीची वेळ. लग्नाच्या मिरवणुकीची वरात रस्त्यानं चाललेली. दोन्ही अंगांना ग्यासच्या बत्त्यांची रांग झगझगत आहे. वाजंत्र्यांच्या ताफ्याच्या मागं मिरवणुकीचा एखादा लचका तुटल्याप्रमाणं थोडीशी रिकामी जागा आणि तिच्यांतून दोन माणसं मिरवणुकीच्याच वेगानं पुढं पुढं सरकताहेत. त्यांतल्या एकाच्या हातांत जळता पलिता आहे. तो आपल्या शेजारून चालणाऱ्या साथीदाराच्या हातीं असलेलं रॉकेलचं डबडं मधून मधून आपल्या हातीं घेतो आहे. त्यांतलं घेतां येईल तितकं रॉकेल तो चक्क आपल्या तोंडांत भरून घेतो. शांतपणानं तें डबडं साथीदाराच्या हातीं परत देतो. एक क्षणभर मग सगळी मिरवणूक उत्कंठेनं थांबल्यासारखी होते. तेवढ्यांत तो माणूस आपलीं गालफडं फुगवून ओठ घट्ट दाबून धरतो, हातांतला पलिता जरा वर करतो, आणि लहान मुलं तोंडांतल्या पाण्याचा फवारा बारीक तुषारांच्या स्वरूपांत फुर्रर करीत उडवतात, तसा तोंडांतल्या त्या रॉकेलचा फवारा तो त्या पलित्यावरून उडवतो. त्या क्षणीं भप्‌दिशीं आगीचा केवढा तरी प्रचंड लोळच्या लोळ आकाशांत बघतां बघतां उडून जातो! मिरवणुकींतल्या सर्वांच्या चर्यांवर आनंद दिसतो. पोरंटोरं टाळ्या पिटूं लागतात. मिरवणूक पुन्हां पुढं सरकूं लागते...

असल्या प्रकारची विलक्षण आतषबाजी कुणीं कधीं बघितली आहे? नसेल, पण मीं बघितली आहे. एकदां नव्हे, अनेकदां. कित्येकदां. पंढरपूरला. तेथें अशा अजब गोष्टी नेहमींच चालत असतात. कांहीं नित्य, तर कांहीं नैमित्तिक. हें तेथलं वैशिष्ट्यच म्हणायला पाहिजे.

एकदां यात्रेच्या दिवसांत वाळवंटांत असंख्य यात्रेकरू उतरले होते. रात्रीं थोडासा पाऊस आला. याच वेळीं गांवापासून पुष्कळ दूर असल्यानं न दिसणाऱ्या पुलावरून आगगाडी जात होती. आगगाडीचा आवाज ऐकून वाळवंटांत उतरलेल्या लोकांत, नदीला भयंकर लोंढा येत असल्याची हूल उठली. लागलीच लोक सैरावैरा पळूं लागले, कांहीं गाड्या जुंपूं लागले. अर्थातच थोड्याच अवधींत गाडी पूल ओलांडून जातांच सर्वांच्या ध्यानांत खरा प्रकार आला. तेव्हां लागलीच लोक

आपापल्या ठिकाणीं परत आले. पण तेवढ्या अवधींत भुरट्या चोरांनीं गाड्यांतील किती तरी सामान लांबवलं होतं!...

पंढरपूरला वर्षांतून चार वेळां यात्रा भरतात. त्यांतल्या आषाढी-कार्तिकींना सर्वांत अधिक महत्त्व मिळालेलं आहे. त्यांच्या खालोखाल माघी-चैत्रींचा क्रम लागतो. तथापि इतर महिन्यांतल्या एकादश्यांनाहि तुरळक लोक येऊन जात असतातच. यामुळं गांवांतली वस्ती बहुतांशीं यात्रेकरूंवर जगणाऱ्या लोकांचीच आहे. आणि त्यांतूनहि ज्यांची उपजीविका प्रत्यक्ष यात्रेवर अवलंबून नसते, ते यात्रेवर जगणाऱ्यांवरच जगतात. म्हणजे अप्रत्यक्षपणें कां होईना, यात्रा हीच त्यांच्या चरितार्थाचं साधन बनते. नाहीं म्हणायला, आपल्या आयुष्याची संध्याकाळ क्षेत्राच्या पवित्र ठिकाणीं निवांतपणानं भगवच्चिंतनांत घालवावी आणि अखेरीला गंगेकांठीं देहाचं सार्थक व्हावं अशा भाविक विचारानं तेथें राहणारीं कांहीं सुखवस्तु कुटुंबंदेखील आहेत. पण तीं थोडीं.

अर्थशास्त्राच्या दृष्टीनं यात्रेकरूंवर जगणाऱ्या या लोकांच्या जीवनाचा समावेश परपुष्ट बांडगुळी जीवनांत करावा लागेल किंवा कसं याचा विचार करायला हवा. यात्रेला येतात ते लोक भाविकतेनं येतात, पुंडलिकाच्या भक्तीनं पंढरीनाथाच्या पायाशीं येतात. आपल्याकडून कोण, किती पैसे घेतो, कशासाठीं घेतो आणि त्याच्या बदलांत आपल्याला वाजवी मोबदला मिळतो आहे कीं नाहीं, याविषयींच्या विचारानं त्यांचं मन व्यापूं शकत नाहीं. हेंच तेथल्यांच्या उपजीविकेचं भांडवल.

तें कांहीं असो, पंढरपूर हा एक अजब गांव बनला आहे यांत शंका नाहीं. आईच्या भाविक वृत्तीमुळं माझं लहानपण तेथें गेलं. तेथल्या अजबपणाचे किती तरी प्रकार मीं तेव्हां पाहिले, ऐकले. अजूनहि ऐकतों, वाचतों. उदाहरणार्थ, ही हकीकत पाहा :

" गेले दोन दिवस तेथें नेहमींच्या दिवाळीप्रमाणें लोक दिवाळी करीत आहेत. लोक पणत्या लावतात, आकाशदिवे लावतात, फटाके उडवतात, सुवासिक तेलें लावून स्नानें करतात आणि पक्वान्नेंहि करून खातात. या बाबतींत विशेष चौकशीअंतीं पुढीलप्रमाणें हकिकत हातीं आली आहे : चारपांच दिवसांपूर्वी येथील एका माणसाला एक गाय भेटली. त्या गाईच्या कानांत एक पणती होती आणि एका कानांत भलें मोठें कुलूप होतें. असा विचित्र अवतार धारण केलेली ही गाय त्या माणसाला म्हणाली ( या वेळीं गाय बोलली असें सांगतात ) कीं, ' तुम्ही गांवांतील लोक जर दिवाळी साजरी न कराल, तर तुमच्या घराला

कुलपें लागतील, इतकी वाईट स्थिति येईल.' हां हां म्हणतां ही वार्ता सर्वत्र पसरली आणि आतां त्याचा परिणाम म्हणून शहरांत सर्वत्र दिवाळी चालू आहे. शहरांतील कित्येक प्रतिष्ठित व्यापाऱ्यांनींहि दिवाळी साजरी केली आहे. या प्रकाराची गांवांत सर्वत्र चर्चा चालू आहे."

गेल्या युद्धकाळांतील एका पौष महिन्यांतली ही बातमी आहे. ही हास्यास्पद आणि बालिश वाटणारी हकीकत मीं वाचली, तेव्हां मीं मनाशीं म्हटलं, "आहे, पंढरपूर अद्याप आहे तसंच आहे..."

भलत्याच वेळेला साजऱ्या झालेल्या दिवाळीच्या ह्या हकीकतीवरून मला तेथल्या आश्विनांतल्या दिवाळीची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं.

कित्येक वर्षे झालीं, मी पंढरपूरला गेलों नाहीं, त्याचप्रमाणं किती तरी वर्षांत पंढरपूरचं मला कुणी भेटलेलंहि नाहीं. जवळजवळ चारपांच वर्षांखालीं एक जण भेटला होता, त्याला मीं तेथल्या पुष्कळ गोष्टी विचारल्या, त्यांत हेंहि विचारलं, "आतांशा दिवाळीच्या दिवसांमध्यें वाळवंटांतली ती नामांकित लढाई होते का हो?"

त्या वेळीं तो म्हणाला होता, "नाहीं बुवा! वेचाळीसच्या आंदोलनाच्या वेळीं सरकारनं तिच्यावर बंदी घातली होती, तेव्हांपासून बंदच आहे सारा मामला."

हें उत्तर चारपांच वर्षांपूर्वीचं आहे. आपल्या हातीं सत्ता आल्यानंतर तो प्रकार पुन्हा सुरू झाला असला तर मला माहीत नाहीं. मनाशीं मी नेहमीं म्हणतों, "आतां भेटला कुणी तिकडचा तर त्याला एकदां विचारून घेतलं पाहिजे."

ती लढाई बंद झाली असेल तर एका परीनं चांगलंच झालं आहे. खेदाची गोष्ट एवढीच, कीं त्याचं श्रेय भलत्याबुऱ्या मार्गानं कां होईना, परकी सरकारला गेलं. आमचा आम्हींच शहाणपणा धरून तो रानटी प्रकार बंद करायला हवा होता.

पंढरपूरच्या वाळवंटांतली ही लढाई दिवाळीचे तीन दिवस चाले. दररोजा मध्यरात्रीच्या सुमाराला अर्धा-पाऊण तासच फक्त. पण तेवढ्या वेळांत केवढी धमाल उडून जाई!

ही लढाई म्हटलं, ती खरी मोठ्या माणसांची. परंतु दिवाळीच्या आधीं वीस दिवस, म्हणजे दसऱ्यापासून, अनधिकृतपणानं शाळांतल्या आणि शाळांत न जाणाऱ्याहि मुलांमध्यें देखील अशीच लढाई चाले. पण तिचं स्वरूप असे अगदींच सौम्य. शाळा सुटली, कीं मुलं घरांतून आपल्या आईबापांकडून, त्यांनीं हौसेनं नाहीं दिले तर रडून भेकून पैसे मिळवीत, त्यांचीं हिंगणं विकत आणीत आणि

वाळवंटांत जात. तेंथें गटागटांनीं जमून विरुद्ध पक्षाकडे तीं पेटवून सोडीत. हिंगण हें नारळासारख्या टणक कवचीचं, चांगल्या टपोऱ्या काशीबोराएवढं फळ असतं. त्याला दोन छिद्रं असतात. वरचं दाभण शिरूं शकेल एवढं आणि तळचं आपल्या पूर्वीच्या गोल चवलीएवढं असतं. हें फळ पोंखरून त्यांत मागल्या बाजूनं दारू भरीत, आणि मला वाटतं, रांगोळी कालवलेल्या कसल्या तरी घट्ट लुकणानं तें बंद करीत. तें लुकण वाळलं, कीं गच्च बसे. पण क्वचित् प्रसंगीं तें फुटून किंवा सुटून मोठा आवाज होई आणि उडवणारा बेसावध किंवा निष्काळजी असला तर त्याचा हात भाजूनदेखील निघे. त्याला बांधलेल्या लांब काडीमुळं पुण्यामुंबईकडे मिळणाऱ्या कागदी बाणाप्रमाणं तें उडे. (आम्ही अर्थात् बाण हिंगणाप्रमाणं उडतात असं म्हणत आलों आहोंत.) हिंगण पैशाला एक आणि अधिक संख्येनं घेतल्यास स्वस्त मिळतं. परंतु ज्या गरीब मुलांना विकत घेण्याला पैसे मिळत नसत, तीं मुलं पैशाला सहा या भावानं मिळणाऱ्या चिचुंद्या (याला तिकडे कडबोळीं म्हणत) आणीत आणि आपली हौस त्यांवर भागवीत. पण त्यांचा पल्ला पांचदहा पावलांइतकाच असे, तेव्हां लढाईतली त्यांची किंमत, डोळ्यांनीं पाहण्याची गंमत एवढीच काय ती असायची. विरुद्ध पक्षांतले गट त्या मानानं खूपच दूर, म्हणजे शंभरदीडशेंहून अधिक गजांइतक्या अंतरावर असायचे. आणि म्हणूनच हिंगणं तेथपर्यंत जाऊन पोचूं शकत असलीं तरी त्यांनींदेखील कुणालाहि अपाय असा क्वचितच होई.

हा सारा खेळ सूर्य मावळून अंधार पडायच्या सुमारास चाले. आपापली दारू संपली, कीं मुलं घरीं परत जात किंवा पुरेशा सुरक्षित अंतरावर जाऊन, इतर उडवीत असलेल्या हिंगणा-चिचुंद्र्यांची मजा पाहत वाळवंटांत बसून राहत. सुरक्षित म्हणण्याचं कारण असं, कीं कांहीं व्रात्य पोरं गोफणीनं दगडहि भिरकावीत, त्यानं कधीं कधीं एकादा जायबंदीहि होई. पण अशा अपायासंबंधांत कुठं कांहीं तक्रार करायची नाहीं असा एक अलिखित संकेत असे. बहुधा, तक्रार करायची म्हटलं, तरी अंधारांत आलेल्या दगडाबद्दल धरणार कुणाला, या निरुपायामुळंच तो संकेत पडला असला पाहिजे.

तथापि संध्याकाळच्या धूसर प्रकाशांत विस्तीर्ण वाळवंटांतलं हें दृश्य विलक्षण मोह पाडणारं असे. त्याच्याकडे बघितलं कीं वाटे, आपण कुठल्या तरी अफाट आणि अथांग जलाशयाच्या तळाशीं बसलों आहोंत आणि आपल्यासमोर लहान-मोठे, चमकते, लुकलुकते मासे झेंपावत आहेत...

कुंभार घाटावरून जर एकादी काल्पनिक रेषा काढीत गांवांतून वर नेली, तर जे दोन भाग होतील, त्यांतल्या एकामध्यें राहणाऱ्याला म्हणत 'कणगीवाले' आणि दुसऱ्यांतल्यांना म्हणत 'तुरीवाले'. उघडउघड हीं नांवं कलगीवाले व तुरेवाले यांचीं अपभ्रष्ट स्वरूपं होतीं. मराठी राज्याच्या काळांतल्या 'कलगी-तुऱ्यां'च्या चढाओढी बंद पडून गेल्याला किती तरी वर्षं होऊन गेलीं होतीं. आतां त्यामुळं कुणालाच त्यांची माहिती नव्हती. तुरी हें धान्य समजून त्याच्याशीं संबंध असलेला कणगी हा शब्द त्याच्याबरोबर घुसून हीं नांवं लोकांच्या तोंडांत रूढ झालीं होतीं कीं काय कुणास ठाऊक! मला तर कित्येक दिवस या दोन शब्दांचं गूढच वाटे. पुढं जेव्हां एकदां कलगी-तुरा ही जोडी माझ्या प्रथम वाचनांत आली, तेव्हां त्यांचा अर्थ मीं कोशांत शोधला. कलगी हा एक पक्ष आणि तुरा हा दुसरा पक्ष. यांच्या मधल्या चढाओढीला कलगी-तुरा म्हणतात, त्याचप्रमाणं हे दोन्ही लावण्यांचे प्रकारहि असून त्यांचं स्वरूप सवाल-जबाबाचं असतं, ही माहिती मला मिळाली आणि सारा उलगडा झाला.

लावण्या-तमाशांचा शोक ज्या वर्गांतल्या लोकांना असतो, त्याच वर्गांतले लोक आपल्याला कणगीवाले आणि तुरीवाले म्हणून घेत. ही त्यांची जाणीव मात्र वर्षांतून ठराविक वेळेलाच प्रखरपणानं जागी होत असे. शिमग्यांतल्या पांच दिवसांमध्यें पंढरपूरला जो अर्वाच्यपणा आणि उखाणेबाजी चाले त्यांचा रोख नेहमीं याच प्रकारच्या विरुद्धपक्षीयांवर असे. धुळवडीच्या दिवशीं तर स्वच्छ कपडे घालून रस्त्यांतून वावरण्याची कुणाला हिंमत होत नसे. कारण, पांच-दहापासून तें पंचवीस-पन्नासच्या संख्यांच्या गटागटांनीं, सर्व वयांतले लोक, गांवांतल्या प्रमुख वस्त्यांतून, रस्त्यांतून आणि गल्लीबोळांतूनसुद्धां वाटेंतल्या उघड्या गटारांतली चक्क राड एकमेकांच्या आणि येणारांजाणारांच्याहि अंगावरून उडवीत फिरत. फिरतां फिरतां कणगीवाल्यांच्या टापूंत तुरीवाल्यांच्या नांवानं आणि तिकडेहि तसाच यांच्या नांवानं सांधिकपणें शिवराळ घोष चाले. ज्यांना तो ऐकवे ते ऐकत; इतर लोक खिडक्या बंद करून घेत. भाग न घेणारे बहुधा उदासीनच असायचे. रीतच आहे, प्रथातच आहे, शिमगा म्हणजे असाच असायचा, हीच त्यांची भावना असायची. सामाजिक बंधनांनीं आणि इतर परिस्थितीमुळं जखडलेल्या साऱ्या मनोवृत्ति आणि मनोव्यथा त्या दिवसांत स्वैर सुटत आणि शिष्टाचाराचीं सारीं कवचं फुटून त्यांचा उद्रेक हा असा तोंडावाटे बाहेर पडे. पांचहि दिवसांत (आणि नंतरहि बरेच दिवस) वेचक शब्दांचे ओबडधोबड शिक्के, गेरूच्या रंगांत पाठीच्या व छातीच्या

अंगाला मारलेले सदरे, अंगरखे अंगावर बेधडक घालून लोक रस्त्यांतून हिंडतांना आढळत. कुणालाच त्याचं कांहीं वाटत नसे. बोलून चालून शिमगाच, त्यांतून नवीन आणि स्वच्छ कपडे आणायचे कुठून ? आणि आणले तरी ते तसे राहतील याची काय शाश्वति ? शिमगा गेला तरी त्यांतलं कवित्व मागं राहतं असं म्हणतात. पंढरपूरला तें कवित्व, श्राव्य स्वरूपांतल्याप्रमाणंच दृश्य स्वरूपांतहि मागं राही...जीवनांतल्या किती तरी रहस्यांचा परिचय मला फार लहानपणीं, नको त्या वेळीं, कणगीवाले आणि तुरीवाले यांच्या स्पर्धेतून निर्माण होणाऱ्या या फाल्गुनी साहित्यानं करून दिला. तेथल्या सगळ्याच मुलांचं असं होत असलं पाहिजे. ऐकत होतों त्या गोष्टी खऱ्या मानायला मात्र मनाची तयारी त्या वेळीं होत नसे...

हें झालं शिमग्याचं. आणि दिवाळीच्या दिवसांत मोठ्या माणसांची जी लढाई चाले म्हणून मी म्हटलं, तीदेखील याच कणगीवाले आणि तुरीवाले या प्रतिपक्षांत.

पंढरपूर हा गांव नदीच्या फक्त एकाच अंगाला वसलेला आहे. नदीचं पात्र गांवाच्या समोरील, पलीकडच्या डगरीला घासून वाहतं, त्यामुळं गांव आणि पात्र यांच्यामध्यें खूपच विस्तीर्ण वाळवंट तयार झालं आहे. आणखी तें सपाट पण आहे. अर्थातच पावसाळ्यांत भीमा तुडुंब भरून दुथडी वाहते तेवढा अवधि सोडला तर बाकीच्या दिवसांत साऱ्या घाटांना वाळवंटांत उतरण्याचे ऐसपैस जिने यावांचून कांहीं अर्थ उरत नाहीं. गांवाची ही अशी आडवी वस्ती जेथें विरळ होत जाते, तेथून समोरचं पात्र अलीकडे येत येत अगदीं गांव संपतां संपतां इकडच्या डगरीला घासून वाहूं लागतं, त्यामुळं सगळ्या गांवापुढचं वाळवंट अगदीं सलग राहिलं आहे आणि एकंदर नदीला हा असा चंद्रकोरीसारखा आकार आल्यानं पंढरीच्या भीमेला चंद्रभागा नांव मिळालं आहे.

याच वाळवंटांत मोठ्या माणसांची लढाई चाले. ती चाले तीनच दिवस, पण त्यांच्या आधीं कित्येक दिवसांपासून तिची तयारी चालू असे. त्या त्या भागांतल्या दानशूर धनिकांकडून देणग्या मिळत. त्या पैशांच्या स्वरूपांत असत किंवा अमक्याअमक्यानं इतके मण दारू दिली अशीहि भाषा कानांवर येई. आम्ही त्या सुमारास दारू तयार करणाऱ्यांच्या घरांवरून जात असूं, तेव्हां दारा-बाहेर बायका एक पाय पसरून नारळ आणि कवठं, पिचूं नयेत म्हणून हलक्या हातांनीं, पोंखरीत बसलेल्या, आढळायच्या आणि रस्त्याच्या कडेला उघड्यावर गोणपाटांवरून 'सोरा' वाळवायला ठेवलेला दिसायचा. लढाईमध्यें हेच नारळ

आणि हींच कवठं उडून लोकांचीं अंगं भाजून निघायचीं असत. नारळ हा अखेर-पर्यंत वांकडातिकडा गरगरतो आणि जेथें पडेल तेथून वाटेल त्या दिशेला थुरथुर, थुरथुर करीत जातो. उलट कवठाचा धर्म, कांहीं अडथळा न आल्यास, एकाच दिशेनं सरळ जाण्याचा असतो. दोन्ही वस्तूंना मुद्दामच काड्या बांधलेल्या नसतात. त्यांचे आकार घसघशीत मोठे, त्यामुळं दोन्ही भरपूर वेळ जळतात. ज्यानं कुणी या वस्तूंत दारू भरून उडवण्याची कल्पना काढली असेल तो चांगलाच डोकेबाज असला पाहिजे.

शिमग्यांतल्या अर्वाच्यपणाकडे त्यांत भाग न घेणारे भद्र लोक उदासीनतेनं पाहत असतील, पण दिवाळींतली ही लढाई मात्र मोठ्या हौसेनं आणि औत्सुक्यानं पाहण्याचा प्रघात असे. किती तरी लोक, आजूबाजूच्या किती तरी ठिकाणांहून मुद्दाम तेवढ्यासाठीं येत. खेडूत येत, शहरी येत, श्रीमंत येत, गरीब येत, सोलापुरा-हून कलेक्टरदेखील येई. दोन्ही पक्षांच्या मागच्या बाजूंना खूप अंतर ठेवून कुणी वाळवंटांतच बसून पाहत, कुणी वाळवंटाच्या कांठावरील वाड्यांच्या सज्जांवरून, माळवदांवरून पाहत. श्रीमंत लोक तर पाहतां पाहतां हौसहि भागवून घेत. हा हौसेचा प्रकार म्हणजे, एकादी होडी भाड्यानं ठरवून तीमध्यें आपल्या बायका-मुलांसह बसून नदीच्या पात्रांतून ही आतषबाजी पाहायची. सारेच जण सुरक्षित अंतरावर असायचे. लढणारे आपापसांत भाजून घेत. इतरांना कुणाला एवढीशी-सुद्धां झळ लागण्याचा संभव नसायचा.

दिवाळींतला हा आगीनं भाजून घेण्याचा खेळ जिला नापसंत असे अशी एक व्यक्ति गांवांत होती. ती म्हणजे नगरपालिकेच्या इस्पितळावरचे प्रमुख डॉक्टर. लढाईच्या दुसऱ्या दिवसापासून भाजलेलीं माणसं मोठ्या संख्येनं येऊन त्यांचं काम वाढे म्हणून मात्र नव्हे. तशी शंकादेखील कुणाच्या मनांत येणं अशक्य होतं. पण भाजलेलीं, पोळलेलीं, जायबंदी झालेलीं तीं गरीब माणसं त्यांनीं बघितलीं कीं त्यांचं काळीज तुटे, आयुष्यांतले इतर भोग अपुरे पडले आहेत म्हणून हीं माणसं असला हा अघोरी खेळ खेळतात कीं काय असा उद्वेगाचा विचार त्यांच्या मनांत येई, आणि ज्याच्या ओठांत आणि पोटांतसुद्धां सतत मधाचे कुंभ भरलेले असत, असा हा देवमाणूस भडकून उठायचा आणि त्याच्या तोंडून अतिशय कडू जहर बाहेर यायचं. फक्त तोंडावाटेच मात्र. कारण त्यांची तो सर्वतोपरी काळजी घेई, आणि मलमपट्ट्या चालू असतांना, हा राक्षसी खेळ खेळत जाऊं नका असा उपदेश करी. पण तो सारा पालथ्या घागरीवरचं पाणी ठरे....

मीं हा विलक्षण खेळ फक्त एकदांच पाहिला आहे. पण तेवढ्यानंच मला जन्माची आठवण राहिली आहे. लहान होतों, तेव्हां मला कुणी जाऊं दिलं नाहीं. थोडा मोठा झाल्यावर एकदोन वेळां वाळवंटांत जाऊन बसलों, पण वाट पाहून पाहून थकलों, कंटाळलों, आणि झोप फारच यायला लागली, तशीं "बघूं पुढं केव्हां तरी! इथंच तर आहोंत!" म्हणत परतलों. प्रत्यक्ष गांवांत राहणाऱ्यांना तेथील वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची अपूर्वाई फारशी नसतेच. पण एका वर्षी मात्र मी कटाक्षानं जागत राहिलों, कंटाळा आला तरी तिष्ठत राहिलों, झोप यायला लागली तरी तसाच पेंगत, झोकांड्या खात वाळवंटांत बसलेला होतों. पलीकडे मधून मधून हिंगणं उडत उडत आकाशांत विझत त्यांकडे, त्याचप्रमाणं अधून मधून दुसरी कसली तरी नवीन लहान वस्तु फरफरत वर जात विझे,—कुणी तरी मला सांगितलं, आतांशा गजगे दारू भरून उडवतात ते आहेत हे,—त्यांकडेहि पाहत राहिलों. वाळवंटांत लढाई पाहण्याकरितां आलेल्या प्रेक्षकांचं प्रतीक्षाकाळांतलं हें मनोरंजन होतं. माझी दारू मीं संध्याकाळींच संपवली होती...

असा किती तरी वेळ निघून गेला आणि मग एकाएकीं दत्तघाट आणि कुंभारघाट यांच्या दरम्यान आगीचा आडवा डोंब उसळला. त्याचबरोबर प्रचंड आरोळ्या उठूं लागल्या, 'केरवा' तालांतला लयबद्ध आवाज करीत मोठमोठाले डफ भराभरा तडतडूं लागले, आणि त्या आवाजांतच, वाफेच्या हजारों यंत्रांची वाफ सोडल्यानंतर व्हावा तसा पेटलेल्या नारळांकवठांचा आवाज व वारंवार त्यांचे स्फोटहि होत होते त्यांचाहि आवाज मिसळूं लागला. आगीचा डोंब असं आत्तां म्हटलं खरं, पण डोंब या शब्दानं आपल्यापुढं पेट्रोलची भडकलेली टाकी किंवा एकादा पेटलेला मोठा वाडा उभा राहतो आणि त्याच्या लळलळणाऱ्या मोठ्या ज्वाला खूप उंच उंच जातांना मनश्चक्षूंना दिसूं लागतात. पण इथलं सारंच कांहीं न्यारं होतं. इथं वर जाणाऱ्या ज्वाळा नव्हत्या, तर—कसं सांगूं?—अमावास्येच्या अजस्र अंधारापुढं दोन-अडीच पुरुष उंचीची, आगीची कुंपणवजा भिंत उभी करावी तसला हा विलक्षण प्रकार होता! आणि ही भिंतदेखील इतकी दाट कीं तिला एवढी म्हटल्या एवढीसुद्धां फट नव्हती. हें सारं प्रकरण कल्पनेंतल्यापेक्षां इतकं वेगळं होतं, आणि सुरू झालं तेंहि इतकं अचानक, कीं माझ्या छातींत एकदम धस्स झालं. मी स्तिमित होऊन सारं बघत राहिलों. हा जाळ निर्माण करणारीं माणसं कुठं होतीं? त्या भिंतीच्या अलीकडे वावरत होतीं कीं पलीकडे, या आगीच्या भिंती दोन होत्या, कीं दोन्ही पक्ष एकमेकांना

भिडून सळा अशी एकच तयार झाली होती, कशाचा कांहींच पत्ता लागत नव्हता. बसलेल्या ठिकाणाहून आम्हांला तो लागणं शक्यच नव्हतं. इतर ठिकाणीं बसलेल्यांनादेखील तो लागला असेल काय त्याचीहि कल्पना होत नव्हती. विमानांतून बरीक सारं दिसलं असतं. पण हें आज म्हणतों आहें. त्या दिवसांत युरोप-अमेरिकेंतल्या विमानांचे फोटोच काय ते वृत्तपत्रांतून आढळत. मी तर वाळवंटांत होतों आणि नेहमींच्या रिवाजाप्रमाणं लढाईतल्या माणसांना प्रसंगीं माघार घेण्यासाठीं भरपूर जागा ठेवून वाळवंटांतल्यांना मागं बसावं लागे...इकडे आरोळ्या, डफ आणि स्फोट चालूच होते. मध्येंच एक कवठ त्या जाळांतून सुटलं आणि निखळलेल्या उल्केसारखं तिरकस रेषेंत सरळ जात जात विझलं. आज जवळ जवळ पंचवीस वर्षे त्या गोष्टीला होऊन गेलीं आहेत, तरी अंधाऱ्या आकाशावर पाजळलेल्या वस्तऱ्याचं पातं सपकन् ओढून चीर काढावी तसा त्या कवठानं आक्रमलेला मार्ग मनश्चक्षूंपुढं मला स्पष्ट दिसतो...सारं बघतां बघतां माझं वेळेचं भान नाहींसं झालं···आणि मग एकाद्या राक्षसानं आपला वासलेला अक्राळविक्राळ जबडा गपकन् मिटून घ्यावा त्याप्रमाणं तो जाळ, आणि रंगभूमी-वरचं पद संपल्याबरोबर सारीं वाद्यं एकसाथ बंद व्हावींत त्याप्रमाणं ते आवाज अवचित बंद झाले. एका क्षणांत सारी सृष्टि पुन्हा अंधारांत लुप्त झाली. प्रेक्षक घरोघर परतूं लागले...

या लढाईत भाग घेणारीं माणसं किती होतीं? माझ्या ओळखीचीं कांहीं माहितगार मुलं होतीं, मोठीं माणसंहि होतीं, त्यांना मी प्रश्न विचारायचा, तेव्हां ते म्हणायचे, कुणास ठाऊक! तथापि त्यांना माणसांची संख्या ठाऊक नसली, तरी इतर पुष्कळ तपशील ठाऊक होते. ते म्हणत, या लढाईत केवळ दारू उडवणारेच भाग घेतात अशी कुणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कारण, जेवढे लोक प्रत्यक्ष दारू उडविणारे असतात, त्यांतल्या प्रत्येकाला निदान आठदहा साथीदार असतात. उडवणारा ताडी पिऊन तर्र झालेला असतो, (त्याशिवाय त्याला हें काम जमण्यासारखं नसतं) त्याच्या कमरेला साखळदंड असून त्याच्या साहाय्यानं त्याला आवरून धरणारे दोघे असतात. दुसऱ्या दोघांकडे शिपतरं हातांत धरून, समोरून येणाऱ्या नारळा-कवठांना तीं ढालींप्रमाणं पुढं करून अडवण्याचं काम असतं, तर आणखी दोघांच्या हातांत सोटे असतात. त्यांनीं ते या खालीं पडलेल्या नारळांकवठांवर तत्काळ घाव घालून त्यांना निकामी करण्याचं काम करतात. बाकीचे गाढवावर लादलेली दारू उडवणाऱ्याच्या हातीं

भराभर पोंचर्ती करतात. पूर्वी म्हणे साखळदंड नसत. पण एके वर्षी एक माणूस दारू उडवण्याच्या जोसांत जो पुढं पुढं गेला, तो विरुद्ध पक्षाच्या फळींत घुसला, तेथें त्याला तेथल्या कांहीं जणांनीं बाजूला नेऊन त्याच्यापुढं पेटतं कवट धरलं आणि तें वरखालीं करीत त्याला सरळ उभा भाजून मारला, तेव्हांपासून साखळदंड आले....

याच माहितगारांकडून कांहीं पट्टीच्या दारू उडवणाऱ्यांच्या कौशल्याच्याहि हकिकती मला समजल्या. उदाहरणार्थ : एका जगाला कांकडाच लागत नसे ! तो प्रथम एक कवट किंवा नारळ पेटवून घेई, मग त्यावरनं दुसरं पेटवून पहिलं फेकी, दुसऱ्यावरून तिसरं पेटवी व दुसरं फेकी...असं हें शेवटपर्यंत चाले. आणखी दुसऱ्या एकाचा खाक्या तर 'उससे भी ज्यादा' होता ! सुरुवातीलाच तो दोन्ही दंडांना कांकडे बांधून घेई आणि डाव्या हातांतलं कवट किंवा नारळ उजव्या दंडाच्या कांकड्यावरून व उजव्या हातांतलं डाव्या दंडावरून पेटवून सारखा दोन्ही हातांनीं काम चालू ठेवी.

हें सारं मी ऐकत होतों, तें इतकं विलक्षण आणि अचाट होतं, कीं त्यांतलं केवढं खरं मानावं नि केवढं मानूं नये तेंच कळेनासं होई. परंतु मी त्या दिवशीं त्या जाळाची ती भयानक भिंत तर प्रत्यक्षच बघितली होती आणि तीहि इतकी विलक्षण आणि अचाट होती, कीं वाटे, असले जाळ असल्या माणसांखेरीज कुणाला निर्माण करतां येणं कठीण आहे.

मला आठवतं, लहानपणीं निबंधाच्या वहींत, दिवाळींतल्या या लढाईचा उपयोग लोकांच्या ठिकाणीं साहसवृत्ति वाढण्याकडे होतो, अशा आशयाचा मजकूर मीं कुठं तरी लिहिला होता. आज मला त्या लढाईची आठवण होते, तेव्हां वाटतं, यांत साहसवृत्ति असेल, पण ती सारी भलत्याच ठिकाणीं आणि अनाठायीं खर्च होत होती. आणि मग असंहि वाटूं लागतं, भारतांतल्या किती तरी लोकांच्या किती तरी चांगल्या वृत्ति अनाठायीं खर्च होत होत्या, अद्यापहि होत आहेत, त्यांतलीच हीहि एक. तथापि माझ्या मनांतल्या गाभ्यांत एक आशा तग धरून आहे. हें असं फार दिवस नाहीं चालायचं, चालणं शक्य नाहीं. आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं परवां, कधीं तरी कां होईना, इस्पितळांतल्या त्या देवमाणसाच्या विचारांना आणि भारतांतल्या त्याच्यासारख्या इतरहि देवमाणसांच्या विचारांना फळ आल्याशिवाय राहणार नाहीं, आणि पंढरपूरसारख्या गांवांच्या ठिकाणचा विचित्र अजबपणा नाहींसा होईल. तसं व्हावं अशी माझी इच्छा आहे.

कारण, पंढरपूर गांवावर, तेथल्या स्थळांवर, तेथल्या नदीवर, तेथें मला आढळलेल्या कित्येक त्यागी लोकांवर, यजमानकृत्यांवर उपजीविका करूनहि निर्लोभी वृत्ति ठेवणाऱ्या कित्येक व्यक्तींवर माझं नितांत प्रेम आहे. आणि माझं लहानपण तेथें गेलं आहे...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 23030 वि: 92:44K
क्रमांक 239 नों: दि: 29/3/51

# धन्य कारवार

"काका कालेलकरांचं लिखाण इतकं चांगलं असेल ही कल्पना आपल्याला कधींच कशी आली नाहीं? आणि आपल्याला कधींच कुणीं कसं सांगितलं नाहीं काकांच्याविषयीं?"—हे उद्गार ज्या वेळीं मीं मनाशीं काढले ती वेळ मला चांगली आठवते. काकांचं मीं आधीं कांहींच वाचलं नव्हतं. पण मग आमच्या शेजारच्यांनीं आपल्या मुलासाठीं आणलेली काकांची 'स्मरणयात्रा' माझ्या हातांत एके दिवशीं पडली. त्यांतला कांहीं भाग मीं सहज वाचूं लागलों आणि अनपेक्षितपणें एकाद्या विलक्षण रम्य बगीचांत शिरल्यासारखं मला वाटलं. काकांच्या खेळकरपणानं, दिलखुलास प्रांजळपणानं आणि ओघवती शैलीनं मी कमालीचा मुग्ध होऊन गेलों आणि तें पुस्तक सुरुवातीपासून वाचायला लागलों. आतां मी त्यांत इतका गुंगून गेलों, कीं पृष्ठांच्या वरचे आंकडे जसजसे मोठे होत गेले तसतसं हें पुस्तक लवकर संपणार याचंच मला दुःख होऊं लागलं, आणखी केवळ दोनच दिवसांच्या मोकळ्या वेळांत ज्या पुस्तकाचा सहज फडशा पाडतां आला असता तें मीं चांगलं आठ दिवस गोड घासासारखं पुरवून पुरवून वाचलं.

स्मरणयात्रेच्या या वाचनाचे अनेक परिणाम झाले. माझ्या खाजगी पुस्तकांच्या संग्रहासाठीं तें पुस्तक मीं विकत आणलं, (अत्यंत महागरा म्हणून गाजलेल्या प्रकाशकाला वेसण घालून किंमत अगदीं माफक ठेवायला लावण्याचा पराक्रम काकांनाच केवळ जमण्यासारखा आहे!) काकांचीं आणखीहि कित्येक पुस्तकं मीं वाचलीं, आणखी तिसरी गोष्ट म्हणजे कारवारविषयीं माझ्या मनांत विलक्षण कुतूहल निर्माण झालं—मनाशीं मीं ठरवूनसुद्धां टाकलं, "कारवारला आतां केव्हां तरी जायलाच पाहिजे!"

कारवार हें नांव प्रथम मीं केव्हां ऐकलं तें मला आज आठवत नाहीं. पण हें मात्र चांगलं आठवतं आहे कीं, कारवारला कांहीं दिवस राहिलेल्या माझ्या एका मित्रानं मागं एकदां आपल्या लहानपणींच्या कांहीं आठवणी सांगितल्या होत्या, गांवाचं थोडं वर्णनहि केलं होतं आणि मला विचारलं होतं, "कारवार हें नांव कसं वाटतं तुला?"

मीं म्हटलं होतं, "आहे! झकास आहे! तें उच्चारतांना तर नुकत्याच फोडलेल्या नारळांतलं, ताज्या दुधासारखं पांढरंशुभ्र खोबरं शिवशिवलेल्या दांतांनीं खात असल्यासारखं वाटतं!..."

कारवारला साहित्यसंमेलन भरणार हें समजल्यावर माझ्या मनांत कारवार-संबंधांतल्या या साऱ्या गोष्टी आल्या आणि मला निर्णय घ्यायला 'हूं' म्हणण्या-इतकासुद्धां वेळ लागला नाहीं.

निर्णय घेतल्यापासून मनाशीं मी सारखं घोकीत होतों, कारवारच्या प्रवासाची 'वासरिका' (हा काकांचा मला आवडलेला शब्द आहे). लिहायची. पण तेथें गेल्यावर तेथल्या सौंदर्याच्या झोतांत मी इतका वाहून गेलों, कीं ती लिहिणं कांहीं माझ्या हातून झालं नाहीं. सौंदर्याच्या सान्निध्यांत असतांना त्याला शब्दस्वरूपांत, कशाला, कुठल्याहि स्वरूपांत स्थानबद्ध करणं मोठं कठीण असतं. अपुरेपणाची जाणीव सतत होत राहते. माझे एक चित्रकार मित्र आहेत, तें नेहमीं म्हणतात, एकाद्या सुंदर दृश्याचं चित्र कितीहि चांगलं रंगवलं, तरी तें स्थान सोडून गेल्याखेरीज तें चांगलं दिसूं शकत नाहीं.

तथापि मीं जर 'वासरिका' लिहिली असती तर तिच्यांतला मजकूर मात्र याच्याहून कांहीं निराळा झाला नसता.

३ मे, १९५१

साहित्य-संमेलन! मी साहित्य-संमेलनाला चाललों आहें! माझं मलाच या शब्दांचं हसूं येतं!

कसले साहित्यिक आणि कसलं साहित्यसंमेलन! मराठीविषयीं मला आपुलकी वाटते खूप; ती सर्व दृष्टींनीं संपन्न व्हावी असंहि मला मनापासून वाटतं, तरी पण साहित्य-संमेलनाविषयीं मला कधींच जिव्हाळा वाटलेला नाहीं, कीं नाहीं कधीं वाटली आत्मीयता. अद्यापहि वाटत नाहीं. आजपर्यंत मीं या संमेलनांत कधीं भाग घेतला नाहीं. त्यासाठीं उठून परगांवीं जाणं सोडाच, पण प्रत्यक्ष पुण्याला संमेलन भरणार होतं, तेव्हां नुसता एक उत्सव म्हणून कां होईना, मला तें पाहायला मिळणार होतं, परंतु त्याच सुमारास हिमालयांत जाण्याची संधि आली, तेव्हां निश्चय करण्याच्या वेळीं माझ्या मनाच्या ताजव्याला थोडेसुद्धां हेलकावे बसले नव्हते!

तरीदेखील मी आज साहित्यसंमेलनाला निघालों आहें. उघड उघड हा अप्रामाणिकपणा आहे. केवळ त्याच्या निमित्तानं एका रम्य ठिकाणीं राहण्याची चांगली सोय होत असल्याचं मला दिसतं आहे. तेव्हां मी तिचा फायदा घेतों आहें. कारवारसाठीं हा मुर्दाडपणा करण्यांत मला कांहींच वाटत नाहीं.

गाडींत गर्दी भरमसाट आहे. तरी आम्ही गाडी निघण्याच्या ठिकाणीं बसलों आहोंत. प्रारंभींच्या भाऊगर्दींत अंग झोकून दिलं आणि कुठं तरी उभा राहिलों, तेव्हां उतारूंचं एकावर एक रचलेलं जें सामान पुढंमागं झालं होतं तें इकडून नि तिकडून रेटत असल्यानं शरिराला देवनागरी 'ई'चा आकार आला. थोड्या वेळानं स्थिरस्थावर झालं तेव्हां त्याचं रूपांतर 'र'मध्यें झालं. अखेरपर्यंत सगळीं अक्षरं अशींच येऊन गेलीं, तर शेवटीं शरीर एखाद्या सरकारी अधिकाऱ्याच्या सहीसारखं होऊन कां होईना, शिल्लक तरी राहतं आहे कीं नाहीं याची भीति वाटते आहे! पण कारवारकरितां (आणि नंतरच्या गोमंतकाकरितां) जिथं मनाच्या पराणीला मीं दाद दिली नाहीं, तिथं शरिराची काय कथा!

बायको म्हणते, "आगगाडीचा हा सासुरवास संपणार तरी कधीं?"

मी उत्तर देतों, "सासुरवास हा शब्द भारतांत जेव्हां केव्हां इतिहासांत जमा होऊन जाईल तेव्हां!"

ती कांहीं वेळ माझ्याकडे टक लावून पाहते आणि मग कांहीं न बोलतां, बरोबर आणलेला मासिकाचा नवा अंक उघडून वाचूं लागते.

४ मे, १९५१

सुमारें वीस तास आगगाडीशीं झटापट केल्यानंतर हुबळीला आम्हीं तिला सोडून दिलं आहे. वेळ सकाळची आहे. मोटारतळावर चौकशी करतां आम्हांला समजतं कीं सकाळची पहिली मोटार केव्हांच निघून गेली, आणि दुसरी टपाली मोटार आतां सुटण्याच्या बेतांत आहे, पण तिच्यांत एकहि जागा शिल्लक नाहीं. दुपारची अडीच वाजतांची मोटार घेण्याशिवाय आम्हांला आतां उपाय नाहीं. तिच्यासाठीं नांवं नोंदवतांना कारवारला आम्ही रात्रीं साडेआठपर्यंत पोंचूं असं कळतं. म्हणजे संमेलनांतला अध्यक्षीय भाषणाचा कार्यक्रम हुकणार आहे. पण मी म्हणतों, "अरेरे! समुद्रतीरावरची संध्याकाळ आणि सूर्यास्त बुडणार!"

मोटारतळासमोरच्या एका पथिकाश्रमांत जागा घेऊन आम्ही थोडी विश्रांति

घेतल्यानंतर सामान सोडूं लागतां, तेवढ्यांत निरोप येतो, "नऊ वाजतां जादा मोटार सुटायची आहे, लवकर बोलावलं आहे, चला." अचानक भाग्य उजळल्यानं आम्ही आनंदित झालों आहोंत.

हुबळी सुटल्यापासूनच कारवारचीं प्रसादचिन्हं दिसूं लागतात. उंच उंच सागांच्या अरण्यांतून रस्ता जातो, त्यावर डोळ्यांना सुखवणारी लाल माती आहे. वारंवार हिरव्यागार आणि डेरेदार वृक्षांच्या झुपक्यांतून वसलेलीं छोटीं छोटीं गांवं लागतात. अंकोल्याला आम्ही पोंचतों तेव्हां कारवार पाहण्याची उत्कंठा शिगेला पोंचते.

अंकोल्याला मोटार बदलून कारवारला आम्ही पोंचतों तेव्हां साडेतीन वाजलेले आहेत. संमेलनकचेरींत पैसे भरून आम्ही बिऱ्हाडजागीं येतों. प्रवासानं शरीर घाण झालं आहे आणि शीण पण बराच आला आहे. गार पाण्यानं स्नान करून आम्ही तो घालवतों आणि ताजेतवाने होऊन संमेलनाच्या मंडपांत पोंचतों. पांच वाजले आहेत. उघड्या मांडवांत प्रकाश भरपूर आहे, हवा भरपूर आहे आणि वातावरणहि प्रसन्न आहे. स्वागताध्यक्षांचं भाषण चाललेलं आहे.

लोक येताहेत, बसताहेत, उठताहेत, बाहेरहि जात आहेत. भाषणांच्या पुस्तिकांची विक्री पण त्यांतच चालू आहे. गळ्यांत कॅमेरा अडकवलेले कांहीं जण हवेप्रमाणं सर्वत्र संचार करीत फिरताहेत. जे बसलेले आहेत, ते सर्व प्रेक्षागारावर दृष्टि फिरवीत कोण कोण आले आहेत तें पाहतात, ओळखीचं कुणी दिसल्यास परस्परांत हात वर होतात. कित्येक ठिकाणीं दबल्या आवाजांत आपापसांत बातचीत चाललेली दिसते :

"बोटीचा प्रवास कसा काय झाला?"

"काय सांगूं! बोट आली चारला, पण धक्क्यावर पाऊल टाकलं तेव्हां आठ वाजून गेले होते—"

"...परिषदेच्या मंडळीबरोबर आलांत, तेव्हां सारी सोय अगदीं राजेशाही झाली असली पाहिजे..."

"हुबळीमार्गानं म्हणजे महाराष्ट्रांतून कर्नाटकांत आणि कर्नाटकांतून परत महाराष्ट्रांत, म्हणजे 'द्राविडी प्राणायाम'च नाहीं का?..."

"... ह्यः ह्यः ह्यः ह्यः! खी खी खी खी!..."

स्वागताध्यक्ष आपले बोलतच आहेत.

वर आकाश मोकळं आहे. सूर्य झाडांच्या आड गेला आहे. व्यासपीठावर

अंधार पडूं लागला, दिवे लागले, मावळत्या अध्यक्षांचं भाषण सुरू झालं आणि बसल्या जागेवरून न दिसणाऱ्या समुद्रांत मावळण्याच्या तयारीला लागलेल्या सूर्याला पाहण्याची ओढ माझ्या मनाला लागली आहे.

"समुद्रावर फिरायला जायचं का?"

हें विचारण्याचाच काय तो अवकाश होता. मीं लगलीच म्हटलं, "चला! जाऊं या!"

याच्यापुढं अध्यक्षांचं भाषण व्हायचं आहे. नाहीं तरी आपलं भाषण ते वाचणारच आहेत. त्यांच्या पांडित्याबद्दल मला आदर वाटतो. तरी पण मनाशीं मी म्हणतों, "आपणहि वाचून काढूं!"

मला इथं ओळखणारं कुणी नाहीं. त्यामुळं लाजेकाजेस्तवदेखील लपतछपत किंवा अंग मोडून निसटण्याची मला जरूरी पडत नाहीं.

चिमुकल्या कारवारच्या स्वच्छ रस्त्यांतून पश्चिमेकडे जात समुद्राजवळच त्याच्या तीराला समांतर असलेल्या रस्त्यावर आम्ही येतों. रस्ता कसा स्वच्छ, सरळ आणि नितळ आहे. त्याच्या दोन्ही अंगांना उंच आणि भव्य सुरूचीं झाडं हारीनं उभीं आहेत. दुपारीं अंकोल्याहून येत असतांना मोटारींतल्या एकाला मीं सहज विचारलं होतं, "या झाडांना इकडे काय म्हणतात?" तो म्हणाला होता, "वाऱ्याचीं झाडं." मला हें नांव फार फार समर्पक वाटलं. वाऱ्याला बोलका करणारीं हीं झाडं मला अतिशय प्रिय आहेत. त्यांचा आवाज मीं पांचगणीला प्रथम ऐकला होता. पण इथं तीं अधिक विपुल आहेत, आणि समुद्राच्या कांठीं आहेत, त्यामुळं सोन्याला सुगंध सुटल्यासारखं वाटतं—असं वर्णन केलं तरी ह्या झाडांचीं पुरेशी कदर होईल असं वाटत नाहीं. दुपारीं या झाडांच्याकडे मीं बघितलं तेव्हां ऊन होतं. त्या वेळीं वाटलं होतं, या झाडांचा हा असा राखेच्या पाण्यांत कालवल्यासारखा गढूळ हिरवट रंग नसता तर काय बहार झाली असती! एवढंच नव्हे, तर अशोक, सोनचांफा किंवा ग्रीष्मकाळांत नुकताच पालवलेला पिंपळ यांच्यासारखा रसरशीत हिरवा रंग या झाडांचा असता तर ही राई कशी दिसली असती तेंदेखील मी मनश्चक्षूंपुढं चितारीत राहिलों होतों. पण आतां संध्याकाळ झाली आहे आणि त्यांचा रंग एकंदर वातावरणाला साजेसाच वाटतो आहे.

समुद्रकांठीं तुरळक, अगदीं तुरळकच माणसं आहेत. मालवणला मागं एकदां मी गेलों होतों, तेव्हां मीं बघितलं होतं, समुद्रतीरावर कोणत्याहि वेळीं गेलं तरी जिकडेतिकडे वर्दळ असायची. कांठावरच्या वाळूंत किती तरी छोटीं-मोठीं

गलबतं असायचीं. होड्या, मचवे, पडाव, एका अंगाला ‘ उलांडी ’ बांधलेले ‘ डुबके ’ असायचे. त्यांतले कांहीं अगदीं पाण्याच्या कांठाशीं वाळूंत ओढून आणून ठेवलेले असायचे, तर कांहीं वरच्या बाजूला उपडे घातलेले असायचे. झालंच तर, पाण्यामध्यें पण पुष्कळ असायचे आणि त्यांच्या डोलकाठ्या, त्यांना बांधलेलीं शिडं, कांहीं उघडलेलीं तर कांहीं गुंडाळून बांधून ठेवलेलीं, सारीं लाटांवर हेलकावे खात असायचीं. फत्तेमाऱ्या, कोळी, जाळीं, मासे, ‘ खारटाणी ’चा वास—गलबतांतून सामान चढत, उतरत असायचं, एकादं विशेष श्रमाचं काम चालू असे तेव्हां एकदम जोर लावण्याच्या क्षणीं सर्वांनीं एकसाथ काढलेले विशिष्ट आवाज लयींत ऐकूं यायचे. इथं तसलं कांहींच कसं नाहीं याचं मला नवल वाटतं आहे. सगळीकडे कसं अगदीं शिवालयांतल्यासारखं शांत आहे.

डाव्या अंगाला डोंगराच्या कुशींत कारवारचं बंदर आहे आणि उजवीकडे ‘ वाऱ्याच्या झाडां ’ची राई दूरपर्यंत जात धूसर झाली आहे. ती राई अखेरीस डोंगराच्या ज्या रांगेंत लोपून गेली आहे, तीसुद्धां इतकी धूसर आणि अंधुक निळसर आहे, कीं करणीदार पृष्ठभागाच्या आकाशावर धावत्या कुंचल्यानं रंगवल्यागत वाटते. सूर्य मावळून गेला. बंदराबाहेर समुद्रांत वर्षानुवर्षं तपश्चर्या करीत उभ्या असलेल्या खडकाळ बेटवजा देवगडावर आतां दिवादांडींतला दिवा लागला आणि क्षणोक्षणीं दाटत चाललेल्या अंधाराला तो लपालपा चाटूं लागला आहे.

बरोबरच्या मंडळीशीं मी प्रथम गप्पा मारल्या, पण पुढं मी नुसत्या हुंकाराशिवाय दुसरं कांहींच करीनासा झाल्यावर माझा नाद त्यांनीं सोडून दिला आणि आपसांत बोलणं सुरू केलं. मी हातांत वस्त्रगाळ वाळू घेऊन ती झुळझुळू सांडूं देत नुसता आपला स्तब्ध राहून कोंकणांतल्या निसर्गाच्या त्या साध्या भव्यतेचं गात्रागात्रांतून आणि रंध्रारंध्रांतून पान करीत राहिलों आहें. थोड्याच वेळांत मला एक विलक्षण सुखदायक धुंदी येते. साहित्य-संमेलनाला आपण आलों असल्याची उरलीसुरली जाणीव नष्ट होते...

साहित्य, मराठी साहित्य, जागतिक साहित्य, भाषांची श्रेष्ठ-कनिष्ठता यांविषयींचे विचार कुठल्या कुठं जातात. तीनचार दिवसांपूर्वीच माझी एक कथा आणि एक लेख प्रसिद्ध झाला आहे. अशा वेळीं सामान्यतः माझ्या मनांत कांहींसा आनंद व कांहींसा अहंकारहि थोडे दिवस तरी रेंगाळत राहातो. पण तो आतां साफ विरून गेला आहे; आणि त्याच्याबरोबरच सावलीसारखा त्याचा पाठलाग करीत उपेक्षितपणाची विषण्णताहि घुटमळते, ती आतां क्षुद्र वाटूं लागली आहे—

१५०५

थोड्याच वेळांत तर तिचा मागमूसदेखील राहत नाहीं.

किती तरी वेळानं बरोबरची मंडळी उठतात आणि म्हणतात, "जेवायची वेळ झाली असेल, परतूं या."

विलक्षण तृप्तीनं उठून मी म्हणतों, "चला."

पण जेवायला अवकाश आहे. म्हणून थोडा वेळ 'मंगेशनगरा'च्या आवारांत आम्ही जातों. आंत कार्यक्रम चालू आहे; पण बाहेर खूप लोक गप्पा मारीत, हास्यविनोद करीत वावरत आहेत. त्यांत साहित्यिक असलेले, नसलेले, दोन्ही आहेत. आमच्यांतल्या एकाला फाटक्या अंगाचा, पण झकपक विलायती पोशाख केलेला एक इसम नमस्कार करतो. त्याच्याशीं आमची औपचारिक ओळख त्यानं करून दिली तेव्हां तो चौकशी करतो, "गोव्यास जाणार आहांत कीं नाहीं?"

आम्ही होकार देतों.

"बरोबर पैसे भरपूर आणले आहेत ना?"

त्याच्या या प्रश्नाचा रोख कुणालाच कळत नाहीं. सगळे चकित होऊन स्तब्ध उभे राहतात.

तो बोलूं लागतो, "गोव्याला जायचं तें नुसतं हात हलवीत परत येण्यांत हंशील नाहीं. मी सांगतों ना, माझ्या अनेक खेपा होतात, पण एकदांहि मीं खिशाला चाट पडूं दिलेली नाहीं. कधीं घड्याळं, कधीं पेनं, तर कधीं सोनं-देखील! पैसे चांगले सुटतात. सगळे जण हेंच करतात. तुम्हींसुद्धां हेंच करायला पाहिजे. माझ्याबरोबर चला, तुम्हांला सांगेन मी त्यांतल्या साऱ्या युक्त्या!"

आतां या आचरट माणसाला काय सांगणार कपाळ!

पहिल्याच भेटींत अनाहूतपणानं दिलेला हा असला त्याचा सल्ला फुकट असला तरी तो आम्हांला कणभरहि पसंत पडण्याजोगा नाहीं. आम्ही केवळ सफरीसाठीं घराबाहेर पडलों आहोंत, धंदा करण्यासाठीं नव्हे. त्यांतून आमचा तो धंदाहि नाहीं. सफरीचा खर्च परस्पर निघण्यासाठींदेखील हा व्यापार करण्याचं आमच्या मनांतसुद्धां येऊं शकत नाहीं. हाहि एक वेगळा अनुभव असेल, असूं दे. यांतहि धोक्याशीं लपंडाव खेळतांना गंमत येत असेल, येऊं दे. ज्यांना ती गंमत वाटत असेल, त्यांची त्यांनाच ती लखलाभ असो! त्या ओंगळ गंमतीपायींसुद्धां आम्हांला आपल्या प्रवासांतल्या सुखाचं धाकधुकीनं वाटोळं करायचं नाहीं. पण या गोष्टी ज्याच्या त्यालाच समजायला हव्यात. दुसऱ्यानं सांगण्याचा कांहीं उपयोगहि नसतो आणि जरूरीहि नसते.

हे महाशय एक क्षणभर दुसऱ्या कुणाशीं तरी बोलतांना गुंतलेले बघून आम्ही तेथून सटकतों आणि जेवायला जातों.

मंगेशनगरांत रात्रीं करमणुकीचा कार्यक्रम आहे. गर्दी खूप जमलेली आहे. गांवकऱ्यांनीं पाहुण्यांसाठीं केलेला हा कार्यक्रम, तेव्हां तो कसा होतो तें पाहायला, त्याचं कौतुक करायला आणि पाहुण्यांना तो किती पसंत पडतो तें समजून घ्यायला गांवांतली बहुतेक मंडळी उत्सवाच्या अपूर्वाईनं पाहायला आली आहे. त्यांच्या चर्यांवर दिसणारे हे सारे भाव पाहूनच माझ्या मनांत त्यांच्याविषयीं आपुलकीची एक लाट भरून आल्यासारखी होते, त्याचबरोबर पाहुणेपणाची जाणीव नष्ट होते, आणि रंगभूमीकडे मी पाहूं लागतों.

किशोरावस्था नुकतीच ओलांडून गेलेली एक मुलगी प्रकाशाच्या झोतांत पुढं येते. आणि आतां तिनं एक साधं गीत शंकरा रागांत म्हणायला सुरुवात केली आहे—

*'पावनभूमि ही अमुची*
*धन्य कारवार...'*

त्याच क्षणीं तिच्या काळ्याभोर केसांतल्या अबोलीच्या फुलांच्या रसरशीत वेणीकडे माझं लक्ष जातं, आणि या फुलांच्या प्रदेशांत, निसर्गाच्या लाडक्या कोंकणांत आपण आलों आहोंत हें सर्वस्वीं पटून 'धन्य कारवार' हे शब्द अगदीं काळजाच्या गाभ्यांत जाऊन रुततात. मनाच्या या सुखावलेल्या अवस्थेंतच मग पुढचं एका लहान मुलीचं नृत्य, नंतरचं वृंदवादन आणि 'जांवईशोध' या नाटकाच्या सुरवातीचा भाग मी पाहतों. आम्हांला संपूर्ण नाटक होईपर्यंत थांबणं शक्य नाहीं. कारण, आतां प्रवासाचा शीण फारच जाणवूं लागला आहे, डोळे पेंगुळले आहेत आणि झोंप व विश्रांति आतां मिळणं अगदीं आवश्यक वाटत आहे.

५ मे, १९५१

आज सकाळीं विषयनियामक समितीची बैठक आहे. आमचं तेथें कांहींच काम नाहीं. आम्हीं समुद्रकांठ गांठला, तेथें थोडेसे भटकून गांवांत आलों, तेथून मग पुन्हा समुद्रकांठीं फिरायला गेलों आणि कांठच्या रस्त्यानं जात जात मग आडवे वळून मुख्य रस्त्यानं दीड-दोन मैलांवरच्या कोडीबागला, जिचं काकांनीं भरघोस वर्णन केलं आहे, त्या काळी नदीच्या मुखाशीं आलों आहोंत. तिचं पात्र दुथडी

भरून वाहत आहे—म्हणजे वाहत आहे कीं नाहीं तें कळणं अशक्यच आहे. कारण, पलीकडेच एक-दोन हांकांच्या अंतरावर ती समुद्राला मिळते आहे. इथं नदीकांठीं पाण्यांत लांकडांचे मोटमोठे ओंडकेच्या ओंडके सांचवून ठेवलेले दिसताहेत. मजूर एकेका ओंडक्याला दोरखंडानं बांधतात, धक्क्यावर रांगेंत उभे राहून तो दोरखंड ओढतात, ओढतांना झटके देतात आणि त्याच वेळीं "हांव–स्से–हांव्–स्से !" असा आवाज एकसाथ मोठ्यानं काढतात. शेवटच्या हिसक्यानं ओंडका धक्क्यावर चढला कीं त्यांचा आवाज एकदम हवेंत झिरपून गेल्यासारखा थांबतो...इथं माणसांची वर्दळ पण खूप आहे. नदीच्या रुंद पात्रांतून शिडाचीं गलबतं वावरतांना दिसतात. समोरच पलीकडे सदाशिवगड आहे आणि इकडून तिकडे व तिकडून इकडे अशा सतत फेऱ्या मारणारा एक वाफोरहि दिसतो आहे. आम्हांला त्यांत बसून पलीकडे जाऊन यायची लहर येते. पुण्याच्या टांगेवाल्याशीं आमचा परिचय. वाटलं होतं, आठ आणे तरी पडतील. पण एका खेपेला माणशीं फक्त तीन पैसे पडतात हें कळल्यावर आम्ही थक्क होतों आणि दुपारच्या उन्हाची पर्वा न करतां सदाशिवगडला जातों.

सदाशिवगड म्हणजे काळी नदीच्या मुखाशीं असलेली एक लहान टेकडी आहे. प्राकार, एकादी तोफ, झरोके यांचे अवशेष तेथें आहेत म्हणूनच गड या त्याच्या नांवांतल्या भागावर विश्वास ठेवायचा; नाहीं तर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजजवळच्या टेकड्यांतल्या सर्वांत पुढच्या टेकडीएवढीच ती भरावी. तथापि तेवढ्यावरूनसुद्धां ही जागा इतकी मोक्याची आहे, कीं पुरेसं साहित्य असलं तर त्या काळांत काळी नदीमार्गानं आंत शिरू पाहणाऱ्या शत्रूच्या गलबतांना थोपवून धरणं अगदीं सहज शक्य होत असलं पाहिजे.

परंतु ही आरमारी दृष्टि बाजूला ठेवली तरी येथून दिसणारं विहंगम दृश्य विलक्षणच रमणीय आहे. लहान लहान अशीं अनेक आखातं, बेटं, त्यांवरच्या 'वाऱ्याच्या झाडां'च्या राया, शेतं, नदीचं रुंद पात्र, पलीकडे झाडींत लपलेलं कारवार, डोंगराची व समुद्राची क्षितिजरेषा हीं आपापल्या परीनं दृश्याच्या मोहकतेंत भर टाकतातच, पण जिथं नदीचं पात्र समुद्राच्या पाण्यांत शिरलं आहे, त्या संगमाच्या ठिकाणचा तळभाग वर आल्यासारखा होऊन तेथल्या उथळ पाण्याच्या पृष्ठभागावर चिमुकल्या लपलपणाऱ्या लाटा तेथें इतक्या उत्पन्न झाल्या आहेत कीं हजारों कबुतरं त्या ठिकाणीं उतरून पंख फडफडावीत दाणे टिपीत असल्याचा भास आम्हांला बसल्या ठिकाणाहून तिकडे पाहतांना होतो. रवीन्द्रनाथ टागोर या

भागांत आले असतांना हेंच दृश्य पाहून मुग्ध होऊन गेले होते असं म्हणतात. रवीन्द्रनाथच कशाला, आजपर्यंत जे जे रसिक येथें येऊन गेले असतील, ते सारे मुग्धच होऊन गेले असले पाहिजेत. आपल्या आनंदाला कवितेच्या स्वरूपांत व्यक्त करतां येणं किंवा न येणं हा प्रेक्षकांमधला फरक! या भूभागानं आपलं ऐश्वर्यभांडार सर्वांना सारख्याच औदार्यानं उघडं करून दाखवलं असणार...

समुद्रतीरावर जाण्याचा आम्हांला कंटाळा म्हणून कसा तो येत नाहीं. संध्याकाळीं समुद्रतीरावर पुन्हा आम्ही जातों. आज तर इथं कालच्यापेक्षांहि अधिक शांतता आहे. तिची रम्यता वाढवण्यासाठींच जणुं जासवंदी रंगाचा झगा घातलेली एक चारपांच वर्षांची किशोरी स्वच्छंदपणानं वागडत त्या शांततेला चाळवते आहे. तिच्याकडे मी किती तरी वेळ पाहत राहतों. मग माझं लक्ष सहज आजूबाजूला जातं. तीनप्रहरीं केव्हां तरी जोराचा वारा सुटून गेला असला पाहिजे. कारण, आतां वाळूच्या पृष्ठभागावर कसल्या तरी विलक्षण लवलवणाऱ्या रेषा तयार झाल्या आहेत. कोट्यवधि उदबत्त्या हारीनं चेतवल्या आणि त्यांतून स्वैरपणानं निघणारीं धूम्रवलयं कुठल्या तरी जादूच्या साहाय्यानं निश्चल करून या पुळणीवर आंथरलीं तर तीं जशीं दिसतील तशा त्या दिसताहेत! मी स्तिमित झालों आहें. वाऱ्यानं वाळूशीं केलेल्या मोहमयी प्रणयक्रीडेची ही विलक्षण निशाणी तिच्या सर्वांगावर उमटली आहे. जासवंदीचं तें उलटं फूल दुडुदुडु धांवत त्या रेषांचा भंग करीत त्यांत नवीन सजावट करीत आहे. खदखदां हसणारं तें फूल, वाऱ्यावर भुरभुरणारे त्याचे केसर, जरा पलीकडेच एका बाजूला बसून, पाण्याच्या फार जवळ आपली मुलगी जात नाहीं ना, याविषयीं जागरूक राहत तिच्याकडे जीवितसाफल्याच्या वृत्तीनं पाहणारे तिचे मातापिते आणि कारवारचा तो शांत समुद्रतीर पाहून माझ्या मनांत येतं, येथें अगदीं मर्ढेकरसुद्धां आपल्या मनोव्यथा, निराशा आणि उबग विसरून जातील...अगदीं प्रथम वाळूवरच्या त्या वलयांकडे पाहून, तुलनेनं, नियतीचं सर्व सामर्थ्य आणि मानवी जीवनाची अगतिकता यांविषयींचे विचार माझ्या मनांत आले होते, पण त्यांना एका क्षणापेक्षां अधिक वेळ थारा मिळाला नाहीं.

मंगेशनगरांत आम्ही सूर्यास्तानंतर जातों, तों तेथल्या खुल्या अधिवेशनांत खूप धमाल उडालेली आहे. बाळासाहेब खेरांच्या त्या सुप्रसिद्ध उद्गारांच्या भुतानं कित्येकांना पछाडलेलं आहे. खरं पाहिलं तर साहित्यसंमेलनासारख्या निरुपद्रवी संस्थेंत निषेधाचा ठराव, फार काय, माफीच्या मागणीचासुद्धां ठराव पास झाला असता तरी कांहीं बिघडण्यासारखं नव्हतं. पण समर्थन करणारे तावातावानं

बोलताहेत आणि ऐकणाऱ्यांच्या मनांवर वेगवेगळे परिणाम घडताहेत. साहित्यानं राजकारणाशीं संपर्क ठेवूं नये म्हणून कांहींना तो पातळ झालेला देखील ठराव नको आहे. कारवारकरांना धोरण-म्हणून नको आहे. त्या ठरावाला मग भलतेच फाटे फुटतात, प्रथांचा आणि नियमांचा शब्दच्छल होऊन साराच चिघळचोथा होतो. शेवटीं अध्यक्ष आपल्या अधिकारांत तो निकालांत काढतात, हें फार चांगलं झालं आहे. माझ्या मनांत राहून राहून येतं, समजा, हा ठराव मुळांतल्या तिखट स्वरूपांत एकमतानं सर्वांनीं निर्भयपणानं पास केला असता, आणि समजा, त्यांतल्या आशयाला अनुसरून बाळासाहेबांनीं आपले शब्द परत घेऊन क्षमादेखील मागितली असती, तर त्याचा परिणाम तरी काय झाला असता? शिवाजी आणि टिळक आपापल्या तसविरींतून आणि चरित्रपुस्तकांतून आहेत तेथेंच राहिले असते, "जितं मया, जितं मया" या शब्दघोषांनीं महाराष्ट्रांतील वातावरण कांहीं दिवस दुमदुमत राहिलं असतं. पण याव्यतिरिक्त केवळ दोन सुट्या अधिक मिळण्याखेरीज चालू सामूहिक जीवनांत असा कोणता फरक पडला असता? थोर पूर्वजांची प्रतिष्ठा टिकवण्यासाठीं जागरूक राहण्याची ही पद्धति विलक्षणच आहे! आज टिळक आणि शिवाजी अचानक महाराष्ट्रांत प्रकट झाले तर आपला वारसा सांगणाऱ्यांना कोणते शब्द ऐकवतील? मी विचार करूं लागतों. शेवटीं तर मला या साऱ्या प्रकाराची उबग येते...

मी उठून बाहेर निघून येतों.

रात्रींच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत मात्र संध्याकाळच्या या प्रसंगाच्या सगळ्या आठवणी बुजून जातात. कवींचं काव्यगायन होतं, तें आयत्या वेळीं ध्वनिक्षेपकांनीं छांदिष्टपणा केला तरी कारवारकर उत्कंठेनं ऐकून घेतात. तांदूळ कांडण्याचं लोकनृत्य स्थानिक आम्हाला दाखवतात तें छान होतं. नंतरचं यक्षपत्नी हें नृत्य चांगलं रंगतं. मग 'सासूबाई' हें नाटक सुरू होतं तेव्हां आम्ही परत येतों...

६ मे, १९५१

आज सकाळीं पुन्हा आम्ही समुद्रतीरावर येतों. बंदराच्या कुशींत 'साबरमती' उभी आहे. येणाऱ्याजाणाऱ्या उतारूंची देवघेव पडावांतून होते. आणि थोड्याच वेळांत बोट निघून जाते. नुकत्याच घडलेल्या एकाद्या प्रसंगाच्या स्मृतीप्रमाणं ती दूर जात जात अस्पष्ट होते. शेवटीं ती लुप्त होते. एक निःश्वास—आणि मग

आम्ही सर्व जण येथील चित्रमंदिरांत नाट्यविषयक परिसंवाद आहे तो ऐकायला येतों. तेथें बोलणारी मंडळी आम्हांला नेहमींच पाहायला, ऐकायला मिळणारी, त्यांतून सर्वांचीं भाषणं आयत्या वेळचीं, तेव्हां आम्हांला फलश्रुतीचा अंदाज असून औत्सुक्य असं फारसं नाहींच. पण कारवारकरांना या कार्यक्रमाची फार अपूर्वाई वाटते आहे असं दिसतं. आम्ही मागं उभे राहतों. मधूनच कुणी तरी जवळपास येऊन विचारतो, "ते कोण हो? अंहं! ते नव्हेत, त्यांच्या शेजारचे, चष्मा घातलेले!" ते कोण तें मी सांगतां, तेव्हां ऐकणाऱ्याच्या तोंडून उद्गार निघतात, "असं होय!" त्या उद्गारांमागं क्वचित् भक्ति, क्वचित् आदर, क्वचित् प्रेम दिसतं तें मला लोभनीय वाटतं...

आज रात्रीं मंगेशनगरांत 'नाट्यनिकेतन'चं नाटक आहे. म्हणून अखेरची सभा नगरपालिकेच्या पटांगणांत भरली आहे. इमारत समुद्रकांठींच, त्यामुळं पाहुण्यांपैकीं पुष्कळच जण सभास्थान आणि समुद्रतीर या दोन्ही ठिकाणीं जाऊन येऊन आहेत. ध्वनिक्षेपक नाहींत, वाराहि खूप सुटला आहे. अगदीं जवळच्यां-खेरीज इतरांना कांहीं ऐकूं येत नाहीं. आवाजाला दृश्य स्वरूप असतं, तर वक्त्याच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दाचा कसा भुगा होत आहे तें दिसूं शकलं असतं. दिवस शेवटचा, रोजच्यापेक्षां माणसंहि समुद्रकांठीं बरींच आहेत. त्यामुळं शांतता तेवढी नाहीं. पण आज लाटा चांगल्या उसळताहेत. एखाद्या तंत्रशुद्ध लघुकथेप्रमाणं प्रत्येक लाट प्रथम तयार होते, पुढं सरकत सरकत वर चढते आणि अखेरीस कोसळून विरून जाते. समुद्राच्या पाण्यांत उभं राहून आम्ही लाटांशीं मनसोक्त खेळून घेतों आणि सृष्टि अंधारानं काळवंडल्यावर बिऱ्हाडीं परततों....

♤ ♤ ♤

७ मे, १९५१

सूर्य उजाडण्याच्या पूर्वी आम्ही मोटारींत बसलों आहोंत. कारवारच्या बाहेर मोटार पडूं लागते तेव्हां सभोंवार आम्ही पुनः पुन्हा पाहून येत आहोंत. मनांत आठवणी गोळा झाल्या आहेत. मात्र त्यांमध्यें साहित्य-संमेलनाच्या यशस्वितेचा (अयशस्वितेचासुद्धां) विचार चुकूनहि येत नाहीं. नुसते पैसे भरले, कीं प्रति-निधि होतां येत होतं, व्हावं लागत होतं, झालों होतों. असल्या प्रतिनिधित्वाची खंत तर वाटली होतीच, पण उपाय नव्हता. मनाला गप्प करून दांभिकपणा पत्करला होता......कारवारकरांनीं आम्हांला अतिशय सौजन्यानं वागवलं होतं,

आमची सोयहि चांगली केली होती, याबद्दल कृतज्ञतेची भावना मात्र आतां मनांत आहे...

बाकी मग, मनांत जें कांहीं सांचून आलं आहे, त्यांत निसर्गाच्या सान्निध्यांत कारवारला राहिल्याचा असीम आनंद आहे.

मनांत सांचून आलं आहे, त्यांत आमच्या उतरण्याच्या जागेविषयीं विचार आहेत. आम्ही उतरलों होतों ती शाळेंतली एक वर्गखोली होती. याच शाळेंत काका कालेलकर शिकले होते. कदाचित् त्याच खोलींत काकांनीं एकादं वर्ष काढलंहि असेल. रोज रात्रीं पथारी पसरून पडलं कीं, मला स्मरणयात्रेची आठवण होई आणि काकांशीं खदखदां हसत गुजगोष्टी केल्याचं समाधान मला मिळे.

आणि मनांत जें सांचून आलं आहे, त्यांत कारवारच्या फुलांच्या स्मृतीहि आहेत. आम्हीं दोघांनीं आपापल्या बायकांना अबोलीच्या आणि मोगरी-मदन-बाणाच्या वेण्या (त्यांना आणि आम्हांलाहि) मनसोक्त घेऊन दिल्या होत्या. अनेक वेळां तर एकाच वेळीं दोन्ही प्रकारच्या घेऊन अबोलीवर मोगरी घालायला लावली होती. त्या वेळीं त्यांच्या संगतींत हिंडतांना मनाला आलेली प्रसन्नता, अबोलीच्या फुलांचा वर्णन न करतां येण्याजोगा रंग (म्हणूनच अबोली हें नांव पडलं असेल काय?) आणि मोगरी-मदनबाणाच्या फुलांचा सुगंध आतां भोंवतीं रेंगाळतो आहे.

आणि मनांत जें सांचून आलं आहे, त्यांत कारवारचं स्त्रीसौंदर्यहि आहे. मागं एकदां मला कुणी तरी सांगितलं होतं, कारवारला कधीं गेलांत तर तेथल्या देखण्या स्त्रिया, विशेषतः त्यांचे हरिणींसारखे 'दीर्घापांग' डोळे पहायला विसरूं नका. आमच्या तें लक्षांत होतं आणि रस्त्यानं हिंडत असतांना अशी एकादी रमणी दिसली, कीं आवाज प्रश्नांकित करून बरोबर असलेल्या आपापल्या बायकांना आम्ही विचारीत असूं, "धन्य कारवार?"

त्यांना मान्य असे तेव्हां पहिल्या रात्रीं ऐकलेल्या शंकरा रागांतल्या गीताच्या स्वरांत त्या गुणगुणूं लागत, "धन्य कारवार!"

मान्य नसे तेव्हां ठसक्यांत म्हणत, "अं हं!"

त्यांना मग खोडून काढण्यासाठीं आवाज जरा उंचावीत आम्ही म्हणत असूं, "धन्य कारवार!"

आम्हीं वारंवार केलेला हा निरागस सांकेतिक खेळ आतां राहून राहून मनांत येतो आहे...

कारवार मागं पडलं आहे. मोटार झपाट्यानं कोडीबागच्या जवळ जवळ जाते आहे. मी दोस्ताकडे पाहून निराळ्या अर्थानं गुणगुणतों, "धन्य कारवार!" त्यानंहि मला साथ दिली आहे. आमचे स्वर जुळत नाहींत, पण भावना जुळल्या आहेत.

आपापल्या बायकांकडे आम्ही पाहतों. त्या मान्यतेचं नुसतं स्मित करतात...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23030 वि: ...
क्रमांक 237 नों: दि: 26/3/58

बालगंधर्वांचीं नाटकं मीं अगदीं मोजकींच पाहिलीं आहेत. तरी पण जेव्हां तीं पाहिलीं तेव्हां तो अगदीं उत्कर्षबिंदूला पोंचला होता. त्या वेळचं मला आठवतं आहे, गंधर्वांचं एकादं रुळलेलं पद सुरू झालं, कीं सबंध प्रेक्षागारांतून अपेक्षा-पूर्तीच्या लहरीवर लहरी उचंबळून यायच्या आणि गाणाऱ्याची मधुर आवाजी व साथीचा भरघोसपणा यांचा त्या लहरींशीं मिलाफ होऊन सारं वातावरण धुंद होऊन जायचं. मग बऱ्याच वेळानं पद संपायचं आणि टाळ्यांचा प्रदीर्घ कडकडाट व्हायचा, तथापि पुढच्या गद्य भागांतसुद्धां ती धुंदी कायम असायची.

पण मग कांहीं वेळानंतर दुसरं पद सुरू व्हायचं, तेव्हां मात्र अगदीं वेगळंच वातावरण निर्माण व्हायचं आणि आधींच्या पदाची नुसती आठवण करायची म्हटलं तरी प्रयास फार पडायचे. माणूस जणुं एका झोतांतून उचलून दुसऱ्या झोतांत फेंकल्यासारखा व्हायचा....

कारवार मागं राहिलं आणि गोमंतकांत मीं प्रवेश केला तेव्हां माझी स्थिति अगदीं अशीच झाली आणि कारवारप्रमाणंच गोव्यांतल्या मुक्कामांतहि 'वासरिका' लिहिणं माझ्या हातून झालं नाहीं.

तथापि मनाशीं मी वारंवार म्हणें, लिहायला पाहिजे, लिहायला पाहिजे...

मला जें लिहावंसं वाटत होतं, तें हें—

७ म, १९५१

मोटारींतून आम्ही कोडीबागला उतरलों आहोंत. आतां काळी नदी ओलांडून पलीकडे दुसरी मोटार गांठायची आहे. ती तेथून चार-पांच मैलांवरच्या माझाळी-पर्यंतच जाते. कारण गोव्याची सरहद्द तेथून सुरू होते.

माथ्यांवर बोजे घेऊन आम्ही कोडीबागच्या धक्क्याशीं येतों. आत्तां ओहोटीची ऐन वेळ असली पाहिजे. काळी नदीची रया अगदींच बघवेनाशी झाली आहे. परवां आलों होतों तेव्हां चांगलं, माणसाला पोहावं लागेल एवढं पाणी होतं.

पण आतां चांगलीं पंचवीस एक पावलं चालत जावं लागेल इतका तळ उघडा टाकून पाणी उतरलं आहे नि मागं गेलं आहे. ह्या उघड्या पडलेल्या तळावर-देखील हिरव्या आणि बुळबुळीत पाणवेलींनीं कीं विचित्र शेवाळानं कुगास टाऊक, जागोजाग फराटे ओढलेले आहेत. खालीं उड्या मारून त्यांना चुकवीत दलदलींतून पाण्याशीं गेलों तरी वाफोरांत चढतांना पाण्यांतून चालणं टळलं नाहींच आणि डोक्याखांद्यावरचं सामान सांवरतांना अंगांतल्या कपड्यांचे खालचे भाग भिजून गेले आहेत. वर आकाशाला पडसं आलं आहे आणि खालीं जमिनीवर मनस्वी उकाडा होतो आहे.

सदाशिवगडला उतरल्याबरोबर पलीकडे डगरीवर उभ्या असलेल्या मोटारीवर बरेचसे जण हल्ला चढवतात. त्या मोटारींत आधीं कांहीं माणसं आहेत याची कुणी पर्वा करीत नाहीं. आणि तिच्या टपावरचं सामान ओघळूं लागण्याच्या बेतांत आहे तरी आणखी सामान वर चढतंच आहे. मोटार तिथं टिकून तरी कशी राहिली आहे हें मोठं आश्चर्य आहे. गुळाच्या ढेपेला लुचणाऱ्या डोंगळ्यांसारखीं तीं माणसं मोटारीशीं आणि आपापसांत झोंबताहेत. एकादा अपघात होण्याची वाट पाहत मी उभा राहतों.

पण तसं कांहींच घडत नाहीं. एकाद्या स्थूलकाय मारवाड्यासारखी ती मोटार लडफडत निघते, तेव्हां आंतले आंत राहतात, वरचं सामान हिंदकळून अधिकच गच्च बसतं, बाहेरून झटापट करणारे लोक हिरमुसले होऊन बाजूला सरकतात, आणि ती हिसके खात खात सरळ रस्त्याला लागून दृष्टीआड होईतों तिच्याकडे पाहत राहतात.

हा सारा तमाशा मी अलिप्त मनानं पाहतों. या असल्या धुमश्चक्रींत भाग घेण्याची मला इच्छा नाहीं. चिकाटी, थोडे धक्के देण्याखाण्याची तयारी व तोंडाळपणा असला, कीं हें काम सोपं असतं. आणि हे गुण अंगीं आणणं कठीणहि नाहीं. परंतु आपल्या आधीं आलेल्या व या गुणांचा अभाव असलेल्या व्यक्तींवर अन्याय होतो तो मला मान्य असत नाहीं. निदान आपल्या हातून तरी तो होऊं नये या विचारानं मी सहसा असल्या भानगडींपासून दूर राहतों.

पण आजचा हा रागरंग कांहीं वेगळाच आहे. लेखक, संपादक, प्रकाशक, साहित्यिक, इत्यादिकांचं हें भलत्याच प्रकारचं संमेलन पाहून मी गडबडलों आहें आणि मला वाटूं लागलं आहे, पाण्याचा ओघ संपून गेला कीं आपण निवांतपणानं पलीकडे जाऊं, असं म्हणत नदीच्या कांठीं बसून राहणाऱ्या प्रवाश्याची संस्कृत गोष्ट

आपण लहानपणीं वाचली होती, तशी आपली स्थिति होणार आतां!

पुढची मोटार येतांच सर्व अस्त्रांचा उपयोग करून आम्ही आंत तर शिरलोंच, पण सामानहि वर चढवलं आहे. अखेरीस मोटार तट्ट फुगून गेल्यावर मोटारवाला येतो व म्हणतो, "पांच जणांना आधीं तिकिटं दिलेलीं आहेत, त्यांना जागा मिळाल्याखेरीज मोटार हलायची नाहीं." इथं मोटारींतल्या उतारूंच्या संख्येवर बंधन दिसत नाहीं; तरी पण आतां मुंगीलाहि आंत यायला जागा राहिलेली नाहीं. त्या पांचांतला एक जण आंतच आहे, तेव्हां कुणा तरी चौघांना उतरावं लागणार. जंगलाच्या कायद्यानं, ज्यांना शक्य झालं तें आंत चढले आहेत, आतां त्याच कायद्यानं प्रत्येक जण दुसराच कुणी तरी उतरेल म्हणून वाट पाहतो आहे. मोटारवाला क्रमाक्रमानं विनवण्या, अजीजी, धाक, इत्यादि साधनांचा उपयोग करतो, पण जागचं कुणीच हलत नाहीं, कीं हूं का चूं करीत नाहीं. मग कुणी तरी सूचना करतं, जो गट चौघांचा असेल त्यानं उतरावं. त्याचाहि कांहीं उपयोग होत नाहीं. मी अर्थातच उतरत नाहीं. कारवारपर्यंत आम्ही पांच होतों, ते आतां सहा जण झालों आहोंत.

अखेरीस सारंच गाडं अडून पडतं, तेव्हां दोन समंजस व्यक्ति अगदीं पुढची जागा मिळालेली असूनहि उतरतात. मग थोडी वाट पाहून आणखी दोन व्यक्ति उतरतात. आम्हां सहांमधल्या त्या आहेत. आम्हां दोघां जोडप्यांशीं ओळखीच्या नात्यानं त्या आलेल्या आहेत. एक पुरुषांच्या बाजूनं आणि एक बायकांच्या बाजूनं. उतरल्यावर त्या म्हणतात, "तुम्ही माझाळीला थांबा. आम्ही येतांच मागच्या मोटारीनं."

मोटारींतल्या माणसांचं हें सामूहिक वर्तन मला प्रेक्षणीय वाटलं आहे. मी पण त्यांत आलोंच. माझ्या मनांत 'संमर्दाचे मनोव्यापार' थोडा वेळ घोटाळतात. मग तर्क सुरू होतो. मागं राहिलेल्या त्या चौघांच्या मनांत, इतरांकरितां आपण कांहीं तरी केल्याचा आनंद असेल, कीं मागं राहावं लागल्याबद्दलची चीड असेल? शेवटीं वाटूं लागतं, अधिकांश आनंदाचाच असला पाहिजे. मग त्या आनंदाला आपण मुकलों याची चुटपुट लागून राहते.

मागं राहिलेलीं तीं दोघं आमच्यामुळं नुकतींच कारवारला परिचित झाली आहेत. आत्तांचा मागं राहावं लागण्याचा त्यांच्यावरचा हा प्रसंग मला नाट्यमय वाटतो आणि एखाद्या कादंबरींत नायक-नायिकांच्या पहिल्या ओळखीसाठीं तो चांगला चपखल बसूं शकेल असंहि मनांत येऊन जातं....

मडगांवला मुक्काम करायचा हा आमचा विचार. आम्हीं मनाशीं म्हटलं होतं, ऐशींनव्वद तर मैल! झाला, झाला तरी असा कितीसा उशीर होणार आहे? दुपारचे बारा म्हणजे डोक्यावरनं पाणी! पण प्रत्यक्षांत मडगांवला पोंचायला पांच वाजले आहेत. कारण, या येवढ्याशा अंतरांत आम्हांला वेगवेगळ्या पांच मोटारीं-तून जावं लागलं आहे. आणि प्रत्येक वेळीं अशीच झुंबड. अशीच झोंबाझोंबी. असंच आंखडून, दाबून बसावं लागलं आहे, तर कित्येकांना क्वचित् छतावरहि बसावं लागलं आहे. इतकं करूनहि प्रत्येक वेळीं मात्र ही भाषा ऐकावी लागली आहे, कीं नेहमींची मोटार निघून गेली, तुमच्याकरितां खास गाडी सोडायला पाहिजे. भाडं दुप्पट पडेल.

साहित्य-संमेलनाला आलेल्यांपैकीं पुष्कळ जण याच मार्गानं लटालटांनीं आज इकडे आले आहेत. पहिल्या एकदोन लटा सुसूत्र येऊन गेल्या. मग वाटेंतल्या लोकांना सुगावा लागला आणि त्यांनीं कमाईची संधि साधून घेतली.

याचाच आणखी एक परिणाम झाला आहे. मडगांवच्या पथिकाश्रमांत जागा शिल्लक नाहीं. फक्त झोपायला सज्जांत खाटा टाकून मिळताहेत, पण त्यांचा दर भरमसाट आहे. तेव्हां आम्ही संतापून पणजी गांठतों. पणजीला येतों त्या वेळीं सगळीकडे अंधार होऊन शहरांत दिवे लागले आहेत.

यापेक्षां पणजीला 'साबरमती'नं समुद्रमार्गें आलों असतों तर किती सोईचं झालं असतं! कारवारला बोटींत बसलं कीं दोन-तीन तासांत पणजी! पण तें शक्य झालं नाहीं. कारण, 'साबरमती' मंगलोरहून कारवारला आठवड्यांतून फक्त शनि-वारीं सकाळीं येऊन गोव्यावरून पुढं मुंबईला जाते. (आम्हीं ती परवां बघितलीहि.) तथापि या सागरी प्रवासांत सुख व सोई कितीहि असल्या तरी माणसानं, एकदां कां होईना, खुश्कीच्या मार्गानं गोव्यांत जरूर यावं. कारण हा रस्ता गोव्याच्या अंतरंगांतून जातो आणि वाटेंत शरिराला क्लेश व मनाला चिंता कितीहि पीडा देत असल्या तरी त्यांची भरपाई किती तरी पटींनीं वाटेंतल्या भागांतलं सृष्टिसौंदर्य करीत असतं!

उदाहरणार्थ, बांद्याला नदी ओलांडण्यासाठीं आम्ही मोटारींतून जेथें उतरलों तो भाग माडांच्या दाट राईनं व्यापलेला होता. तिच्यांतून थोडं अंतर चालून आम्ही नदीच्या कांठीं आलों. या नदीच्या दोन्ही अंगांना माडांची अशीच सलग राई आहे. ती इतकी दाट आहे, कीं कांठावरून उजवीकडे व डावीकडे दृष्टि टाकली, कीं कुठल्या तरी हिरव्यागार घळींतून प्रवाह वाहत जात असल्याचा भास होतो. नदीचं पाणीदेखील इथं इतकं संथ, खोल आणि हिरवंगार आहे, कीं त्या झाडांचा

रंगच पाण्यांत उतरल्यागत वाटतं. ही नदी ज्या होडींतून आम्हीं ओलांडली, ती अत्यंत निरुंद व माणसांनीं शिगोशिग भरलेली होती. कांठावरून ती कागदांतली एखादी प्रचंड केक तरंगत जावी तशी दिसली असेल. होडींत असतांना वारंवार विचार डोकावे, होडी उलटली तर?...पण त्याच वेळीं आजूबाजूला दृष्टि फिरे आणि मनांत येई, आजकालच्या अस्थिर जीवनांत माणसाला केव्हां, कुठं नि कोणत्या परिस्थितींत जगाचा निरोप घ्यावा लागेल याची जर शाश्वति राहिलेली नाहीं, तर मग इतर कुठल्या तरी ठिकाणापेक्षां हें ठिकाण किती तरी अधिक रमणीय, शांत आणि अखेरचे क्षण समाधानानं भरून टाकणारं!...

आणखी, संध्याकाळीं मडगांवहून पणजीला येतांनाची हकीकत. रस्ता सुरेख होता आणि मोटार वेगांत जात होती. मध्येंच एकाएकीं ती एका माडांच्या बनांतून गेली. त्या वेळीं रस्त्याच्या कडेला त्या झाडांचे बुंधे आणि वरच्या बाजूला एकमेकांत मिसळून गेलेले झावळ्यांचे पुंज आतां सावलींत असल्यानं काळेकभिन्न दिसले. पलीकडे कांहीं अंतर टाकून परत माडांची राई होती, तीसुद्धां अशीच दिसली. आणि ह्या दोघांच्या मधल्या खोलाटींत हिरवळ किंवा भातशेतं होतीं, त्यांच्यावर पडलेल्या सूर्याच्या शेवटच्या किरणांनीं तीं इतकीं झगझगत होतीं कीं द्रवरूप बनलेल्या पाचूचा हिरवागार ओघच त्या काळ्याकभिन्न रायांमधून वाहत असल्यासारखं वाटलं. मोटार वेगांत असल्यानं हें दृश्य फारच थोडा वेळ दिसलं, पण त्यामुळं डोळ्यांना कसल्या तरी विलक्षण गार गुदगुल्या झाल्या आणि एवढ्या एका दृश्यापुढं आज झालेले सारे श्रम कःपदार्थ आहेत असं वाटलं!...

पणजीला ज्या पथिकाश्रमांत आम्ही उतरलों आहोंत, तो चांगला मध्यवर्ती ठिकाणीं आहे. या पथिकाश्रमांतल्या जेवणघराची गोष्ट राहूंच द्या, पण राहायच्या खोल्यांतूनसुद्धां मासळीचा उग्र दर्प इतका कोंदून भरलेला आहे, कीं मला वाटतं, त्याच्या वड्यादेखील कापतां येतील. आम्हीं जेवण मागवलं आहे शाकाहारी, पण भात खातांना आम्हांला माशाचा पुलावा खाल्ल्यागत वाटतं. आणि आमटीचा भुरका मारला, कीं वाटतं, हें माशांचं कालवण असलं पाहिजे. रात्रीं आम्ही पथारीवर अंग टाकतों, तेव्हां एखाद्या देवमाशाच्या पोटावर पहुडल्यासारखं प्रत्येकाला वाटतं. या खाणावळींचं नांव 'मत्स्यगंधाश्रम' असं कां नाहीं ठेवलं कुणास ठाऊक! मालकाला ही सूचना करून पाहण्यासारखी आहे.

झोंपीं जाण्यापूर्वीं मालक मला बोलावून घेतात. आपल्यासमोरच्या तक्त्यांत,

आम्ही कोण, कुठले, किती दिवस राहणार, इत्यादि सर्व माहिती ते लिहून घेतात. हे तक्ते पोलीस खात्याला देण्याचं त्यांच्यावर बंधन आहे. आमचा राजकारणाशीं संबंध नाहीं, तेव्हां या प्रकाराविषयीं तसं कांहीं वाटून घेण्याचं कारण नाहीं. परंतु आल्या गेल्या सगळ्यांच्याविषयीं इथल्या सरकारनं ही साशंक वृत्ति धरावी याचं आम्हांला नवल वाटतं. आणि आमचीच भाषा, आमचाच वेष, आमच्यासारखंच जीवन जगणाऱ्या, आमच्यांतल्याच लोकांपासून आम्हांला परकं मानण्यांत यावं, हें आम्हांला सहन होत नाहीं.

पण गोव्याला पोर्तुगालचाच एक भाग मानणाऱ्या मुत्सद्द्यांकडून आणखी कशाची अपेक्षा करायची ?

बाकी, हे मुत्सद्दी खरंच तसं मानतात कीं नुसतं धोरण म्हणून बोलण्याचा तो एक प्रकार आहे हें कोडंच आहे. ते खरंच तसं मानीत असले तर ते खुळे असले पाहिजेत आणि नुसतंच म्हणत असले तर दांभिक असले पाहिजेत.

परंतु हें कोडं पडायची तरी काय जरूरी आहे? हे लोक खुळे तर खासच नाहींत. आणि साम्राज्य संभाळूं पाहणाऱ्या राजकारणी माणसांच्या जबड्यांतली जीभ जी भाषा वापरीत असते तिचा परिचय आम्हां भारतीयांना, अगदीं नको इतका, आतांपर्यंत झालेला नाहीं काय?

❦ ❦ ❦

८ मे, १९५१

आळशीपणाची कमाल करून सकाळीं खूप उशीरांपर्यंत आम्हीं लोळून घेतलं आहे. मग ताजेतवाने होऊन जवळच्याच एका उपाहारगृहांत आम्ही जातों. ताजे पाव, ऊनऊन चपात्या, आणि बटाट्याची भाजी तेथें तयार आहे. अगदीं स्वल्पांत आम्हांला भरपूर खायला मिळतं. गोव्यांतल्या स्वस्ताईशींहि ही आमची पहिलीच ओळख.

पणजींतल्या इमारती चांगल्या आहेत. मुंबईतल्या आहेत तितक्या या भव्य नाहींत, पण त्यांची धाटणी मात्र तशीच आहे. आणि म्हणून इथं वावरतांना मुंबईची सारखी आठवण होते. तथापि मुंबईतल्या इमारती केव्हांहि पाहा, तीन-चार दिवसांत दाढी न केलेल्या माणसासारखी त्यांच्यावर अभद्र कळा आलेली असते, तशा मात्र इथल्या दिसत नाहींत. त्याचं कारण, दर वर्षी पावसाळा उलटल्यावर प्रत्येक इमारतीला बाहेरून नवा रंग दिलाच पाहिजे असा इथं कायदा आहे.

आणखी, मुंबईच्यापेक्षां इथं रस्त्यावर माणसांचा आणि वाहनांचादेखील वावर कमी आहे. त्यामुळं इथं स्वच्छताहि अधिक वाटतें.

खायला स्वस्तांत मिळाल्यामुळं आमचीं पोटं अधिकच भरलीं आहेत. आम्ही तृप्तीनं आणि निवांतपणानं आजूबाजूला भटकत राहतों. जवळच नदी आहे, तिच्या कांठच्या प्राकारावर जातों, पैलतीराकडे खेपा टाकणाऱ्या बाफोरांतील चढउतार बघतों. पाणी उतरलं आहे, दोन-चार गलबतं आळसटपणानं नांगरून पडलीं आहेत. सगळीकडे सुस्तावलेलं वातावरण आहे.

आमचे गोव्याचे मित्र येतात, त्यांच्याबरोबर लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत आम्ही जातों. मंदिर विशेष प्रेक्षणीय नाहीं, पण स्वच्छ आहे आणि शांतहि आहे. इथं बसावंसं वाटतं. तसं मनसोक्त बसून आम्ही मग एक मोटार भाड्यानं ठरवून जुन्या गोव्याकडे जातों.

जुन्या गोव्यांत 'इगर्जींची' रेलचेल आहे. सगळीं रोमन कॅथोलिक आहेत. धार्मिक जुलमाच्या आततायी काळांत ज्या ठिकाणीं महादेवाचं मंदिर पाडून चर्च बांधलं आहे, तें ठिकाण आम्ही पाहतों. त्याच्या बाहेरचं आवार विस्तीर्ण आहे. त्यांत एके ठिकाणीं कुठल्या तरी गाभाऱ्याच्या दाराची नुसती दगडी चौकटच काय ती, कशी कुणास ठाऊक, कालप्रवाहाशीं झुंज देऊन अद्याप उभी आहे. मला तिचा फोटो घ्यावासा वाटतो आणि चित्रांत ती भव्य व उंच दिसावी म्हणून कॅमेरा जरा खालच्या पातळींत धरून मी कळ दाबतों. या इगर्जीला लागून असलेल्या दालनांत त्या नामशेष शिवालयाच्या भिंतीवरील शिल्पांचे अवशेष ठेवलेले आहेत. त्यांतले कित्येक उध्वस्त स्थितींत असले तरी मूर्तींच्या पवित्र्यांतील कसब अबाधित असून तें डोळ्यांत भरल्यावांचून राहत नाहीं. याच इगर्जीच्या सर्वोच्च जागीं क्रूस चढवण्याचा प्रयत्न अनेक वेळां झाला, पण आजपर्यंत कधीं तो तेथें टिकला नाहीं, ही गूढ आख्यायिका मी ऐकतों, तेव्हां मला बरं वाटतं. नास्तिक असूनहि मला बरं वाटतं...

इथून अगदीं जवळून मांडवी नदी वाहते. आत्तां ती तुडुंब भरली आहे. आणि आकाशांत सूर्य चांगला वर आलेला असल्यानं तिचं निळं पाणी झगमगत आहे. प्रतिभावंताच्या मनांतून एकादी कल्पना तरळून जावी त्याप्रमाणं वारा भरलेल्या शिडाचं एकादं गलबत मधूनच कुठून तरी येतं आणि सपकन् दृष्टीआड होतं. याच ठिकाणीं रायबंदर आहे. मात्र बंदर हें फक्त नांवांतच काय तें आहे. कारण इथं प्रशस्त असा धक्का कुठं नाहींच. रस्ता मात्र पाण्याच्या जवळपर्यंत

गेलेला आहे. याच रस्त्यावर जरा अलीकडे एक कमान आहे. कार्डावरच्या तिकिटाच्या जागीं ही कमान पूर्वीच पाहिलेली आहे. त्या वेळीं मला ती आवडली होती. पण आज मी पाहतों तों भोंवतालच्या भव्य आणि टोलेजंग इमारतींच्या सान्निध्यांत ती अगदींच क्षुद्र दिसते व माडांच्या शेजारीं अगदींच फिकी वाटते. ती भव्य तर नाहींच, पण तिच्यांत नुसत्या रचनेची मेधाहि नाहीं, कीं नाहीं कलाकुसरीचं वैभव! माझी निराशा होते, पण क्षणभरच. त्या कमानीला एवढं महत्त्व द्यावंसं मला वाटत नाहीं. गोव्याचा राज्यपाल म्हणे पोर्तुगालहून प्रथम येतो तो रायबंदरला उतरतो आणि या कमानीखालून गोव्यांत प्रवेश करतो. मुख्य धर्मगुरु त्याच्या हातीं राजदंड देतो, त्यानंतर इतर ठराविक विधि होतात व मग नव्या कारकीर्दीला सुरुवात झाल्याचं समजतात.

जुन्या गोव्यांतून परततांना वाटेंत मीं पोस्टाचीं कार्डं आणलीं आहेत. प्रवासांत प्रिय व्यक्तींना पत्रं पाठवण्यांत एक वेगळीच लज्जत असते. या कार्डांनीं ती वाढणार आहे. कारण, प्रत्येक कार्डाचा रंग स्वच्छ निळसर पांढरा आहे. आपल्या-कडच्या कार्डासारखा त्याला अभद्र वास येत नाहीं आणि प्रत्येकाच्या मागं अर्ध्या भागावर गोव्याचं वैशिष्ट्य दाखवणारं एक सुंदर दृश्य फोटोग्रेव्हर पद्धतीनं सुरेख छापलेलं आहे. पत्र लिहितांना माझ्या मनांत सारखं येतं, नखाएवढ्या पोर्तुगालनं-देखील ही गोष्ट करावी आणि आपल्या भारताला, सुचणं राहूं दे, पण गोव्याचं हें पाहूनहि करावंसं वाटूं नये? आपल्या कार्डावरचा निकृष्ट राजा गेला आणि त्या जागीं त्रिमूर्ति आले. पण त्यांनीं जी शोभा वाढवली तीसुद्धां खालच्या चार हेंगाड्या रेघांनीं नष्ट करून टाकली! मला हें आठवून राहून राहून वैषम्य वाटतं, आणि मनांतलं पुष्कळ दिवसांपासूनचं शल्य अधिकच सलूं लागतं...

आज संध्याकाळचा मुक्काम मंगेशीला करण्याचं आम्हीं ठरवलं आहे. चार वाजण्याच्या सुमारास पणजीच्या मोटारतळावर आम्ही जातों, तों पावणेपांचची मोटार भरून गेलेली आहे. मडगांवला आल्यापासून आम्ही पाहतों आहोंत, इकडच्या मोटारींत ठराविक संख्येच्या वर एकहि उतारू घेत नाहींत. या संख्येंत बसणाऱ्यांना चांगली ऐसपैस जागा मिळते. मला हा एक स्वस्ताईचाच प्रकार वाटतो. पण इथं मोटार संपूर्ण भरली तरी आधीं सोडत नाहींतच, पण ती सुटायला अर्धापाऊण तास अवधि असला तरी आंत बसलेल्याला कुठं एकादं काम उरकायलाहि जाऊं देत नाहींत.

पावणेपांचच्या नंतरची मोटार साडेसहाला आहे. आतां अडीच तास थांबणं

आलं, असं म्हणत कुणी तरी दाखवलेल्या एका मोटारींत जागा धरून आम्ही बसतों. पण तेवढ्यांत दुसरं कुणी तरी आम्हांला तिसऱ्याच मोटारींत घेऊन जातं. या त्रिस्थळी यात्रेचा अचंबा करीत आम्ही मधल्या वेळेचा फडशा पाडण्याकरितां पत्ते काढतों, तेवढ्यांत आणखी कुणी तरी येतं आणि वेगळ्याच मोटारींत आम्हांला नेऊन बसवतं. ही म्हणे पुरेसे उतारू जमल्यामुळं जादा सुटणारी मोटार आहे. आणि विलक्षण असं, कीं पावणेपांचच्या मोटारीआधींच ही सुटते. भाडं दुप्पट नाहीं, पण थोडं जास्त पडणार आहे आम्हांला, पण त्याचं कांहीं विशेष नाहीं. पावणेपांचवाल्या मोटारींत आमच्या ओळखीचे कांहीं जण आहेत, ते असूयेनं आमच्याकडे पाहतात. करपल्लवीनं आम्ही त्यांची हुर्यो करतों. ते तोंड वांकडीं करतात.

आमची मोटार सकाळच्या जुन्या गोव्याच्याच रस्त्यानं चालली आहे. रस्ता डांबरी आहे, सुंदर आहे, त्यामुळं तिला वेग चांगला येतो. वाटेंतल्या एका पुलावर माणशीं दोन पैसे कर भरावा लागतो, त्यासाठीं मोटार थांबते, तेव्हां पुलापाशींच मोगरीच्या वेण्या दिसतात. आम्ही त्या हावरेपणानं घेऊन बायकांना देतों. वेण्या...आणि कारवार! कालचा सबंध दिवस प्रवासाची दगदग, धांवपळ व जिकिरींत गेला, त्यामुळं कारवार सोडल्याला किती तरी अवधि होऊन गेला आहे असं वाटतं. बाहेर कांहीं तरी बघण्यासाठीं मान वळवावी तों शेजारीं बसलेल्या बायकोची वेणी पुढं येते आणि तिचा सुगंध घमघमून, समोर दिसणारं गोमंतकांतलं हिरवंगार दृश्यच सुगंधित झाल्यासारखं क्षणभर वाटतं. मी बायकोच्या अधिकच जवळ सरकतों.

ती उद्गारते, "हें काय, इतकं खेंटून काय बसतां?"

हसून मी म्हणतों, "सांगूं कारण?"

मी कांहीं तरी भरमसाट बोलणार या भयानं ती एकदम म्हणते, "पुरे! समजलं सगळं!" तिला कांहींएक समजलेलं नाहीं. पण तिच्याबरोबरची मैत्रीण अविवाहित आहे, आणि तिला काय वाटेल या विचारानं ती बिचकते आहे.

मोटार ज्या प्रदेशांतून चालली आहे, तो अतिशयच रम्य आहे. नाना प्रकारचीं झाडं, झुडुपं, वृक्ष, सगळीकडे हिरव्या वासंतिक वैभवानं नटलेलीं आहेत. यांत आंबे आहेत, नारळ आहेत, फणस आहेत, बदाम आहेत...मधेंच एकादं काजूचं झाड लागतं, त्याला लटकलेला एकादा 'जांब' क्वचित् शेंदरी रंगानं तर क्वचित् उकळत्या सोन्याच्या रंगानं लखलखून जातो आहे...

मधून मधून रस्त्याला फांद्या फुटतात. त्या त्या फाट्यांवर गांवांचीं नांवं सांगणाऱ्या पाट्या आहेत. जिकडे तिकडे टापटीप आणि विलक्षण स्वच्छता आहे. मधेंच एके ठिकाणीं मोटार अचानक थांबते. ती कशाकरितां थांबली असावी असं म्हणत मी बाहेर पाहतों, तों रस्त्याच्या कडेला दोन-तीन दुकानवजा घरं दिसतात. बैठीं, पुढं पडवी आणि आंत नुसते दोन-तीन गाळे असलेलीं. तींसुद्धां बंद आहेत. पलीकडे जरा व्यवस्थित आणि आधुनिक स्वरूपाचं होटेल आहे. मी म्हणतों, चक्रधराला चहा घ्यायची लहर आलेली दिसते.

पण तेवढ्यांत कुणी तरी म्हणतं, "आली मंगेशी, उतरा आतां!"

थक्क होऊन आम्ही उतरतों. उतरणारे फक्त आम्हीच आहोंत. मोटार लागलीच निघून जाते, तेव्हां कुठल्या तरी निर्जन भागांत येऊन पडल्यासारखं मला वाटतं. आमच्यांतल्या एकानं, आपल्या ओळखीच्या माणसाची चिठ्ठी इथल्या त्याच्या ओळखीच्या माणसाकरितां आणली आहे. ती घेऊन तो चौकशीला जातो, तेव्हां सामानापाशीं रस्त्याच्या कडेला उभा असतांना माझ्या मनांत येतं, आमची ही ओळख म्हणजे, आडभिंतीची पडभिंत नि पडभिंतीचा पोपडा! धड टिकणार आहे कीं नाहीं कुणास ठाऊक!

पण सारं ठीक जमतं. थोड्या वेळानं आम्ही आंत जायला निघातों. केवळ सातआठ पावलं चालून प्रवेशाच्या कमानीखालीं मी येतों. आणि मी पुन्हां थक्क होतों. मघांशीं तसा तर आतां असा! कारण, समोर मला जें दृश्य दिसतं आहे, तें स्वप्नसृष्टीलासुद्धां मान खालीं घालायला लावील इतकं विलक्षण रम्य...मोहक... भान हरवणारं.. डोळे दिपवणारं...छे! शब्द संपले आहेत, पण मनांतलं व्यक्त झालेलं नाहीं. निसर्गदेवीनं आळवलेल्या बागेश्रीची मूर्त स्वरूपांतली खुलावट म्हणूं का?...तसं पाहायला गेलं, तर बागेश्रीचा संबंध वागीश्वरीशीं जोडतात; बागेशीं नाहीं, वनश्रीशीं नाहीं, कीं वृक्षलतापल्लवांशींहि नाहीं. पण मंगेशीच्या या परिसराला मूर्तिमंत रागिणी म्हणावं असं आतां वाटतं, तेव्हां, कां कुणास ठाऊक, बागेश्री-खेरीज दुसरी कोणी मनापुढं येत नाहीं--

समोर बघितलं कीं सरळ थेटपर्यंत स्वच्छ, नितळ, घोटीव व ऐसपैस रस्ता दिसतो, त्याच्या दोन्ही अंगांना कमरेहून जरा उंच व शेवटपर्यंत गेलेला कुसूंवजा बांधीव कठडा, त्याच्या पलीकडे दोन्ही बाजूंना हारीनं वाढलेलीं माडांचीं उंच झाडं, त्यांच्या झावळ्या एकमेकांना बिलगल्यानं तयार झालेली हिरवीगार महिरप... हें सारं दिसतं, तेव्हां वाटतं, एकादा रुंद पाट दूरवर वाहत गेला आहे आणि

त्याच्या पात्रावरून आपण चालत आहोंत! आजूबाजूला तांबडी माती आहे, शेतं आहेत, राया आहेत, कुळागरं आहेत. मध्येंच एकादा वृक्षराज दिसतो, त्याला प्रशस्त आणि घसघशीत उंच पार आहे. थोडं अंतर चालून आम्ही पुढं होतों, तों समोर रस्त्याच्या डाव्या अंगाला मंगेशाचं देवालय, त्याच्याच पुढ्यांतली सर्वांत प्रथम दृष्टि खेंचून घेणारी पांढरीशुभ्र दीपमाळ, तिच्या अलीकडे प्राकाराच्या वर नगारखाना, त्याच्या खालून दोन्ही बाजूंनीं काढलेले जिने आणि त्यांतून बाहेर येणाऱ्या पायऱ्यांनीं जिच्यांत उतरायचं, ती औरसचौरस प्रशस्त पुष्करिणी. प्राकाराला बाहेरच्या बाजूस खेटलेली. हिच्या पायऱ्या स्वच्छ आहेत. कुठं चिकचिक नाहीं; आणि आंतलं पाणीसुद्धां असायचं त्यापेक्षां किती तरी कमी मलिन आहे. या टापूंत इतकी स्वच्छता कशी आली आहे कुणास ठाऊक! कीं इकडे नारळाच्या झाडांचं वैपुल्य असल्यामुळं त्यांच्या झावळ्यांच्या केरसुण्या सतत हलत्या राहून सारं वातावरण निर्मळ ठेवतात, कुठंहि केर पडूं देत नाहींत?

इथं पुष्कळ लोक उतरले आहेत. देवळाच्या अंगणाच्या तिन्ही अंगांना असलेल्या दुमजली इमारतींतल्या खोल्यांतून ते राहिले आहेत. आम्ही ज्यांच्याकडे जात आहोंत त्यांच्याहिकडे या दिवसांत नेहमींच अशी गर्दी असते. तरी पण आमची व्यवस्था छान झाली आहे.

चहा पिऊन आम्ही बाहेर पडतों. मोटारीच्या रस्त्यावरच सुमारें अर्ध्या मैलावर म्हारदोळ या चिमुकल्या गांवीं आम्ही येतों. इथं म्हाळसेचं देवालय आहे. मात्र या अपभ्रष्ट रूपापेक्षां 'महाल्सा' हें मूळ संस्कृत नांवच इथं जिकडेतिकडे लिहिलेलं आढळतं. आज आम्ही देवळांत जात नाहीं किंवा देवीचं दर्शन घेत नाहीं, तें मुद्दामच. इथल्या बघण्यासारख्या गोष्टी पटकन् संपून जाव्यात असं आम्हांला वाटत नाहीं. तेव्हां रस्त्याच्या दोन्ही बाजूंना जीं दुकानं आहेत त्यांतला नुसता माल पाहत, कधीं न बघितलेले सुपाऱ्यांचे व काजूंचे ढीग एका दुकानांत न्याहाळीत, दुकानांच्या पाट्यांवरून शांति या शब्दाचीं 'xanti' हीं आणि कामतबद्दल 'camata' हीं अक्षरं पाहून हसत, रेंगाळत आम्ही पुढं जातों. वाटेंत शहाळीं मिळतात, तीं पण पिऊन घेतों. पुढं वस्ती संपते तसे रस्ता सोडून जवळच्याच एका शेतांत जाऊन बसतों.

वातावरण शांत, विलक्षण शांत आहे.

पश्चिमेच्या बाजूला आतां प्रकाश अगदीं क्षीण झाला आहे, पण त्याच्या आड माडांच्या झावळ्यांचे पुंज काळेकभिन्न दिसताहेत आणि निरभ्र आकाशांत बीजेची

कोरीव चंद्रकोर दिसते आहे. या शांतपणांत मी एक क्षणभर विरून विरघळून गेल्यासारखा होतों...

शांति...

पण ही मनःशांति क्षणभराहून अधिक वेळ टिकत नाहीं. विचित्र तर खरंच, पण माझ्या मनांत येतं, आत्तांच्या या क्षणीं पृथ्वीच्या पाठीवर कुठं कुठं, काय काय घडत असेल?...रणक्षेत्रावर प्रचंड स्फोट होत असतील...आग...धूर... जखमा...निःश्वास...किंकाळ्या...मृत्यु...कुठं तरी दुसरीकडे, कुणाचा तरी कांटा काढण्याचा बेत आंखून, कुणी तरी त्यासाठीं शस्त्र पाजळीत असेल... कुठल्या तरी तिसऱ्या ठिकाणीं भडकलेल्या माथ्याचा कुणी तरी भांडणांतल्या आपल्या प्रतिपक्षाचं डोकं चेंचण्यासाठीं एकादी मोठी शिळा उचलीत असेल... आणि, आणखी कुठल्या तरी काळोखाच्या ठिकाणीं कांहीं नरपशु पळवून आणलेल्या तरुणीवर बलात्कार...

हल्लींच्या युगांत नेहमींच्याच होऊन बसलेल्या या प्रसंगांच्या कल्पनांनीं माझं शरीर एकदां सडसडून शहारतं, मी डोळे घट्ट मिटून घेतों, दोनचारदां डोकं झटकतों...मग माझं मन आकांत करून उठतं...नाहीं! नाहीं! एवढंच केवळ नाहीं! कुठल्या तरी ठिकाणीं आत्तां सूर्य मावळत असेल, तिथल्या हिरव्यागार बगीचांत मुलं हुंदाडत असतील, कर्कश आरोळ्या ठोकीत असतील...कुठल्या तरी लताकुंजांत नितांत प्रीतीच्या बंधनानं एकत्र आलेलं एकादं प्रणयी युगुल एकमेकांच्या बाहुपाशांत निःशब्द प्रीतिकूजन करीत असेल, कुठल्या तरी कारागृहांत पोलादी काळजाचा एकादा महाभाग शरीर क्षीण झालं असलं तरी अन्यायाचा प्रतिकार करतांना आलेलं कष्टाचं जिणं समाधानानं आणि मानानं जगत असेल, कुठल्या तरी साध्यासुध्या घरामध्यें कुणी तरी गवई पूरिया रागाचा रियाज करीत असेल, आणि कुठल्या तरी किर्र अरण्यांत एकादी वाघीण पिलांचं स्तनपान चाललं असतांना त्यांचीं लुसलुशींत चिमुकलीं शरीरं चाटीत हुंगीत असेल...

अद्याप ढगांचे पुंज काळेकभिन्न दिसताहेतच, पण अंधार थोडासा वाढल्यानं बीजेची कोर मात्र थोडी अधिक उजळ दिसते आहे....

आमच्यांतल्या एका व्यक्तीनं भावगीत सुरू केलं होतं, तं आतां संपलेलं आहे, तेव्हां बाकीचे तिला आणखी एकादं म्हणण्याचा आग्रह करताहेत....

थोडा वेळ आणखी थांबून आम्ही परत फिरतों.

रात्रीचं जेवण आटोपल्यावर मंगेशाच्या मंदिरांत आम्ही जातों. आज एका

भक्तानं देवाची अष्टकोनी पूजा बांधवली आहे. गाभाऱ्याच्या बाहेरच्या दारापासून ते थेट मूर्तीपर्यंत, मधल्या दोन दरवाजांमधूनहि, एकामागं एक, लहान लहान होत जाणाऱ्या कमानी उभ्या करून एक महिरप तयार केली आहे. प्रत्येक कमानीचे दोन भाग असून वरचा अष्टकोनी व खालचा उभट चौकोनी आहे. त्या प्रत्येकीच्या मधोमध आडवा दांडा आला आहे, आणि त्या प्रत्येकावरून पेटवून ठेवलेले तेलाचे चिमुकले दिवे तेवत आहेत. या कमानी घोटीव संगमरवराच्या दिसताहेत. त्यामुळं मी अधिकच्च विस्मित होऊन, शेजारीं उभ्या असलेल्या एका भक्ताला विचारतों, या कमानी कायमच्या तयार असून प्रत्येक वेळीं इथं आणून उभ्या करतात काय? तो हसतो आणि म्हणतो, कुणीं सांगितलं तुम्हांला हें संगमरवर आहे म्हणून? केळींच्या खांबाचे सोल उभे कापून या साऱ्या कमानी केलेल्या आहेत. मला प्रथम हें खरं वाटत नाहीं. खात्री करून घेण्यासाठीं अगदीं जवळ जाऊन मला निरखून पाहावं लागतं. माझी मग खात्री होते तेव्हां मी आणखीनच्च विस्मित होतों. या महिरपींत सुमारें पांचशें तरी दीप लुकलुकत आहेत. त्यांची ही संगमरवरी आराशीची मोहमयी रचना पाहून डोळ्यांना विलक्षण गुदगुल्या होतात आणि कुठल्या तरी गोष्टींतल्या जादूच्या गुहेंतून रत्नांच्या उजेडांत वाटचाल करीत असल्यासारखं मला वाटतं. पंढरपूरला पांडुरंगाची अनेक प्रकारची पूजा आणि आरास मीं बघितली आहे. त्यांत पांडुरंगाला सोन्याचं धोतरदेखील नेसवतात तें मीं पाहिलं आहे. समजूं लागल्यापासून तो सारा प्रकार मला हास्यास्पद वाटत असे. पण आजची ही तऱ्हा कांहीं न्यारीच आहे. आजची पूजा करणारा भक्त सोवळं नेसून दिमाखानं इकडेतिकडे वावरतो आहे. तो श्रीमंत असला पाहिजे. श्रीमंती-विषयीं माझ्या मनांत अढी असल्यानं त्याच्या भक्तीमागं मला अंधाराचे अनेक लेप दिसतात. देवावर माझी श्रद्धा नाहीं; त्यामुळं या उपाधींतलं त्याचं दर्शन घडल्याचं समाधान माझ्या मनांत नाहीं; मला तें नकोहि आहे. तरी परंतु एखादी सुंदर कलाकृति बघितल्यानं जो आनंद व्हायचा, तो मात्र माझ्या मनांत मावत नाहीं. त्या लुकलुकणाऱ्या असंख्य दिव्यांकडे किती तरी वेळ मी एकटक पाहत राहतों...

मंगेशाची आरती रत्नदीपानं होते. पांचपंचवीस दिव्यांच्या एखाद्या उलट्या झुंबरासारखा दिसणारा हा रत्नदीप आयुष्यांत मी प्रथमच पाहतों. आरतीनंतर यजमान देवाला साष्टांग नमस्कार घालतात. मग प्रसाद वांटण्याचं काम सुरू होतं. प्रसादाचीं तबकं पांच असून त्यांतून फणसगरे, केळ्यांचे काप, जांभळं, गूळखोबरं,

आणि अननसाच्या फोडी आहेत. प्रत्येकाला हे पांचहि पदार्थ मिळतात. प्रसाद वांटण्याचं काम साहजिकच बराच वेळ चालतं. सभामंडपाच्या दाराजवळ खांबाला रेंलून तीन देवदासी उभ्या आहेत. देवदासी, देवदासी म्हणून ज्यांचा उल्लेख आजपर्यंत वाङ्मयांतून आम्हीं अनेक वेळां वाचला, त्या आम्हांला आज प्रथमच दिसतात. शिष्टाचाराचा भंग होणार नाहीं एवढं धोरण संभाळून अपूर्वाईनं आम्ही त्यांच्याकडे अनेक वेळां निरखून पाहून घेतां. तीर्थप्रसादाचं काम चालू असेतां त्यांतल्या दोघी एकेक गीत गातात. एक हिंदी चीज आहे व दुसरं मराठी पद आहे. त्यांचं म्हणणं रागदारींत आहे, पण म्हणण्यांत जीव नाहीं. त्यांच्या चर्यांवर-देखील भक्तीचाच काय, कसलाच भाव दिसत नाहीं. बरोबर साथ फक्त मृदंगाची आहे. मृदंगिया मात्र वाकबगार दिसतो.

प्रसाद घेऊन त्या तिघी जणी देवाला नमस्कार करून निघून जातात, तेव्हां त्या दृष्टीआड होईपर्यंत मी त्यांच्याकडे पाहत राहतों. मान खालीं घालून स्तब्धपणानं जाणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीकडे पाहतांना वास्तविक उदास वाटायला पाहिजे. ह्यांच्या-विषयीं तें तसलं वाचल्यानंतर अधिकच. पण माझं मन साफ कोरं आहे. अगदीं नुकत्याच घेतलेल्या वहीच्या पानासारखं कोरं...

९ मे, १९५१

आज सकाळीं उठल्यानंतर आम्ही निवांतपणानं म्हारदोळला जातों. देवळाच्या अंगणांत दीपमाळ आहे, तिच्यावर चढायची आम्हांला लहर येते. शिडीच्या साहाय्यानं आम्ही तिच्या पहिल्या मजल्यांत शिरतों व मग आंतल्या वर्तुलाकार भिंतीला व मध्यवर्ती खांबाला पाय ठेवतां येतील असे सोयिस्कर कोनाडे काढलेले आहेत त्यांच्या साहाय्यानं वर गच्चीवर जातों. तेथून सभोंवतालचा हिरवागार समुद्र दिसतो, त्यावरच्या उंचसखल लाटाहि दिसतात व एकाद्या दीपगृहावर उभं असल्यासारखं क्षणभर वाटतं. मग अडगळींतल्या खोक्यांत केव्हां तरी फेकून दिलेल्या सटरफटर वस्तू उपसाव्यात तशा रीतीनं आमच्या गप्पा किती तरी वेळ चालतात. मग खालीं उतरल्यावर सभामंडपांत बसून माझं पत्र लिहिण्याचं काम चालतं. नंतर देवीचं दर्शन घ्यायची मला बुद्धि होते. तं घेऊन पुन्हा सभामंडपांत आल्यावर माझी दृष्टि सहज पाठीमागं गाभाऱ्याकडे जाते. काळ्याभोर चौकोनांत मला नंदादीप दिसतात. इथून स्पष्ट न दिसणाऱ्या देवीच्या दोन्ही बाजूंना ते आहेत.

अगदीं समोरून बघितलं तर एकाखालीं एक अशा चार चार ज्योती दिसतात, पण पाऊल थोडं सरकवून बघितलं, कीं प्रत्येकीच्या तीन तीन ज्योती होतात आणि दीपावलींतली आरास दिसूं लागते. लहानपणीं उन्हाळ्यांत माळवदावर रात्रीं झोंपतांना पडल्या पडल्या मी चंद्राकडे पाहीं. अशा वेळीं डोळे किलकिले केले, कीं चंद्रबिंबांतून निघालेले किरण थेट आपल्या डोळ्यांपर्यंत येऊन पोंचलेले मला दिसत आणि चंद्राशीं स्पर्श झाल्याचा आनंद होऊन हा खेळ कितीहि वेळ केला तरी मला कंटाळा म्हणून येत नसे. आत्तांसुद्धां, ज्योती कमी दिसतात त्या एकामागं एक गेल्यामुळं आणि बाजूला सरकलं कीं त्या वेगळ्या होऊन जास्त दिसतात हें उमजूनसुद्धां त्यांच्याकडे असं पुनःपुन्हा पाहण्याचा मोह मला आवरत नाहीं. शेवटीं बायको मला तेथून ओढून नेते. तिला चहा प्यायची तल्लफ आली आहे. शिवाय रिकाम्या वेळांतल्या गप्पा एकमेकांत चपखल बसण्यासाठीं चहासारखं दुसरं चांगलं साधन नाहीं असं तिचं मत आहे.

पत्र टाकायच्या पेटीपाशींच पोलिसचावडी आहे. तिच्यांतल्या एका पोलिसानं एक खार पाळली आहे. ती त्याच्या खांद्यावरून, डोक्यावरून, हातावरून धावते आणि वाटेल तेथें थांबते. त्याच्या पंजावर किंवा वाकवलेल्या अंगठ्यावर बसून ती तो देईल तें निःशंकपणानं खाते. त्याचं हें प्रेम मी कुतूहलानं पाहतों, आणि खाकी पोशाखांतल्या या जातीविषयीं आपल्याकडे सर्वसामान्यपणें लोकांच्या मनांत जी तेढी भावना असते ती माझ्याहि मनांत आहे, तरी पण या व्यक्तीच्या बाबतींत ती तशी राहत नाहीं.

बोलूनचालून ‘महालसा’! तिच्या परिसरांत आळशीपणानं रेंगाळण्याशिवाय दुसरं काय करायचं? इथलं सारं पाहून झालंच आहे. अखेरीस आळशीपणाचाहि कंटाळा आला आहे. तेव्हां आम्ही मंगेशीला परत येतों...

आत्तां अंधार पडलेला आहे. फोंडा-मंगेशी रस्त्यानं आम्ही चालतों आहोंत. खूप दमलेलों आहोंत, कारण सुमारें पंधरा मैलांची वाटचाल आम्हीं केलेली आहे.

पण या श्रमाचं पुरेपूर माप आमच्या पदरांत केव्हांच पडलेलं आहे. कारण, आम्ही आज दुपारीं नागेश, महालक्ष्मी, रामनाथ आणि शांतादुर्गा हीं देवस्थानं बघितलीं आहेत. या टापूंतलं वनश्रीचं परमावधीचं वैभव आम्हीं मनसोक्त लुटलं आहे. पायीं चालल्यामुळं तर विशेषच! मोटार करून चटकन् जाऊन तसेच परत येणारे महाभाग करंटे! ते काय पाहत असतील कुणास ठाऊक!

आज अक्षय्यतृतीया आहे. रामनाथाच्या भक्तांनीं मोठा खर्च करून देवळापुढं नाट्यमंदिरासारखा एक नवा सभामंडप बांधवला, त्याचा उद्घाटन-समारंभ आणि देवळावर सुवर्णकलश चढवण्याचा विधि आज झाला, त्यामुळं आम्ही गेलों तेव्हां देवळाच्या आवारांत गर्दी खूप होती. कोलाहल, गजबज, अस्वच्छपणाहि होताच. वाद्यं वाजत होतीं, घामानं थबथबलेले भटजी घाईनं वावरत होते, आणि पोरंटोरं वाटेल त्या मिठाया खाऊन हात, तोंड, कपडे चिकट करून घेत होतीं. देवळाला अशा रीतीनं हें असं जत्रेचं स्वरूप आलं होतं, तरी त्याच्या परिसरांतल्या वनश्रीला एवढा म्हटल्या एवढासुद्धां धक्का लागला नव्हता.

ही वनश्री केव्हां नि कुठं सुरू झाली तें मला चांगलं आठवतं आहे. मोटारीचा मुख्य रस्ता सोडून बांदिवडें फाट्यानं उजव्या हाताला आम्ही थोडंसं अंतर चालून गेलों तोंच खडा उतार सुरू झाला आणि उंच उंच पोफळांचीं कुळागरं लागलीं. त्याच क्षणीं आजूबाजूला सगळीकडे दृष्टि फिरली आणि फळझाडांनीं समृद्ध अशा हिरव्यागार खोऱ्यांत आपण उतरत असल्याची जाणीव होऊन, तळावलेल्या डोळ्यांना कानांत तेल घातल्याबरोबर जसं व्हावं तसं उन्हांतून चारपांच मैल चालून आलेल्या आम्हांला झालं.

याच खोऱ्यांत नागेश, महालक्ष्मी, रामनाथ आणि कवळ्याची शांतादुर्गा हीं चार देवस्थानं क्रमानं लागतात. एकमेकांपासून तीं फारशीं दूर नाहींत. या चारी देवालयांच्या परिसरांतल्या वनश्रीचं वर्णन कोठवर करावं? नागेशाच्या समोर एक फारच सुंदर चिरेबंदी पुष्करणी आहे. तिला वळसा घातल्याबरोबर एक पोफळीची बाग लागली. सरळ उंचच उंच वाढत गेलेलीं तीं झाडं जणुं हाताला हात लावून सांघिक नृत्य करण्याच्या तयारीनं कायमचीं उभीं होतीं. त्यांतून प्रत्येक दोन झाडांमधून केळी आपल्या रुंद पानांच्या पिसाऱ्यांनीं त्यांच्या मांड्यांना गुदगुल्या करीत होत्या. खालीं जमिनीवर सगळीकडे दाट सावली झाली होती आणि वरून तिच्यांत हिरवा थंडपणा सारखा निथळत होता. या बागेचं हें दृश्य जितकं विलक्षण तितकीच सुपारीचं पीक उतरण्याची रीतहि विलक्षण! सुपारीचं झाड अतिशय चिवट आणि लवचीक. सुपारी उतरण्यासाठीं माणूस म्हणे एकदां वर चढला, कीं वरच्या वर हेलकावे घेऊन दुसऱ्या झाडाच्या शेंड्यावर जातो, तेथली सुपारी उतरवून तसाच तिसऱ्या झाडावर, तसाच चौथ्या, आणि असं करीत सगळी बाग संपल्याखेरीज खालीं येत नाहीं.

याच्यापुढं महालक्ष्मीचं दर्शन घेऊन आम्ही रामनाथाकडे चाललों होतों. रस्ता

एका प्राकारवजा भिंतीवरून दोन ऐसपैस शेतांना चिरून जात होता. दरींतला हा अगदीं खोलटींतला भाग. आतां तीन प्रहर टळून गेले होते. ऐन मध्यान्हीच्या वेळीं सूर्यानं केलेल्या दांडगाईनं ही वनश्री घायाळ झाली होती, पण आतां त्याला पश्चात्ताप होऊन तिला तो हळुवार हातांनीं गोंजारीत होता. त्यामुळं तिच्या सर्वांगावर तृप्तीचे तवंग दाटले होते आणि त्यांचा नारिंगी सुवास सगळीकडे घमघमत होता...

—आणि कवळ्याच्या शांतादुर्गेच्या परिसरांत आम्ही गेलों तेव्हां तेथें शांतता तरी किती कमालीची आढळली होती! जणुं त्या देवीच्या नांवांतील सार्थकतेला धक्का लागूं नये म्हणूनच...

—आणि प्रथमच दृष्टीला पडलेलं गोव्यांतलं तें मानवी लावण्य! तें घरगुती होतं ही केवढी चांगली गोष्ट होती! नागेशाच्या देवळांत आम्ही पोंचलों तेव्हां दमलों होतों आणि तहान पण सपाटून लागली होती. आमच्या बरोबरच्यांनीं आवारांतल्याच एका घरीं आम्हांला नेलं. उपाध्यायाचं घर, ऐश्वर्य असं कितीसं आहे तेथें? पण सारवलेल्या स्वच्छ जमिनीवर चटई आंथरली गेली, निर्मळ घासलेली तांब्याची कळशी व भांडं पुढं आलं आणि बरोबर एका स्वच्छ ताटांत तप्त सुवर्णासारखे रसरशीत, रसाळ फणसाचे गरे! ते बघूनच आम्ही तृप्त झालों. तेवढ्यांत त्या घरांतल्या पुरुषाबरोबरच एक किशोरी आणि एक तरुणी बाहेर आल्या व आमच्या बरोबरच्यांना कुशल विचारूं लागल्या. त्यांची किलबिल मंजुळ तर होतीच; पण सात्त्विक, लोभस चर्या, गव्हाळी रंग, गालांवर पडणाऱ्या मोहमयी खळ्या, डोळ्यांतलं निरागस वात्सल्य, पौर्णिमेच्या क्षितिजापासच्या चंद्रासारखं भाळावरचं भरघोस कुंकू, हें सारं पाहून मला वेलीवरच फुललेल्या जातिकुसुमांची आठवण झाली. त्यांना लाजल्यासारखं वाटणार नाहीं इतकी सावधगिरी बाळगून मीं त्यांच्याकडे पाहून घेतलं व तेथून निघतांना मनाशीं म्हटलं, ज्या कुणा भाग्यवंतांचीं घरं या उजळ करणार असतील ते यांना श्रमाचं जीवन हवं तर देऊं देत, किंबहुना ऐतखाऊ जीवन यांना नकोच मिळूं दे, पण त्यांच्यापासून यांना हृदयाचं सुख मात्र पुरेपूर लाभूं दे आणि ते स्वतः चारित्र्यसंपन्न असूं देत...

आत्तां अंधारांतून फोंडा-मंगेशीच्या रस्त्यानं परततांना माझ्या मनांत दुपारच्या या साऱ्या आठवणी गोळा झाल्या आहेत व खरं गोमंतक पाहिल्याची तृप्ति माझ्या

अंगप्रत्यंगांतून निथळते आहे...

ही आत्तां डावीकडे फुटलेली पायवाट गेली, ती डोंगरावर चढून जवळच्या रस्त्यानं वांदिवडे खोऱ्याकडे जायची वाट. दुपारीं याच वाटेनं आम्ही गेलों होतों. डोंगरावर काजूचीं झाडं जागोजाग लागलीं होतीं. त्यांचे जांब आम्हीं तोडून खाल्ले. एक फोड खाल्ल्याबरोबर कुणी तरी म्हटलं, "तोठरा बसला कीं जिभेला!"

"म्हणजे काय?" मीं विचारलं.

"मुरट्याची फोड खाल्ल्यानंतर जिभेला जें होतं तें!"

हें स्पष्टीकरण अजब पण सोपं होतं. मला तें आवडलं. मुरटा आणि तोठरा हे दोन्ही शब्द मला अपरिचित होते. काजूच्या फळाला मी जांब हा शब्द लहानपणापासून ऐकत आलों होतों. आतांचा हा नवीन शब्द मला आवडला नाहीं. पण तोठरा मात्र फार आवडला. जिभेची व घशाची अवस्था त्यानं फार सुरेख सुचवली जाते. तो जिभेवर पक्का बसवण्यासाठीं पुढच्या वाटचालींत मीं तो इतके वेळां वापरला कीं, अखेरीस बायको म्हणाली, "त्या तुमच्या शब्दानं आतां माझ्या कानांना तोठरा बसायची वेळ आली. तुमच्या कानांचं सोडून द्या, पण जिभेला तरी अजून कसा नाहीं बसला?"

आमच्यांतला एक जण गाणं म्हणतो आहे. समोर अंधारांत दिवे दिसूं लागले आहेत. म्हारदोळ जवळ आलं असलं पाहिजे. म्हणजे आतां मंगेशी आलीच...

दर सोमवारीं रात्रीं आरतीच्या वेळीं इथं पालखी असते. आज सोमवार नाहीं, पण अक्षय्यतृतीया आहे, म्हणून ती निघायची आहे. आम्हांला हा सोहळा पाहायला मिळतो. मंगेशाच्या उत्सवमूर्तीला एका पालखींत बसवतात, आणि आवारांतच देवळाभोंवतीं प्रदक्षिणा करवून मिरवून आणतात. माणसं बरींच जमतात, पुढं सनई वाजते, वाटेंत ठिकठिकाणीं फटाक्यांचे सर लावतात. मूर्तीवर चवरी ढळत असते. वाटेंत पालखी अनेक वेळां थांबवतात. एक वृद्ध गृहस्थ तिच्या पुढं येतो; तुकारामाच्या अभंगांतला एकादा चरण म्हणतो, आणि बाजूला होऊन गर्दींत मिसळतो. सिनेमाचं चित्रण चालू असतांना 'फटकपाटी' वाजवणाऱ्या पोऱ्यासारखा! नंतर दोन देवदासी तेथेंच माणसांच्या घोळक्याच्या मध्यभागीं येतात, एकादं गाणं म्हणून टाकतात, हातपाय झटकतात, आणि त्या परत गर्दींत मिसळल्यावर पालखी पुढं चालूं लागते. या वेळीं त्यांच्या पायांतले पैंजण वाजतात यावरूनच काय तें त्यांचा नृत्य करायचा उद्देश असतो असं म्हणायचं. नाहीं तर परकऱ्या पोरीसुद्धां झिम्मा खेळतांना अधिक लवलवत असतील!

प्रदक्षिणेचा घेर सुमारें तीनचारशें पावलांचा, तेवढ्यांत पालखी पांचसहा वेळां ही अशी थांबते. भाविकांचं ठीक आहे, पण इतरांना यांत भव्यता किंवा सौंदर्य आढळेल असं कांहींच नाहीं.

आज रात्रीं कुणा तरी भक्तानं देवाची चौकोनी पूजा करवली आहे. कालची अष्टकोनी पूजा पाहिल्यावर ही तिच्यापुढं फिकी वाटते. पूजेच्या वेळचा आरती-नैवेद्याचा सरंजाम कालच्यासारखाच आहे.

आज उकाडा बराच वाटतो आहे. 'प्रायेण सामग्र्यविधौ गुणानां पराङ्मुखी विश्वसृजः प्रवृत्तिः' हें सुभाषित आज विशेषच प्रत्ययाला येत आहे. नाहीं तर विधात्याला गोमंतकांतली हवा थंड करायला काय हरकत होती ? या उकाड्यानं हैराण होऊन आम्ही दीपमाळेच्या चौथऱ्यावर उघड्यांत झोंपतों आहोंत. पालखीच्या गर्दींत माझ्या वहाणा चोरीला गेल्या आहेत, त्यामुळं मी खट्टू झालों आहें आणि आतां वास्कोला गेल्याशिवाय नव्या मिळायचा संभव नाहीं त्यामुळं उद्यांचा दिवस कसा निभेल या चिंतेंतहि आहें. मीं सगळीकडे शोधलं आहे, पण त्या सांपडल्या नाहींत. अखेरीस, "बरं तर बरं, आजची पंधरा मैलांची भर उन्हांतली चाल होऊन गेल्यावर तरी गेल्या!" असं म्हणून मी मनाचं समाधान करून घेतों नि झोंपीं जातों.

१० में, १९५१

आज सकाळीं आम्ही म्हारदोळच्या पलीकडे थोड्याच अंतरावर असलेल्या वेलिंग नांवाच्या गांवीं जातों. इथं तीन छोटीं देवस्थानं आहेत. वेताळेश्वर, शांतादुर्गा आणि नरसिंह. इथलं नरसिंहाचं स्थानच प्रमुख मानतात. हें देऊळ (आणि उरलेलीं दोन्हीहि) मंगेश किंवा कवळ्या शांतादुर्गेपेक्षां लहान आहेत. तरीसुद्धां स्वच्छता, टापटीप आणि शांत प्रसन्न वातावरण हीं जीं गोमंतकांतल्या देवस्थानांचीं वैशिष्ट्यं, तीं इथंहि आढळतात. मला सर्वांत नवल वाटतं तें याचं, कीं हिमालयांतले बद्रिनारायण व केदारनाथ, काशीचा विश्वेश्वर, पंढरीचा पांडुरंग, इत्यादि किती तरी भारतीय देवालयं मीं बघितलीं आहेत, पण सगळीं कुठं अस्वच्छता, कुठं ओल, तर कुठं कुबट वातावरण यांनीं ओंगळलेलीं; मग इथलींच देवळं याला अपवाद कशीं ? भाविकतेची कमतरता नाहीं, ऐश्वर्यहि थोडं नाहीं, मग असा कोणता गुण (कीं दोष म्हणायला हवा ?) यांच्या ठिकाणीं आहे,

कीं त्यामुळं हीं वेगळीं व्हावींत? गोमंतकीय जनतेच्या वृत्तीचा हा आविष्कार असल्यास न कळे.

कांहीं असो, इथल्या या छोटेखानी देवस्थानाशीं निसर्गानं मात्र कोणताच पक्षपात केलेला नाहीं. इथं आम्हांला अमसोलाचीं झाडं भरपूर दिसतात, त्यांचीं फळं आम्ही पाहून घेतों. कच्चीं हिरवींगार आहेत, पिकलेलीं लालभडक आहेत. इथल्या वस्तीमधल्या घरांच्या अंगणांत त्यांच्या ओल्या साली वाळत घातलेल्या दिसतात. आजपर्यंत काळ्या रंगाशिवाय दुसऱ्या कोणत्याच रंगांत त्यांना मीं पाहिलेलं नाहीं. त्यामुळं त्यांच्या जीविताच्या सर्व अवस्था इथं पाहतांना मला विशेषच अपूर्वाई वाटते.

नरसिंहापुढं पुष्करणी आहे. तींत आम्ही डुंबतों आणि मग एका कोपऱ्यांत गोमुखांतून स्वच्छ झऱ्याचं पाणी सतत झुळझुळ पडत आहे त्याखालीं स्नान करून घेतों...

परततांना ऊन झालेलं आहे, आणि पाय भाजताहेत. एवढासा त्रासदेखील आपल्याला सहन करतां येऊं नये याची खंत वाटते, तरी पण डांबरी रस्ता टाळून कांठच्या गवतावरून मी चालतों आणि तें नसेल तेवढ्या भागांत सावलीपासून पुढच्या सावलीपर्यंत पळायचं, तेथें तळवे निवले कीं पुन्हा पळायचं, असं करीत राहतों. बरोबरचे हसतात आणि त्यांना दयाहि येते. शेवटीं जेव्हां मंगेशीला थोडंसं अंतर राहतं तेव्हां मी सावलींत उभा असतांना दोघे पुढं जातात आणि त्यांतला एक जण दुसऱ्याची चप्पल मला आणून देतो. मला ती नाकारवत नाहीं...

आज आम्ही मंगेशीचा निरोप घेणार. मनाला चुकल्या चुकल्यासारखं वाटतं आहे. इथं आम्ही फारच रमलों होतों. गोमंतकांतल्या प्रवासांतला आमचा सर्वांत जास्त अवधि इथं मंगेशीच्या परिसरांतच गेला आहे. ज्यांच्याकडे आम्ही उतरलों आहोंत, त्यांनीं आम्हांला कमालीच्या अगत्यानं व आपुलकीच्या नात्यानं वागवलं. केवळ समाईक ओळखीच्या माणसाच्या चिठ्ठीनं त्यांनीं आमची चांगली सोय केली. त्याबद्दल ते पैसे नाकारताहेत यामुळं तर आम्हांला अतीच संकोचल्यासारखं झालं आहे. आम्ही पुनः पुन्हा त्यांना विचारतों, पण ते पुनः पुन्हा म्हणतात, "तुमच्याकडून नाहीं." आम्हांला चिठ्ठी देणारांचे आणि यांचे संबंध फारच घनिष्ट असले पाहिजेत. यांच्या वाड्यांत माणसं तरी किती उतरावींत! सगळ्या खोल्या तर भरल्या आहेतच, पण पडव्यासोप्यांनाहि अक्षरशः स्टेशनवरच्या 'प्रतीक्षाघराची' कळा आली आहे. तथापि आपलीं कामं बाजूला ठेवून

आमच्याबरोबर ते काल दुपारच्या उन्हांत पंधरा मैल पायपीट करीत आले. हें सारं मनांत आलं, कीं जीव दडपून जातो आणि विचार येतो, "गोव्यांतलं हें आपुलकीचं गार्हस्थ्य आपल्याला कधीं तरी जमलं असतं काय?" याचं उत्तर सांपडत नाहीं आणि संकोच शरमेच्या सीमारेषेवर जाऊन पोंचतो...

पहिल्या दिवशीं त्यांची माझ्याशीं लेखनावरून ओळख करून देण्यांत आली, तेव्हां ते म्हणाले होते, "आहे, वाचलं आहे यांचं पुष्कळ वेळां!" या उत्तरानं साहजिकच माझा अहंकार सुखावला होता. तथापि त्या उत्तराचा त्यांनीं दाखवलेल्या अगत्याशीं संबंध जोडण्याचं माझ्या मनांतहि येत नाहीं. तसं करणं म्हणजे एक तर त्यांच्या सौजन्याचा उपमर्द आहे; दुसरं असं, कीं त्यांच्याकडे किती तरी ज्येष्ठ व श्रेष्ठ लेखक येऊन गेले असतील (किंबहुना, आमच्याबरोबर कारवारहून इकडे किती तरी आले आहेत); आणि तिसरं असं, कीं एक जुना प्रसंग मला सारखा आठवतो व माझ्या अहंकारानं केवढीहि भरारी मारली तरी आपला कार्यकारणभाव तो जोडूं देत नाहीं.

मला आठवण आहे, तेरा वर्षांखालीं मी प्रतापगडला गेलों होतों. तेथें राहणारे एक गृहस्थ गड दाखवायला बरोबर आले. तरुण, ब्राह्मण, बोलण्याचालण्यावरून गृहस्थ सुसंस्कृत वाटत होता. आमच्या पुष्कळ गप्पा झाल्या. गड पाहायला कोणकोण येतात, आले होते, याविषयीं बोलणं निघालं असतां तो म्हणाला, "माधव ज्यूलियन नांवाचे एक कवि इथं एकदां आले होते."

चकित होऊन मी ऐकूं लागलों. तो पुढं म्हणाला, "त्यांना मी असाच गड दाखवीत होतों, तेव्हां मध्येंच त्यांनीं अचानक विचारलं, 'मला तुम्ही ओळखलंत कीं नाहीं?'

"तेव्हां मी त्यांना म्हणालों, 'नाहीं.'

"'मासिकांत, पुस्तकांत कधीं फोटोबिटो नाहीं बघितला?'

"मीं पुन्हा म्हटलं, 'नाहीं.' खरंच मीं बघितला नव्हता.

"ते नाराज झालेले दिसले. त्यांनीं मग स्वतःची ओळख करून दिली आणि म्हटलं, 'यापुढं आतां लक्षांत ठेवा. विसरूं नका.'

"मीं म्हटलं, 'ठीक आहे.' दुसरं काय म्हणणार? पण मीं त्यांना ओळखलं नाहीं यांत माझी काय चूक? पण अशी तऱ्हा असते एकेका माणसाची!"

माणूस...अहंकार...कीर्ति...

दुपारीं आम्ही रस्त्यावर येऊन उभे राहतों. मडगांवकडे जाणारी मोटार

आम्हांला पटकन् मिळतें, तेथेंहि वास्कोला नेणारी लागलीच मिळून आम्ही वास्कोला पोंचतों. अद्याप सूर्यास्त व्हायला भरपूर अवधि आहे. माझ्या पणजीच्या मित्राचं इथं घर आहे. त्यांत आम्ही उतरतों. त्या घरीं एक मुंबईचे पाहुणे आलेले आहेत. गृहस्थ ऐसपैस गोष्टीवेल्हाळ आहे. हौशी आहे. इथं त्याच्या अनेक खेपा होतात. तो प्रत्येक वेळीं कांहीं ना कांहीं इथून घेऊन जात असतो. इथं काय काय घ्यावं याविषयीं त्याच्या सूचना देणं चालू आहे. प्रवासखर्च बाहेर पडावा किंवा पैसे मिळवावेत या हेतूनं तो स्वतः या गोष्टी करीत नाहीं, म्हणूनच त्या सूचना मी ऐकून घेतों, पण माझं तिकडे लक्ष नाहीं. कारण, केवळ स्वस्त मिळतात म्हणून घ्यायचं म्हटलं, तर सामान्यतः ज्या आपण घेणार नाहीं अशा कित्येक वस्तू आपण घेऊं असं मला वाटतं. पण बाकीचे मात्र त्याचं बोलणं उत्सुकतेनं ऐकताहेत.

चहा घेऊन आम्ही भटकायला बाहेर पडतों. त्या पाहुण्यानं पायांत बूट घालून आपल्या चपला मला दिल्या आहेत. मंडई, बाजार, इत्यादि ठिकाणीं फिरवून आम्हांला तो एका मोठ्या दुकानाशीं नेतो. आतां इथं बायका ल्हावसटपणा करणार याची मला खात्री आहे. कारण गोव्यांत आल्यापासून शहरांत खरेदीची हौस निवांतपणान भागवायला त्यांना प्रथमच मिळत आहे. मी दुकानांत थोडा वेळ खुळ्यासारखा रेंगाळतों, मग बाहेर पदपथावर उभा राहतों, नंतर संधि साधून सटकतों आणि जवळच असलेल्या समुद्रतीरावर जातों.

सूर्य मावळला आहे. मुरगांव बंदराच्या टेकड्या काळवंडून गेल्या आहेत आणि त्यांच्या आड अलीकडे कुठं तरी मालगाडीच्या हालचाली चालू आहेत. त्यांचा आवाजच फक्त ऐकूं येतो आहे. प्रयत्न केला तर दिसूं शकतें, पण दृष्टि जरा दूर झाली कीं ती पुन्हां लवकर सांपडत नाहीं. तिला असं शोधण्याच्या खेळांतसुद्धां माझं मन रमतं.

इथला समुद्रतीर एकाद्या आखातासारखा आहे. पाण्यांत बाफोर, गलबतं तरंगत हेलकावत आहेत. समोर मध्यभागीं एक आगबोट अर्घ्यदान करणाऱ्या स्थितप्रज्ञासारखी उभी आहे. ठिकठिकाणीं ती गंजलेली आहे नि तिच्यावर चिटपांखरूं देखील वावरत नाहीं. ही जर्मन बोट युद्धकाळांत इथं आणून बुडवली होती, ती आतां वर काढलेली आहे. मुंबईच्या कुणा व्यापाऱ्यानं, म्हणे, ती मोडींत विकत घेतली आहे. गणितशास्त्रांत आंकडे कल्पनेच्या पलीकडे जाऊन 'अनंत' झाले म्हणजे सगळेच सारखे मानतात त्याप्रमाणं मी या बोटीची किंमत

ऐकली आहे, पण ती किती लाख, दहा कीं एकवीस कीं बत्तीस, तें माझ्या लक्षांत नाहीं. मला त्या साऱ्याच सारख्या वाटतात. मात्र मला वाटतं, ही बोट इथं अशी नुसती गंजत ठेवली आहे, त्याऐवजीं मुंबईच्या त्या व्यापाऱ्यानं ती अद्याप भाड्यानं राहायला कशी दिली नाहीं? किनाऱ्याशीं दळणवळण करायला एक होडी व बोटींतल्या खोल्यांना रंगरंगोटी एवढ्यावर भागलं असतं! दूर डावीकडे दुसरीहि अशीच एक आहे, पण ती पाण्याखालीं आहे. तिचा जो अगदीं थोडा भाग वर दिसतो, तो तळ आहे कीं कुशीचा भाग आहे, तें कळत नाहीं. मेलेल्या माशाभोंवतीं जलचर प्राण्यांनीं घिरट्या घालाव्यात त्याप्रमाणें तिच्या आजूबाजूनीं वाफोर, गलबतं, होड्या जात-येत आहेत. दूर क्षितिजरेषा पट्टीनं आंखावी तशी दिसते आहे आणि मुरगांव बंदराचा धक्क्याचा सुळका पाण्यांत तिला समांतर शिरला आहे.

आतां मुरगांवच्या आणि दोनापावल्याच्या दांड्यांतले दिवे लागले आहेत. मुरगांवचा निळा आणि दुसरा पिवळसर आहे त्याची लकाकी व अंधारउजेडांच्या अवधींचीं आवर्तनं वेगळीं आहेत. या आवर्तनांवरूनच दर्यावर्दी लोकांना त्या त्या स्थळांची ओळख पटत असली पाहिजे.

बऱ्याच वेळानं बाकीची मंडळी हसत खिदळत येते. त्यांनीं ज्या वस्तू घेतल्या आहेत त्यांचं मला हसूं येतं. बायकांपैकीं प्रत्येकीनं मोत्यांचा एकेक कंठा घेतला आहे. किंमत किती, तर पांच रुपये! पुरुषांतल्या एकानं दाढीचीं पातीं, विलायती सुगंधाची बाटली व 'मुखराग' घेतले आहेत. मी त्यांच्याबरोबर परत जायला निघतों. मला वहाणा घेणं मात्र आवश्यक आहे. पण इथं त्या आयत्या मिळत नाहींत. बुटांच्या एका दुकानांत फक्त एक जोड दिसतो; पण तो भिकार आहे. कुणा तरी गिऱ्हाइकानं बहुतेक नाकारलेला असावा. मला तो सैल होतो, तरी मी घेतों. लागलीच पायांत घालून पाहुण्यांच्या चपला पुडक्यांत बांधून मी आभारपूर्वक त्यांच्या स्वाधीन करतों. पण दुर्दैव असं, कीं थोड्याच वेळांत चहा प्यायसाठीं आम्ही सारे एका दुकानांत जातां तेथें तें पुडकं हातोहात चोरीला जातं!...

विकत घेतलेल्या त्या वस्तूंबद्दल रात्रीं शंकाकुशंकांना सुरवात होते. कंठे गळ्यांत घालतां येतील, पण सुगंधी द्रव आणि मुखरागाचं काय करायचं? सरहद्दीवर जकात मागितली तर? लागलीच त्या वस्तु वापरलेल्या दिसाव्यात म्हणून प्रयत्न सुरू होतो. सर्वांच्या हाताला व कपड्यांना सुगंधी द्रव लावला जाऊन सर्वत्र घमघमाट होतो. बाटलींतल्या त्या द्रवाची पातळी आतां पाऊण हिश्यापर्यंत उतरते. मग

सगळीं जणं पावडर भसाभस हातातोंडाला लावून घेऊन बैरागी बनतात! पण त्याची डबी कोरी करकरीत आहे, त्याचं काय करावं? मग ज्याची ती आहे ते ती हातांत आडवी धरतात व लहान मुलानं फरशीला साबण लावावा तशी ती फरशीवर फराफरा घासून तिच्यावर धूमकेतूसारखे दिसणारे पंधरावीस फराटे काढून ठेवतात! मी म्हणतों, "अशा नव्हे तर तशा, पण एकंदरींत या वस्तु महागच पडल्या!"

ꕥ ꕥ ꕥ

११ मे, १९५१

सकाळीं उठून आम्ही मुरगांव बंदरावर जातों. दीड मैल अंतरावर हें गांव आहे. परकीयांनीं याच्या नांवाचं मार्मागोवा हें भ्रष्ट रूप रूढ केलं आहे, तरी इथले लोक मुरगांवच म्हणतात. इथं बोटी पुष्कळ आहेत, यान्या आहेत, गर्दी, धांवपळ सारं आहे. एका बोटीवर उघड्या वाघिणींतून आलेली लाल माती भरभरून चढवली जात आहे. ही कुठं आणि कशाला जात असावी याची मला कल्पना येत नाहीं. मंगलोरला कौलांसाठीं ती जात असेल काय? पण मग लाल कौलांसाठीं लाल माती लागत असेल तर लाल विटांसाठीं काळी माती कां चालवी? धक्क्यावरच्या ज्या भागांत हें काम चालू आहे तेथें आम्ही जाऊं लागतों, पण वाटेंत आम्हांला अडवण्यांत येतं. परवाना पाहिजे आहे; आमच्यापाशीं तो नाहीं. आम्ही अनभिज्ञ असल्यानं लाल मातीची ही शंका अतृप्तच राहते.

बाकीच्या सर्व बंदरांतून आम्ही भटकतों. मालधक्क्याशीं काटकोन करून एक तट आंत पाण्यांत सरळ गेला आहे. गोदीभागांतलं पाणी याच्यामुळं संथ राहत असलं पाहिजे. पण त्याच्या इकडच्या, म्हणजे खुल्या समुद्राकडील, बाजूला चौरस-चौरस आकाराचे, मुद्दाम ढाळून काढलेले, जवळजवळ दहा फूट लांबी-रुंदी-उंचीचे कॉंक्रीटचे ठोकळे वाटेल तसे फेकलेले आहेत ते कशासाठीं? समुद्राच्या लाटा त्यांच्यावर येऊन धडाधड कोसळताहेत. म्हणजे या आडव्या तटाचं संरक्षण करण्यासाठीं हे टाकलेले आहेत कीं काय कुणास ठाऊक?

आतां आम्ही इथून वास्कोला परत गेलों, कीं तेथून दुपारच्या एकच्या गाडीनं परत निघणार. येतांना गाडींत गर्दीचा त्रास पुष्कळ झाला होता. आतां तो

असणारच, पण त्याबरोबरच सरहद्दीवर तपासणीसाठीं आणि लोंढ्याला पुढच्या गाडीला डबा जोडला जाईपर्यंत दोन दोन, तीन तीन तास गाडी थांबेल तेव्हां तें एक मोठं दिव्यच करावं लागणार आहे.

गाडींत आम्हांला जागा तर चांगली ऐसपैस मिळाली आहे. पण मडगांव आणि कोल्वेम येथें माणसं खूप येतील असं एक माहितगार सांगतो. त्याच्याशीं गप्पा मारतांना हेंदेखील कळतं कीं मुरगांव बंदरांतली ती लाल माती परदेशीं जाते, कारण तिच्यांत मँगेनीज चांगल्या प्रमाणांत आहे. हें ऐकून आम्हांला काय वाटतं तें सांगतां येणं अशक्य आहे.

आतां गाडीच्या दोन्ही अंगांना माडांचीं झाडं, वस्त्या, त्यांतून राहणारीं फाटक्यातुटक्या कपड्यांचीं व तसल्याच शरिराचीं माणसं वारंवार दिसतात. मध्येंच गाडी समुद्राच्या जवळून जाते. त्या वेळीं जें दृश्य अगदीं थोडा वेळ दिसून लुप्त होतं तें विलक्षण सुंदर आहे. प्रथम नारळाचीं झाडं, मग पलीकडे एकदम तुटलेला कडा, त्याच्या पलीकडे एकदम खूप खालच्या पातळींत गेलेली शुभ्र पुळण, नंतर किनाऱ्याशीं पुन्हां पुन्हां येऊन लगट करणाऱ्या लाटा, त्यानं झिडकारलं तरी कांहीं मानून न घेतां त्यांनीं केलेलं पांढरंशुभ्र लाघवी हास्य, त्यांच्या पलीकडे खूप खूप खूप दूरपर्यंत निष्कलंक मोरचुदी रंगाचं समुद्राचं पाणीच पाणी... माडांच्या महिरपींतलं हें सारं दृश्य डोळ्यांत सांठवून ठेवायची मला घाई होते. इतक्यांत गाडी आणि समुद्र यांच्यामध्यें भूभाग येतो आणि सगळं नाहींसं होतं. एकादं स्वप्न बघितल्यागत माझी स्थिति होते.

गाडींतली गर्दी खूप वाढते. गोंव्याची सरहद्द. इथं होणारी तपासणी मामुली स्वरूपाची आहे. आतां भारताची सरहद्द येणार. आमच्याच लोकांपासून वेगळे करणाऱ्या या सरहद्दी मला असह्य वाटतात...मग...गेलीं साडेचारशें वर्षं... पोर्तुगीज...डच...इंग्रज...दादाजी राणे आणि दिपाजी राणे...शेहेचाळीसचं आंदोलन...काल मंगेशीहून येतांना वाटेंत फोंड्याला बघितलेल्या सैन्याच्या झोपड्यांवजा बराकी...त्यांच्या आसपास बघितलेले आणि रात्रीं वास्कोलाहि रस्त्यांतून वावरतांना दिसलेले हबशी सैनिक...आज आणि उद्यां...

हवेंत गारठा आला आहे. आकाश कसलं काळवंडलं आहे! पाऊसहि येऊन जातो. दूधसागराचा धबधबा, पहाडच पहाड, झाडीच झाडी, दऱ्याच दऱ्या, पुन्हां डोंगरांच्या रांगा, आणि त्यांच्या पलीकडे दूर दूर एकाद्या प्रचंड फळाच्या दाट काळ्या सालीचा आडवा तुकडा सोलतांच आंतला नारिंगी गर तेवढ्या भागापुरताच

दिसावा तसा वाटणारा क्षितिजाजवळचा झगझगीत पट्टा...

टक लावून पाहून मला धुंदी येते.

भारताची सरहद्द जवळ येऊं लागली आहे. आमच्या डब्यांतली एक वल्ली पितळेच्या परळींतून उरलंसुरलेलं मद्य पिऊन घेते आहे. मुंबई प्रांतावरची ही नाट्यपूर्ण टीका पाहून मला हसूं येतं. त्याचबरोबर मला हा गोमंतकाचा उपमर्द वाटतो...आणि या दोन्ही गोष्टी सोडून दिल्या, तरी मद्य काय असं प्यायचं असतं?

कॅसलरॉकला गाडी थांबते. लागलीच सर्व डब्यांना बाहेरून कुलपं लावतात. बाहेर फलाटाच्या विरुद्ध बाजूला किती तरी पोलिस कुंपणाच्या खांबासारखे उभे राहून पहारा करतात. मग क्रमाक्रमानं तपासणी सुरू होते. आम्हांला कसलाच उपद्रव होत नाहीं. एका बोजांतून साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणाची छापील पुस्तिका निघते, तेव्हां अधिकारी विचारतो, "कारवारला संमेलनाला गेलां होतांत?"

आम्हीं हुंकार देतों.

तो विचारतो, "कसं काय झालं संमेलन?"

आम्ही म्हणतों, "उत्तम!"

तो मग बाकीचं सामान धड तपाशीतहि नाहीं. त्यानं आमच्यावर टाकलेल्या या विश्वासाचा द्रोह घडण्याजोगं आमच्याजवळ कांहीं नाहीं, आम्हीं बुद्धिपुरस्सर आणलेलं नाहीं, हा विचार सुखदायक आहे...

•

# सारनाथ आणि बनारस

मुंबईहून आज रात्रीं साडेआठला निघालेली कलकत्ता मेल उद्यां रात्रीं अकराच्या सुमारास मोगलसराईला पोंचते. तेथून आपल्याला काशीला जायचं असलं, तर त्या सुमारास दोन गाड्या आहेत. एक लवकरची, पण ती दुसरीकडून येऊन काशीकडे जाते; तर दुसरी उशीरांची, सुमारें अडीच तासांनंतरची, पण ही खुद्द मोगलसराईहूनच सुटते. आम्ही खूप जण होतों आणि आमचं सामानहि ढीगभर होतं म्हणून आम्ही दुसरीच ठरवली. एर्वीतेर्वी अपरात्र झालीच होती, मग बारा काय अन् दोन काय, सारखंच होतं!

आमची उशीरांची गाडी पलीकडल्या फलाटावर उभीदेखील होती. तिच्यांत माणसं तर नव्हतींच, पण उजेडदेखील नव्हता. एक डबा धरून सामान रचून ठेवलं आणि आम्ही भटकायला मोकळे झालों.

स्टेशनाच्या आवारांत तिकीटघरापाशीं आमचं मराठी ऐकून एक जण आमच्यापाशीं आले व चौकशी करूं लागले. आम्ही काशीला जातों आहोंत हें कळल्यावर ते आमची सर्व सोय करून देतों म्हणाले. त्यांचं नांव महाराष्ट्रीय, बोली शुद्ध मराठी आणि भाषाहि अतिशय अगत्याची. ते काशीचे एक पंड्ये. आमचं अमक्या ठिकाणीं उतरायचं असं कांहीं ठरलं नव्हतंच. फक्त एक-दोन धर्मशाळांचीं नांवं आम्हीं लक्षांत ठेवलीं होतीं. तेव्हां आम्हांला एकदम हायसं वाटलं. तथापि त्यांची 'वृत्ति' आणि आमचे हेतु जुळणारे नव्हते. तेव्हां आपुलकीच्या पोटीं गैरसमज किंवा अपेक्षाभंग होऊं नये म्हणून आम्ही यात्रेकरू नसून केवळ प्रवासी आहोंत, धर्मकृत्य कुणीच करणार नाहीं, इत्यादि सारं स्पष्ट सांगून त्यांची 'अपेक्षा' विचारली. त्यांनीं सांगितलेला आंकडा बेताचाच होता. तो कबूल करून आम्ही निश्चिंत झालों.

पंड्याजी पहिल्या गाडीनं पुढं जात होते. स्वतःच्या कांहीं कामं उरकून काशी किंवा तिच्या पुढच्याच 'बनारस छावणी' स्टेशनावर आम्हांला गाठण्याचं त्यांनीं कबूल केलं. आम्ही बनारस छावणीचीं तिकिटं काढून परत आमच्या फलाटावर आलों तों मध्यरात्रीचा सुमार झाला होता.

मोगलसराई स्टेशन चांगलं मोठं, प्रमुख फलाट भरघोस लांब आणि त्यावर भरपूर दिवे व उजेड आहे. इकडे आवार ऐसपैस रुंद असून त्यांत मालगाड्या, सुटे डबे, त्यांची जोडसोड चालू असते. एखादं सुटं इंजिनदेखील वर ताठ मान करून, आणि छाती पुढं काढून सतत फुसकारीत असलेलंहि आढळतं. मध्यरात्रीच्या वेळीं अशा स्टेशनाच्या फलाटावरून नुसतं हिंडण्यांतहि मजा असते. लहानपणापासून आगगाडी आणि तिचं आवार यांविषयीं मला विलक्षण मोहिनी पडत आली आहे. त्या दिवशीं तर जागा व मुक्काम यांविषयीं निश्चित झाल्यानं नुसत्या येरझारा घालतांनाच माझं मन रमलं. या फलाटावर उजेड बेताचाच होता, त्यामुळं अधिक शांत वाटत होतं. आमची गाडी कुठपर्यंत जायची होती कोण जाणे, पण तिच्यांत गर्दी होण्याचीं लक्षणं अजिबात दिसत नव्हतीं. आवारांतल्या अंधारांत निरनिराळ्या उंचीवर आणि निरनिराळ्या अंतरावर अनेक ठिकाणीं कुठं तांबडे तर कुठं पांढरे दिवे, सामान्य माणसाच्या जीविताप्रमाणं, तेवत होते.

स्वतःच्याच पावलांचा आवाज ऐकत मी रेंगाळत इकडेतिकडे फिरत होतों. मध्येंच माझं फलाटाच्या अगदीं टोकाला लक्ष गेलं. तिथं जमिनींतून वाफेचे लोटच्या लोट बाहेर पडत होते. अधिक जवळ गेलों तों रुळाच्या एका जोडीमध्यें चांगला प्रशस्त लांबट चौकोनी चिरेबंदी खड्डा दिसला. त्याच्या आंत दगडी कोळशांची राख होती. तिच्या ढिगावर नुकतंच पाणी टाकलं असावं, त्याच्या त्या वाफा होत्या. दिव्यापासून जरा दूरच, मंद प्रकाशांत त्या वाफांवर एक गूढतेचं वातावरण आल्यासारखं झालं होतं; व कसली तरी अनामिक ओढ लागून, एखाद्या चित्रकारानं स्टेशनाच्या या आवाराचं ह्या वेळचं हें दृश्य शाश्वताच्या रसायनांत गोठवून टाकायला पाहिजे, असं मनाशीं म्हणत मी त्या खड्ड्याच्या अगदीं कडेशीं गेलों तर अधिकच थक्क झालों. वाटला होता त्यापेक्षां तो खड्डा जास्त खोल होता आणि मघाशीं न दिसलेला, सातआठ वर्षांचा एक छोकरा, फाटक्या अंगाचा व फाटक्या कपड्यांचा, ती भिजलेली राख कडेकडेनं चिवडीत त्यांतून अपुरे जळलेले कोळसे वेंचून बाजूला काढीत होता. मध्यरात्रीचा तो अंधार, ऐन हिंवाळ्यांतला गारठा, फलाटावरचा तो मंद प्रकाश, अधांतरीं तरंगत असलेले अनेक पांढरे-तांबडे दिवे...शांति आणि युद्ध . माणसं आणि माणसं...

मग पहांटे पावणेदोन वाजतां आमची गाडी मोगलसराईहून सुटली आणि लागलीच काशी आली व गेली. नंतर 'बनारस छावणी' आली. तिथं सगळं सामान उतरवून घेतलं, गाडी थोडा वेळ थांबून निघून गेली, पण पंड्याजी

उगवले नाहींत. आमच्या मनमोकळेपणाची परतफेड प्रांतबांधवाकडून परप्रांतांत तरी अशी होईल ही कल्पना येईना आणि आम्ही त्यांची वाट पाहत बसलों. सामान खालीं आलं होतं. फलाटाच्या टोकाला, आमच्या डब्यासमोर तिथं उघडी जागा व झोंबरं वारं होतं तें हाडं फोडीत होतं. पण हमाली पडेल ती एकदांच पडूं दे, यां विचारानं कांहीं जण तिथंच वाट पाहत राहिलों. अर्धा तास...पाऊण तास...एक तास...मग प्रांतबांधव असले तरी पंड्याजी हे पंड्याजीच आहेत याची खात्री पटली व सामान निवाऱ्यांत घेऊन फलाटावरच आडोशाला पथाऱ्या पसरून दिल्या. दोघे जण गांवांत जागेच्या शोधासाठीं गेले ते केव्हां परतले कुणास ठाऊक!

सकाळीं जागं लवकरच व्हावं लागलं. 'बनारस छावणी' स्टेशनांतून बाहेर पडलं, कीं सर्वत्र बहुजनसमाजी वस्तीच लागते. त्यांतच स्टेशनापासून सुमारें पांचशें कदमांवर श्रीकृष्ण धर्मशाळेंत दोन खोल्या भाड्यानं घेतल्या. दिवसाला भाडं फक्त आठ आणे म्हणजे पुष्कळच स्वस्त वाटलं. खोल्यांत केवळ समानच ठेवायचं होतं. कारण आज रात्रींच आम्ही इथून पुढं कलकत्त्याकडे जायचे होतों.

कांहीं वेळानंतर मग आम्ही दोन मोटारी केल्या आणि बाहेर पडलों.

झाडावरचीं फुलं खसाखसा ओरबाडून काढावींत त्याप्रमाणं एखाद्या गांवांतलीं प्रेक्षणीय स्थळं मोटारींतून धांवतपळत पाहणं मला पसंत असत नाहीं. परंतु दुसरा उपायच नव्हता. इतक्या दूरच्या या प्रवासांत बनारससाठीं आम्हांला फक्त एकाच दिवसाचा अवधि बाजूला काढतां येत होता. तेवढ्या वेळांत सगळं तर सोडाच, पण जें पाहूं तेंसुद्धां सावकाश, चिंतन करीत पाहणं शक्य होणार नव्हतं. काळ, काम आणि वेग दैनंदिन व्यवहारांत सूत्रानुसार वागत असतील, पण प्रवासांत मात्र काळाची शिरजोरी माणसाला सहन करावीच लागते. तिचा थोडासा प्रतिकार करण्याचं मोटार हें एक साधन एवढंच.

आमच्या मोटारी प्रथम सारनाथकडे वळल्या.

भूभाग सपाट होता आणि मोहरी-तुरीचीं शेतं लागत होतीं. मोहरीचीं झुडुपं खुजीं, झगझगीत हिरवींगार, आणि त्यांच्यावर पिवळीं पिवळीं धमक डंवरलेलीं फुलंच फुलं! तर तुरीचीं शेतं त्या मानानं थोडीं अधिक उंच आणि काळपट हिरव्या रंगाचीं. मध्येंच कुठं कुठं डेरेदार वृक्ष असायचे. तुरी-मोहरीचीं शेतं एकमेकांना लागून वाढलेलीं दिसत, तेव्हां त्या मोठ्या वृक्षांभोंवतीं हिरव्या चिऱ्यांचे अफाट पार बांधलेले दिसल्यागत वाटे. आयुष्यांतला बराच काळ शहरांत

घालवलेल्या मला हीं एवढीं शेतं पाहून काळजांतला कुठला तरी चषक फुटून मनाचा द्रव वाहत पसरत गेल्याचा भास झाला. गंगाकांठ...हरिद्वार...कल्पना-शक्ति या शेतांना अनेक मैल लांबरुंद पसरवून दृष्टि ठरणार नाहीं व छाती अभिमानानं फुलून येईल इतकीं विस्तीर्ण करवून घेत होती. पण प्रत्यक्ष मात्र आजूबाजूला जागोजाग मोडकळीला आलेलीं खपरेलं, उघडींनागडीं पोरंटोरं, बरगड्या बाहेर आलेलीं गुरं, सैरावैरा धावणाऱ्या कोंबड्या-शेरड्या, उकिरडा, दारिद्र्य, दैन्य दिसत होतं आणि पोटांत कुठं तरी कालवत होतं.

मग केव्हां तरी सारनाथाच्या स्वच्छ आणि वेगळ्याच वातावरणांत गेल्यावर मनाला काय होतं आहे तें कळेना. परंतु मन कोरं करून घेणं भाग होतं...भद्र लोकांच्या निढावलेल्या मनाला या गोष्टी कठीण असत नाहींत...

आतां बौद्ध वातावरण सुरू झालं. आम्हीं बुद्धमंदिरांत प्रवेश केला. इथं मध्यभागीं बुद्धाची तुकतुकीत संगमरवरी मूर्ति आहे. सभोंवार मेणबत्त्या, नीरांजनं असून तीं पेटलेलीं नसलीं तरी वातावरणाला शुचिता आल्यासारखी वाटते व मन प्रसन्न होतं. इथल्या चहू बाजूंच्या भिंतींवरून बुद्धचरितांतील प्रसंगांचीं छापील चित्रं चौकटींतून टांगलेलीं दिसतात. सार्लिस नांवाच्या चित्रकारानं तीं काढलेलीं असून कोलंबोच्या कुणा पेद्रीस नांवाच्या माणसाकडे त्यांचे हक्क असल्याचा इशारा प्रत्येक चित्राच्या तळाशीं आढळतो. सारीं चित्रं आपल्याकडच्या धुरंधर प्रकृतीचीं म्हणजे सर्व व्यक्तींचे मुखवटे एकाच छापांतून काढलेले दिसतात. त्यांतून बायकांच्या तोंडांची ठेवण एकजात ग्रीक वळणाची तर भारतीय व्यक्तींना अगदीं विसंगत वाटते. मनानं त्या काळच्या वातावरणांत जायचा प्रयत्न केला तरी चित्रांत गोडी वाटेना, कीं एकाहि चित्रापुढं रेंगाळायची इच्छा होईना. बुद्धाची संगमरवरी घोटीव मूर्ति नसती तर थोडा वेळहि इथं थांबवतं ना. कोपऱ्यांतली एक चिनी घंटा मात्र नाविन्यपूर्ण व प्रेक्षणीय वाटली. तिचा घाट उभट आहे, घेर व उंची घसघशीत, शिवाय तिच्यावर बाहेरून कोरीव काम असून, स्तूपाच्या प्रवेशद्वाराशीं असते तशा महिरपींत ती टांगल्यामुळं एक वेगळीच भावना मनांत तरंगते.

या मंदिरांतून बाहेर पडल्यावर माणूस मागल्या बाजूला एका दालनांत संग्रहालय आहे तिथं जातो. इथं अनेक वस्तु मांडून ठेवलेल्या आढळतात. आपल्याकडे जिला आपण कुबेराची मूर्ति म्हणतों, तशी एक तिथं आहे. एखाद्या शेटजी-सारखा बसलेला तो गलथान, ढेरपोट्या; आणि तोंडावर दांभिकपणाचं हास्य! ही मूर्ति इथं कशाला, असं मी मनाशीं म्हणतों, तोंच शेजारीं बाटाड्यासारखा दिसणारा

एक माणूस वावरत होता, तो अनाहूतपणें म्हणाला, "जिन्होंने यह मंदिर बनवाया, उनकी मूर्ति." मग चेंगिजखानी चर्येच्या एका व्यक्तीच्या जुनाट तसविरीकडे पाहत मी उभा होतों, तेव्हां तो म्हणाला, "जो इस मंदिरका खर्चा दिलवाते हैं, उनकी तसवीर." त्याच्या माहितीकडे दुर्लक्ष करण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. नाहीं तरी माहितीपेक्षां कांहीं कलाकुसरीच्या वस्तु दिसताहेत का, तेवढंच आम्हांला पाहायचं होतं. त्या दिसल्या तसे तोंडून उद्गार निघाले, "अहाहा!" कारण भिंतीजवळच्या टेबलावर शिसवीचे दोन चिनी आकाशदिवे दिसले. सुमारें दोन वीत उंचीचे. नाजूक व मनाला गुदगुल्या करणारं कोरीव काम. चिनी संस्कृतीचं प्रतीक. आकाशदिवे .. पतंगाप्रमाणं माणसाच्या मनाला उंच आभाळांत तरंगायला लावणारे आकाशदिवे...

या दोन आकाशदिव्यांमध्यें ग्यासची बत्ती होती! दिवसा ती पेटवून ठेवली नव्हती हेंच नशीब! तरी पण ती तिथं असल्यामुळं आकाशदिवे अधिकच चांगले वाटत होते.

इथून बाहेर रस्त्यावर येऊन शेजारीं असलेल्या 'मूलगंधकुटिविहारा'च्या आवारांत माणूस जातो. हें आवर अतिशय विस्तीर्ण आहे आणि महाबोधि सोसायटीनं त्याची निगा पण चांगली राखली आहे. जिकडे तिकडे प्रशस्त हिरवळी आणि मध्येंच एके ठिकाणीं जमिनींतून उगवलेल्या बांबूंचा कुंज आहे तो एकदम लक्ष वेधून घेतो.

या विहारांतहि बुद्धाची मूर्ति आहे. त्याच्या पायऱ्या सुरू होतात, तिथं दोन चिमुकल्या घुमट्या दोन्ही अंगांना आहेत. त्यांतल्या एकीभोंवतीं एक नेपाळी प्रौढा मंत्र पुटपुटत प्रदक्षिणा घालीत होती व तिच्या हातांत लाकडी जपयंत्र होतं तें फिरवीत होती. दांडा, त्याच्यावर सुमारें पांच बोटं उंचीची रीळवजा लाकडी डबी, तिला दोरी बांधलेली व तिला खड्यासारखं वजन टांगलेलं. लहानपणीं असलं एक खेळणं आम्ही फिरवीत असूं व त्याला 'रॅंयूरॅंयू' म्हणत असूं. कारण तें फिरवतांना तसा आवाज निघायचा. हें जपयंत्र स्तब्ध होतं. पुण्यसंचयासाठीं त्या प्रौढेचे ते कष्ट चालू होते. तिला तें मिळणार होतं कीं नाहीं कुणास ठाऊक; मनःशांति तरी तिला लाभो, असं म्हणत आम्हीं विहारांत प्रवेश केला.

आंत गेल्याबरोबर माणूस एका अरुंद खोलींत शिरतो. इथं मध्यभागीं डोक्याच्या पातळीवर एक घंटा आहे व तिच्यापुढं दोऱ्यांच्या टांगण्यांनीं एक वासा आडवा टांगता ठेवला आहे. घंटेला 'लोळी' नाहीं; तर या वाशाला झोका दिला कीं तो तिच्यावर आदळतो व गंभीर आवाज घुमायला लागतो. घंटा खूप मोठी आहे.

या विहाराच्या गाभाऱ्यांत बुद्धाची भव्य सोनेरी मूर्ति आहे. गाभाऱ्यापुढचा सभामंडपहि भव्य व रुंद आहे. येथील भिंतींवर खूप मोठीं चित्रं रंगवलीं आहेत. उघड उघड ह्या अजिंठ्याच्या प्रतिकृति आहेत. पण रंगांच्या सर्व छटा आधुनिक, त्यांची डूबहि अगदीं फिकट, आणि सारीं फवारा मारून काढलेलीं आहेत; त्यामुळं अजिंठा कुठल्या कुठंच राहतो व सारीं चित्रं थिएटरांतली सवंग सजावट वाटतात.

याच आवारांत 'धम्मेख' नांवाचा स्तूप आहे. इथं गौतम बुद्धानं पहिलं प्रवचन केलं. या स्तूपाचा सर्व पृष्ठभाग भूतकाळांत केव्हां तरी कोरीव कामानं आच्छादलेला असला पाहिजे. कारण, खालच्या उभट भागांत त्याचे अवशेष दिसतात. पण वरच्या गोलाईच्या सर्व पृष्ठावरचं कवच निघून गेलेलं असून आतां सारा वरचा भाग कोचदार विटांचा, उखीरपाखीर व खरबरीत आहे. तथापि उंचपणा, साधेपणा आणि भव्यता यांनीं हा स्तूप डोळ्यांत भरल्याशिवाय राहत नाहीं. या स्तूपाला प्रदक्षिणा घालायची म्हटलं तर घेर सहज चारपांचशें कदमं भरेल.

पूर्वीं हा सारा भाग अगदीं दुर्लक्षिलेला होता. सभोंवार रान होतं आणि या टापूंत डुकरं वावरत असत. पण महाबोधि सोसायटीनं ह्या जागेला आज रम्य उपवनाचं स्वरूप आणलं आहे. हें मूलगंधकुटिविहारहि तिनंच बांधलं आहे. महाबोधि सोसायटी सुमारें साठ वर्षांपूर्वीं स्थापन झालेली एक आंतरराष्ट्रीय संस्था असून भारतांत बौद्ध धर्माचं पुनरुज्जीवन करणं, पाली व संस्कृत भाषेंतील बौद्ध ग्रंथ छापून त्यांचा प्रसार करणं हें तिचं ब्रीद आहे. ही संस्था शिक्षण देऊन बुद्धभिख्खु तयार करते व ते धर्मप्रचाराचं कार्य करतात. हिचं मुख्य केंद्रस्थान कलकत्त्याला असून तिच्या शाखा भारतांत अनेक ठिकाणीं आहेत. परदेशांत कालिंपॉंग, सिलोन, जर्मनीमध्येंहि आहेत.

धम्मेख स्तूपाच्या पलीकडच्या अंगाला उत्खननाचे अवशेष आहेत. उत्खनन केल्यानंतर राहिलेले खड्डे, चर तसेच व्यवस्थित स्वरूपांत ठेवले आहेत व भूगर्भांत सांपडलेल्या बांधकामालाहि धक्का लावलेला नाहीं; किंवा दुरुस्तीहि केलेली नाहीं. हलवतां येण्याजोग्या वस्तु मात्र उचलून नेऊन जवळच्याच जागीं व्यवस्थित संग्रह करून ठेवलेल्या आहेत.

या उत्खननांतून वावरतांना मन उदास होतं. कारण इथं उध्वस्त विश्वाशिवाय दुसरं कांहीं आढळत नाहीं. जिकडेतिकडे शांत असतं. प्रेक्षणीय स्थळं पाहण्यास आलेल्या व्यक्तिसुद्धां धम्मेख स्तूप पाहूनच दुसरीकडे जातात. इथं एखादुसराच प्रवासी आढळतो. एका चराला लागूनच जमिनीच्या पृष्ठाखालीं इथं एक मुख्य

मंदिर व त्यांत विटांचा एक लहानसा स्तूप आहे. तेथें गेलों तेव्हां तर एक तिबेटी माणूस त्या स्तूपांतील एका विटकरीचा तुकडा उचकटून, जवळच्याच दगडावर आपटून तिची भुकटी एका डबींत भरून घेत होता. स्वतःच्या संग्रहीं ती पवित्र भुकटी राहावी ही त्याची इच्छा. आम्ही तेथें पोंचलों तेव्हां तो स्तब्धपणानं हसला व त्यानं लपकन् जीभ बाहेर काढली.

माझ्या बरोबरचे गृहस्थ म्हणाले, "त्यानं काय केलं कळलं?"

"काय केलंन् त्यानं? आपलं चौर्यकर्म आणि प्राचीन वास्तूची नासधूस केल्याचं उघडकीला आलं म्हणून शरमिंदा झाला ना?"

"छे, छे! त्यानं आपल्याला प्रणाम केला. तिबेटी लोकांची ही नमस्कार करण्याची पद्धत."

रस्त्याच्या पलीकडे पुराणवस्तुसंग्रहालय आहे. त्यांत असंख्य वस्तु आहेत. त्यांची मांडणी पण वर्गवारीनं व टापटिपींत केलेली दिसते. असल्या संग्रहालयां-तून वावरतांना तज्ज्ञांना काय वाटत असेल तें असो, पण सामान्य माणसाची छाती तरी दडपून जाते. भंगलेल्या आणि अभंग राहिलेल्या मूर्ति, वस्तु, त्यांचीं वेगवेगळीं व अपरिचित नांवं, त्यांचे ते कालखंड, तीं इसवी सनापूर्वीचीं आणि नंतरचीं शतकं, इतिहासाच्या परीक्षेपुरत्या केलेल्या अभ्यासांतून कधीं तरी येऊन गेलेलीं आणि म्हणून क्वचित् आढळणारीं परिचित नांवं माणूस प्रथम प्रथम कटाक्षानं वाचतो. पण पुढं पुढं इतकं सारं लक्षांत ठेवून ठेवून ठेवणार तरी किती नि कशासाठीं अशा विचारानं तो भांबावून जातो. मग खंत वाटायला लागते व शेवटीं मन बधिर होतं. अखेरीस राहते ती केवळ कलेची आवड व कलाकृति पाहण्याची उत्सुकता. एखादं सुंदर शिल्प दिसलं, कीं हरखून तो तिच्यापुढं थबकतो. पण तेंहि फार वेळ जमत नाहीं. वेळेचा काच जाणिवेला सलत असतो. शेवटीं त्यांतल्या कांहीं वस्तु विसरतात, कांहीं लक्षांत राहतात.

या वस्तुसंग्रहालयांत माझी अवस्था हीच झाली. साऱ्या वस्तूंसमोरून मी सरकत गेलों आणि जेव्हां बाहेर पडलों तेव्हां, आज भारताचं बोधचिन्ह झालेले अशोकस्तंभावरील चार सिंह, त्यांच्या खालीं असलेल्या पशूंपैकीं 'बलीवर्द' हें नांव सार्थ करणारा धष्टपुष्ट बैल,- त्यांच्यामधलीं तीं अशोकाचीं धर्मचक्रं आपण मूळ स्वरूपांत प्रत्यक्ष पाहिलीं याचा आनंद काय तो शिल्लक होता...

आमच्या मोटारी यानंतर सारनाथहून परत बनारसकडे आल्या. वाटेंत भारत-

माता मंदिरापाशीं त्या थांबल्या. भारतमाता मंदिर म्हणजे भारतमातेचें मंदिर. यांत भारतमाता कुणा स्त्रीच्या स्वरूपांत नसून 'स्वाभाविक' नकाशाच्या स्वरूपांत आहे. जमिनींत व्यायामशाळेंतल्यासारखा आखाडा खणून त्याच्या तळाशीं हा नकाशा तयार केलेला आहे. चौरस आकाराचे संगमरवरी दगड बसवले आहेत व त्यांच्यावर नद्या व उंचसखल भाग खोदकामानं दाखवले आहेत. आखाड्याच्या वर सभोंवार कठडा आहे. मनाला प्रसन्न वाटत नाहीं. देवळांतल्यासारखी माणसांची ऐसपैस येजा, रेंगाळणं आणि गटागटांनीं गप्पा चालू असतात. शिवाय नकाशांतहि कुठं तरी, कांहीं तरी खटकल्यासारखं वाटतं, वेढबपणा वाटतो, थिटं-थिटं वाटतं. त्याचा उलगडा दारापाशीं एका शिळेवर लिहिलेला हिशेबाचा तपशील वाचल्यावर झाला. सर्व नकाशाला साडेसहा मैलांना एक इंच तर हिमालय व इतर पर्वतांच्या शिखरांना दोन हजार फुटांना एक-इंच असं प्रमाण धरलेलं आहे.

तेथून मग मोटारी बनारस विद्यापीठाकडे गेल्या. वाटेनं जातांना वस्ती विरळ वाटत नव्हती आणि आपण आतां गांवांत आहोंत कीं गांवाबाहेर याचा पत्ता लागत नव्हता. शिवाय मोटारींतून जात असल्यानं अंतराचा अंदाज येत नव्हता.

विद्यापीठ अफाट असून त्याचा घेर दहा मैल आहे. यांत सर्व प्रकारचीं कॉलेजं असून त्या त्या कॉलेजांचीं वसतिगृहं त्यांच्यासमोरच आहेत. अर्थातच या अजस्र व ऐसपैस आवारांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांची फारच मोठी सोय होत असली पाहिजे.

सगळीं कॉलेजं किंवा वसतिगृहं किंवा इतर इमारती तपशीलवार पाहणं शक्यहि नव्हतं व त्याची जरुरी पण नव्हती. सर्वांत प्रेक्षणीय काय काय आहे याची चौकशी करतां प्राच्य विद्या कॉलेजाचं सभागृह पाहण्यासारखं आहे असं कळलं, म्हणून तिकडं गेलों. सभागृह लांब, रुंद आणि उंच भरपूर आहे हें खरंच, पण मी डेहराडूनचा आंतून सर्व बाजूंनीं लाकडाची तक्तपोशी बसवलेला अजस्र बिनखांबी हॉल बघितला होता, शिवाय जुन्या गोव्यांतल्या भव्य इगर्जीहि बघितल्या होत्या, त्यामुळं या सभागृहांची भव्यता विशेष डोळ्यांत भरली नाहीं. या सभागृहाच्या भिंतींत संगमवरी शिळांचे तक्ते बसवून त्यावर 'अर्ध शिल्पी' कोरीव काम आहे. त्यांना वेगवेगळे रंग दिलेले बघितले तेव्हां तर त्या बालिशपणाचं हसूंच आलं. पुण्यांतल्या तुळशीबागेंतल्या भिंतींमधल्या महिरपींतून सनई-चौघडा वाजवणाऱ्यांचा ताफा, हत्ती, घोडे, इत्यादिकांचीं चिमुकलीं हातभर उंचीचींच अनेक चित्रं लहानपणीं मीं बघितलीं आहेत. नानाच्या वाड्यांतील भिंतींवरूनसुद्धां पेशवाई काळांत काढलेलीं दशावतारांचीं चित्रं पाहिलीं आहेत. जुन्या चित्रकारांची परंपरेनं

अनुक्रम...........
सारनाथ आणि बनारस ..... नों: दि: .......
क्रमांक ...........

आलेली ती कला वेगळीच होती, आणि त्यांत वेगळीच गोडी वाटे. इथला सारा प्रकार घेड्गुजरी वाटत होता. त्यांत धड आधुनिकताहि नव्हती किंवा जुनेपणाहि नव्हता. तथापि त्यांतल्या त्यांत नुसत्या संगमरवरी पृष्ठभागावर पातळीचा भंग न करतां नुसत्या बाह्य रेषांनीं काढलेलीं कांहीं चित्रं बरीं वाटलीं. पण त्यांची संख्या त्या मानानं थोडी आहे. फक्त पंधरा. या सभागृहांत रविवारीं गीतेवर प्रवचन चालतं असं ऐकलं.

आजूबाजूला मंडळींमध्यें या सभागृहाची स्तुति चालली होती आणि आपल्याच विचारसरणींत कुठं तेढेपणा आहे कीं काय याचा माझ्या मनाशीं संभ्रम उडाला होता. पण त्या सभागृहांत कांहीं केल्या माझं मन फुलून येईना.

मात्र एकूण विद्यापीठाच्या आवरांतली टापटीप, स्वच्छता, शांतता, भरपूर रुंद रस्ते, हिरव्यागार झाडांची रेलचेल, या साऱ्या वातावरणाचा मनावर फार अनुकूल परिणाम झाला होता. विद्यार्जनाला खरोखरच आदर्श असं हें ठिकाण वाटत होतं. भविष्यकाळाची चाहूल लागून तरुण विद्यार्थ्यांचीं मनं काळवंडलेलीं नाहींत अशी अवस्था जेव्हां केव्हां येईल, तेव्हां हें निरभ्र वातावरण सर्वच दृष्टींनीं आदर्श होईल.

दशाश्वमेध घाट !

हें नांव ऐकल्याबरोबर कांहीं तरी भव्य, दिव्य डोळ्यांपुढं तरळून गेलं. आणि माझं मन संस्कृत साहित्याच्या लालित्यानं व कर्णमाधुर्यानं लहरून गेलं. कुठल्या तरी लोकोत्तर दृश्याची अपेक्षा मी करूं लागलों.

परंतु प्रत्यक्ष दशाश्वमेध घाटाच्या चौकांत आल्यावर बघितलं तरी चहूंकडे गर्दी धांवपळ आणि रेंगाळणारीं माणसं, गलगा, रस्त्याच्या कडेला उभ्या राहिलेल्या चकचकीत मोटारी आणि त्यांच्याच बरोबर बुरसलेल्या व डबडीं झालेल्या लॉऱ्या, देवाला वाहिलेल्या गुरांची गर्दी, धूळ, माती, सांडपाण्याचे ओहोळ, केरकचरा, उघड्यावर ठेवलेल्या खाद्य पदार्थांचीं दुकानं, घोंघावणाऱ्या माशा...बनारस हे शहर आहे हें माहित असूनहि भलत्याच अपेक्षा करण्यांत माझाच मूर्खपणा झाला होता ! मला हिमालयाची आठवण झाली. तिथं नांव ऐकून मनांत निर्माण झालेल्या अपेक्षा तोकड्या पडून माझा तसा पराभव झाला होता, तर इथं हा असा झाला होता.

मग चौकांतून थोडं पुढं चालून गेल्यावर गंगेकांठीं आलों. पाणी कमी होतं

आणि जें होतं त्यालासुद्धां गति नव्हती. आम्ही मग एक होडी ठरवली आणि तिच्यांत बसून गंगेकांठचे घाट बघायला निघालों. होडी मुंगीच्या पावलांनीं सरकूं लागली.

राजेशाही घाट, भद्रवर्गीय घाट, गरीब घाट. पुढं आलेले आणि मागं गेलेले घाट. खचलेले, पिचलेले, सुस्थितींत असलेले घाट. कांठावरच्या उंच इमारती. दूर दिसणारा एकच मनोरा. आपला सहकारी वयोवृद्ध होऊन धरतीवर कोसळला म्हणून उदासवाणा वाटणारा, एकटाच राहिलेला...

घाटांना लागून पाण्यांत तरंगणाऱ्या होड्या. आंत छपरी असलेल्या, छपरी नसलेल्या. रंग देऊन सजवलेल्या आणि नुसत्या पाण्यानं काळपटलेल्या लांकडांच्या. तागानं आणि घासगवतांच्या भाऱ्यांनीं भरलेल्या. मध्येंच पाण्यांत तरंगत्या तराफ्या-वर बंदिस्त छपरी, पत्र्यांची उभी केलेली. बायकांना कपडे बदलतांना संकोच वाटूं नये म्हणून ठेवलेली. पण त्या अवस्थेंतल्या स्त्रिया दिसणं बंद झाल्यामुळं जेवढं सौंदर्य गमावलं असेल त्याच्या शतपट विद्रूपता तें कावेच्या रंगाचं हिडीस ढबडं उभं केल्यामुळं आलेली. उपयोगिता आणि सौंदर्य यांनीं एकमेकांच्या हातांत हात कां घालूं नये?...

घाटांना अंत नव्हता. हरिश्चंद्र घाटाच्या दिशेला आम्ही जात होतों. अहिल्या-देवी घाट, दरभंगा घाट, मुनशी घाट, सरस्वती किंवा श्रुति घाट आणि किती तरी घाट. माहिती सांगायला बरोबर आलेला एक पंड्याजी सांगत होता, "अगडम् बगडम् सब कुल मिलाकर गंगाजीके किनारेपर तीन सौ साठ घाट हैं."

पात्राच्या इकडच्या अंगाला उजाड भूभाग होता. उन्हानं उजळलेल्या पात्रांत काळेभोर दिसणारे दोन बांबू एकापुढं एक तरंगत स्थिर होते. त्यांवर शेवाळं, कीं निर्माल्यांचे थर जमले होते. कुठून तरी पक्षी येऊन त्यांवर बसत होते, उडत होते, पुन्हां बसत होते...

सूर्य माथ्यावर आला होता आणि मला संध्याकाळ हवी होती. संध्याकाळीं हाच गंगाकांठ माणसांनीं फुललेला, गजबजलेला सुंदर दिसला असता. मावळत्या सूर्यानं याच भागावर जादूचा हात फिरवला असता आणि डोळ्यापुढं मायानगरी उभी केली असती. मग दरभंगा महाराजांच्या वाड्याच्या नितळ दगडी भिंतीवर डकवलेली 'लडकी'ची जाहिरात डोळ्यांत खुपली नसती, 'लक्ष्मी अगरबत्ती खरीदिये' किंवा 'मोटर ड्राइवरी सीखिये' असं कुणी डोळ्यांत बोटं घालून सांगितलं नसतं, भिंतीवरून बटबटीत अक्षरांत 'इस घाटपर साबुन कपडेपर लगाना मना है' असा कुणी उगीचच इशारा दिला नसता, आणि निरोगी माणसालासुद्धां असंख्य रोगांवर

अमुक अमुक औषधं घ्या असा होणारा आग्रहदेखील चुकला असता.

लहानपणीं इथेंच याच गंगेच्या कांठाशीं मंगलागौरी घाटावर मी पोहायला शिकलों होतों. बिंदुमाधव घाटावरचा घोष मीं ऐकला होता. गंगापूजा किंवा संध्या करण्यासाठीं पाण्यावर बांधलेल्या फळ्यांवरून पळत पळत जाऊन पाण्यांत उड्या घेतल्या होत्या. फार फार वर्षांपूर्वीचं एकादं चित्र उन्हांत राहून विटून गेलेलं पाहावं तसं मला आज वाटत होतं. माझा अपेक्षाभंग झाला होता तरी विरस झाला नव्हता. कारण माझ्या मनश्चक्षूंतलीं तीं दृश्यं शाबूत होतीं. शिवाय, इथं आत्तां रुक्ष असला तरी, अस्ताव्यस्त असला तरी, भव्यपणा होता. मनांत भावना होती फक्त थोडीशी दुःखाची. निसर्गाच्या साहाय्याशिवाय या स्थळाला सुंदर दिसतां येऊं नये याची...

मग थोड्या वेळानं परत वळून उलट्या क्रमानं तेच घाट घेत होडी दशाश्वमेध घाटाजवळच एका निवांत जागीं थांबली. मंडळींची स्नानासाठीं लगबग सुरूं झाली. मी होडीच्या छतावरच बसून राहलों.

बायकोनं विचारलं, "स्नान नाहीं करणार?"

मीं नकार दिला.

"एवढ्या पुण्यक्षेत्रांत आलांत..."

मी हसलों आणि म्हटलं, "या पुण्यगंगेंत स्नान करण्यासाठीं तुम्हीं साबण काढले आहेत!"

बायकोनं मान वेळावली व म्हटलं, "काय बोलणं पाहा!"

"आणि पवित्रतेचं म्हणत असशील तर प्रत्यक्ष हिमालयांतल्या धो धो वाहणाऱ्या स्वच्छ गंगेंत इतक्या ठिकाणीं साबण न लावतां मी स्नानं केलीं आहेत, कीं आतां या पाण्यानं शुद्धि होण्यासारखं या देहांत कांहीं राहिलंच नाहीं. आधींच तें प्रवासानं मळलेलं आहे, तें अधिक घाण करायची मला इच्छाच होत नाहीं."

"तुमच्याशीं वाद घालण्यांत अर्थ नाहीं." अशा अभिप्रायानं बायकोनं नाद सोडून दिला.

तिच्या म्हणण्याला अंशतः मान देण्यासाठीं गंगेच्या चारपांच बिंदूंनीं, संध्येंतल्यासारखं 'अघमर्षण' फक्त शेवटीं केलं.

मग तीन प्रहरीं अरुंद व अस्वच्छ बोळांतून विश्वेश्वराच्या देवळांत गेलों, तेव्हां दर्शन घेतलं व नमस्कारहि केला. त्या नमस्कारांत लाकडीपणा होता आणि लहानपणीं झालेल्या संस्कारांवर विवेकाचीं पुटं चढलेलीं होतीं, तरी त्यांना थोडे तडे गेले. हिरव्यागार बिल्वपत्रांच्या राशीवर वरच्या मोठ्या कलशांतून टपकणारे

पाण्याचे थेंब पाहून जुन्या संस्कारांचे स्निग्ध रस स्वतःला नकळतच थोडा वेळ झरूं लागले. मग स्वतःचंच हसूं आलं, पण तें देवळाच्या बाहेर पडल्यावर. विचार आला, हे अवशेष किती दिवस टिकणार? वातावरण संपूर्ण बदलेपर्यंत? भाऊ, बहीण, मित्र, मैत्रिणी यांचा देवदेवतांच्या नांवानं उल्लेख करतां आहांत तोंपर्यंत?...

श्रीकृष्ण धर्मशाळेंत परत आलों, तों आंतल्या अंगणांत तिबेटी नृत्य चाललं होतं. तीन तरुण मुली, एक म्हातारा व दोन तरुण. अंगविक्षेप आणि फेऱ्या. पायांची झटकेबाज हालचाल. तरुणीच्या हातांत सारंगीसारखं गजतांतीचं वाद्य, एकाच्या हातांत डफ, त्याच्या दोन्ही अंगांना कातडं, प्रश्नचिन्हासारख्या वाकवलेल्या एका वेताच्या छडीच्या टोकाला बांधलेला बोराएवढा, चिमुकला चिंधीचा गट्टू आणि त्यानं डफावर धरलेला ठेका. देहाती रांगडं नृत्य, लोकांचं रांगडं गीत आणि बालिश चर्या.

समजत कांहींच नव्हतं तरी लहान मुलांच्यासारखे त्या नृत्यानं माझे पाय अस्थिर झाले आणि काळजांत कबुतरं फडफडूं लागलीं. स्वतःच्या जीवनांत स्वतःला विसरून असं लोकरंजन करायला संधि मिळत नाहीं म्हणून कीं काय, कुणास ठाऊक!

तें लोकनृत्य संपलं तसा चौपाईवर बसलेला कुणी तरी धर्मशाळेचा अधिकारी, पलीकडे सुतारकाम चाललं होतं तेथल्या सुताराला म्हणाला, "इन लोगोंको लकडी दे दो!" त्या मंडळींनीं आपल्या सोग्यांतून रंधा-भुस्सा गोळा केला.

आमच्या मंडळींची कांहींशी माझ्यासारखीच अवस्था झाली असली पाहिजे. एकानं चार आणे त्या मंडळींना दिले आणि पुन्हा एकदां काळजांतल्या कबुतरांची फडफड झाली. तृप्ति आली होती व थकवाहि आला होता.

सूर्य मावळला तो बनारस छावणी स्टेशनावरच्या निवांत फलाटावर असतांना. धूसर वातावरण. क्षितिजापाशीं आकाशांत काळाभोर पट्टा आणि त्यांत दिसणारं लालभडक व चपटं सूर्यबिंब. हवेंत गारठा.

डब्यांत उजेड होता. जागा ऐसपैस मिळाली होती. भोंवतालीं मराठी भाषा ऐकूं येत होती. निवारा होता. ऊब होती. गाडी सुटल्यावर कांहीं वेळानं गंगेवरचा पूल घोंघावला. पेंगुळलेल्या डोळ्यांनीं शांत, स्थिर असणाऱ्या गंगेचं आणि दूर दिसणाऱ्या बनारसी दीपांचं दर्शन घेतलं.

गाडी कलकत्त्याकडे 'शोनार बांगला'मध्यें जायची होती. शरद्‌बाबूंची आठवण झाली होती आणि पेंगतां पेंगतां बंगाल पाहण्याची उत्कंठा वाढत होती...

# ऊब आणि गारठा

दिवस रविवारचा आहे. रविवारीं मी सहसा लवकर उठत नाहीं. पण आज लवकर उठलों आहें. अद्याप उजाडलंहि नाहीं तरी मी स्नान आटोपून घरांतून बाहेर पडलों आहें. मी पांढरपेशाच्या घरीं जातों. तो अंगांत कपडे घालून तयार आहे. तो म्हणतो, "आलों हो! एका मिनिटांतच!" मग त्याच्या घरांत न जातां फाटकाशीं उभा राहतों.

पांढरपेशाचं खरं नांव वेगळं आहे. त्यानं 'पांढरपेशांचें जग' नांवाचं पुस्तक प्रसिद्ध केलं आहे, त्यामुळं आणि तेव्हांपासून त्याची-माझी ओळख झाली. त्याच्या नांवांत दोन 'ज' शेजारीं येतात आणि ते उच्चारायला जिभेला जड जातं. म्हणून आतांपर्यंत त्याचा 'पांढरपेशा' या सुटसुटीत नांवानंच उल्लेख करीत आलों आहें.

जंगलीमहाराज रस्त्यावर अद्याप वर्दळ सुरू झालेली नाहीं. एखाददुसरा सायकलवाला रेंगाळत जातो. रिकामी रिक्षा इकडून तिकडे जाते. मध्येंच बस् येते, थांबते आणि माझ्यासमोरून पुढं निघून जाते. तिच्यांत दिवे लागलेले आहेत, ऊब आहे. हवेंत गारठा खूप आहे; पण ती ऊब पाहून माझं मन उल्हसित होतं.

मी दोनचार मिनिटंच उभा आहें. पण तेवढ्यांत चार-पांच, चार-पांच, अशा गटांनीं किती तरी चिमण्या माझ्या शेजारून किलबिल करीत जातात. आज या साऱ्या मुलींची कुठं तरी सहल निघालेली दिसते, असं मनाशीं म्हणत त्या मुलीं-कडे मी पाहत राहतों. पंधरासोळांच्या आसपास असलेल्या त्या मुलींचं निरागस बोलणं आणि हास्य ऐकून मला वाटूं लागतं, आजचा दिवस छान जाणार. त्या सर्व मुली देखण्या आहेत असं नाहीं, पण त्यांच्या चालण्यावागण्यांत ताजेपणा आहे.

पांढरपेशा बाहेर येतो आणि आम्ही चालायला लागतों. आमचीं पावलं जरा लगबगीनंच पडतात. आमच्यासमोर पांच मुलींचा एक घोळका चालतो आहे. थोड्याच वेळापूर्वी माझ्या शेजारून तो गेला तेव्हां त्यांतली बदामी रंगाचं पातळ नेसलेली एक मुलगी मला आवडली आहे. तिचं नांव मीं ठरवलं आहे, सुमित्रा सामंत. हेंच नांव कां मनांत यावं? ती मला कारवारी वाटते. तिचे डोळे फार सुरेख आहेत, आणि कारवारकडील स्त्रियांचे डोळे दृष्ट लागण्यासारखे असतात, हें

मला ठाऊक आहे. माझ्या कल्पनेंत असलेली माझी मानसकन्या आतां हेच डोळे घेऊन माझ्याभोंवतीं वावरणार आहे, बोलणार आहे, आपल्या हृद्यांतलीं गुपितं मला सांगणार आहे...

एका दुकानाशीं थांबून पांढरपेशा सिगारेट घेतो आणि दोन-तीन मनसोक्त झुरके मारून म्हणतो, "चला." त्या मुलींच्या आणि आमच्या मधलं अंतर बरंच वाढतं. आम्ही मग संथपणानंच चालायला लागतों···

शिवाजीनगरावर आमच्यांतले प्रथम आलेले आम्हीच आहोंत. नंतर आणखी तिघे येतात. आम्ही गप्पा मारीत राहतों. मग मेल येते आणि आम्ही तिच्यांत चढतों. आमच्यांतले अनेक जण पुण्यावर गाडींत चढले आहेत. कोण कोण आहेत तें मी एकदां बघून घेतों. वसुंधरा पटवर्धन नाहींत, व्यंकटेश माडगूळकर नाहींत, त्याचप्रमाणं नाना गोरेहि आलेले नाहींत. गोरे आणि वसुंधराबाई येणार नाहींत हें आधींच कळलेलं होतं; पण माडगूळकर नक्की येणार होते. एका गोष्टींत, हरवलेल्या रत्नांपैकीं जीं सांपडलीं, त्यांच्यापेक्षां जीं सांपडलीं नाहींत तींच रत्नं अधिक मौल्यवान् होतीं, असं म्हणत दुःख करीत बसणाऱ्या मारवाड्यासारखी क्षणभर माझी स्थिति होते.

माडगूळकरांच्या गप्पा विलक्षण ऐकण्याजोग्या असतात. त्यांत केव्हां, काय येईल याची कल्पना नसते. त्यांत फांसेपारधी असतील, माकडं पाळणाऱ्यांचं जीवन येईल, कल्पना येणार नाहीं इतक्या दूर अंतरावरच्या चाहुलीवरून सावज ओळखणारे रानवट अडाणी शिकारी येऊन जातील, एक ना दोन. आम्ही सारे जण पहिल्यांदा जमलों होतों तेव्हां ते बनगरवाडी लिहीत होते. त्यांतले अनेक प्रसंग त्या दिवशीं गप्पा मारतां मारतां त्यांनीं सांगितले होते. उभ्या आयुष्यांत जमिनीला पाठ न लावलेला काकूबा धनगर, बुचड्याचे रुपये, स्वतःचा खांदा जुंपून टिपण ओढणारी शेकूची बायको...साऱ्या हकीकती आम्ही ऐकत गेलों होतों आणि कुठल्या तरी अपरिचित विलक्षण भागांतून प्रवास केला होता.

पण तेवढंच नव्हे! प्रत्यक्ष प्रवासांत जें गवसलं नसतं असंहि कांहीं तरी त्यांत होतं. 'माडगूळकर' या व्यक्तीच्या प्रकाशाचे झोत त्या बनगरवाडीवर पडले होते आणि दैन्यानं ओसंडून जाणारं तें खेडं वेगळंच वैभव घेऊन कलाकृतीचं रूप धारण करीत होतं...

हें सगळं आज हुकलं आहे.

शिवाय, आज आम्ही रानावनांतून हिंडणार आहोंत. व्यंकटेश माडगूळकरांकडून

झाडांचा आणि पांखरांचा परिचय मला करून घ्यायचा होता. मीं झाडं अनेक बघितलीं आहेत, पक्षीदेखील पुष्कळ बघितले आहेत. पण शहरांतून दिसणाऱ्या ढोबळ झाडांपक्ष्यांखेरीज इतरांचीं नांवं मला टाऊक नाहींत. ही संधि हुकल्यामुळं पण मला हिरमुसल्यासारखं झालं आहे.

पण हवेंत गारठा आहे आणि ऊनहि स्वच्छ पडलं आहे. गाडी सोसाट्यांत जाते आणि मन प्रफुल्ल झाल्यावांचून राहत नाहीं. वाटेंत एका ठिकाणीं जांभळसर राखी रंगाचीं कणसं किंवा तुरे असलेलीं पिकं दिसतात. अशींच पिकं, अशींच दुरून मीं अनेकदां बघितलीं आहेत. तो मला ऊंस वाटे, पण तुरे-कणसं येणारा ऊंस मीं कधीं ऐकला-बघितला नव्हता. माझ्या शेजारच्यांना मी शंका विचारतों. त्यांना माहिती आहे. ते म्हणतात, हा ऊंसच, पण पिण्याच्या रसाचा नव्हे. तो वेगळा असतो. हा गुळाचा, साखरेचा. यांत साखरेचा अंश पुष्कळ असतो. आणि मुरमाड जमिनींतदेखील याची पैदास चांगली होते. आपल्याकडे याचं संशोधन व प्रयोग पुष्कळ झाले आहेत. आपल्याकडे म्हणजे महाराष्ट्रांत...

गाडी जोरांत चालली आहे. मधल्या मामुली स्टेशनांकडे ती ढुंकूनहि पाहत नाहीं. तिला लोणावळ्याची ओढ लागली आहे. वाटेंत तिच्याकडे पाठ करून, लाजून उभे राहिलेले सिग्नल तिला भेटतात, त्यांना बगल देऊन ती पुढंच जाते. लोणावळा आल्याशिवाय ती थांबणार नाहीं.

लोणावळ्याला गो. नी. दांडेकर गाडींत चढतात. त्यांना मी आजच प्रथम बघतों आहें. त्यांची शितू मीं वाचली आहे आणि पडघवली पण क्रमानं वाचतों आहें. गाडी थोडा वेळ थांबते आणि मग निघते. थोड्याच वेळांत खंडाळाहि येतो. आम्ही सारे जण उतरतों. गाडी पुढं निघून जाते. बरोबर नऊ वाजले आहेत.

आम्ही फलाटाच्या अलीकडेच रूळांशेजारीं उभे आहोंत. ऊन चांगलं पडलं आहे. पण वारा गार सुटला आहे, तो झोंबरा आहे. म्हणून सावली टाळीत मोकळ्या जागेंतल्या उन्हामधूनच आम्ही चालायला लागतों.

अखेरीस आमचं हें कथाकार मंडळ खंडाळ्याला पोचलं आहे. साधारणपणें महिन्याच्या पहिल्या रविवारीं आमच्यांतल्याच कुणाच्या तरी घरीं दुपारीं साडेतीन-चारच्या सुमाराला आम्ही जमतों आणि त्याच्या आतिथ्याचा आस्वाद घेत घेत गप्पा मारतों. वाटेल त्या गप्पा, वाटेल त्या विषयावरच्या गप्पा. एकमेकांचे अनुभव, एकमेकांच्या शंका, एकमेकांपुढील समस्या, एकमेकांचीं सुखं आणि दुःखं. कधीं कधीं एकदोन पाहुणेहि आलेले असतात. साहित्याशीं कोणत्या ना कोणत्या

तरी नात्यानं संबंध आलेल्यालाच आम्ही बोलावतों. आमच्या या मंडळांत पुरुष आहेत, स्त्रिया आहेत. नव्या पिढींतले कथाकार आहेत, तसेच जुन्या वळणाचेहि आहेत. प्रतिष्ठा पावलेले आहेत, होतकरू आहेत, व्यवसाय म्हणून लेखन करणारे त्याचप्रमाणं कथालेखनाला आपल्या जीवनाचा एक पैलू मानणारेहि आहेत...

आज आम्ही खंडाळ्याला आलों आहोंत. आज प्रत्येक जणच यजमान. फार काय, पाहुणे आले आहेत, तेहि यजमान आहेत.

बिऱ्हाडाच्या जागीं पोंचल्यावर आमचा चहा होतो. चहाच्या चवीशीं आम्हांला कर्तव्य नाहीं. त्या निमित्तानं एकत्र बसून आम्हांला हसायला, खिदळायला, भरपूर गलगा करून घ्यायला मिळतं. शास्त्रीबुवा आलेले नाहींत, पण ते मुंबईहून यायचे आहेत. त्यांच्या गाडीला दहा मिनिटांचा अवधि राहतो, तेव्हां आम्ही दोघेचौघे उठतों आणि स्टेशन गांठतों. गाडींतून शास्त्रीबुवा सपत्नीक उतरतात. आम्ही सगळे जण मग परत बिऱ्हाडीं यायला निघतों.

वाटेंत एक जण माझ्याजवळ येऊन म्हणतात, "लक्ष असूं द्या. बॅग हातांत घेऊन चाललों आहें! उल्लेख यायला पाहिजे!"

मला हसूं येतं. याच रस्त्यानं थोड्या वेळापूर्वी आम्ही जात होतों, तेव्हां गोखल्यांनीं माझ्याकडे पाहत सर्वांना बजावलं होतं, "आज कांहीं विशेष बोलणार, करणार असाल, तर हे आसपास आहेत कीं नाहींत तें पाहून घ्या. कारण आजचा वृत्तांत ते लिहिणार आहेत!"

मी पुन्हां एकदां हसतों. सगळं थट्टेंतच चाललं आहे. कारण, प्रत्येक जण आपापल्या परीनं स्वयंसिद्ध आहे. वृत्तान्तांत आल्यानं कुणाचंहि नांव अधिक जड होणार नाहीं, किंवा तें नाहीं आलं तर अपुरेपणाहि राहणार नाहीं. शिवाय, मी लिहिणार आहें कीं नाहीं तेंहि मला अजून ठाऊक नाहीं. तथापि मला वारंवार डिंचवून मात्र घ्यावं लागणार आहे असं दिसतं. मी अंगावर गेंड्याचं कातडं जमवायचा प्रयत्न करतों आहें.

थोड्या वेळानं आम्ही भटकायला बाहेर पडतों आणि खोपवलीच्या रस्त्यानं रमतगमत रेंगाळत चालायला लागतों. वारा आतां भणाभणा वाहतो आहे आणि आजूबाजूचीं झाडं होलपटून निघताहेत. मध्येंच एकाची उन्हेरी टोपी उडते आणि कुठल्या कुठं घरंगळत जाते. गो. नी. दांडेकर धांवतात. आणि ती परत आणून देतात. मला कुणी तरी बजावतं, "हें लक्षांत असूं द्या."

एक जण म्हणतात, "आम्ही कॉलेजांत असतांना एका प्राध्यापकाच्या तासाला

फक्त मुली नि अति अभ्यासू मुलं बसत. पण मग एकदां बातमी आली, कीं यंदाच्या परीक्षेला ते परीक्षक नेमले गेले आहेत. लागलीच हजेरी शंभर टक्के झाली. त्याच जातीचा प्रकार आहे हा!"

याकडे कुणीच लक्ष देत नाहीं. वाटेंत तिघेचौघे उभे राहिलेले मला दिसतात. मी तिथें पोंचेपर्यंत ते हलत नाहींत. मी जवळ पोंचतांच ते म्हणतात, "या! तुमचीच वाट पाहत होतों." मी पाहतों, तों एखाद्या शिकाऱ्याच्या ऐटींत प्रधान एका सापाच्या डोक्यावर पाय देऊन उभे! कुणी तरी म्हणतं, "साप मारला आहे!" आणखी मंडळी जमा होतात. तं फुरसं असल्याची माहिती मिळते. मराठी साहित्यांतला फुरशाचा इतिहास डिंवचला जातो. मग एक जण त्या सापाला हातांतल्या काठीनं हलवतो, पण त्याच्या शरीराच्या लाटा अभंग राहतात. त्याचं लाकूड झालेलं आहे. आधींच कुणी तरी तो मारलेला आहे. एकदां सगळे जण हसतात आणि मग पुढं चालायला लागतों.

वारा विलक्षण वेगानं वाहतो आहे. रस्त्याच्या कडेला ज्या टेलिफोनच्या तारा आहेत त्यांतून तर तो अगदीं भणाणतो आहे. तोल संभाळून जागेवर उभं राहणं-देखील कठीण होऊन जातं. झुडुपाची एखादी ढापी हातांत उंच धरून हाताची पक्कड सोडून दिली तर ती ढापीदेखील सगळीच्या सगळी कागदाच्या कपट्या-सारखी अधांतरीं तरंगत भिरभिरत कुठल्या कुठं जाऊन पडते आहे! आमच्या उजव्या अंगाला खोल भयानक दरी आहे. वारा तिकडूनच येतो आहे. अगदीं कड्यावर जाऊन अंग पुढं झुकवलं तरी खालीं दरींत कोसळणं अशक्य होईल इतका वाऱ्याचा जोर वाटतो आहे.-तो वारा आम्ही भरपूर पिऊन घेतों.

मग रस्ता काटकोनांत वळण घेतो आणि एकदम भरमसाट उतार सुरू होतो. घोटीव नितळ रस्त्यावरून झुलतझुलत जायला मजा येते, पण कांहीं जणांची प्रकृति आज थोडी नादुरुस्त आहे, म्हणून खालीं रिव्हर्सिंगपर्यंत जाण्याचा बेत रहित होतो. मग परत वर जाऊन, वळणापाशीं रस्ता सोडून, पलीकडे सपाटीवरच वाघजाईचं देऊळ आहे त्याच्यावरून थोडं पुढं होऊन, एका वृक्षाच्या सावलींत आम्ही बसतों. चारसहा पावलांपलीकडे दरी आहे. तिच्यांत मध्येंच एक टेकाड खूप वर आलं आहे, ती 'वानरटेकडी'. तिच्या पायथ्याला घाशीत आगगाडीचे रूळ गेले आहेत आणि त्यांना एका पहाडानं आपल्या जबड्यांत गिळून घेतलं आहे. आमच्यासभोंवतीं गवत आहे, झाडं आहेत, झुडुपं आहेत, सावली आहे...ऊबहि आहे नि गारठाहि आहे...

सिगरेटी पेटतात, पानाचा डबा खुला होतो, तंबाखूचे बार भरले जातात. प्रत्येकाला वाटतं, आपल्या हृदयाचा वेध घेईल असा कांहीं तरी विषय निघायला हवा. तो विषय कोणता तें कुणी सुचवीत नाहीं, कुणाला सुचत नाहीं. मग कुठले तरी कपटे वाऱ्यानं रस्त्यावरील गदळामधून वर उधळावेत, थोडा वेळ तरंगून मग कुठं तरी भलतीकडे पुन्हा गदळांत पडावेत, तसं होतं. दिवाळी अंकांत येऊन गेलेल्या एका विनोदी लेखाची कुणाला तरी आठवण होते, त्यांतल्या गंमती तो खुलवून सांगतो; मग दुसऱ्याला त्याच लेखांतला आणखी वेगळा भाग आठवतो, तो त्याचं रसग्रहण करतो. आणि मग तिसराहि तेंच करतो, चौथाहि तेंच करतो. हा लेख अशा रीतीनं खिळखिळा करून झाल्यावर गाडी, कशी कुणास ठाऊक, केशवपनावर घसरते आणि हा अभद्र विषयहि थोडाबहुत ओढला-ताणला जातो. मंडळी कंटाळतात. मग फोटो काढण्याची कल्पना निघते. जरा पलीकडे एका मोकळ्या जागेवर आम्ही सगळे जाऊन बसतों. मांडणी बदलून दोन फोटो होतात, मंडळी उठतात व कपडे झटकूं लागतात. सर्वांच्याप्रमाणं माझ्याहि विजारीला कुसळं लागलीं आहेत, तीं टोचताहेत, तीं मी सर्वांच्याप्रमाणेंच वेचून काढून टाकूं लागतों…

दूर पलीकडून एक तरुण आणि तरुणी हातांत हात घालून त्यांना झोले देत झाडांच्या निर्जन राईंतून कुठून तरी येतात, पलीकडेच कुठं तरी जातांना दिसतात आणि मग दृष्टीआड होतात. आमच्या अस्तित्वाची त्या निवांत आणि निर्जन भागांत त्यांना जाणीव नाहीं. मोपासांच्या गोष्टींतल्यासारखं तें दृश्य पाहून कुणाच्या तरी काळजांतून कळ निघून जाते आणि उद्गार निघतो, "कथेचा विषय चालला आहे, तो पाहा!" आणखी अनेकांच्या काळजांतून तशीच कळ निघून जाते. वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळ्या तीव्रतेची. कुणीच कांहीं बोलत नाहीं. कुणालाच चर्चा नको आहे. एकदोन निःश्वास मात्र निघतात…

माझ्या मनाला हुरहुर वाटते आहे. कशाची कुणास ठाऊक!

परतीच्या रस्त्यानं आम्ही जातों आहोंत, पण परत नव्हे. वाटेंत कुठं तरी आम्ही थांबणार आहोंत. आणखी फोटो काढणार आहोंत. आजचा दिवस अद्याप रंगलेला नाहीं. तो रंगायला हवा, पुष्कळ दिवस लक्षांत राहील असा रंगायला हवा, असं प्रत्येकाला वाटतं आहे. त्यासाठींच हा एक प्रयत्न.

रस्त्यावरून मोटारी जाताहेत, येताहेत. मालवाहू मोटारी, खटारे झालेल्या मोटारी, श्रीमंतीची झळाळी असलेल्या मोटारी. एखादीवर फाटका माणूस

बसलेला दिसतो; एखादीच्या चिमुकल्या पेटींत कांचेआड सौंदर्याचं कवच तोंडावर चढवलेली तरुणी बसलेली आहे, तिच्या शेजारीं तिचा मालक आहे. हास्य, पैसा, निश्चितता, बेपर्वाई. एखादी मोटार नादुरुस्त होऊन रस्त्यांतच थांबलेली दिसते. तिच्या पोटाखालीं कुणी तरी उताणं पडलेलं आहे, त्याचे पायच फक्त जाणारा-येणाराला दिसतात. मध्येंच एखादा सहलीला आलेल्या शाळकरी मुलामुलींचा थवा येऊन जातो. त्यांचा गलका वाढत वाढत ऐकूं येतो आणि मग तो मंदावत जातो. आम्ही त्यांच्यांत नाहीं, ते आमच्यांत नाहींत.

आम्ही रेंगाळत चाललों आहोंत. विरळ होऊन, पांगून चाललों आहोंत. याच विरळपणाच्या गटांतून आपापल्यापुरत्या गप्पाहि चालू आहेत. त्या आमच्या घरींसुद्धां होऊं शकल्या असत्या.

उजव्या हाताला एक दगडी कुसूं लागतं, त्याच्या आंत डगर आणि तिच्यावर एक उंबराचं पसरलेलं झाड आहे. कुणी तरी म्हणतं, "त्याच्याखालीं जाऊन बसूं या." सगळे जण कुसवावरून उड्या मारून आंत जातात. पानाचा डबा, तंबाखू, सिगरेटी. पण गाडी रुळावर येत नाहीं. मी मनाशीं म्हणतों, "माणसाचं मन रमायला रम्य जागेची रमणीयता पुरी पडत नाहीं; आणखी कांहीं तरी हवं आहे. काय?...काय?..."

कुणी तरी सरिता पदकी यांना कांहीं तरी म्हणायला सांगतं. त्यांची अवस्था अशीच कांहींशी झाली आहे कीं काय कुणास ठाऊक, पण आणखी आग्रह झाल्यावर त्या काढतात एक हिंदी गीत. परंतु वाऱ्याच्या झोतांत त्या गीताच्या चिरफळ्या होतात, त्यांना मोठ्यानं म्हणावं लागतं आणि मग एका कडव्याच्या वेळीं तर त्यांचा आवाजच चढेनासा होतो व त्या तें गीत अर्धवटच वाऱ्यावर सोडून स्तब्ध होतात.

कुणीच कांहीं बोलत नाहीं.

मग कुणी तरी गो. नी. दांडेकरांना कांहीं तरी म्हणा म्हणून सांगतं. ते म्हणतात, "ठीक आहे. एक धनगराचं गीत म्हणतों, मग 'यशोधरा' ही संगीतिका म्हणेन, नंतर वंजाऱ्याचं गीत." सगळे जण मान्यता देतात. वारा आतां पुष्कळ कमी झाला आहे.

रांगड्या भाषेंतलं तें धनगर-गीत अनेक ओळींची पुनरुक्ति असूनहि रंगतं. वाहवाचे उद्गार निघतात, टाळ्याहि वाजतात. त्या थांबल्यावर गो. नी. म्हणतात, "आतां यशोधरा म्हणतों."

संगीतिका म्हणजे साहजिकच दीर्घ असणार. शिवाय हे ती कशी म्हणणार आहेत कुणास ठाऊक, या विचारानंच बहुधा एकदोन विरोधी पण सौजन्याचे सूर निघतात, "त्यापेक्षां वंजाऱ्याचंच विवाहगीत म्हणा" असाहि आग्रह होतो; पण गो. नी. म्हणतात, "तें नंतर म्हणेन."

ते सुरुवात करतात आणि मग काय नि कसं होत जातं तें कुणाला कळतसुद्धां नाहीं. पण आम्ही सगळे जण एकाएकीं मगधदेशांत जातों. गौतमाच्या राजवाड्यांतल्या दोन दासी आमच्यापुढं येऊन उभ्या राहतात आणि आपापसांत बोलायला लागतात. श्यामा जवळच उभी आहे आणि ती यशोधरेची बालसखी आहे हें समजतांक्षणीं त्या बावरतात. आपल्याला आतां यापुढं संभाळून वागायला हवं याची त्यांना जाणीव होते. तेवढ्यांत यशोधरा येते. तिचं तोंड कोमेजलं आहे, मुद्रा उदास आहे. श्यामा तिला विचारते, "गोपे, असं कां?" यशोधरा म्हणते, "माझ्या मनाची व्यथा, कुणाला सांगणार मी? ती कुणाला पटणार? नाथ मला सोडून तर जाणार नाहींत? माझ्या संसाराची कथा दुःखान्त तर होणार नाहीं? ही काळजी माझ्या काळजाला आतांशा रात्रंदिवस जाळीत असते."

तेवढ्यांत गौतम येतो. त्याच्याहि मनांत हुरहुर आहे. दुःख म्हणजे काय? सुख म्हणजे तरी काय? किती समस्या! किती कोडीं! यांचीं उत्तरं कधीं सांपडणार आहेत का?

यशोधरा आणि राहुल यांचा त्याग करून गौतम निघून जातो. पति योगसाधनेला गेला तो आपल्याला टाकून; आपल्याला मुक्तिमार्गातला अडथळा मानून. तिचं सारं जीवनच काळवंडून गेलं आहे. राहुलाला हृदयाशीं धरून ती शोकांत मग्न आहे; दुःख सहन करते आहे, गिळते आहे. स्त्रीजन्माच्या वांट्याला येणाऱ्या दुर्दैवाला दोष देत ती गौतम परत येईल म्हणून वाट पाहते आहे.

तिला सात वर्षं वाट पाहावी लागते. गौतम आतां परत आला आहे. आपल्या जीवनांत आतां सारी मंगल दीप्ति भरून राहणार याची तिला धुंदी चढते आहे!...

पण हाय रे दैवा! गौतम परत आला आहे तो विरागी होऊन! आतां त्याला संसार वर्ज्य. मिरवणूक येते आहे, हे सारे घोष तिला ऐकूं येताहेत. तिचं मन बधिर होऊन जातं.

सिद्धार्थाची भेट व्हावी ही तिची फार इच्छा आहे; पण ती मानी, आपणहून भेटीसाठीं त्याच्याकडे जायला ती राजी नाहीं. आपले अश्रु गौतमानं येऊन पुसावेत अशी तिच्या मनाची मागणी आहे.

आले! बुद्धदेव आले! यशोधरेची इच्छा पूर्ण झाली. शिवाय त्यांनीं आपल्या यशाचं सारं श्रेय यशोधरेला दिलं...

गो. नी. म्हणत होते. स्वतः लिहिलेलं, त्यांना तें मुखोद्गतहि होतं....

यशोधरा धन्य झाली! तिनं आपलं तनमनधन गौतम सिद्धार्थाच्या स्वाधीन केलं. पण वेगळ्याच पातळीवरून...

संगीतिकेचा शेवट "धम्मं सरणं गच्छामि। संघं सरणं गच्छामि।" या पुन्हा पुन्हा म्हटलेल्या धीरगंभीर घोषांत होतो, तेव्हां आम्ही सगळे भारावून गेलों आहोंत. आगळ्या विश्वांतून, आगळ्या काळांतून आणि आगळ्या वातावरणांतून आमचा प्रवास झाला आहे. गो. नी. नीं ही सारी संगीतिका विलक्षण तन्मयतेनें म्हटली आहे. टाळ्या वाजवायचंहि कुणाला भान राहत नाहीं. त्याची जरूरीहि नाहीं.

आम्ही सारे जण थोडा वेळ स्तब्धच राहतों.

इतक्यांत पलीकडे रस्त्यावरून झपाझप चाललेल्या दोन व्यक्ति आम्हांला पाहतात. त्यांच्या आनंदाचा चीत्कार आमचं लक्ष वेधून घेतो. मेधा गुप्ते आणि तिचे वडील प्रभाकर गुप्ते. तीं आमच्याबरोबर यायचीं होतीं, पण त्यांची गाडी थोडक्यांत चुकली. मग नंतरच्या लोकलनं तीं आलीं; परंतु लोणावळ्यापर्यंतच. तिथून मग तीं चालत खंडाळ्याला आलीं आणि आमचा शोध घेत भटकत राहिलीं. वाघजाईच्या देवळाशीं त्यांची-आमची थोडक्यांत चुकामूक झाली. इतकी पायपीट झाली आहे तरी मेधा दमल्यासारखी दिसत नाहीं. ती टवटवीत आहे, दुडदुड धावते आहे, पोपटासारखी चिवचिवते आहे. 'देवबाप्पा' तली ही मेधा अजून मोठी झाल्यासारखी वाटत नाहीं आणि तेंच चांगलं वाटतं आहे. आवाजहि तसाच लाडका, तिला चटकन् जवळ घ्यावीशी वाटणारा. मात्र कांहीं शब्द ती वापरते ते तिच्यापेक्षां मोठ्या मुलींच्या तोडीं शोभले असते, असं राहून राहून मनांत येतं. तरी पण ती ते वापरते समर्पकपणानंच. त्याचं कौतुकदेखील वाटतं; परंतु त्याचबरोबर आपल्या बरोबरीच्या मुलींच्याहून ही वेगळी वाढते आहे कीं काय अशी शंका आल्याशिवाय राहत नाहीं.

कमलाबाईंची रोहिणी सकाळपासून आमच्याबरोबर आहे, पण ती इतका वेळ एकटी पडली होती. आतां तिच्याशीं खेळायला, बोलायला, भांडायला मेधा आली आहे आणि आमचं वातावरणहि त्यांच्या किलबिलीनं गजबजून गेलं आहे.

मेधाची लगबग थांबल्यावर मग थोड्या वेळानं वंजाऱ्याच्या लग्नाचं गाणं गो. नी. म्हणतात. त्याला टाळ्या पडतात. मग आम्ही उठतों आणि गप्पा मारीत

बिऱ्हाडीं परत येतों. मंडळी भुकेलेली आहेत.

जेवणाचे पदार्थ कांहीं घरगुती तर कांहीं बाजारी आहेत. पण हें अपरिहार्य आहे. त्याचा कुणालाच खेद नाहीं, अरुचि नाहीं. शहरी वातावरणांत वावरलेलीं आम्ही माणसं. बाजारी खाद्यपदार्थांचा, थोडा कां होईना, प्रत्येकाला सराव आहे. पण मुख्य म्हणजे आम्ही सगळे एकत्र आहोंत याचंच फार मोठं समाधान आणि आनंद आमच्या मनांत आहे.

जेवण झाल्यानंतर सुस्ती येऊन बहुतेकांना लोळायची आवश्यकता भासूं लागली आहे. रस्त्यापलीकडच्या एका बंगलीच्या माडीवरील निवांत खोलींत आम्ही जमतों आणि जमेल त्याप्रमाणं कुणी आडवं होतं, कुणी भिंतीचा आश्रय घेतं, कुणी खुर्चीवर रेलतं, तर कुणी खाटेवर अंग टाकून देतं;—जागा अपुरी आहे तरी प्रत्येक जणानं आपापली सोय करून घेतली आहे. डोळ्यांवर झोंप पेंगुळली आहे, पण एकमेकांच्या सान्निध्यांतला हा अवधि नुसत्या झोंपेंत वायां जावा याला कुणी राजी नाहीं. शिवाय, संध्याकाळची परतीची गाडी गांठायची आहे, तेव्हां मनसोक्त झोंप आतां घरीं गेल्यावरच, हा विचार प्रत्येकाच्या मनांत आहे.

तरी पण प्रत्येकाची अवस्था अवघडल्यासारखी झाली आहे. अनेक अर्थांनीं! वेळांतल्या या पोकळीचं करायचं काय? मग सरिता आणि मंगेश पद्की यांना कविता म्हणायचा आग्रह होतो. दोघं आपापल्या कविता म्हणून दाखवतात. म्हणून म्हणजे वाचून, गाऊन नव्हे. कानालासुद्धां तेंच बरं लागतं. त्यांतल्या ज्या प्रीतिकविता आहेत त्या एकमेकाविषयींच्या आहेत, असाव्यात. त्या ऐकतांना मला गंमत वाटते. मनांत सांखळी करीत विचार येत जातात...प्रीतिकविता आणि प्रीतिपत्रं...प्रीतिपत्रांची वाच्यता...प्रीतिकविता प्रसिद्ध कराव्यात कीं करूं नयेत? ...मग लिहायच्या तरी कशासाटीं?...

या कविता लिहितांना यांतल्या प्रत्येकाच्या मनांत आपला कोणता साथीदार असेल? स्वप्नरंजन करतांना मनश्चक्षूंपुढं उभा राहणारा, कीं आजच्या प्रत्यक्ष जीवनांतला?...

पण यापैकीं कोणतीच शंका मी विचारीत नाहीं. त्यांच्या उत्तरांची खरं पाहिलं तर जरुरीच नाहीं. कवितेकडे ती आहे त्या स्वरूपांतच एखादी स्वयंपूर्ण कलाकृति म्हणूनच पाहायला पाहिजे. आणि तीच दृष्टि ठेवून तिचा रसास्वाद घेतला पाहिजे...

मंगेश पद्की 'हिरव्या माडीखालीं' नांवाची एक कविता म्हणतात. लहानपणीं

गोष्टी खेळतांना म्हटलेलीं फाल्गुनी संप्रदायाचीं यमकं मला आठवतात, त्यांत हिरवी माडी येऊन जात होती. पण हें थोडाच वेळ. कारण त्या कवितेच्या आशयांत मी गुरफटून जातों. कविता चांगली आहे. नंतर थोडा वेळ स्तब्धतेचा बुडबुडा तयार होतो. तो गो. नी. दांडेकर फोडतात, "तुम्ही कविता लिहितां तेव्हां तुम्हांला अनुभव प्रत्यक्ष आलेला असतो, कीं केवळ कल्पनेंतून तुमचं काव्य निर्माण होतं ?"

...अनुभव स्वतःचा किंवा दुसऱ्याचा...त्यांतून मनांत उठलेले तरंग... व्यक्तित्व आणि मनाचा पिंड यांच्या रसायनांतून धुवून, साज चढून निर्माण झालेली कृति...निर्मितीची ही प्रक्रिया सर्वांचीच थोड्याफार फरकानं या रीतीनं होत असली पाहिजे. गो. नी. स्वतः लेखन करतात. त्यांना हा प्रश्न कां पडावा? कीं त्यांना आपल्या अनुभवाचा इतरांच्या अनुभवाशीं पडताळा पाहायचा आहे ? कीं स्वतः ते काव्यनिर्मिति करीत नसल्यामुळं त्याविषयीं त्यांना हें कुतूहल वाटतं आहे ?

त्यांना उत्तरं मिळतात. तपशील वेगळे; पण आशय तोच.

थोडा वेळ मग सटरफटर गप्पा होतात. मग त्यांना कुणी तरी गंभीर वळण देतं आणि प्रभाकर गुत्ते लोकनाट्याविषयीं स्वतःचे विचार सांगतात. लोकनाट्याला पूर्वीं खालच्या वर्गासाठीं असलेलं नाट्य असा अर्थ होता; पण वरपासून खालपर्यंत सर्व वर्गांना समरसतेनं जें नाट्य पाहतां येईल, त्याला लोकनाट्य म्हणायला पाहिजे, या विचाराशीं ते येऊन पोंचले आहेत.

चाळीस सालीं सीलोनच्या एका मंत्र्याची कन्या युरोपच्या सफरीहून परत आली. ती स्पेनमधल्या यादवी युद्धाच्या रणभूमीवर जाऊन आली होती. तिनं चीनमध्येंहि प्रवास केला होता. तिच्या प्रेरणेनं आणि पुढाकारानं हिंदी लोकनाट्य संघाची (Indian Peoples' Theatre) स्थापना झाली. त्यांत काणेकर, मामा वरेरकर, स्वतः गुत्ते, इत्यादि महाराष्ट्रीय मंडळी होती. नाटकं लिहिण्यासाठीं या मंडळींना प्रवृत्त करण्यांत आलं. काणेकर या विषयावर आपण विचार केलेला नाहीं असं प्रामाणिकपणानं म्हणाले, तर मामांच्या बाबतींत वेगळाच अनुभव आला. डांग्यांचं सहकार्य घेऊन कामगारांच्या तक्रारींच्या फायली मामांच्या स्वाधीन केल्या. पण आठ दिवस त्यांचं मंथन करूनहि मामांनीं कांहीं निर्माण केलं नाहीं, किंवा त्यासंबंधांत ते आश्वासनहि देऊं शकले नाहींत. पण मग कामगारांच्या जगांत वावरणाऱ्या सरमळकर नांवाच्या एका कमी शिकलेल्या गृहस्थानं कांहीं मजकूर लिहून आणला.

त्यांत गिरणी होती, कामगार होते, जॉबर होते, त्यांतला एक कामगार आपल्या बायकोचा छळ करीत असे आणि एका जॉबरला तिच्याविषयीं सहानुभूति वाटत असे. इथं नाट्य सांपडलं होतं. ह्याच मजकूर घासूनपुसून त्यांतून 'दादा' नांवाचं नाटक तयार झालं. तें रंगभूमीवर आलं, तेव्हां कामगार मंडळींनीं बहुसंख्येनं तें तन्मयतेनं बघितलं. कामगारच नव्हे तर सगळ्याच थरांतले लोक तेवढ्याच तन्मयतेनं तें पाहतील...

अशा नाटकाला लोकनाट्य म्हणायला पाहिजे, ही गुप्त्यांची भूमिका. आमच्या सर्वांच्या परिचयांतलीं ज्यांना लोकनाट्य म्हणतां येईल अशीं दोन नाटकं त्यांनीं उदाहरण म्हणून सांगितलीं : 'एकच प्याला' आणि 'कीचकवध'.

यावर अर्थातच शंका निघतात. 'दादा' नाटक कामगारांनीं तन्मयतेनं बघितलं हें कबूल, पण सर्वच लोक तितक्याच तन्मयतेनं तें पाहतील असं त्यावरून कसं म्हणतां येईल? त्या वातावरणांत सर्वांना स्वारस्य कसं वाटूं शकेल?

दुसरं कुणी तरी म्हणतं, शिवाय समजा, सर्वांनीं तें तन्मयतेनं पाहिलं, तरी तें केवळ अपरिचितपणाचं पहिलं कुतूहल म्हणूनच. परंतु एकदां बघितल्यानंतर तें कुतूहलदेखील नाहींसं होईल.

माझ्या मनांत आहे, कथानक अमक्या थरांतल्या व्यक्तींसंबंधांतलं आहे ह्या घटनेचा परिणाम तन्मयतेवर होत असला तर तो अगदीं थोडा. मानवी जीवनांतल्या शाश्वत भावांचा परिपोष नाटकांत किती उत्कटपणानं झाला आहे या निकषावरच त्या नाटकाची परिणामकारकता अवलंबून असणार....

पण या चर्चेला शेवट नाहीं. आजहि तो होत नाहीं. शंका निघत राहतात, उत्तरं शोधण्याचा प्रयत्न होत रहतो. अनेक कारणं, अनेक साधनं, सगळीं परस्परावलंबी. नेमकं काय तें कुणाला सांपडत नाहीं.....

आतां गाडीची वेळ होत आली आहे. म्हणून आम्ही झटपट आवराआवर करतों आणि स्टेशनाच्या दिशेनं चालायला लागतों. अंगांत थकवाहि आहे, तशीच सुस्ती पण आहे. तरी पण सूर्याच्या कलत्या उन्हांत आमचीं मनं उजळून निघतात व प्रसन्न वाटतं आहे. एकमेकांच्या सान्निध्यांत दिवस गेल्याचा आनंद मनांत भरून आला आहे.

पण खंडाळ्याचं स्टेशन प्रचंड पहाडाच्या पायथ्याशीं त्याच्याच सांवलींत आहे. इथं सूर्याच्या कलत्या किरणांची ऊब नाहीं. त्याचा माझ्या मनावर परिणाम होतो कीं काय कुणास ठाऊक, मला विलक्षण उदास, एकटं एकटं वाटूं लागलं आहे.

माझ्या मनांत येतं, आमच्यांतला प्रत्येक जण खरोखरीच एकटा आहे. प्रत्येकाला आपला साहित्यिक प्रवास जीविताच्या प्रवासासारखाच एकटेपणानं करायचा आहे. कुणाला फार मोठं यश मिळणार असेल, तर कुणाला नुसतंच दुसऱ्याचं मोठं यश पाहत राहून आपल्या अहंकाराला होत असलेल्या जखमा अंधारांत चाटत प्रवास करावा लागणार आहे. शिवाय ज्याला यश मिळणार असेल, त्याच्या त्या यशालासुद्धां मर्यादा राहणार आहेतच आणि त्याचंहि दुःख त्याला वाहावं लागणार आहे. एकाचं कमी तर दुसऱ्याचं त्याहून अधिक, एवढाच फरक....

आणि काळाच्या रसायनांत कुणाचं यश अभंग राहणार आहे आणि कुणाचं पोखरून निघणार आहे, तें तर सारंच अनिश्चित...

त्या निळ्या सावलीच्या गारठ्यांत माझ्या मनांत आलेले हे विचार मला विलक्षण बेचैन करून सोडतात. गाडी येते, तीसुद्धां निळी आहे. अगदीं गडद निळी.

परंतु गाडीच्या आंतला रंग ऊबदार आहे. पुन्हा मला आम्ही एकत्र आहोंत या जाणिवेची ऊब मिळते. परंतु ती ऊब अगदीं विचित्र आहे. माणसं शेकोटी-भोवतीं बसलीं असतांना शरिराच्या एका अंगाला शेक मिळावा, पण दुसऱ्या अंगाची बाजू मात्र कांकडून जावी, तशी कांहींशी ती आहे.

शिवाजीनगरला उतरून आम्ही चालायला लागतों. मार्ग वेगळे होतात तेव्हां आम्ही निरोप घेतों. हे निरोप खरोखरीच आपुलकीचे आहेत. तरी पण ते घेतांना एकटेपणा अधिकच वाटायला लागतो. वाटूं नये हें मनांत येतं, तरी वाटतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम 23030 वि: 
क्रमांक 239 नों: दि:
१८४८

REFBK-0009747

REFBK-0009747